# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

एम. ए. भाग-२ : राज्यशास्त्र

# दक्षिण आशियातील तौलनिक राजकारण

**(Comparative Politics in South Asia)**

**सत्र ४ : पेपर DSE 34**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०१७

**द्वितीय आवृत्ती :** २०१८

**सुधारित आवृत्ती :** २०२१

**सुधारित आवृत्ती :** २०२३

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-२ पेपर DSE 34

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ३००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-8486-574-5

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र ■**

अध्यक्ष - **डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर
- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. कराड,
  जि. सातारा
- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप जगताप आर्टस कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा ३८४/३८५ आर. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर
- **डॉ. अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली
- **डॉ. रमेश दिनकर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूर शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग दोन च्या राज्यशास्त्र विषयाच्या पेपर DSE 34 सत्र चार साठी 'दक्षिण आशियातील तौलनिक राजकारण' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

दक्षिण आशियातील तौलनिक राजकारण यामध्ये श्रीलंका, बांगला देश, नेपाळ व पाकिस्तान या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभागप्रमुख, नेहरू अभ्यास केंद्र समन्वयक, राज्यशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. वासंती रासम, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. प्रकाश पवार, डॉ. भणगे रविंद्र, डॉ. अशोक चौसाळकर, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. वसंत पाटील व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक तसेच केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. अजितानंद यशवंत जाधव**

इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर



## अभ्यास घटकांचे लेखक


| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **श्री. अनिल डी. पाटील**<br>ओंकार शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज | १ |
| **प्रा. डॉ. अजितानंद यशवंत जाधव**<br>इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा | २, ४ |
| **सौ. श्रद्धा विनोद कोठावळे**<br>सहकारभूषण एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड, जि. कोल्हापूर | ३ |

■ **संपादक** ■

**प्रा. डॉ. अजितानंद यशवंत जाधव**
इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | श्रीलंका | १ |
| २. | बांगला देश | २६ |
| ३. | नेपाळ | ६६ |
| ४. | पाकिस्तान | १३१ |

## विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

**सत्र ४ : घटक १**

# श्रीलंका

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ श्रीलंकेची ऐतिहासिक पार्श्वभूमी
  - १.२.१.१ ब्रिटिश राजवट
  - १.२.१.२ श्रीलंकेची स्वातंत्र्यप्राप्ती
  - १.२.१.३ राज्यघटनेची निर्मिती
- १.२.२ श्रीलंकेतील शासनसंस्था
  - १.२.२.१ कायदेमंडळ - पार्लमेंट
  - १.२.२.२ कार्यकारी मंडळ - अध्यक्ष, पंतप्रधान व मंत्रिमंडळ
  - १.२.२.३ न्यायमंडळ - सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालये
- १.२.३ श्रीलंकेतील समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था
  - १.२.३.१ समाजरचना - जात, वंश आणि अल्पसंख्यांक समुदाय
  - १.२.३.२ सामाजिक चळवळी
  - १.२.३.३ अर्थव्यवस्था आणि विकास
- १.२.४ श्रीलंकेतील समकालीन राजकारण
  - १.२.४.१ पक्षीय राजकारण
  - १.२.४.२ राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडता यासमोरील आव्हाने

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## १.० उद्दिष्टे

या घटकात आपण श्रीलंका (पूर्वीचे नाव सिलोन Cylone) या देशाचा राजकीय इतिहास, राजकीय व्यवस्था, समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था यांचा अभ्यास करणार आहोत. त्याचप्रमाणे समकालीन राजकीय स्थितीचा आढावा घेणार आहोत. या घटकाच्या अभ्यासाअंती आपण–

- श्रीलंकेचा आधुनिक इतिहास समजावून घेणार आहोत.
- श्रीलंकेतील शासनसंस्थेची (कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आणि न्यायमंडळ) रचना व अधिकार समजावून घेणार आहोत.
- श्रीलंकेतील समकालीन सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीचा आढावा घेणार आहोत.

## १.१ प्रास्ताविक

श्रीलंका, बांगला देश, नेपाळ आणि पाकिस्तान यांच्या संदर्भात 'दक्षिण आशियातील तुलनात्मक राजकारण' या पेपरच्या अभ्यासक्रमातील घटकांच्या अभ्यासाच्या सोईसाठी देशनिहाय घटकलेखन करण्यात आले आहे. त्यामुळे आपण अनुक्रमे श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ आणि पाकिस्तान यांचा अभ्यास चार स्वतंत्र घटकात करणार आहोत. पहिल्या घटकात श्रीलंकेचे 'शासन व राजकारण' याबाबतच्या विविध घटकांचा एकत्रित अभ्यास करणार आहोत. पुढील तीन घटकात अनुक्रमे बांगला देश, नेपाळ आणि पाकिस्तान येथील शासन व राजकारण यांचा अभ्यास करणार आहोत. या अभ्यासात कांही संकल्पनांसाठी इंग्रजी शब्दप्रयोग करण्यात आले आहेत.

श्रीलंकेचे शासन आणि राजकारण समजावून घेण्यासाठी त्याची विभागणी पुढीलप्रमाणे चार उपघटकात केली आहे.

१) श्रीलंकेची ऐतिहासिक पार्श्वभूमी

२) श्रीलंकेतील विद्यमान शासनसंस्था

३) श्रीलंकेची सामाजिक व आर्थिक स्थिती

४) श्रीलंकेतील राजकीय पक्ष आणि समकालीन राजकारण

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ श्रीलंकेची ऐतिहासिक पार्श्वभूमी

श्रीलंकेचा आधुनिक इतिहास समजावून घेतल्याशिवाय आपणास तेथील 'शासनसंस्था आणि राजकारण' यांचा अभ्यास करता येणार नाही. यासाठी प्रथम आपण श्रीलंकेतील ब्रिटिश राजवट, श्रीलंकेची स्वातंत्र्यप्राप्ती आणि श्रीलंकेतील घटना निर्मिती यांचा अभ्यास करणार आहोत.

### १.२.१.१ ब्रिटिश राजवट

भारताप्रमाणे श्रीलंकेला देखील एक प्राचीन इतिहास आहे. रामायणात 'लंका' या रावणाच्या राज्याचा पहिला लिखित उल्लेख सापडतो. इ.स. पूर्व काळापासून इ. स. १५ व्या शतकापर्यंत अनेक राजघराण्यांनी श्रीलंकेवर राज्य केल्याचा इतिहास आहे.

१६ व्या शतकापासून श्रीलंकेच्या आधुनिक इतिहासाला प्रारंभ होतो. इ.स. १५०५ साली पोर्तुगीज खलाशी लेरेन्को डी. अलमेडीया श्रीलंकेत आला आणि त्याने १५१७ साली कोलंबो या ठिकाणी पहिला किल्ला बांधला. अशाप्रकारे श्रीलंकेच्या पश्चिम किनारपट्टीवर पोर्तुगीजांनी आपले नियंत्रण प्रस्थापित केले. त्यानंतर हळूहळू श्रीलंकेतील इतर प्रदेशावर पोर्तुगीजांनी आपले नियंत्रण प्रस्थापित केले.

१७ व्या शतकाच्या प्रारंभी, दुसरा राजसिंघे या राजाच्या काळात, डचांचे श्रीलंकेत आगमन झाले. पोर्तुगीजांना शह देण्यासाठी राजा दुसरा राजसिंघे याने इ.स. १६३८ साली 'डच ईस्ट इंडिया कंपनी' सोबत करार केला. त्यामुळे डच-पोर्तुगीज संघर्ष सुरू झाला. या संघर्षात पोर्तुगीजांचा पराभव झाला आणि इ.स. १६३८ साली कोलंबो डचांना मिळाले. त्यानंतर डचांनी श्रीलंकेतील इतर छोटी छोटी राज्ये आपल्या नियंत्रणाखाली आणली. इ.स. १७३९ साली कँडी राज्याचा राजा वीर नरेंद्रसिंह याचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूनंतर येथे वारसा हक्कावरून वाद सुरू झाले. यावेळी डचांनी कँडी हे अखेरचे स्वतंत्र राज्य देखील आपल्या ताब्यात घेतले.

इ.स. १७९६ साली ब्रिटिशांनी श्रीलंकेत प्रवेश केला. ब्रिटिशांनी डचांचा पराभव करून श्रीलंकेवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. इ.स. १८१५ मध्ये झालेल्या दुसऱ्या कँडी युद्धात ब्रिटिशांनी संपूर्ण श्रीलंकेवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. इ. स. १८१८ साली कँडीयन घोषणापत्रानुसार श्रीलंका ब्रिटिशांची अधिकृत वसाहत झाल्याची घोषणा करण्यात आली. ब्रिटिशांनी आपल्या वसाहतीचे 'सिलोन'(Cylone) असे नामकरण केले. त्यामुळे श्रीलंकेला 'सिलोन' या नावाने देखील ओळखले जाते. इ. स. १८१८ साली ब्रिटिश राजवटी विरुद्ध 'डवा' समुदायाने पहिले बंड केले. यास 'डवा बंड' असे म्हणतात. तात्कालीन श्रीलंकेचे गव्हर्नर रॉबर्ट ब्राडनरीग्ग यांनी हे बंड मोडून काढले.

इ. स. १८३३ च्या कोलेब्रुक-कॅमेरॉन कायद्याने आधुनिक श्रीलंकेत लोकशाहीची सुरुवात झाली. उदारमतवादी दृष्टीने श्रीलंकेचा राज्यकारभार चालावा आणि कायद्याचे राज्य प्रस्थापित व्हावे हा या कायद्याचा उद्देश होता. या कायद्यामुळे संपूर्ण श्रीलंका एकाच कायद्याच्या नियंत्रणाखाली आली. कार्यकारी मंडळ (Executive Council) आणि कायदेमंडळ (Legislative Council) या संस्थाची सुरुवात करण्यात आली. भविष्यातील लोकशाही व्यवस्थेचा हा आरंभ होता.

१९ व्या शतकाच्या पुर्वार्धात ब्रिटिशांनी श्रीलंकेत कॉफीच्या लागवडीला चालना दिली. श्रीलंकेतून मोठ्या प्रमाणात कॉफीची निर्यात करण्यात येवू लागली. इ. स. १८४७ च्या आर्थिक

मंदीमुळे कॉफीचे दर घसरले आणि आर्थिक विकासाला खीळ बसली. शासनाला कर रूपाने मिळणाऱ्या उत्पन्नात घट झाली. त्यामुळे ब्रिटिश सरकारने श्रीलंकेत अनेक नवीन कर सुरू केले. याशिवाय 'राजकरीया' पुन्हा सुरू केला. 'राजकरीया' म्हणजे आठवड्यातील सहा दिवस विनावेतन शासकीय मजुरीची कामे करणे अथवा तेवढ्या मजूरीच्या मूल्याची रक्कम शासनाला देणे. अशा निर्णयामुळे स्थानिक श्रीलंकन लोकांच्या मनात ब्रिटिशांविरुद्ध असंतोष निर्माण झाला. स्थानिक श्रीलंकन लोकांनी इ. स. १८४८ साली ब्रिटिशांविरुद्ध बंड पुकारले.

इ. स. १८७० च्या दशकात कॉफीच्या शेतीला विशिष्ट किडीचा प्रादुर्भाव झाल्याने कॉफी उत्पादन घटले. कॉफीला पर्याय म्हणून ब्रिटिशांनी चहाची लागवड सुरू केली. थोड्याच काळात चहाचे उत्पादन तीन पटीने वाढले. दरम्याने २० व्या शतकाच्या प्रारंभी रबराची लागवड करण्यास सुरुवात झाली. अशा प्रकारे ब्रिटिशांनी पुन्हा आपली आर्थिक स्थिती भक्कम करण्याचा प्रयत्न केला.

**१.२.१.२ श्रीलंकेची स्वातंत्र्य चळवळ**

१९ व्या शतकात ब्रिटिशांनी केलेल्या आर्थिक शोषणाविरुद्ध श्रीलंकन समुदायामध्ये असंतोष निर्माण झाला होता. १९ व्या शतकाच्या शेवटी आणि २० व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात आधुनिक शिक्षणामुळे एक नवीन सुशिक्षीत श्रीलंकन समाज राजकीय क्षेत्रात उदयाला आला. श्रीलंकेतील विविध धार्मिक आणि वांशिक समुदायातील एक वर्ग शिक्षण, आरोग्य, प्रशासन आणि राजकारण इ. क्षेत्रात पुढे आला. त्यांच्यात 'श्रीलंकन अस्मिता' जागृत झाली. समाजातील या नवशिक्षीत वर्गाने प्रारंभीच्या काळात बौद्ध आणि हिंदू धर्मातील लोकांनी ख्रिश्चन मिशनरींच्या धर्मप्रसाराला प्रतिरोध करण्यास सुरूवात केली. यातून ब्रिटिशांच्या विरुद्ध एक संघटन निर्माण झाले.

देशाला स्वातंत्र्य मिळविण्याच्या उद्देशाने १९१९ साली पुनाबलम् अरुणाचलम यांच्या नेतृत्वाखाली 'सिलोन राष्ट्रीय काँग्रेसची' स्थापना करण्यात आली. यात सिंहली आणि तमिळ राजकीय संघटनांचा समावेश होता. सुरुवातीच्या काळात सिलोन राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटिश सरकारकडून राजकीय सुधारणांसाठी मागणी केली. तथापि या मागणीला म्हणावा तसा लोकपाठिंबा मिळाला नाही. दरम्यानच्या काळात तेथील गव्हर्नरने 'वांशिक प्रतिनिधीत्वाचा' मुद्दा उपस्थित केला. 'कोलंबो सीट' साठी सिंहली आणि तमिळ यांच्यात संघर्ष निर्माण झाला यातून १९२० नंतर सिंहली व तमिळ समुदायात फूट पडली याचा विपरीत परिणाम सिलोन राष्ट्रीय काँग्रेसवर देखील झाला.

सिलोन राष्ट्रीय काँग्रेसची स्वातंत्र्यासाठीची आग्रही भूमिका आणि श्रीलंकन समाजातील ब्रिटिशांच्या विरुद्ध असणारा असंतोष कमी करण्याच्या उद्देशाने १९३१ साली 'डोनोग्मोअर सुधारणा कायदा' तयार करण्यात आला. यानुसार 'वांशिक प्रतिनिधित्वाचा' मुद्दा मागे पडला आणि 'प्रौढ आणि सार्वत्रिक मताधिकार' ही संकल्पना पुढे आली. प्रौढ आणि सार्वत्रिक मतदान पद्धतीमुळे सर्वांना मताधिकार मिळाला. यापूर्वी केवळ ४% लोकांनाच मतदानाचा अधिकार होता. तथापि डोनोग्मोअर सुधारणा कायद्याला अल्पसंख्याक तमिळ समुदायाने विरोध केला. १९३७ साली तमिळ समुदायाचे नेते जी. जी. पुनाबलम यांनी ५०-५० टक्के प्रतिनिधित्वाची मागणी केली. त्यानुसार ५० टक्के

सिंहली आणि ५० टक्के इतर वांशिक समुदायांना प्रतिनिधीत्व असावे अशी मागणी करण्यात आली. तथापि १९४४-४५ मधील 'सलबरी सुधारणा आयोगाने' ही मागणी अमान्य केली. त्यामुळे डोनोग्मोअर सुधारणा कायद्यानुसार सार्वत्रिक मताधिकार पद्धत प्रचलित राहिली. तथापि सलबरी सुधारणा आयोगाने श्रीलंकेला वासाहातिक स्वातंत्र्य देण्याचे मान्य केले. त्यानुसार ४ फेब्रुवारी १९४८ रोजी श्रीलंकेला स्वातंत्र्य देण्यात आले. पुढे १९७२ साली श्रीलंकेला संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले.

### १.२.१.३ राज्यघटनेची निर्मिती

आशिया खंडतील सर्वात प्रथम लोकशाही स्वीकारणारा देश अशी श्रीलंकेची ओळख आहे. १९३१ साली डोनोग्मोअर आयोगाने श्रीलंकेसाठी पहिली राज्यघटना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. डानोग्मोअर आयोगाने सार्वत्रिक प्रौढ मतदान पद्धतीचा पुरस्कार केला. त्यानुसार सिलोन राज्य परिषद (Cylone State Council) निर्माण करण्यात आली. सर डॉन बेरॉन जयतिलका यांची सिलोन राज्य परिषदेचा नेता म्हणून निवड करण्यात आली. परंतु डोनोग्मोअर आयोगाने श्रीलंकेतील स्वातंत्र्य चळवळीचा प्रश्न निकालात निघू शकला नाही. यासाठी १९४६ साली सोलबरी आयोग स्थापन करण्यात आला.

### १९४६ ची राज्यघटना

१९४६ साली नवीन राज्यघटना निर्माण करण्यासाठी सोलबरी आयोग (Soulbury Commission) स्थापन करण्यात आला. दरम्यानच्या काळात श्रीलंकेत स्वातंत्र्याची मागणी सुरू होती. परिणामतः या राज्यघटनेनुसार ४ फेब्रुवारी १९४८ रोजी श्रीलंकेला वासाहातिक स्वातंत्र्य देण्यात आले. म्हणजेच संपूर्ण स्वातंत्र्य दिले गेले नाही. सोलबरी राज्यघटनेनुसार श्रीलंकेत इंग्लंडच्या धर्तीवर संसदीय लोकशाही व्यवस्था स्वीकारण्यात आली. त्यानुसार इंग्लंडचा राजा हा श्रीलंकेचा नामधारी राज्यप्रमुख होता. सर्व कार्यकारी अधिकार इंग्लंडच्या राजाच्या नावे गव्हर्नर जनरल वापरत असत. वास्तविक कार्यकारी अधिकार पंतप्रधान व मंत्रिमंडळाला देण्यात आले होते. या राज्यघटनेनुसार सिनेट आणि प्रतिनिधीगृह अशी दोन सभागृह असणारी पार्लमेंट निर्माण करण्यात आली. या राज्यघटनेनुसार १९४७ साली निवडणूका झाल्या आणि डी. एस. सेनानायके यांना पंतप्रधान म्हणून नियुक्त करण्यात आले.

### १९७२ ची राज्यघटना

मे १९७० मध्ये श्रीलंकेत एस. एल. एफ. पी. (Srilankan Liberation Freedom Party) युनायटेड फ्रंटचे सरकार सत्तेवर आले. या सरकारने श्रीलंकन लोकांनी निर्माण केलेली स्वदेशी राज्यघटना असावी या उद्देशाने नवीन राज्यघटना निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १९७२ साली श्रीलंकेसाठी दुसरी राज्यघटना स्वीकारण्यात आली. या राज्यघटनेनुसार द्विगृही पार्लमेंट ऐवजी एकगृही पार्लमेंट अस्तित्वात आणली. त्यामुळे सिनेट हे सभागृह रद्द झाले आणि 'नॅशनल स्टेट ॲसेंब्ली' हे नवीन एकगृही कायदेमंडळ अस्तित्वात आले. कायदेमंडळाला म्हणजेच नॅशनल स्टेट

ॲसेंब्लीला कायदे करण्याचा व्यापक अधिकार देण्यात आला. नॅशनल स्टेट ॲसेंब्लीचे कायदे अवैध ठरविण्याचा न्यायमंडळाचा अधिकार रद्द करण्यात आला. त्याचप्रमाणे कार्यकारी मंडळाच्या अधिकारावर असणाऱ्या न्यायालयीन नियंत्रणावर मर्यादा घालण्यात आल्या, पंतप्रधान सत्तेचा केंद्रबिंदू झाला.

या राज्यघटनेनुसार श्रीलंकेचे 'सिलोन' हे ब्रिटिशांनी केलेले नामकरण रद्द केले आणि रिपब्लीक ऑफ श्रीलंका (Republic of Srilanka) असे नामकरण करण्यात आले. 'धर्मनिरपेक्षता' या तत्व ऐवजी बौद्ध धर्माला प्राधान्य देण्याचे तत्व स्वीकारण्यात आले. सिंहली या भाषेला राष्ट्रीय भाषेचा दर्जा देण्यात आला. साहजिकच तमिळ भाषिकांना दुय्यम स्थान देण्यात आले. त्याचप्रमाणे हिंदू, मुस्लीम आणि ख्रिश्चन धर्मिय नागरीकांना दुय्यम स्थान देण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे या राज्यघटनेने देशांची बहुसंख्यांक इतर सिंहली विरुद्ध अल्पसंख्यांक अशी विभागणी केली. अल्पसंख्यांक समुदायाच्या वाजवी मागण्या देखील बहुमताच्या आधारे अमान्य करण्याचे प्रयत्न झाले. या घटना लोकशाहीसाठी मारक होत्या.

**१९७८ ची राज्यघटना**

आज रोजी श्रीलंकेत १९७८ ची राज्यघटना प्रचलित आहे. जुलै १९७७ च्या निवडणूकीत सिरीमाओ भंडारनायके यांच्या हुकूमशाही राजवटीला लोकांनी नाकारले आणि जयवर्धने यांच्या नेतृत्वाखाली UNP या पक्षाला निवडून दिले. त्याचप्रमाणे तमिळ भाषिकांचे प्राबल्य असणारा TULF या पक्षाला देखील चांगले यश मिळाले. त्यामुळे या पक्षाला मुख्य विरोधी पक्षाचे स्थान मिळाले. नवीन सरकार सत्तेवर आल्यावर लागलीच तमिळ-सिंहली संघर्ष पेटला आणि त्यास हिंसक वळण लागले. याच काळात प्रभाकरनच्या नेतृत्वाखाली LTTE या तमिळ भाषिकांच्या कट्टरतावादी संघटनेचा उदय झाला. तमिळ भाषिक नागरीकांवर होणाऱ्या अन्यायाला हिंसक मार्गाने या संघटनेने विरोध सुरू केला. श्रीलंकेच्या उत्तर (जाफना) भागात आणि पूर्व भागात LTTE चा विशेष प्रभाव होता. जाफना शहराच्या LTTE १९७५ साली महापौराचा खून केला. LTTE ने स्वतंत्र तमिळ राज्याची मागणी सुरू केली. त्यामुळे या मागणीला विरोध करणारा सिंहली समुदाय देखील आक्रमक झाला. या संघर्षामुळे जूलै १९८३ मध्ये मोठ्या प्रमाणात हिंसा झाली आणि हजारो तमिळ भाषिकांची हत्या झाली. अशा राजकीय परिस्थिती मध्ये १९७८ ची राज्यघटना निर्माण करण्यात आली.

जयवर्धने यांनी नवीन राज्यघटना निर्माण करण्याचा निश्चय केला. त्यानुसार फ्रान्सच्या धर्तीवर प्रबळ अध्यक्ष असणारी अध्यक्षीय शासन पद्धतीची राज्यघटना १६ ऑगस्ट १९७८ साली तयार करण्यात आली. या राज्यघटनेनुसार जयवर्धने हे पहिले राष्ट्राध्यक्ष झाले. त्यांनी पक्ष व शासन यंत्रणेवर आपले संपूर्ण वर्चस्व प्रस्थापित केले. या राज्यघटनेची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

**१) संसदीय व अध्यक्षीय– संमीश्र शासन पद्धती**

फ्रान्सच्या धर्तीवर अध्यक्षाला व्यापक अधिकार असणाऱ्या कार्यकारी मंडळाची तरतूद करण्यात आली आहे. अध्यक्षाचा कार्यकाल ६ वर्षे ठेवण्यात आला. नंतर घटना दुरुस्ती करून हा कार्यकाल पाच वर्षे करण्यात आला आहे. तो मंत्रिमंडळाचा देखील अध्यक्ष असतो त्याची निवड थेट जनतेमधून केली जाते. पंतप्रधान व मंत्रिमंडळ पार्लमेंटला जबाबदार असते.

**२) एकात्मक शासन पद्धती**

श्रीलंकेत प्रबळ केंद्र सरकार असणारी एकात्मक शासन पद्धती स्वीकारण्यात आली आहे. प्रशासकीय सोईसाठी श्रीलंकेची नऊ प्रांतामध्ये विभागणी करण्यात आली आहे. प्रांताना प्रशासकीय स्वरूपाची स्वायत्तत्ता देण्यात आली आहे. परंतु राजकीय स्वायत्तत्ता देण्यात आलेली नाही.

**३) मूलभूत हक्कांची तरतूद**

नागरिकांसाठी मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आली आहे. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, अमानुष वागणूकीपासून स्वातंत्र्याचा हक्क, समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, भाषण व संचार स्वातंत्र्याचा हक्क, माहिती मिळविण्याचा हक्क इ. प्रमुख हक्क राज्यघटनेने नागरिकांना देवू केले आहेत.

**४) मार्गदर्शक तत्वे आणि मूलभूत कर्तव्ये**

न्यायावर आधारीत समाज निर्माण करणे; देशाचे सार्वभौमत्व व स्वातंत्र्याचे रक्षण करणे; लोकशाही व्यवस्थेचे रक्षण करणे; आर्थिक विषमता नष्ट करणे इ. मार्गदर्शक तत्वानुसार शासनाने काम करावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे राज्यघटनेचा आदर करणे, राष्ट्रीय एकात्मता जोपासने, इतरांच्या हक्क आणि स्वातंत्र्याचा आदर करणे, पर्यावरणाचे रक्षण करणे इ. मूलभूत कर्तव्याचा समावेश राज्यघटनेत करण्यात आला आहे. अशा प्रकारे नागरिकांची राज्याप्रती आणि राज्याची नागरिकाप्रती कोणती भूमिका असावी हे स्पष्ट करण्यात आले आहे.

**५) घटना परिषदेची व्यवस्था**

'घटना परिषद' ही श्रीलंकेच्या राजकीय व्यवस्थेमधील एक नावीन्यपूर्ण व्यवस्था आहे. घटना परिषदेमध्ये दहा सदस्य असतात. पंतप्रधान, पार्लमेंटचा सभापती, पार्लमेटंमधील विरोधी पक्ष नेता हे घटना परिषदेचे पदसिद्ध सदस्य असतात. पंतप्रधान आणि विरोधी पक्षाचा नेता यांच्या शिफारशीवरून अध्यक्ष इतर पाच सदस्यांची नियुक्ती करतो. पार्लमेंटचा एक सदस्य या घटना परिषदेवर नियुक्त केला जातो. प्रशासनातील उच्च पदस्थ अधिकारी, निवडणूक आयोग, लोकसेवा आयोग, मानवी हक्क आयोग इ. स्वायत्त संस्थावरील महत्वाच्या नियुक्त्या करण्यासाठी योग्य नावांची शिफारस करणे हे घटना परिषदेचे मुख्य काम आहे.

**६) उद्देशपत्रिका**

श्रीलंकेच्या राज्यघटनेची सुरूवात विस्तृत अशा उद्देशपत्रिकेपासून होते. भारताप्रमाणे स्वतंत्र, सार्वभौम, लोकशाही, समाजवादी गणराज्य निर्माण करणे हा या राज्यघटनेचा उद्देश आहे.

**७) बहुपक्ष पद्धती**

UND(United National Party) आणि SLFP (Sri Lanka Freedom Party) हे श्रीलंकेतील दोन प्रमुख राजकीय पक्ष आहेत. याशिवाय समाजातील विविध समुदायांचे प्रतिनिधीत्व करणारे राजकीय पक्ष श्रीलंकेत आहेत. साधारणतः या पक्षांची तीन गटात वर्गवारी केली जाते. सिंहली समुदायाचे पक्ष, समाजवादी तत्वज्ञानाचे पक्ष आणि इतर अल्पसंख्यांक समुदायाचे पक्ष.

**८) जनमतसंग्रह**

आवश्यकता भासल्यास अध्यक्ष एखादा कायदा अथवा त्यातील तरतूद जनमत चाचणीसाठी जनतेसमोर ठेवू शकतो. बहुमताच्या आधारे जनता त्यास मंजूर किंवा नामंजूर करू शकते. पार्लमेंट मध्ये नामंजूर झालेला एखादा कायदा जनमत चाचणीसाठी जनतेसमोर ठेवण्याचा अधिकार अध्यक्षाला आहे.

वरील विवेचनावरून श्रीलंकेतील लोकशाही राजकीय व्यवस्थेचे स्वरुप स्पष्ट होते.

### १.२.१ स्वाध्याय १

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणत्या युरोपियन देशांनी श्रीलंकेवर राज्य केले आहे?

२) कोणत्या दिवशी ब्रिटिशांनी श्रीलंकेला वासहातिक स्वातंत्र्य दिले?

३) कोलेब्रुक कॅमेरॉन कायदा केंव्हा अस्तित्वात आला?

४) १९७८ च्या राज्यघटनेने कोणती शासन पद्धती स्वीकारली?

५) श्रीलंकेत जनमत चाचणी घेण्याबाबतचा निर्णय कोण घेते?

६) 'राजकीया' म्हणजे काय?

### १.२.२ श्रीलंकेतील शासनसंस्था

श्रीलंकेत प्रबळ अध्यक्ष असणारी संमिश्र शासनपद्धती आहे. येथील कायदेमंडळाला 'पार्लमेंट' म्हणतात; कार्यकारी मंडळात अध्यक्ष, पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाचा समावेश होतो; न्यायमंडळाला सर्वोच्च न्यायालय असे संबोधले जाते. याशिवाय घटना परिषद, निवडणूक आयोग, लोकसेवा आयोग, इ. स्वायत्त संस्थादेखील शासन संस्थेचा अविभाज्य भाग आहेत.

### १.२.२.१ पार्लमेंट (कायदेमंडळ)

श्रीलंकेत 'पार्लमेंट' हे एकगृही कायदेमंडळ आहे. या सभागृहात २२५ सदस्य आहेत. यापैकी १९६ सदस्यांची बहु सदस्यीय (बावीस) मतदार संघातून (Multi Member Electoral Districts) निवड केली जाते. उर्वरीत २९ सदस्यांची निवड यादी पद्धतीनुसार केली जाते. यासाठी प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या तत्वानुसार निवडणूक घेतली जाते. १८ वर्षे पूर्ण असणाऱ्या प्रौढ नागरिकांना मताधिकार देण्यात आला आहे.

पार्लमेंटचा कार्यकाल पाच वर्षे आहे. सार्वत्रिक निवडणूकीनंतर किमान एक वर्ष पार्लमेंट बरखास्त करता येत नाही. त्यानंतर पार्लमेंट बरखास्त करण्याचा अधिकार अध्यक्षाला असतो. पार्लमेंटचे अधिवेशन बोलाविणे, स्थगित करणे अथवा पार्लमेंट बरखास्त करण्याचा अधिकार अध्यक्षाला आहे. वर्षातून किमान एक अधिवेशन बोलविणे बंधनकारक आहे. सभागृहाचे कामकाज सुरू ठेवण्यासाठी गणसंख्या २० निश्चित करण्यात आली आहे.

संसदेने मंजूर केलेल्या कांही कायद्यांना जनमत चाचणीतून जावे लागते. जनमताच्या (Referendum) मंजूरी नंतरच सदर कायदा वैध ठरतो. जनमत घेण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्षाला आहे. बहुपक्ष पद्धतीमुळे विविध पक्षांना आणि वांशिक समुदायांना पार्लमेंटमध्ये प्रतिनिधीत्व दिले जाते. पंतप्रधान हा बहुमतप्राप्त पक्षाचा नेता असतो, परंतु तो अध्यक्षाच्या अधिन राहून काम करतो.

पार्लमेंटचे कामकाज चालविण्याची जबाबदारी स्पीकरची (Speaker) असते. स्पीकर पार्लमेंटचे अध्यक्षस्थान भूषवितो. त्याच्या गैर हजेरीत डेप्यूटी स्पीकर सभागृहाचे कामकाज चालवितो. 'पार्लमेंटरी सेक्रेटरीएट' ही पार्लमेंटच्या कामकाजाचे समन्वय करणारी व्यवस्था आहे. सेक्रेटरी जनरल ऑफ पार्लमेंट पार्लमेंटच्या कामाचे व्यवस्थापन पाहतो. स्पीकरला कामकाजात मदत करणे व सल्ला देणे सेक्रेटरी जनरलचे काम आहे.

कोलंबो शहरापासून १६ कि. मी. अंतरावरील दुवा बेटावर नवीन पार्लमेंटची इमारत बांधण्यात आली आहे. या ठिकाणाला श्री जयवर्धनेपुरा कोट्टे म्हणून ओळखले जाते. १९८२ पासून या ठिकाणी पार्लमेंटचे कामकाज चालते.

**पार्लमेंटचे अधिकार व कार्ये**

१) कायदे तयार करण्याचा व्यापक अधिकार पार्लमेंटला देण्यात आला आहे.

२) राज्यघटनेत बदल करण्याचा अधिकार पार्लमेंटला आहे.

३) संचित निधीतून पैसा खर्च करणेसाठी किंवा कर लागू करणेसाठी संमती देणे पार्लमेंटचे काम आहे.

४) अध्यक्षाने घोषित केलेल्या आणिबाणीला मंजूरी देणे अथवा नाकारणे पार्लमेंटचा अधिकार आहे.

५) कार्यकारी मंडळ पार्लमेंटला जबाबदार असते.

**१.२.२.२ अध्यक्ष, पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ (कार्यकारी मंडळ)**

अध्यक्ष, पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ यांना मिळून कार्यकारीमंडळ अस्तित्वात येते. श्रीलंकन कार्यकारी मंडळामध्ये अध्यक्षीय आणि संसदीय शासन पद्धतींचे मिश्रण दिसून येते. घटनात्मक मंडळ या न्याविन्यपूर्ण व्यवस्थेचा अभ्यास देखील आपण करणार आहोत.

**अ) अध्यक्ष**

राज्यघटनेनुसार सर्व कार्यकारी अधिकार अध्यक्षाला देण्यात आले आहेत. सर्व कार्यकारी अधिकार अध्यक्ष स्वतः वापरतो १९७२ च्या राज्यघटनेनुसार अध्यक्षपद तयार करण्यात आले आणि १९७८ च्या राज्यघटनेनुसार अध्यक्षाला वास्तविक अधिकार बहाल करण्यात आले आहेत. त्यामुळे श्रीलंकेत अध्यक्षाला महत्वाचे स्थान आहे. तो राज्यप्रमुख आणि शासनप्रमुख अशा दोन्ही भूमिका पार पाडतो. अध्यक्ष तिन्ही दलांचा सरसेनापती (Commander in Chief) असतो. अध्यक्षाची निवड प्रत्यक्ष जनतेमार्फत पाच वर्षासाठी केली जाते. १९ व्या घटना दुरुस्तीनुसार एकाच व्यक्तीला दोनपेक्षा अधिक वेळा अध्यक्षपदाची संधी दिली जात नाही.

अध्यक्षपदाची निवडणूक लढविणारी व्यक्ती श्रीलंकेचा नागरिक असावी लागते. गुन्हेगार आणि मानसिकदृष्ट्या विकलांग व्यक्तीला अध्यक्षपदाची निवडणूक लढविता येत नाही. मान्यताप्राप्त पक्षाकडून पुरस्कृत व्यक्ती अध्यक्ष पदासाठी निवडणूक लढवू शकते अथवा पार्लमेंटचा सदस्य असणारी व्यक्ती अध्यक्षपदासाठी निवडणूक लढविण्यास पात्र समजली जाते.

अध्यक्षाला दरमहा श्रीलंकन रु. ९७५००/- वेतन दिले जाते. शासकीय निवासाची मोफत सोय केली जाते. निवृत्तीनंतर त्याला निवृत्तीवेतन देण्याची तरतूद आहे. अध्यक्षाला पदच्यूत करण्याचा अधिकार पार्लमेंटला आहे. मानसिक किंवा शारीरिक अकार्यक्षमता; जाणीवपूर्वक राज्यघटनेचे उल्लंघन करणे; भ्रष्टाचार किंवा गैरवर्तन करणे इ. कारणासाठी अध्यक्षाला पदच्यूत करता येते अध्यक्षाच्या पदच्यूतीचा ठराव मांडण्यासाठी प्रथम पार्लमेंटच्या स्पीकरच्या मंजूरीची आवश्यकता आहे. त्यानंतर पार्लमेंटच्या सदस्यांनी पदच्यूतीचा ठराव $^{२}/_{३}$ बहुमताने मंजूर करणे आवश्यक आहे. या पदच्यूतीला सर्वोच्च न्यायालयाची संमती मिळाल्या नंतर अध्यक्षाला पदच्यूत करता येते. मुदतपूर्व अध्यक्षाचे पद रिक्त झाल्यास पंतप्रधान हंगामी अध्यक्ष म्हणून काम पाहतात.

अध्यक्षाविरुद्ध कोणालाही न्यायालयात खटला दाखल करता येणार नाही. किंवा कोणतेही न्यायालय अध्यक्षाला शिक्षा देवू शकत नाही. उपरोक्त घटनात्मक तरतूदी वरून अध्यक्षपदाचे महत्वाचे स्थान स्पष्ट होते.

**अध्यक्षाचे कार्य व अधिकार**

**१) प्रशासकीय अधिकार**

अध्यक्ष प्रशासनाचा सर्वोच्च प्रमुख आहे. त्याच्या नावे प्रशासन चालते. पंतप्रधान, मंत्री, प्रांताचे गव्हर्नर, राजदूत आणि उच्च पदस्थ अधिकारी यांची नेमणूक करण्याचा अधिकार अध्यक्षाला आहे.

**२) कायदेविषयक अधिकार**

पार्लमेंटचे अधिवेशन बोलाविणे, स्थगित करणे आणि पार्लमेंट विसर्जीत करणे हे अध्यक्षाचे कायदेविषयक अधिकार आहेत. पार्लमेंटच्या प्रत्येक अधिवेशनाची सुरूवात अध्यक्षाच्या अभिभाषणाने होते. अध्यक्ष सभागृहाला संबोधीत करू शकतो अथवा संदेश पाठवू शकतो. शासनाच्या महत्वाच्या धोरणांची घोषणा पार्लमेंटमध्ये करण्याचा मान अध्यक्षाला दिला जातो.

**३) न्यायविषयक अधिकार**

सर्वोच्च न्यायालय अपिल न्यायालय आणि उच्च न्यायालय इत्यादी न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचा आणि त्यांना पदच्यूत करण्याचा अधिकार अध्यक्षाला आहे. न्यायालयाने दिलेल्या शिक्षेमध्ये सूट देण्याचा, बदल करण्याचा अथवा शिक्षा रद्द करण्याचा अधिकार अध्यक्षाला आहे. अध्यक्ष कोणत्याही घटनेबाबत चौकशी आयोग नियुक्त करू शकतो.

**४) इतर अधिकार**

संविधानाचे रक्षण करण्याचा अधिकार युद्ध घोषित करणे किंवा तह करण्याचा अधिकार राजदूत आणि उच्चआयुक्त याची नियुक्ती करणे आणि परदेशातील राजदूत आणि उच्च आयुक्तांचे स्वागत करणेचा अधिकार आणिबाणी घोषित करण्याचा अधिकार संविधानात्मक संस्था सुव्यवस्थित काम करण्यासाठी प्रयत्न करण्याचा अधिकार जनमत चाचणी घेणेबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्षाला देण्यात आले आहेत.

**ब) पंतप्रधान व मंत्रिमंडळ**

इंग्लंड किंवा भारताप्रमाणे श्रीलंकेत पंतप्रधान पदाला अधिकार नाहीत. पंतप्रधानाची नियुक्ती अध्यक्ष करतो. पार्लमेंटवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता असणाऱ्या व्यक्तीची पंतप्रधान म्हणून नियुक्ती केली जाते. याबाबतचा निर्णय अध्यक्ष स्वतःघेतो. अध्यक्ष पदाच्या खालोखाल पंतप्रधानाचे पद आहे. अध्यक्ष मंत्रिमंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवितो. पंतप्रधानाचे स्थान मंत्रिमंडळातील सर्वात जेष्ठ असते. पंतप्रधान हा 'घटना परिषद' आणि 'राष्ट्रीय सुरक्षा परिषद' यांचा सदस्य असतो.

अध्यक्षाच्या पक्षाला पार्लमेंटमध्ये बहुमत असत नाही तेंव्हा दुसऱ्या पक्षाच्या व्यक्तीला पंतप्रधान म्हणून नियुक्त केले जाते.

अध्यक्षपद रिक्त झाल्यास पंतप्रधान अध्यक्षपदी विराजमान होतो. नवीन अध्यक्षाची निवड होईपर्यंत हंगामी अध्यक्ष म्हणून पंतप्रधान काम पहातो.

अध्यक्षाचा सल्लागार म्हणून पंतप्रधान काम पहातो. तो अध्यक्षाला मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या नियुक्तीबाबत आणि पदच्यूतीबाबत सल्ला देतो. मंत्रिमंडळाचे खातेवाटप आणि मंत्रिमंडळाचा आकार याबाबतचा सल्ला पंतप्रधान अध्यक्षाला देतो. तथापि याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्षाला आहे. त्यामुळे पंतप्रधानाचे स्थान सल्लागार म्हणून आहे.

पंतप्रधानाला दरमहा रु. ७१५०० वेतन दिले जाते. त्याचप्रमाणे मोफत निवास व इतर सुविधा दिल्या जातात.

पंतप्रधान व मंत्रिमंडळ पार्लमेंटला जबाबदार असते. मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री, राज्य मंत्री आणि उपमंत्री यांचा समावेश असतो. श्रीलंकेत 'गैर कॅबिनेट मंत्री' नावाची व्यवस्था दिसून येते. कॅबीनेट मंत्री विशिष्ट खात्याचा प्रमुख म्हणून काम पहात असतो. 'गैर कॅबिनट मंत्री' इतर कांही शासकीय व्यवस्थांचे प्रमुख म्हणून काम पहातात.

**क) घटनात्मक मंडळ** (Constitutional Council)

केवळ पार्लमेंट; अध्यक्ष, पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ; आणि सर्वोच्च न्यायालय; यांचा अभ्यास करून श्रीलंकेची शासन व्यवस्था समजावून घेता येणार नाही. 'घटनात्मक मंडळ' (Constitutional Council) हा देखील शासन व्यवस्थेमधील एक महत्वाचा घटक आहे. सर्वप्रथम २००० साली ७ वी घटना दुरुस्ती करून घटनात्मक मंडळ निर्माण करण्यात आले. त्यानंतर पुन्हा १९ वी घटना दुरुस्ती करून नवीन स्वरूपाचे 'घटनात्मक मंडळ' तयार करण्यात आले आहे.

घटनात्मक मंडळात एकूण १० सदस्य असतात. त्यापैकी पंतप्रधान, पार्लमेंटचा स्पीकर आणि पार्लमेंट मधील विरोधी पक्ष नेता हे तीन पदसिद्ध सदस्य असतात. एका सदस्याची निवड व नेमणूक अध्यक्ष करतो. पंतप्रधान आणि विरोधी पक्ष नेता यांच्या शिफारसीवरून पाच सदस्यांची नियुक्ती अध्यक्ष करतो. सत्तारुढ आणि प्रमुख विरोधी पक्ष वगळून इतर पक्षातील एका पार्लमेंट सदस्याची नियुक्ती अध्यक्षामार्फत केली जाते. पदसिद्ध सदस्य आपल्या पदावर असेपर्यंत घटनात्मक मंडळाचे सदस्य राहतात. इतर सदस्य तीन वर्षाकरीता नियुक्त केले जातात. पार्लमेंटचा स्पीकर घटनात्मक मंडळाचा अध्यक्ष म्हणून काम पहातो.

सार्वजनिक जीवनात चारित्र्यसंपन्न आणि गुणवत्ता असणाऱ्या व्यक्तींची घटनात्मक मंडळावर नियुक्ती केली जावी अशी अपेक्षा असते. घटनात्मक मंडळाचे प्रशासकीय कामकाज पाहण्यासाठी सेक्रेटरी जनरलची नियुक्ती केली जाते. निवडणूक आयोग, लोकसेवा आयोग, वित्त आयोग, राष्ट्रीय पोलिस आयोग, मानव हक्क आयोग, इ. आयोग घटनात्मक मंडळाच्या अंतर्गत येतात. घटनात्मक मंडळ प्रशासनातील उच्च पदस्थ अधिकारी व न्यायाधीश यांच्या नेमणूकी बाबत अध्यक्षाला शिफारस करतात. सर्वोच्च न्यायालय आणि अपील न्यायालयातील न्यायाधीश, ॲटर्नी जनरल, ऑडिटर

जनरल, इनस्पेक्टर जनरल ऑफ पोलीस इ. महत्वाच्या नेमणूकीबाबत अध्यक्षाला पात्र नावांची शिफारस करणे घटनात्मक मंडळाची जबाबदारी आहे.

### १.२.२ स्वाध्याय २

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१) श्रीलंकेतील पार्लमेंट........ गृही आहे.

२) श्रीलंकेत मताधिकार ....... वर्षी दिला जातो.

३) अध्यक्षाची निवड ...... पद्धतीने होते.

४) ....... हा घटनात्मक मंडळाचा अध्यक्ष असतो.

५) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाच्या निवृत्तीचे वय ...... वर्षे आहे.

### १.२.२.३ सर्वोच्च न्यायालय (न्यायमंडळ)

श्रीलंकन न्यायव्यवस्थेमध्ये सर्वोच्च न्यायालय (Supreme Court) हे शिखर न्यायालय म्हणून कार्यरत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली अपील कोर्ट, हायकोर्ट, व इतर कनिष्ठ न्यायालये काम करतात. न्यायालयांचे प्रामुख्याने दिवाणी आणि फौजदारी न्यायालये असे वर्गिकरण केले जाते.

सर्वोच्च न्यायालयात एक सरन्यायाधिश व इतर ६ ते १० न्यायाधीश असतात. न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचा अधिकार अध्यक्षाना आहे. न्यायाधीशांची नियुक्ती करताना अध्यक्षांना घटना परिषदेचा सल्ला विचारात घ्यावा लागतो. घटना परिषद, अटर्नी जनरल व सरन्यायाधीश यांचे मत विचारात घेऊ शकते.

सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे निवृत्तीचे वय ६५ वर्षे आहे. तत्पूर्वी राजीनामा पदच्यूती किंवा मृत्यूमुळे त्यांचे पद रिक्त होऊ शकते. गैरवर्तन किंवा अकार्यक्षमता सिद्ध झाल्यास न्यायाधीशांना पदच्यूत करता येते. यासाठी पार्लमेंट मध्ये बहुमताने ठराव मंजूर व्हावा लागतो. असा ठराव मंजूर झाल्यानंतर अध्यक्ष सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशाला पदच्यूत करू शकतात.

सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाला दरमहा १,४५,००० वेतन (२००६ पासून) देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यात दरवर्षी रु. ७२५० ची वार्षिक वेतनवाढ देण्याची तरतूद आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांना इतर आनुशांगिक सुविधा दिल्या जातात. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाला इतर कोणत्याही पदावर काम करता येत नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या खाली अपील कोर्ट आणि हाय कार्ट समांतर पातळीवर काम करतात. १९७८ च्या राज्यघटनेने अध्यक्षाला दिलेल्या व्यापक अधिकारामुळे न्यायव्यवस्थेची स्वायत्तता आणि

स्वातंत्र्य धोक्यात आले आहे. घटनेनुसार सर्वोच्च न्यायालयाला खालील अधिकार देण्यात आले आहेत.

**अधिकार**

१) संविधानात्मक विषयांवर संबधीत खटल्याबाबत निर्णय घेणे.

२) मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची हमी देणे.

३) अपील कोर्ट आणि हाय कोर्ट येथून अपीलाच्या माध्यमातून येणाऱ्या खटल्यांची सूनावणी करणे.

४) अध्यक्षाने मागणी केल्यावरून कायदेविषयक सल्ला देणे.

५) अध्यक्षपदाच्या निवडणूकी संदर्भात किंवा जनमत चाचणी संदर्भात वाद निर्माण झाल्यास निर्णय देणे.

६) पार्लमेंट सदस्याच्या विशेषाधिकारांचे उल्लंघन झाल्यास त्याबाबत निर्णय घेणे.

७) पार्लमेंटच्या कायद्यानुसार दिलेल्या अधिकाराचा वापर करून न्यायदान करणे.

### १.२.३ श्रीलंकाः समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था

श्रीलंकेच्या राजकीय व्यवस्थेचे परिपूर्ण आकलन होण्यासाठी तेथील सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती समजावून घेणे आवश्यक आहे.

#### १.२.३.१ श्रीलंकन समाजरचना

श्रीलंकेत, इतर दक्षिण आशियातील देशांप्रमाणे विविध जाती धर्माचे लोक वास्तव्य करून आहेत. बौद्ध, हिंदू, मुस्लीम आणि ख्रिश्चन हे श्रीलंकेतील मुख्य धार्मिक समुदाय आहेत. एकूण लोकसंख्येपैकी ७०% बौद्ध धर्माचे, १२% हिंदू धर्माचे, १०% मुस्लीम धर्माचे आणि ७% ख्रिश्चन धर्माचे लोक आहेत. या लोकसंख्येची सिंहली, तमिळ आणि मुस्लीम अशा तीन वंशात विभागणी झाली बहुसंख्य समाज सिंहली भाषिक आहे. तमिळ भाषा बोलणारा दुसरा मोठा समुदाय आहे. याशिवाय इंग्रजी भाषा सुद्धा बोलणारा समुदाय आहे. १९२० पर्यत श्रीलंकेतील या सर्व जाती व धार्मिक समुदायामध्ये सलोख्याचे संबंध होते. प्रत्येक समुदाय आपआपल्या परंपरेनुसार जीवन जगत होते.

१९२० नंतर श्रीलंकन समाजामध्ये धार्मिक आणि वंशवादाचे बीजारोपन झाले. सुरुवातीला सिंहली आणि तमिळ वंशाच्या समुदायामध्ये राजकीय पातळीवर संघर्ष सुरू झाला.१९८० नंतर या संघर्षाला हिंसक वळण लागले. हा संघर्ष २००१ साली थांबला. तीन दशकात सिंहली-तमिळ संघर्षामध्ये मोठ्या प्रमाणात जीवीत आणि वित्त हानी झाली.

सिंहली, तमिळ आणि इंग्रजी या भाषा बोलणारे समुदाय श्रीलंकेत आहेत. ७४% लोक सिंहली भाषा बोलतात. २४% लोक तमिळ भाषा बोलतात. १ ते २ टक्क लोक इंग्रजी व इतर भाषा बोलतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रशासनात या तिन्ही भाषांचा आवश्यकतेनुसार वापर केला जात होता. १९७२ च्या राज्यघटनेने सिंहली या एकमेव भाषेला राष्ट्रीय भाषा म्हणून घोषित केले. त्यामुळे तमिळ भाषिक लोकांमध्ये नाराजी पसरली. त्यातून पुढे सिंहली-तमिळ संघर्षाला पोषक वातावरण तयार झाले.

श्रीलंकेत एकूण लोकसंख्येच्या ७४% सिंहली वंशाचे आणि १२% श्रीलंकन वंशांचे तमिळ लोक आहेत. याशिवाय भारतीय वंशाचे तमिळ लोक ५% आणि मुस्लीम लोक ७% आहेत. इतर वंशाच्या लोकांचे प्रमाण नगन्य आहे. समाजाची विभागणी केवळ वंशआधारीत नाही. भारताप्रमाणे श्रीलंकेत देखील जातीव्यवस्था दिसून येते. सिंहली आणि तमिळ समुदायामध्ये जातीव्यवस्था दिसून येते. व्यवसाय आधारीत जातीव्यवस्था हे देखील समाजव्यवस्थेचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. सिंहली वंशातील गोइगामा(शेती करणारी) ही जात राजकीयदृष्ट्या प्रबळ समुह आहे. तमिळ समुदायातील व्हेल्लाळा जातीचे लोक स्वतःला श्रेष्ठ मानतात. व्हेल्लाळा जातीच्या लोकांची व्यापार व शिक्षण क्षेत्रात मक्तेदारी दिसून येते.

वरील माहितीवरून हे स्पष्ट होते की, श्रीलंका हा बहुल सांस्कृतिक समाज (Multi-Cultural Society) आहे. या समाजात एक गुंतागुत दिसून येते. सिंहली-तमिळ संघर्षामुळे निर्माण झालेला तणाव कमी करण्याचे प्रयत्न आजही श्रीलंकेत सुरू आहेत.

### १.२.३.२ सामाजिक चळवळी

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर श्रीलंकेत लहान-मोठ्या सामाजिक व राजकीय चळवळी झाल्या. यातील जनथा विमुक्थी पेरुमुना यांचे दोन उठाव महत्वाचे आहेत. त्याचप्रमाणे स्वतंत्र तमिळ राज्याची मागणी करण्यासाठी LTTE संघटनेची दीर्घ काळ चाललेली सशस्त्र चळवळ अभ्यासल्या शिवाय आधुनिक श्रीलंकेचा अभ्यास पूर्ण होणार नाही.

### अ) जनथा विमुक्थी पेरमुना (JVP) उठाव- १९७१

रोहन विजेविरा यांनी १९६७ साली सिलोन कम्युनिस्ट पक्षातून बाहेर पडून कट्टर साम्यवादाचा पुरस्कार करणारा 'न्यू लेफ्ट' नावाचा गट तयार केला. समविचारी युवकांना आणि विद्यार्थ्यांना संघटीत करून परिवर्तनाची चळवळ सुरू केली. युवकांना मार्क्सवाद लेनिनवादाचे तत्वज्ञान शिकविणे आणि लष्करी प्रशिक्षण देणे यासारख्या उपक्रमामुळे रोहन विजेवारा यांचा दबदबा निर्माण झाला. या डाव्या विचारांच्या गटाने १९७० च्या निवडणूकीस सिरीमाओ भंडारनायके यांच्या पक्षाला उघड पाठिंबा दिला. निवडणूकीत दिलेल्या आश्वासनानुसार 'कामगार व श्रमजीवी' लोकांसाठी भंडारनायके सरकारने काम करावे अशी विजेवारा यांची अपेक्षा होती. अपेक्षेनुसार भंडारनायके पंतप्रधान झाले. तथापि विजेवारा यांच्या अपेक्षेप्रमाणे सामाजिक व आर्थिक बदलाबाबतचे धोरण राबविण्यात आले

नाही. त्यामुळे या काळात विजेवारा यांनी 'जनथा विमुक्थी पेरनुमा' या कट्टर डाव्या विचारांच्या संघटनेची बांधणी केली. या संघटनेने बंदुका, हातबॉंब यांची जुळवाजुळव सुरू केली.

''कामगार, शेतकरी आणि सैनिक यांची क्रांती विजयी करूया'' ही घोषणा देवून मार्च १९७१ मध्ये प्रत्यक्ष क्रांतीला सुरूवात झाली. जेव्हीपी च्या क्रांतिकारकांनी पोलीस स्टेशनवर हल्ले केले, फोनचे जाळे तोडण्याचे प्रयत्न केले, वीज पुरवठा खंडीत केला, रस्ते बंद करण्यात आले. महिनाभरात बंडखोरांनी श्रीलंकेच्या दक्षिण प्रांतावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. या घटनेमुळे सरकारी यंत्रणा खडबडून जागी झाली. श्रीलंकेतील अंतर्गत गुप्तहेर व पोलिस यंत्रणा त्यावेळी सक्षम नव्हती. त्यामुळे श्रीलंकेच्या सरकारने भारत आणि पाकिस्तानची लष्करी मदत मागविली. जून १९७१ अखेर क्रांतिकारकांना अटक करण्यात सरकारला यश आले. या उठावात सुमारे ४ ते ५ हजार लोकांची जीवीत हानी झाल्याचा अंदाज आहे. या उठावात सामील झालेल्या 'जनथा विमुक्थी पेरिमुना' संघटनेच्या क्रांतिकारकांना न्यायालयाने शिक्षा दिली. त्याचप्रमाणे १९७५ साली न्यायालयाने विजेवारा यांना आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली. स्वतंत्र श्रीलंकेच्या इतिहासातील हा पहिला सशस्त्र उठाव होता. या उठावाचा उद्देश आर्थिक विषमता नष्ट करणे हा होता. प्रस्थापितांच्या विरुद्धचा हा उठाव होता.

**ब) जनथा विमुक्थी पेरिमुना (दुसरा) उठाव १९८७–८९**

जे. आर जयवर्धने यांच्या अध्यक्षपदाच्या काळात श्रीलंकेत झालेला हा उठाव होता. हा उठाव देखील अयशस्वी ठरला हा उठाव १९७१ च्या उठावाप्रमाणे उघड उठाव नव्हता. १९८७ ते १९८९ या काळात जेव्हीपीने श्रीलंकन सरकार विरुद्ध छुपे युद्ध पुकारले होते. लष्करी आणि पोलिस दलावर हमले करणे, राजकीय नेत्यांची हत्या करणे, सार्वजनिक ठिकाणी दहशत माजविणे इ. तंत्राचा वापर जेव्हीपीने केला. भूमिगत राहून संघटना लढत होती.

१९८० नंतर जेव्हीपी च्या वैचारीक भूमिकेत बदल झाला होता. सिंहली आणि तमिळ समुदायातील उपेक्षीतांची संघटना असणाऱ्या जेव्हीपी संघटनेने आता 'कट्टर सिंहली' संघटना म्हणून काम सुरू केले होते. सिंहली राष्ट्रवादाचे जेव्हीपीने समर्थन सुरू केले. त्यामुळे श्रीलंकेतील कट्टर सिंहली लोकांचा छुपा पाठिंबा या चळवळीला मिळाला.

तमिळ लोकांच्या प्रति अध्यक्ष जे. आर. जयवर्धने यांच्या सकारात्मक भूमिकेला जेव्हीपीने विरोध केला. भारत श्रीलंका कराराला (१९८७) देखील जेव्हीपीने विरोध केला. या कराराअन्वये जाफना व उत्तर श्रीलंकेतील तमिळ बहुल प्रदेशाना स्वायत्तत्ता देण्याचे जयवर्धने सरकारने मान्य केले. या विरुद्धचा हा उठाव होता.

१९८७ साली भारतातून 'शांती सेना' श्रीलंकेत पोहचली ही घटना श्रीलंकेतील कट्टरतावादी सिंहली समुदायाला रुचली नाही. त्यामुळे जेव्हीपीने शासनाच्या विरोधात सशस्त्र बंड सुरू केले.

शासनाने नोव्हेंबर १९८९ मध्ये जेव्हीपीचा नेता रोहन विजेविरा याला पकडून ठार मारले आणि सुमारे ७००० जेव्हीपी कार्यकत्यांना अटक करण्यात आली. पहिल्या उठावाचा उद्देश आणि या दुसऱ्या उठावाच्या उद्देशामध्ये फरक होता. तमिळ लोकांच्याप्रती शासनाने अनुसरलेल्या धोरणाविरुद्ध हा दुसरा उठाव होता.

**क) LTTE चा सशस्त्र संघर्ष**

१९६० आणि १९७० च्या दशकात सिंहली-तामिळ संघर्ष राजकारणापुरता मर्यादित होता. अल्पसंख्यांक असल्यामुळे तामिळ भाषिकांना राजकीय पटलावर लोकशाही मार्गाने आंदोलन करून आपल्या मागण्या मान्य होत नाहीत याची जाणीव निर्माण झाली. त्यामुळे तामिळ भाषिक लोकांनी हिंसक मार्गाचा अवलंब सुरू केला. जुलै १९८३ मध्ये तामिळ भाषिकांच्या हिंसक घटनांना प्रत्युत्तर देण्याच्या उद्देशाने सिंहली समुदायाने तामिळ लोकांचे हत्याकांड सुरू केले. या घटनेमध्ये हजारो तामिळ लोक मारले गेले. अनेक तामिळ भाषिकांनी भारताचा आसरा घेतला. ही जगातील नरसंहाराची दुर्देवी घटना होती. या घटनेनंतर भारताने श्रीलंकेत शांतीसेना (IPKP) पाठवून तमिळ भाषिकांना सुरक्षा देण्याचा प्रयत्न केला.

१९८३ च्या सिंहली-तमिळ संघर्षानंतर दोन्ही समुदायामध्ये परस्पर द्वेश निर्माण झाला तमिळ समर्थक LTTE च्या हिंसक कारवायामध्ये मोठ्या प्रमाणे वाढ झाली. LTTE विरुद्ध आवाज उठविणाऱ्या लोकांना ठार मारले जात होते. LTTE च्या कारवायांना प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने सरकारने हस्तक्षेप वाढविला. नागरी स्वातंत्र्यावर अनेक बंधन लादण्यात आली. लष्कराला मिळालेल्या विशेषाधिकारामुळे अनेकदा लष्करी अधिकारी व जवानांनी नागरिकांवर अन्याय केले. कांही ठिकाणी महिलांच्या लैंगिक शोषणाच्या घटना घडल्या त्यामुळे सिंहली-तमिळ हिंसक घटनांमध्ये वाढ होत गेली. (१९९० च्या दशकात LTTE च्या दहशतवादी कृत्यामध्ये अनेक नागरिकांची आणि राजकीय नेत्यांची हत्या झाली.)

श्रीलंकेचे सरकार आणि सिंहली समुदायाच्या दृष्टीने LTTE ही अतिरेकी आणि देशद्रोही संघटना होती. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीमध्ये LTTE चा बिमोड करणे हे श्रीलंकन सरकारने ठरविले होते. याऊलट LTTE च्या मते, तमिळ भाषिकांच्या LTTE संघटना स्वातंत्र्यासाठी लढत आहे. त्यामुळे तमिळ बहुल प्रदेशातील तमिळ लोकांनी LTTE ला समर्थन द्यावे असा दावा केला. त्यामुळे 'सिंहली समर्थक' आणि 'तमिळ समर्थक' अशा प्रकारे देशाची दोन गटात विभागणी झाली. १९९० च्या दशकात आणि चालू शतकातील पहिल्या दशकात तमिळ सिंहली सशस्त्र संघर्षामध्ये अनेक नागरिकांची हत्या झाली. LTTE या तमिळ दहशतवादी संघटनेने अनेक राजकीय नेत्यांना गेल्या तीन दशकात ठार मारले. श्रीलंकन शासन आणि LTTE यांच्यात १९८५ ते २००६ या काळात चार वेळा शांतता, बैठका झाल्या नार्वे या देशाने मध्यस्थ म्हणून भूमिका बजावली. तथापि त्याला यश आले नाही.

तमिळ समुदाय स्वतंत्र राज्याची मागणी करत होते याउलट श्रीलंकेच्या शासनाने त्यांना स्वायत्तत्ता देण्याची तयारी दर्शविली. अखेर श्रीलंकेच्या लष्कराने २००९ साली LTTE चा बिमोड केला. या युद्धकाळात सुमारे एकलाखपेक्षा अधिक लोक मारले गेले असावेत असा अभ्यासकांचा अंदाज आहे युद्धाच्या शेवटच्या टप्यात सुमारे तीन लाख तमिळ लोक विस्थापित झाले.

**१.२.३.३ अर्थव्यवस्था आणि विकास**

शेती आणि मासेमारी हा श्रीलंकेच्या परंपरागत अर्थव्यवस्थेचा आधार होता. १८ व्या शतकापर्यंत भाताची शेती आणि शेतीपूरक व्यवसाय श्रीलंकेच्या बहुतांश समाजाच्या उपजिवीकेचे साधन होते. १९ व्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटिशांनी कॉफी उत्पादनाला चालना दिली. त्यामुळे या काळात मोठ्या प्रमाणात कॉफीचे उत्पादन वाढले. थोड्याच काळात श्रीलंका कॉफी निर्यात करणारा देश म्हणून ओळखला जावू लागला. दरम्यान १८८० च्या दशकात कॉफीच्या मळ्यांवर मोठ्या प्रमाणात कीडीचा प्रादूर्भाव झाल्याने या व्यवसायाला खीळ बसली. त्यानंतर ब्रिटिशांनी कॉफीला पर्याय म्हणून चहा, रबर आणि नारळ उत्पादनाला चालना दिली. नगदी पिकांच्या वाढत्या प्रमाणामुळे श्रीलंकेला भात आयात करावा लागत होता. विशेषतः १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या पूर्वार्धात श्रीलंका हा भाताची आयात करणारा देश होता. २० व्या शतकाच्या मध्यात कॉफी, चहा, रबर, नारळ आणि मसाल्याचे पदार्थ उत्पादन करणे आणि निर्यात करणे हे श्रीलंकेच्या अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर (१९४८) श्रीलंकेच्या अर्थव्यवस्थेत बदल होत गेले. शासनाने उत्पादन, व्यापार, आयात-निर्यात, यावर नियंत्रण प्रस्थापित केले. १९६० च्या दशकात आयात-निर्यातीवर विविध बंधने लादण्यात आली. १९७० च्या दशकात उत्पादन क्षेत्र, आणि वाहतूक व दळणवळण यांना चालना देण्यासाठी शासन पातळीवरून प्रयत्न करण्यात आले. मोठे चहाचे मळे आणि नगदी पिके उत्पादन करणाऱ्या मळ्यांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. देशांतर्गत व्यापारावर शासनाचे पूर्ण नियंत्रण प्रस्थापित करण्यात आले. अर्थव्यवस्थेवरील राज्याच्या वाढत्या नियंत्रणामुळे आर्थिक विकासाची गती मंदावली, रोजगाराच्या संधी कमी झाल्या.

१९७७ च्या निवडणूकीत UNP पक्षाला सत्ता मिळाली. या पक्षाने अर्थव्यवस्थेवरील अनावश्यक बंधन कमी करण्याचे आश्वासन जनतेला दिले होते. त्यानुसार आर्थिक उदारीकरणाच्या धोरणांची सुरूवात झाली. सर्व प्रथम शासनाने उत्पादन आणि कृषी क्षेत्रातील आपली भागीदारी कमी केली. या क्षेत्रात खाजगी क्षेत्राला संधी देण्यात आली. खाजगी गुंतवणूकीला वाव देणे, विदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे, आणि आयातीवरील बंधन कमी करणे अशा प्रकारचे धाडसी निर्णय १९८० च्या सुरूवातीला घेतले गेले. अनुदानाचे (Subsidy) धोरण आणि सामाजिक कल्याणकारी योजनांना कात्री लावण्यात आली. याऊलट पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करण्यास चालणा देण्यात आली. महावेली गंगा प्रकल्पाच्या माध्यमातून शेतीसाठी पाणीपुरवठा करणे आणि जलविद्यूत प्रकल्प उभे करणे, इ. महत्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्यात आले.

१९८६ साली वस्त्रोद्योगाच्या विकासामुळे सर्वात जास्त निर्यात वस्त्रोद्योग क्षेत्राने केली. याशिवाय विदेशात काम करणाऱ्या श्रीलंकन समुदायाकडून मिळणारे उत्पन्न आणि पर्यटन व्यवसायातून मिळणारे उत्पन्न हा देखील एक महत्वाचा आर्थिक उत्पन्नाचा आधार होता. १९६० मध्ये चहा, रबर आणि नारळ यांचा एकूण निर्यातीमधील वाटा ९०% होता. १९६० च्या तुलनेत चहा, रबर आणि नारळ या तीन प्रमुख निर्यात वस्तूंचा वाटा १९८६ ला निम्याने घटला. हे प्रमाण ९०% वरून १९८६ ला ४२% पर्यंत पोहचले. याऊलट वस्त्रोद्योग, मासे, जंगली उत्पादने इत्यादींचे निर्यातीचे प्रमाण वाढत गेले.

श्रीलंकेत स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आर्थिक विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने १९५६ साली राष्ट्रीय नियोजन मंडळ (National Planning Council) स्थापन करण्यात आले. या मंडळाने श्रीलंकेच्या आर्थिक विकासासाठी दहा वर्षाची योजना तयार केली. औद्योगिक विकासाला चालना देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश होता. तथापि ही योजना अंशतः यशस्वी ठरली. त्यामुळे १९६५ साली आर्थिक विकासाला चालणा देण्यासाठी आणि त्याचे नियमन करण्यासाठी 'नियोजन आणि आर्थिक व्यवहार मंत्रालय' (Ministry of Planning and Economic Development) निर्माण करण्यात आले. या मंत्रालयाने प्रत्येक खात्याच्या विकासासाठी एक समग्र विकास आराखडा तयार केला. या योजनेनुसार श्रीलंकेला भात उत्पादनात स्वंयपूर्ण करण्याला प्राधान्य दिले गेले.

१९७२-७६ या काळासाठी पंचवार्षिक योजना तयार केली गेली. या योजनेची दोन ठळक उद्दिष्टे होती. पहिले उद्दिष्ट श्रीलंकेतील लोकांचे रहाणीमान आणि उत्पन्न यातील तफावत कमी करणे व दुसरे उद्दिष्ट पारंपरिक भात, रबर, चहा, नारळ इ. शेती उत्पन्नाबरोबर सुर्यफूल, मॅनिऑक, कापूस, कोको, काजू, अननस इ. सारख्या किरकोळ कृषी उत्पादनामध्ये वाढ करणे.

१९७७ नंतर शासनाने आपल्या आर्थिक धोरणात अमुलाग्र बदल केला. कृषी क्षेत्रात खाजगी भागीदारीला वाव दिल्याने आणि विदेशी गुंतवणूकीत वाढ झाल्यामुळे रोजगाराच्या संधी वाढल्या. १९८० च्या दशकात एका बाजूला खाजगीकरणामुळे विकासाला चालना मिळत होती आणि दुसऱ्या बाजूला सिंहली-तमिळ संघर्षामुळे साधनसंपत्तीचे नुकसान केले जात होते. सुरक्षेवरील वाढत जाणाऱ्या खर्चामुळे विकास कामांवर विपरीत परिणाम होत होता. विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण देखील खाली आले. सुमारे चार दशक या संघर्षामुळे श्रीलंकेची अर्थव्यवस्था मोडकळीस आली. त्यामुळे २००१ साली श्रीलंका दिवाळखोर झाला. २००९ साली श्रीलंकन सरकारने LTTE चा पराभव करून या यादवी युद्धाला पूर्णविराम दिला आहे. २००४ मधील सुनामीमुळे श्रीलंकेची मोठ्या प्रमाणात जीवीत आणि वित्त हानी झाली. २००९ पासून पुन्हा श्रीलंकेने आपल्या आर्थिक विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने प्रयत्न सुरू केले आहेत. गेल्या सात-आठ वर्षात आर्थिक विकासाचा दर ३ ते ४ टक्केने वेगाने वाढत आहे.

### १.२.४ श्रीलंकेतील समकालीन राजकारण

यादवी युद्धाच्या समाप्तीनंतर (२००९) श्रीलंकेच्या राजकारणाला एक नवी दिशा प्राप्त झाली. तीन दशकाच्या संघर्षामुळे दोन्ही पक्षांचे (श्रीलंकन सरकार आणि LTTE) मोठे नुकसान झाले होते. यादवी युद्धामुळे झालेली राजकीय, सामाजिक आणि आर्थिक हानी भरून काढणे हे श्रीलंकेसमोरील आज सर्वात मोठे आव्हान आहे. या संघर्षामुळे हजारो तमिळ कुटुंबे विस्थापित झाली आहेत. त्यांचे पुनर्वसन करण्याचे काम चालू आहे. सिंहली तमिळ समुदायात परस्पर विश्वास निर्माण करण्याचे मोठे आव्हान आज देशासमोर आहे. सर्व श्रीलंकन समुदायांमध्ये एकतेची भावना निर्माण करणे आणि सर्वांचा विकास करणे हे आज श्रीलंकेचे उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने कांही राजकीय पाऊले उचलण्यात आली आहेत. यासदंर्भात श्रीलंकेतील समकालीन पक्षीय राजकारण आणि एकता व अखंडता निर्माण करण्यासमोरील आव्हानांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

#### १.२.४.१ समकार्लीन पक्षीय राजकारण

श्रीलंकेच्या राजकीय पटलावर १९८० अखेर दोन प्रबळ पक्ष होते. युनायटेड नॅशनल पार्टी (UNP) आणि श्रीलंका फ्रिडम पार्टी (SLFP) या दोन राजकीय पक्षांच्या प्रभावामुळे इतर राजकीय पक्षांचे स्थान दुय्यम स्वरूपाचे होते. १९८० पूर्वी दोन्ही पक्षांनी देशातील सर्व धार्मिक व अल्पसंख्यांक समुदायांना एकत्र घेऊन काम केले. परंतु १९८० नंतर सिंहली-तमिळ संघर्षाला सुरूवात झाली. त्यामुळे या परिस्थितीत दोन्ही प्रमुख पक्षांनी राजकीय स्वार्थासाठी अल्पसंख्यांक असणाऱ्या तमिळ भाविक समुदायाकडे पाठ फिरविली परिणामतः १९८० नंतरच्या पार्लमेंट निवडणूकीत कोणत्याच एका पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त करता आले नाही. त्यामुळे आघाडी सरकार हे श्रीलंकेच्या राजकारणाचे एक वैशिष्ट्य बनले.

श्रीलंकेत सध्या UNP आणि SLFP या दोन प्रमुख पक्षांशिवाय सुमारे ६० ते ७० लहान मोठे राजकीय पक्ष आहेत. या पक्षांची साधारणतः तीन गटात विभागणी केली जाते. सिंहली समर्थक राजकीय पक्ष, समाजवादी राजकीय पक्ष आणि तमिळ राष्ट्रवादी पक्ष UNP आणि SLFP हे सिंहली समर्थक राजकीय पक्ष आहेत. यातील UNP हा उजव्या विचारसरणीचा पक्ष म्हणून ओळखला जातो आणि SLFP हा डाव्या विचारांचा पक्ष म्हणून ओळखला जातो. लंका समा समाजा पार्टी (LSSP) आणि कम्युनिस्ट पार्टी ऑफ श्रीलंका हे समाजवादी गटातील पक्ष आहेत. तमिळ लिबरेशन युनायटेड फ्रंट, सिलोन वर्कर्स पार्टी आणि श्रीलंका मुस्लीम कॉंग्रेस हे तमिळ राष्ट्रवादी पक्ष आहेत.

२०१५ साली झालेल्या पार्लमेंटच्या निवडणूकीत UNP हा सर्वात मोठा पक्ष म्हणून निवडून आला आहे. परंतु या पक्षाला बहुमत प्राप्त करता आलेले नाही. त्यामुळे UNP च्या नेतृत्वाखाली 'युनायटेड नॅशनल फ्रंट फॉर गुड गव्हर्नन्स' चे आघाडी सरकार सत्तेवर आहे. UNP चे नेते रानिल विक्रमसिंघे यांची पंतप्रधान म्हणून निवड करण्यात आली आहे. २०१५ साली झालेल्या अध्यक्षीय निवडणूकीत मात्र 'न्यू डेमॉक्रॅटीक फ्रंट' चे (NDF) नेते मैथ्रिपाला सिरीसेना अध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. डेमॉक्रॅटीक युनायटेड नॅशनल फ्रंट मधून बाहेर पडून २००९ मध्ये NDF ची स्थापना

झाली. सध्या सत्तारुढ अध्यक्ष आणि पंतप्रधान यांच्या पक्षांनी तमिळ आणि इतर अल्पसंख्यांक समुदायाला सोबत घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे श्रीलंकेच्या शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नाला हातभार लागला आहे. श्रीलंकेत दबाव गट प्रभावी नाहीत. छोट्या मोठ्या समुदायांचे हित जोपासण्याचे काम विविध राजकीय पक्षांकडूनच केले जाते.

**१.२.४.२ राष्ट्रीय एकात्मता व अखंडता यासमोरील आव्हाने**

श्रीलंका विविध धर्म, विविध जाती, विविध वांशिक समुदाय असणारा देश आहे. सिंहली तमिळ संघर्षाची पार्श्वभूमी असणारा देश म्हणून श्रीलंकेची ओळख आहे. त्यामुळे श्रीलंकेत एकता निर्माण करणे हे मोठे आव्हानात्मक काम आहे. सिंहली बहुल समुदायाला श्रीलंका एक 'सिंहली राष्ट्र' निर्माण व्हावे असे वाटते. याउलट तमिळ समुदायाला 'स्वतंत्र तमिळ राष्ट्राची' अपेक्षा आहे. या दोन परस्पर विरोधी आणि टोकाच्या भूमिका आहेत. यांच्यात समन्वय, साध्य केल्याशिवाय श्रीलंकेमध्ये एकतेची भावना निर्माण होणार नाही. २००९ नंतर या दोन्ही समुदायांनी ऐक्य निर्माण करण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू केले आहेत.

सिंहली-तमिळ यादवी युद्धाच्या समाप्तीनंतर राष्ट्राध्यक्ष मंहिदा राजपक्षे यांनी पुढील प्रमाणे घोषणा केली. ''आज आम्ही 'अल्पसंख्यांक' हा शब्द आमच्या शब्दकोशातून काढून टाकत आहोत. यापुढे तमिळ, मुस्लीम, बर्घेर आणि मलय या समुदायांना अल्पसंख्यांक म्हणून पाहिले जाणार नाही. यापुढे या देशात दोनच समुदाय असतील. एक या देशावर मातृभूमीवर प्रेम करणारा समुदाय आणि दुसरा, ज्यांना आपल्या या मातृभूमीबद्दल प्रेम नाही असा लहान समुदाय'' या घोषणेचे दोन अर्थ काढले गेले. पहिला सकारात्मक अर्थ असा की, देशातील सर्व नागरिकांना समान संधी दिली जाईल. जेणेकरून राष्ट्रीय ऐक्य निर्माण होण्यास मदत होईल. दुसरा नकारात्मक अर्थ असा की, श्रीलंकेत अर्थात सिंहली राष्ट्राला विरोध करणाऱ्या गटाला देशद्रोही समजले जाईल.

२० व्या शतकाच्या प्रारंभी ख्रिश्चन धर्मप्रसाराला विरोध करण्यासाठी बौद्ध धर्मप्रसारकांचे प्रयत्न सुरू झाले. त्याच काळात भाषा व वंश आधारीत समुदाय राजकारणात निर्माण होत गेले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी या विविध समुदायांनी ब्रिटिश सरकारविरूद्ध चळवळ चालविली होती. लोकशाही व अहिंसक मार्गाने विविध गट ब्रिटिश सत्तेविरूद्ध झगडत राहिले. परिणामतः १९४८ मध्ये अहिंसक मार्गाने श्रीलंकेला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्थानिक प्रस्थापित वर्गाकडे सत्ता हस्तांतरीत झाली. सिंहली आणि तमिळ वंशांतील उच्च जातींना सत्ता मिळाली.

ब्रिटिशांनी लोकांमध्ये धर्म, वंश आणि भाषा यावरून भेदभावाची भावना निर्माण केली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राजकीय पक्षांनी सत्ता प्राप्तीसाठी जनतेमध्ये धर्म व वंश आधारीत अस्मिता जागृत केल्या. सिंहली वंश बहुसंख्य असल्यामुळे त्यांच्या दबावामुळे देशाचे सिंहलीकरण करण्यास सुरुवात झाली. विशेषतः १९७२ च्या राज्यघटनेने अधिकृतपणे बौद्ध धर्म आणि सिंहली भाषा यांना प्राधान्य देण्याचे घोषित केले. त्यामुळे अल्पसंख्यांक समुदायामध्ये असुरक्षेची भावना निर्माण झाली. पुढे १९८० नंतर या संघर्षाचे रुपांतर दहशतवादामध्ये झाले. सुमारे तीन दशकानंतर आता श्रीलंकेत शांतता

प्रस्थापित झाली आहे. श्रीलंका सरकार विरूद्ध LTTE ने पुकारलेल्या युद्धामुळे देशाच्या अखंडतेला धोका निर्माण झाल होता. लष्करी सामर्थ्यावर २००९ साली सरकारने LTTE चा पराभव केला. परंतु केवळ दहशतच्या मार्गाने राष्ट्रीय ऐक्य टिकणार नाही याची जाणीव सरकारला झाली. त्यामुळे यादवी युद्धानंतर श्रीलंकन सरकारने संयुक्त राष्ट्र संघटना (UND) आणि इतर देशाच्या आर्थिक मदतीने युद्ध पिडीतांना मदत देण्याचे काम सुरू आहे. अमेरिका पुरस्कृत USAID मार्फत श्रीलंकेच्या युद्धोतर काळात भरीव मदत केली आहे. युद्ध पिडीतांना तात्पुरता निवारा उपलब्ध करून देणे; स्वच्छ पाणी, आरोग्य इ. उपलब्ध करून देणे, मानसिक आधार देणे, अपंग आणि विधवा महिलांचे पुनर्वसन करणे, युद्धात सामील युवकाना कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगार उपलब्ध करून देणे. या सारख्या कार्यक्रमामुळे विश्वास निर्माण करण्याचे काम सुरू आहे.

श्रीलंकेने तमिळ भाषेत राष्ट्रगीत म्हणण्याची सवलत दिल्यामुळे राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याच्या दिशेने सरकारने महत्वाचे पाऊल उचलले आहे. त्याचप्रमाणे शिक्षणामध्ये तमिळ भाषेला पूर्वीप्रमाणे स्थान देण्यात आले आहे. परिणामतः सिंहली-तमिळ संघर्षाची धार कमी झाली आहे. तथापि आज देखील कट्टरतावादी सिंहली लोकांचा तमिळ भाषिकांना दिल्या जाणाऱ्या सवलतींना विरोध आहे. धार्मिक समुदायामधील भिन्नतेमध्ये एकता निर्माण करण्याचे आव्हान आज श्रीलंकेसमोर आहे. सिंहली-तमिळ यांच्यात परस्पर विश्वास निर्माण झाल्याशिवाय राष्ट्रीय ऐक्य निर्माण होणार नाही. त्याचप्रमाणे मुस्लीम आणि ख्रिश्चन समुदायाला मुख्य प्रवाहात सामील करून घेणे ही सुद्धा काळाची गरज आहे. चांगल्या शिक्षण व्यवस्थेमधून हे ऐक्य निर्माण करावे लागणार आहे.

**क) १.२.३ स्वाध्याय**

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) श्रीलंकेतील अल्पसंख्यांक धार्मिक समुदायांची नावे सांगा.

२) LTTE चा विस्तार सांगा.

३) श्रीलंकेतील प्रमुख दोन राजकीय पक्षांची नावे सांगा.

४) तमिळ-सिंहली यादवी युद्ध केव्हा समाप्त झाले?

५) तमिळ-सिंहली संघर्ष मिटविण्यासाठी कोणत्या देशाने मध्यस्ती केली?

## १.३ सारांश

इ. स. १९ व्या शतकापासून श्रीलंकेच्या आधुनिक इतिहासाला प्रारंभ होतो. पोर्तुगीज, डच आणि इंग्रज या युरोपियन देशांनी श्रीलंकेवर राज्य केले आहे. १९ व्या शतकामध्ये इंग्रजांनी श्रीलंकेवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. कॉफीच्या शेतीचा प्रयोग, चहाची लागवड आणि रबराची लागवड करत श्रीलंकेचे आर्थिक शोषण केले. १९ व्या शतकाच्या शेवटी आणि २० व्या शतकाच्या प्रारंभी श्रीलंकेत स्वातंत्र्य प्रापतीसाठी जागृती निर्माण झाली. सिलोन राष्ट्रीय कॉंग्रेसने स्वातंत्र्यप्राप्तीसाठी

ब्रिटिश सरकारवर दडपण आणले. परिणामतः १९४८ साली श्रीलंकेला वासहातिक स्वातंत्र्य देण्यात आले.

१९४६ सालच्या सोलबरी आयोगाने तयार केलेल्या राज्यघटनेनुसार संसदीय लोकशाही पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. १९७२ साली नवीन राज्यघटना निर्माण करण्यात आली. त्यानंतर लगेच १९७८ साली श्रीलंकेसाठी तिसरी राज्यघटना तयार करण्यात आली. या राज्यघटनेने फ्रान्सच्या धर्तीवर अध्यक्षीय शासनपद्धतीचे प्रारुप असणारी शासन व्यवस्था स्वीकारली अध्यक्षाला व्यापक अधिकार देण्यात आले. सध्या ही राज्यघटना प्रचलित आहे.

श्रीलंकेत 'पार्लमेंट' हे एकगृही कायदेमंडळ आहे. अध्यक्ष, पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ यांना कार्यकारी अधिकार देण्यात आले आहेत. अध्यक्षाला अनेक बाबतीत विशेषाधिकार देण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालय शिखर न्यायालय म्हणून काम पहाते. 'घटनात्मक मंडळ' हा देखील श्रीलंकच्या शासनसंस्थेचा एक अविभाज्य घटक आहे.

भारताप्रमाणे श्रीलंकेत अनेक जाती धर्माचे लोक रहातात. बौद्ध, हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन इ. धर्माचे लोक श्रीलंकेत आहेत. सिंहली वंशाच्या लोकांचे प्रमाण सर्वात जास्त असल्याने त्यांचे राजकारणावर वर्चस्व दिसून येते. याऊलट तमिळ वंशाचे लोक अल्पसंख्यांक आहेत. त्यामुळे सिंहली-तमिळ संघर्ष हे श्रीलंकेच्या राजकारणाचे ठळक वैशिष्ट्य आहे. यातूनच LTTE या तमिळ अतिरेकी संघटनेचा जन्म झाला. २००९ साली या संघर्षाला पूर्णविराम मिळाल्याने सध्या श्रीलंकेत शांतता आहे. याशिवाय श्रीलंकेत साम्यवादी चळवळी देखील झाल्या आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कृषी विकासाबरोबर औद्योगिक विकासाला चालना देण्यात आली आहे. विशेषतः १९८० नंतर उदारीकरणाचे धोरण स्विकारल्यामुळे औद्योगिक विकासाला गती प्राप्त झाली. सिंहली-तमिळ यादवी युद्धामुळे आर्थिक विकासावर विपरीत परिणाम झाला होता. श्रीलंकेत बहुपक्ष पद्धती आहे. तथापि दोन प्रबळ पक्ष राजकारणाचा केंद्रबिंदू आहेत. जात-धर्म-वंश भाषा या आधारे देशाच्या झालेल्या विभागणीला एकत्र करणे हे सर्वात मोठे आव्हान देशासमोर उभे आहे. देशात एकता व अखंडता निर्माण करणे यासाठी श्रीलंकेचा प्रयत्न सुरू आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द

SLFP - Sri Lankan Freedom Party- राजकीय पक्ष

UNP- United National Party- राजकीय पक्ष

LTTE- Liberation Tigers of Tamil Elam- तमिळ भाषिकांची उग्रवादी संघटना

TULF- Tamil United Liberation Front- तमिळ भाषिकांचा राजकीय पक्ष

JVP- Janatha Vimukthi Pernuma - डाव्या विचारांची संघटना

NDF- New Democratic Front- आघाडी सरकार

IPKF- Indian Peace Keeping Force- भारतीय शांती सेना पथक

१) **वांशिक प्रतिनिधित्व**- देशातील विविध वंशाच्या लोकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात कायदेमंडळात प्रतिनिधित्व असणे.

२) **यादवी युद्ध**- देशांतर्गत दोन समुदाय किंवा गटातील युद्ध.

३) **उच्चायुक्त-राजदूत**- एका देशाच्या दुसऱ्या देशातील शासनाचा अधिकृत प्रतिनिधीला राजदूत असे म्हणतात. ब्रिटिश साम्राज्यात यासाठी उच्चआयुक्त 'High Commissioner' हा शब्द प्रचलित आहे.

## १.५ स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**अ) १.२.१ स्वाध्याय**

१) डच, पोर्तुगीज आणि इंग्लंड

२) ४ फेब्रुवारी, १९४८

३) इ. स. १८३३

४) संसदीय अध्यक्षीय संमिश्र पद्धती

५) श्रीलंकेचे अध्यक्ष

६) आठवड्यातील सहा दिवस विना वेतन शासकीय काम करणेची श्रीलंकेतील ब्रिटिश काळातील पद्धत

**ब) १.२.२ स्वाध्याय**

१) एक २) १८ ३) प्रत्यक्ष जनतेमार्फत

४) पार्लमेंटचा स्वीकार ५) ६५ वर्षे

**क) १.२.३ स्वाध्याय**

१) हिंदू, मुस्लीम आणि ख्रिश्चन

२) Liberation Tigers of Tamil Elam

३) २००९ साली

४) नॉर्वे

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) श्रीलंकेच्या १९७८ च्या राज्यघटनेची पार्श्वभूमी आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) श्रीलंकेच्या पार्लमेंटची रचना कार्य व अधिकार यांची चर्चा करा.

३) श्रीलंकेच्या अध्यक्ष, पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ याबाबतच्या घटनात्मक तरतूदी स्पष्ट करा.

४) श्रीलंकन समाजव्यवस्थेचे राजकीय दृष्टीतून परीक्षण करा.

५) श्रीलंकेच्या राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हानांची सविस्तर चर्चा करा.

**ब) टीपा लिहा.**

१) श्रीलंकेची स्वातंत्र्यप्राप्ती

२) श्रीलंकेतील ब्रिटिश राजवटीचा आढावा

३) श्रीलंकेतील सर्वोच्च न्यायालय

४) जनथा विमुक्ती पेरमुना (JVP) उठाव १९७१

५) श्रीलंकेच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा आर्थिक आढावा

६) श्रीलंकेतील पक्षीय राजकारण

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१) Camilla Orjuela (Ed) (2010) Power and Politics in the Shadow of Sri Lanka's Armed Conflict, sida, Colombo.

२) Mortimer, Louis (1990), Sri Lanka, A Country Study, Federal Research Division of Congress, Washington.

३) Mahajan, V. D. (1975), Select Modern Governments, S. Chand & Co., New Delhi.

४) Constitution of Republic of Sri Lanka.

५) Government and Politics of Sri Lanka, S. Chand & Co., New Delhi.

Sundarji, Padma Rao, Sri Lanka: The New Country, Harper Collins India.


❑❑❑

## सत्र ४ : घटक २

# बांगलादेश

घटक १ : ऐतिहासिक वारसा

(अ) वासाहतिक कायदे

(ब) स्वातंत्र्यप्राप्तीकडे

(क) राज्यघटनानिर्मिती

घटक २ : शासन संस्थांची कार्यपद्धती

(अ) कायदेमंडळ

(ब) कार्यकारी मंडळ

(क) न्यायालय

घटक ३ : समाज व अर्थव्यवस्था

(अ) सामाजिक संरचना, जातीजमाती व अल्पसंख्यांक

(ब) सामाजिक चळवळी

(क) अर्थव्यवस्था व विकास

घटक ४ : समकालीन राजकारण

(अ) पक्षीय राजकारण

(ब) एकी व एकात्मतेला आव्हान

## २.० उद्दिष्टे

साधारणतः १९४५ नंतर म्हणजेच दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंडचा साम्राज्यवाद व वसाहतवाद संपुष्टात आला. लॅटिन अमेरिका, दक्षिण आफ्रिका व आशिया खंडात मोठ्या प्रमाणात लोकशाहीच्या चळवळी नव्या शक्ती विचाराद्वारे स्वातंत्र्य, समता, न्याय व विकासासाठी काम करू लागल्या. क्युबा, टांझानिया, पेरु याबरोबर आशिया खंडातील भारत, श्रीलंका, चीन ही राष्ट्रे नव्याने पुढे आली. त्यामुळे ही सर्व नवोदित राष्ट्रे व त्या देशांचे राजकारण, प्रशासन व विविध चळवळी यांचा नव्याने अभ्यास होऊ लागला. इंग्लंड, अमेरिका व रशिया यासारख्या पारंपरिक व्यवस्थांच्या रचनात्मक अभ्यासाऐवजी तिसऱ्या जगातील राष्ट्रांचे शासन, राजकारण व तत्त्वज्ञानाचे नवे प्रयोग

जगासमोर येऊ लागले. कृतीशिलता, नव्या कल्याणकारी संकल्पना याबरोबरच या नव्या तिसऱ्या जगातील राष्ट्रांनी परावलंबन, दहशतवाद, पर्यावरण, लोकसंख्या, दारिद्र्य, अस्थिर राजकारण, धार्मिक मूलतत्त्ववाद यासारखे काही नवे प्रश्न निर्माण केले. त्या प्रश्नांचा व त्यावरील उपाययोजनांचा अभ्यासही १९४५ नंतर महत्त्वाचा ठरू लागला. लोकशाही समाजवाद, नवमार्क्सवाद, गांधीवाद व उत्तर गांधीवाद, उदारमतवाद व कल्याणकारी राज्याला या कालखंडात महत्त्व आले.

नव्या राष्ट्रांच्या या निर्मितीमध्ये आशिया खंडात जी राष्ट्रे १९४५ नंतर स्वतंत्र झाली. त्यात भारत, पाकिस्तान, चीन यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. इथे पाकिस्तान हे राष्ट्र पश्चिम पाकिस्तान व पूर्व पाकिस्तान या नावाने १९७० पर्यंत एकच राष्ट्र म्हणून अभ्यासले गेले पण १९७१ नंतर पूर्व पाकिस्तानने 'सोनार बांगला' (स्वतंत्र बांगला) ची घोषणा करून शेख मुजबूर रहेमान यांच्या नेतृत्वाखाली स्वतःचे वेगळे राष्ट्र तयार केले. भारताच्या सहकार्याने तयार झालेल्या बांगला देशाने १९७१ नंतर आशिया खंडातील राजनैतिक परस्पर संबंधावर मोठा प्रभाव तयार केला. विशेषतः सार्क व अलिप्त राष्ट्र संघटनेत बांगला देशाने आपली महत्वाची भूमिका बजावली. कधी भारताच्या बाजूने तर कधी भारताच्या विरोधात बदलणारे व स्वयंकेंद्री राजकारणासाठी बांगला देश महत्वाचा मानला जातो. या संबंधाचा आशिया खंडाबरोबर संपूर्ण जगावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम होत असल्याने या प्रकरणात या सर्व विविध संबंधाचा आपणास अभ्यास करावयाचा आहे.

शीतयुद्ध व शीतयुद्धोत्तर कालखंडात विशेषतः १९९१ नंतर जागतिकीकरण, खाजगीकरण धोरणामुळे जागतिक राजकारणाचे सर्वच संदर्भ वेगाने बदलत गेले. देशादेशातील सीमारेषा अंधुक झाल्याने मोठ्या राष्ट्रांना छोट्या राष्ट्रांची बाजारपेठ म्हणून गरज भासू लागली तर छोट्या राष्ट्रांना स्वतःच्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी मोठ्या राष्ट्रांची गरज भासू लागली. त्यामुळे पहिल्या महायुद्धाच्या कालखंडात इंग्लंडभोवती फिरणारे राजकारण पहिल्या महायुद्धानंतर म्हणजे १९१९ नंतर अमेरिका रशिया भोवती केंद्रित झाले. या काळात जर्मनी इटालीतील फॅसिझमने काही काळ जगाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. लोकशाही व साम्यवादापेक्षा आक्रमक राष्ट्रवादाने राष्ट्र खऱ्या अर्थाने स्वतःचा विकास करू शकते हा नवा विचार जर्मनी, इटालीने जगासमोर मांडला पण काही अपवाद वगळता अमेरिका व रशिया केंद्रित जागतिक राजकारण दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतरही महत्वाचे मानले जात होते. १९८० नंतर रशियाची अर्थव्यवस्था अडचणीत आली. गोर्बाचेव्ह यांनी 'स्वायत्तता व पुनर्रचना', या कार्यक्रमाची घोषणा करूनही रशियाची पडझड होत राहिली. मार्क्सवादावरील उडालेला लोकांचा विश्वास व संघराज्यातून बाहेर फुटून निघण्याच्या प्रक्रियेने जग पुन्हा एक केंद्री बनू लागले. या काळात एक केंद्री अमेरिकेचे महत्व काही प्रमाणात वाढत असताना चीन, भारत, जपान कोरिया ही जागतिक शक्तीची नवी केंद्रे तयार होऊ लागली. त्यामुळे भासमान एककेंद्रिकरणाबरोबर जग बहुकेंद्रित बनू लागले. या उत्तर वसाहतवादी कालखंडात तिसऱ्या जगाला महत्व आले. अलिप्त राष्ट्र संघटना, सार्क व कॉमनवेल्थ राष्ट्रे कोणता निर्णय घेतात याला जागतिक व्यवहारात भरीव संदर्भ प्राप्त होऊ लागले. साधारणतः तिसऱ्या जगाचे नेतृत्व पं. नेहरूंपासून भारताकडे या ना त्या कारणाने सारखे टिकून राहिल्याने भारतीय राजनीतीला व परराष्ट्र धोरणाला १९४७ नंतर महत्व प्राप्त झाले.

भारत स्वतंत्र होताना पाकिस्तानचीही एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून निर्मिती झाली. यावेळी पश्चिम पाकिस्तान व पूर्व पाकिस्तान (सध्याचा बांगला देश) अशा दोन भौगोलिक सलगता व समिपता नसणाऱ्या भूभागावर एकच राष्ट्र पाकिस्तान या नावाने कारभार करत होते. सलग भूभाग नसेल तर नियंत्रणाचे प्रश्न तयार होतात. अस्मितेचे निवडणूकांचे प्रश्न तयार होतात. भाषिक सांस्कृतिक वेगळेपणाचे प्रश्न अस्थिरता तयार करतात. बांगला देशाच्या निर्मितीमागे हे सर्व प्रश्न तर होतेच पण सर्वात महत्वाचा प्रश्न होता तो उर्दू भाषेचा. पश्चिम पाकिस्तानने पूर्व पाकिस्तानवर म्हणजे बांगला देशावर उर्दू भाषेचा आग्रह धरला. वास्तविक पहाता पूर्व पाकिस्तानवर भारतातील बंगाल प्रांताचा मोठा प्रभाव आहे. जसा पश्चिम पाकिस्तानवर पंजाब व काश्मिरच्या संस्कृतीचा व भाषेचा प्रभाव आहे. पूर्व पाकिस्तानात म्हणजे सध्याच्या बांगला देशात बंगाली भाषा बोलली जाते. त्यामुळे त्यांनी उर्दूला विरोध केला व या एका नैमत्तिक कारणातून स्वतंत्र बांगलाची चळवळ पूर्व पाकिस्तानमध्ये १९६५ नंतर मूळ धरू लागली. या त्यांच्या मागणीला भारताने पाठिंबा व सहकार्य केल्याने ६ डिसेंबर १९७१ रोजी शेख मुजबूर रहेमान यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र बांगला देश तयार झाला. २० डिसेंबर १९७१ रोजी मुजबूर रहेमान हे लोकसत्ताक प्रजासत्ताक बांगला देशाचे पहिले प्रधानमंत्री बनले. या नव्या देशाने विशेषतः आशिया खंडात काही नवे विचार व काही नवे प्रश्न तयार केले. या सर्वांचा बांगला देशाच्या शासनव्यवस्था व राजकारणाच्या संदर्भात आपणास अभ्यास करावयाचा आहे.

## २.१ प्रास्ताविक

तौलनिक शासनव्यवस्था व राजकारणाचा अभ्यास हा आधुनिक अनुभववादी राज्यशास्त्राचा महत्वाचा शास्त्रीय पाया आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहार हे सातत्याने राष्ट्रीय हित व विकासाच्या संदर्भात तपासले जातात. यात सत्ता दृष्टिकोन जसा महत्वाचा मानतात तसा आदर्शवादी तात्विक मूल्यप्रधान दृष्टिकोनाचाही विचार महत्वाचा मानला जातो. राष्ट्राची प्रगती ही भौतिक संदर्भात जशी मोजली जाते. तशीच ती विचार व मानदंड व प्रमाणकांच्या (Norms) संदर्भातही मोजली जाते. भौतिक व आदर्शवादी राष्ट्रीय हिताचा प्रमाणित समतोल व प्रमाणित विकास झाला असेल तर असे राष्ट्र जागतिक राजकारणात नेतृत्व करणारे बडे राष्ट्र (Big Power) मानले जाते.

२० व्या शतकाच्या सुरूवातीला इंग्लंडने आपले राष्ट्रीय हित जोपासताना वसाहतवादाच्या माध्यमातून प्रचंड भौतिक प्रगती केली तसेच दुसऱ्या बाजुला लोकशाही समाजवादी विचारांचा विकास करताना कल्याणकारी राज्य व स्वातंत्र्याचे विचार मांडले. टी. एच. ग्रीन, मील, लास्की इत्यादी अनेक विचारवंत लोकशाही समाजवादाचा नव्याने विचार करत होते. ज्यांचा संपूर्ण जगावर प्रभाव पडला व म्हणूनच इंग्लंडला जागतिक राजकारणात मध्यवर्ती स्थान मिळाले. मात्र स्वातंत्र्याचा मूलगामी विचार करणारे इंग्लंड स्वतः मात्र छोट्या राष्ट्रांना स्वातंत्र्य देत नाही हे जेंव्हा जगातील पारतंत्र्यांत असणाऱ्या राष्ट्रांच्या लक्षात आले तेंव्हा पहिल्या महायुद्धानंतर इंग्लंडचे प्रभुत्व कमी होऊ लागले.

यातूनच लोकशाहीचा नव्या संदर्भात विचार करणारे सक्षम प्रगत अमेरिका जगाच्या राजकारणात नव्याने आले व लोकांनी इंग्लंडच्या साम्राज्यवादाला विरोध करण्यासाठी स्वातंत्र्य व प्रतिकाराच्या चळवळी उभारण्यास सुरूवात केली. याच काळात सर्व सामान्य शेतकरी, कामगार व कष्टकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी समतेचा पुरस्कार करणारी विज्ञानवादी, व्यावहारिक, नवी क्रांतिकारी, परिवर्तनवादी विचारधारा पुढे आली. या चळवळीचे नेतृत्व रशिया करीत होता. रशियाने साम्यवादाच्या या पुरस्कारातून झपाट्याने रशियाची केलेली प्रगती व संपत्तीचे राष्ट्रीयकरण तथा धर्माला विरोध जगातील बऱ्याच राष्ट्रांना महत्वाचा व प्रभावी विचार वाटला. यातून १९२० च्या आसपास ब्रिटिश साम्राज्यवादातून मुक्त होण्याच्या चळवळी आकार घेताना दुसऱ्या बाजुला अमेरिकन नेतृत्वाखालील लोकशाही तर तिसऱ्या बाजुला कामगारांचे कल्याण करू पहाणारी समताधिष्ठित रशियन नेतृत्वाखाली जाण्यास राष्ट्रे तयार होऊ लागली. याला जगाचे द्विध्रुवीकरण असे म्हणतात. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी व इटालीच्या निमित्ताने काही काळ जगासमोर आक्रमक राष्ट्रवाद व संघर्षातून प्रगतीचा विचार मांडणारा फॅसिझम विचारप्रणालीचे काही आकर्षणे तयार केली. पण ती मूळ धरू शकली नाहीत.

१९२० च्या आसपास लॅटिन अमेरिका, दक्षिण आफ्रिका व आशिया खंडात स्वातंत्र्य चळवळींना वेग आला. क्युबा, ऱ्होडेशिया, टांझानिया, पेरू, चिली, इजिप्त, युगोस्लाव्हिया, भारत, चीन, श्रीलंका या छोट्या छोट्या पारतंत्र्यात असणाऱ्या राष्ट्रात फिडेल क्रॅस्ट्रो, यासर अराफत, नासेर, मार्शल टिटो, नेल्सन मंडेला, विनी मंडेला, न्येरेरे, एन्क्रुमा, म. गांधी, पं. नेहरू यांनी स्वातंत्र्यवादी व शांततावादी सहजीवनाच्या विचारांना प्राधान्य दिले. या नेत्यांनी लोकशाही समाजवाद व साम्यवादाबरोबर स्वतःच्या स्वतंत्र विचारांना प्राधान्य दिल्याने जागतिक राजकारणात गांधीवाद उत्तरमार्क्सवाद, नवउदारमतवाद, अराज्यवाद, याबरोबर मानसाचा दर्जा व विकास साधणारे नवे पर्याय पुढे यायला लागले आणि जागतिक राजकारणाच्या अभ्यासाची व्याप्ती केवळ अमेरिका व रशियापुरती न राहाता ती नाविण्याचा शोध घेणारी बनली. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाचे प्रश्न केवळ महायुद्धापुरते शिल्लक राहिले नाहीत तर ते लोकसंख्येच्या वाढीच्या संदर्भात आर्थिक, सामाजिक, पर्यावरण, दहशतवाद, धार्मिक मूलतत्ववाद, साधनसंपत्ती व वितरण, दारिद्र्य व सार्वत्रिक मागासलेपणाच्या संदर्भात तयार होऊ लागले. परावलंबनाच्या सिद्धांतामुळे एका राष्ट्राचे प्रादेशिक प्रश्न जागतिक बनू लागले. गटराजकारणाने तर ते आणखी जटिल करून टाकले. बहुध्रुवीकरणाच्या काळात वेगवेगळ्या खंडात वेगवेगळ्या राष्ट्रांचे नव्याने महत्व येत राहिले. स्पर्धा वाढली, अमेरिकेला मध्य युरोपियन राष्ट्रे पर्यायी बनू लागली. साम्यवादाच्या नेतृत्वाखाली रशिया विरूद्ध चीन व सध्या कोरिया असे पर्याय पुढे आले. आशिया खंडात भारत विरूद्ध चीन किंवा पाकिस्तानात सतत संघर्ष वाढू लागले. यातूनच नव्या राष्ट्रांच्या नव्या अस्मिता, नवे नेतृत्व, नवे प्रयोग यामुळे तिसऱ्या जगात क्युबा, भारत, बांगला, पाकिस्तान, नेपाळ, श्रीलंका, चीन, तैवान व आफ्रिका खंडातील मागास राष्ट्रे ही अभ्यासाचा केंद्रबिंदू बनली. सध्या ग्रीसमध्ये झालेल्या आर्थिक दिवाळखोरीने मध्ये युरोपाचे प्रश्न वाढवले. इसिस सारख्या संघटनेने सीरिया, इराण, इराक या मुस्लीम राष्ट्रांबरोबर जगाची झोप उडवली. पाकिस्तानातील

दहशतवादाने आशिया खंडातले वातावरण अस्थिर बनवले तर कोरियाच्या किम ऊनने जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या जवळ नेण्याचा प्रयत्न चालू केला. या साऱ्या पार्श्वभूमीवर या प्रकरणात आपणास बांगला देशाच्या स्वातंत्र्य चळवळीचा तेथील पाकिस्तानसंदर्भात असणाऱ्या भूमिकेचा, सार्वत्रिक दारिद्र्य, स्थलांतराचा व धर्मांधता तथा इसिसने तयार केलेल्या नविन दहशतवादी प्रश्नांचा आणि एकंदर समाजकारण, राजकारण व शासनाचा अभ्यास करावयाचा आहे. या देशाने आपल्या स्वातंत्र्यानंतर लोकशाही, प्रजासत्ताक मूल्यांचा स्वीकार केला. हे नवे आधुनिक विचार तथा सार्क व अलिप्त राष्ट्र संघटनेमध्ये बांगला देशाची भूमिका याचाही अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे.

## २.२ विषय विवेचन

या प्रकरणात एकूण चार उपघटकांमध्ये आपणास बांगलादेशाच्या राजकीय, शासकीय आणि सामाजिक व्यवस्थेचा सखोल अभ्यास करावयाचा आहे. यासाठी त्या देशाचा इतिहास व त्यामध्ये लपलेल्या संस्कृतीचा आपणास विचार करावा लागतो. बांगला देशाचा तसा इतिहास तपासून पहाता १९७१ पूर्वीचा म्हणजे पश्चिम पाकिस्तानमध्ये असतानाचा इतिहास लक्षात घ्यावा लागतो व पश्चिम व पूर्व पाकिस्तान तयार होण्यापूर्वी म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या व वसाहतवादाच्या संदर्भात हा इतिहास तपासावा लागतो. १९४७ पूर्वी पाकिस्तान व बांगलादेश हे भारतीय भूप्रदेशाचे महत्वाचे भाग होते. ब्रिटिशांचे फोडा व झोडा धोरण, बॅ. जिनांची द्विराष्ट्रवादाची मागणी व काँग्रेसने त्यास दिलेला पाठिंबा यामुळे १४ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तानची म्हणजे पश्चिम पाकिस्तान व पूर्व पाकिस्तानची (सध्याचा बांगला) निर्मिती झाली तर पुढे राजकीय स्वातंत्र्याच्या केलेल्या मागणीला प्रतिसाद म्हणून भारताने बांगला देशाच्या स्वातंत्र्याला पाठिंबा दिला व बांगला देशाच्या उभारणीत मोलाचे आर्थिक सहकार्य केले. अलिप्त राष्ट्रसंघटना व पंचशील तत्वाचा हा एक मूल्यात्मक भाग असल्याने भारताने त्यावेळी आपल्या भूमिकेचे समर्थन केले. या बांगला स्वातंत्र्यामुळे आशिया खंडात पाकिस्तानची शक्ती कमी झाली तर एक नवे राष्ट्र जगासमोर आले. तसेच जागतिक राजकारणात भारताचे महत्व सिद्ध झाले.

अखंड भारतातून द्विराष्ट्रवादाच्या मागणीतून धार्मिक आधारावर मुस्लीम धार्मियांसाठी पाकिस्तानची निर्मिती झाली. ब्रिटिश पारतंत्र्यातून बाहेर पडलेल्या दोन्हीही पाकिस्तानचा इतिहास हा भारतीय इतिहासाचाच एक भाग होता. त्यामुळे भारताचा इतिहास तोच पाकिस्तानचा व बांगलाचा इतिहास व भारताचे प्रश्न तेच या दोन्ही देशांचे काही अपवाद वगळता सारखे प्रश्न होते. पश्चिम पाकिस्तानची संस्कृती वायव्य प्रांतातील अफगाणिस्तान, बलुचिस्तान व परवतुनिस्तान यामुळे काहीशी वेगळी असून तिचा भारतातील काश्मिर व पंजाबच्या प्रादेशिक भाषा संस्कृती व पद्धतीशी जवळचा संबंध दिसतो तर बांगला देशावर भारतीय बंगाली संस्कृती, भाषा यांचा प्रभाव दिसतो.

पाकिस्तानच्या (पाकिस्तान दोन्ही) निर्मितीनंतर या देशात एकूण चार राज्यघटनांचा वापर करण्यात आला. या सर्व निर्णयकारी प्रक्रिया पश्चिम पाकिस्तानमध्ये पार पडत होत्या व त्यामध्ये बहुधा कधीच पूर्व पाकिस्तानला विश्वासात घेतले गेले नाही. निर्णय पश्चिम पाकिस्तानने घ्यायचे व

ते पूर्व पाकिस्तानवर लादायचे असा साधारण हा इतिहास आपणास दिसतो. सुरूवातीला १९४७ ते १९५६ पर्यंत १९३५ चा भारत प्रशासन कायदा पाकिस्तानमध्ये वापरला गेला. अर्थात पूर्व पाकिस्तान म्हणजे बांगलामध्ये वापरला गेला. मार्च १९५६ ते ऑक्टोबर १९५८ पर्यंत १९५६ च्या दुसऱ्या घटनात्मक विधीसभेने तयार केलेली राज्यघटना येथे वापरली गेली. ऑक्टोबर १९५८ ते जून १९६२ या काळात पाकिस्तानात अयुबखान यांनी पहिला मार्शल लॉ जारी केला. जून १९६२ ते मार्च १९६९ या काळात घोषित केलेल्या वटहुकूमांमुळे मार्च १९६९ ते डिसेंबर १९७१ या काळात याह्याखान यांनी दुसरा मार्शल लॉ जारी केला. ही सर्व एकप्रकारची लष्करप्रधान हुकूमशाही होती. सातत्याने पूर्व पाकिस्तान म्हणजे बांगला देशावर अन्याय करावयाचा, त्यांना दुय्यम वागणूक द्यावयाची व त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करावयाचे या साऱ्या त्रासाला कंटाळून शेख मुजबूर रहेमान यांनी भारताच्या सहकार्याने 'सोनार बांगलाची' (स्वतंत्र बांगला) घोषणा केली व ६ डिसेंबर १९७१ रोजी बांगला देशाची निर्मिती झाली. यासाठी भारत, पाकिस्तान या राष्ट्रांना युद्ध करावे लागले. निर्वासितांचे प्रश्न तयार झाले. बांगला देशाला स्वातंत्र्य मिळाले पण भारत पाकिस्तान संबंध मात्र अधिक संघर्षाचे व संशयाचे बनले.

मूळात पाकिस्तानची निर्मिती हीच धार्मिक कारणातून झाली असल्याने पाकिस्तानप्रमाणेच बांगला देशात लोकशाही मूल्ये रुजणे बरेच अवघड होते. याचे आजही आपणास प्रत्यंतर येते. मुस्लीम धर्मातील कडवा सनातन विचार दूर होण्यासाठी भारतात झालेल्या प्रयत्नांचा एक परिणाम म्हणून तस्लीमा नसरीन या पुरोगामी लेखिकेने मुस्लीमांमधील कट्टरता व पारंपरिक संकुचितपणावर कठोर प्रहार केले पण तरीही बांगला देशातील धार्मिक मूलतत्ववाद सतत हिंसक मार्गाचा वापर करीत असतो. मोठ्या प्रमाणात असणाऱ्या आर्थिक दारिद्र्यामुळे बांगला देशातून मोठ्या प्रमाणात निर्वासीत भारतात येत आहेत. त्याचबरोबर बांगला देश आता पाकिस्तान, नेपाळप्रमाणे आंतरराष्ट्रीय दहशतवाद व इसिसला खतपाणी घालणारे केंद्र बनत आहे. त्यामुळे अहमदिया व वहाबी चळवळीतून मांडलेला समन्वयवादी सौम्य राष्ट्रवाद आता बांगला देशात इतिहासजमा झाला आहे. याचाच एक भाग म्हणजे भारताला विरोध करणारा व शत्रू मानणारा मोठा वर्ग बांगला देशात तयार होत आहे. हिंदूच्या कत्तली, पत्रकारांच्या स्वातंत्र्यावरील मर्यादा, भारतीय क्रिकेटपटूंचे हिंसक ओंगळ पोस्टर प्रदर्शन यातून या देशाची मागास मानसिकता व एकंदर अस्थिरता लक्षात येते.

अखंड भारतामध्ये मूळात असणाऱ्या बहुराष्ट्रवादाला वाट करून देण्यासाठी पाकिस्तानची निर्मिती झाली. किंबहुना दुसरा कोणताही पर्याय त्या काळात नव्हता. सर सय्यद अहमद यांना मुस्लीमांची चिंता वाटत होती. बॅ. जीनांना तसेच वाटत होते. हिंदू मुस्लीम ही मूळात दोन राष्ट्रे आहेत, असे वास्तववादी प्रतिपादन डॉ. आंबेडकरांनी आपल्या (Thougts on Pakistan) 'थॉटस् ऑन पाकिस्तान' या ग्रंथात म्हटले होते. शिख नेते तेजबहादूर सप्रू यांनीही अल्पसंख्य जमातींच्या भविष्याबाबत १९४६ च्या सप्रू अहवालात चिंता व्यक्त केली होती. पाकिस्तानची निर्मिती बहुराष्ट्रवादी धार्मिक विघटनवादी प्रवृत्तीमधून तयार झाली असली तरी बांगला देशाची निर्मिती मात्र केवळ बांगलाने स्वातंत्र्याची मागणी केली व भारताने त्यास पाठिंबा दिला या वरवरच्या तात्विक

कारणातून झाली नाही. पाकिस्तानचा शिरजोरपणा व दडपशाही बांगलाला नको होती. तसेच भारताचेही काही राष्ट्रीय हितसंबंध या संपूर्ण मुक्तीसंग्रामात अनुस्यूत होते. १९६९ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे विघटन झाले व संजीव रेड्डीच्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीवरून काँग्रेसमध्ये दोन गट पडले. इंदिरा गांधीच्या नेतृत्वावर विश्वास नसणारे काँग्रेसमधील जुनेजाणते नेते कामराज, स.का. पाटील, मोरारजी देसाई, संजीव रेड्डी यांना सिंडीकेट काँग्रेस असे नाव पडले तर इंदिरा गांधींना पाठिंबा देणारे यशवंतराव चव्हाण, अतुल्य घोष आदींना इंडिकेट काँग्रेस असे नाव मिळाले. संजीव रेड्डी काँग्रेसचे असूनही इंदिरा गांधींनी कामगार नेते व्ही. व्ही. गिरी यांना राष्ट्रपती पदासाठी पाठिंबा देऊन त्यांना राष्ट्रपती करण्यात महत्वाची भूमिका बजावली. एका अर्थाने हा इंदिरा गांधींच्या धाडसी निर्णयाचा विजय होता. याच काळात त्यांनी चौदा बँकांचे राष्ट्रीयकरण व गरीबी हटावची घोषणा करून काँग्रेसचे निर्णायक प्रभुत्व सिद्ध केले. याच यशाचा एक भाग म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणात रशियाशी पोलादी मैत्री करार करताना त्यांनी पाकिस्तानची एकसंध शक्ती विभाजीत करून पाकिस्तानच्या उद्दामपणाला शह दिला व बांगलाची निर्मिती करून जागतिक राजकारणात आपले आंतरराष्ट्रीय राजकारणाचे कौशल्य दाखवून दिले म्हणूनच बांगलाची निर्मिती ही केवळ स्वातंत्र्याची व उर्दूला विरोध करणारी प्रतिक्रिया नव्हती तर विशेषतः आशिया खंडातील भारताच्या नेतृत्वाचे त्यास नवे संदर्भ होते.

थोडक्यात बांगला देशाची निर्मिती बहुविध कारणांचा परिपाक होती. पश्चिम पाकिस्तानविरोधात बांगला देशातील अवामी लीग पक्षाने केलेली ही स्वातंत्र्याची क्रांती होती. भौगोलिक सलगता नसताना केवळ धर्माच्या नावाखाली दूरदूरचे दोन देश एकत्र राहाणे मूळातच अनैसर्गिक होते. डिसेंबर १९७० च्या नॅशनल ॲसेंब्लीच्या निवडणूकीत शेख मुजबूर रहेमान यांच्या अवामी लीग पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले. अवामी लीगला नॅशनल असेंब्लीच्या ३१३ जागापैकी १६७ व पूर्व पाकिस्तान (बांगला) मध्ये ३१० जागापैकी २९८ एवढे प्रचंड पाठबळ व जागा मिळाल्या. यामुळे पाकिस्तानची दडपशाही संपली. शेख मुजबूर रहेमान यांचा तुरुंगवास संपला. या काळात बांगला देशातील लोकांवर केलेल्या अत्याचाराला जगातून सहानुभूती मिळाली. अन्यायाला शह देण्यासाठी बांगला देशात 'मुक्ती वाहिनी' या चळवळीने पाकिस्तानला योग्य तो विरोध केला तरी जून १९७० पर्यंत भारतात जवळजवळ सहा सात लाख निर्वासीत घाबरून स्थलांतरीत झाले. त्या सर्वांची भारताने योग्य ती सोय करून भारताची आदरातिथ्याची थोर परंपरा जगाला दाखवून दिली. या साऱ्या पार्श्वभूमीवर जून जुलै १९७२ मध्ये पाकिस्तानचे प्रेसिडेंट झुल्फीकार अली भुट्टो व भारतीय प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांच्यात ऐतिहासिक सिमला करार झाला आणि यामध्ये बाहेरच्या शक्तींनी आशिया खंडाच्या अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप करू नये असे ठरवण्यात आले. अमेरिकेने याकाळात पाकिस्तानला पाठिंबा दिला होता व भारताला भिती दाखवण्यासाठी त्यांचे अती सुसज्ज आण्विक शस्त्रांनी समृद्ध सातवे आरमार हिंदी महासागरात भारताजवळच्या दिगोगार्शिया बेटापर्यंत आणले होते. बांगला देशाच्या स्वातंत्र्यामधून बड्या राष्ट्रांच्या हस्तक्षेपी राजकारणालाही भारताने योग्य तो शह दिला, म्हणूनच मार्च १९७१ च्या लोकसभा निवडूकीत काँग्रेसला म्हणजे इंदिरा गांधींना प्रचंड यश मिळाले. बांगला

देशाच्या उभारणीत भारताचा मोठा वाटा होता. युनोमध्येही भारताने बांगला देशातील नागरिकांवर होणारा अत्याचार व त्यांचे स्थलांतर जगाला दाखवून दिले. आपला मदतीचा हात पुढे करताना भारत बांगला देशाने उभय मैत्री करार १९ मार्च १९७२ मध्ये संमत केला. या मैत्री करारात शांतता, सलोखा याबरोबर धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समाजवाद व राष्ट्रवादावर भर देण्यात आला.

मात्र बांगला देशातील दारिद्र्य, मागासलेपण, सनातन धार्मिकता यामुळे तेथील प्रशासन चालवणे ही खूपच अवघड गोष्ट होती. दुष्काळ व प्रशासकीय पुनर्रचनेच्या अडचणी त्यात युद्धाची भर यामुळे बांगला देशाची परिस्थिती १९७० च्या दशकात कमालीची खराब होती. भारताने या संदर्भात महत्वाची जबाबदारी पार पाडली. या संदर्भातील काही उदाहरणे भारताच्या उदार सहिष्णू विदेश धोरणावर प्रकाश टाकणारी आहेत. बांगला देशाचे डिसेंबर १९७१ मधील प्रधानमंत्री ताजुद्दीन अहमद यांच्या विनंतीनुसार २८ आय. ए. एस व आय. पी. एस अधिकाऱ्यांचे एक पथक बांगला देशात भारताने त्यांना प्रशासनीक मदत करण्यास पाठवले (पहा- टाईम्स ऑफ इंडिया १३ डिसेंबर १९७१) याशिवाय भारताने कापड, तेल, मीठ, साखर, रॉकेल, औषधे यांची त्यांना मदत केली. (पहा- हिंदुस्तान स्टॅंडर्ड २० डिसें. १९७१) याशिवाय १,५०,००० टन अन्नधान्न २५ कोटी रुपयांची तातडीची मदत, रेल्वेसाठी १३ कोटी रु. ४०,००० टन शेतीसाठी युरिया खत भारताने बांगलाला दिले. वर्षअखेरीपर्यंत इंधन तेल व इतर मदतीशिवाय ९,३१,००० टन एवढे प्रचंड अन्नधान्य भारतातून बांगलासाठी पाठवण्यात आले. (पहा स्टेटसमन ९ नोव्हें १९७२)

जुलै १९७३ मध्ये भारत व बांगला देशात व्यापारी द्विपक्षीय करार झाला. यात भारताने बांगला देशाला कोळसा व तंत्रज्ञानाची तर बांगलाने भारताला ज्युट व ताग द्यावा. या ज्युट व तागावर प्रक्रिया करून कृत्रिम धागे व मोठा कापड व्यवसाय कलकत्ता व बंगाल प्रांतात आहे पण नैसर्गिक अडचणींमुळे बांगलाला हा करार निट चालवता आला नाही. १९७४ च्या काळात बांगला देशात भारत विरोधी, चीन विरोधी, मुजबूर रहेमान विरोधी असे विविध गट काम करीत होते व या साऱ्यांना बरोबर घेऊन बांगलाची प्रगती करणे हे अवघड काम शेख मुजबूर रहेमान यांच्यासमोर होते. निष्क्रिय प्रशासन, दारिद्र्य, दुष्काळ, बंद पडलेले व्यवसाय, युद्धाचे झालेले परिणाम व अंतर्गत असंतोष यामुळे मुजबूर रहेमान यांचे महत्व दिवसेंदिवस कमी होऊ लागले. या सार्वत्रिक असंतोषामध्ये फराक्का धरण व बेरु बारीचा प्रश्नाने भर टाकली. गंगेच्या पाणी वाटपात भारत बांगलादेशाला फसवत आहे असा एक समज बांगला देशात तयार झाला होता. शेख मुजबूर रहेमान यांना सतत होणारा वाढता विरोध, अन्नधान्याच्या वाढत्या किंमती व शासकीय प्रशासकीय अस्थिरता यातून देशात शिस्त व नियंत्रण करण्यासाठी शेख मुजबूर रहेमान यांनी २८ डिसेंबर १९७४ रोजी राष्ट्रीय आणिबाणीची घोषणा केली. पण तरीही बांगला देशातील अराजक कमी झाले नाही व १५ ऑगस्ट १९७५ रोजी एका लष्करी अधिकाऱ्याने शेख मुजबूर रहेमान व त्यांच्या कुटुंबियांची हत्या केली. वाणिज्य व व्यापारमंत्री खानदकार मुस्ताक अहमद नवे राष्ट्रपती झाले. २४ ऑगस्टला लष्करात मोठे बदल झाले व मेजर जनरल झिऊर रहेमान यांची मेजर जनरल के. एम्. शफिउल्लाह यांच्या जागी प्रमुख म्हणून निवड झाली. २६ ऑगस्टला भारताचे मित्र असणाऱ्या अवामी लीगच्या सर्व

पदाधिकाऱ्यांची भ्रष्टाचार व इतर राष्ट्रद्रोहाच्या कारणासाठी धरपकड झाली. यात पूर्व उपराष्ट्रपती नरुल इस्लाम प्रधानमंत्री मनसुर अली आणि ताजुद्दिन अहमद, अब्दुल सामद, कमरुझ्झमन डॉ. अस्दुल हक, डॉ. हैदर अली, गाझी गोलम मुस्तफा, माणिक चौधरी आणि कृषक श्रमिक अवामी लीगच्या नेत्यांना तुरुंगात टाकले गेले. बांगला देशात अराजकातून निर्माण झालेले हे लष्करी बंड होते. ज्या संस्कृतीचा आजपर्यंत बांगलादेशाला त्रास सहन करावा लागला आहे. कारण आजही या देशात लोकशाही नावालाच आहे. मूलभूत स्वातंत्र्ये नाहीत व जगातील भ्रष्टाचारी राष्ट्रात बांगलादेशाचा पहिला तर भारताचा पासष्टावा नंबर आहे. अस्थिरता व हिंसक खूनाचे हे सत्र पुढे नोव्हेंबर व त्यानंतरही चालूच होते खानदकार मुस्ताक अहमद यांना राष्ट्रपती पदावरून हटवून सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश ए. एम. सायेम यांना राष्ट्रपती करण्यात आले. शेख मुजबूर रहेमान यांचे समर्थक ताजुद्दिन अहमद, सैद नुरुल हस्लाम, कमरुझ्झमन, मन्सुर अली यांची हत्या करण्यात आली. ६ नोव्हेंबर १९७५ रोजी सरन्यायाधीश ए. एम. सायेम राष्ट्रपती झाले पण त्याच दिवशी बांगला संसद बरखास्त करण्यात आली. ७ नोव्हेंबर १९७५ रोजी झिऊर रहेमान डेप्युटी मार्शल लॉ अधिकारी बनले व त्यांनी वित्त, गृह, उद्योग, वाणिज्य, ज्युट, माहिती व प्रसारण, शिक्षण, विज्ञान व संशोधन तंत्रज्ञान तथा अणू ऊर्जा खात्यांचा कारभार स्वतःकडे घेतला. या सर्व गोंधळाकडे भारतासह जग तटस्थपणेच बघत होते.

भारत बांगला देश यांच्यात दुरावा व संघर्ष होण्याची साधारणतः पाच कारणे आहेत यात-

१) गंगेच्या पाणीवाटपाचा प्रश्न होता. फराक्का धरणाच्या संदर्भात हा विषय आणखीनच गुंतागुंतीचा बनला होता. परराष्ट्र सेक्रेटरी, विदेश मंत्री व प्रधानमंत्री स्तरावर यावर चर्चा होऊनही हा प्रश्न सुटला नाही.

२) भारत व बांगला देशातील दुसरा प्रश्न होता. तो घुसखोरीचा. ही घुसखोरी मोठ्या प्रमाणात आसाम प्रांतात झाली. आज आसाम प्रांतात जो स्थानिक मूळनिवासी लोकांनी नक्षलवादाचा आधार घेतला आहे. किंवा बोडो लँडचे प्रकरण १९८६ मध्ये तयार झाले; त्याच्या मूळाशी बांगला निर्वासीत हे खरे कारण आहे. कारण या प्रांतात असणारे चहाचे मळे मोठ्या प्रमाणात राजस्थान व गुजराथमधल्या व्यापाऱ्यांनी घेतले असून बांगला घुसखोर हे या चहाच्या मळ्यात स्वस्त मजूर म्हणून काम करतात. हे स्वस्त मजूर ही भारताची सध्याची डोकेदुखी आहे.

३) भारत व बांगलामधील मतभेदाचे तिसरे कारण म्हणजे या दोन्ही देशातील सीमावाद होय. भारत व बांगला देशात खास कंपौउ स्वरूपात सीमा बंदिस्त नाहीत. जनरल इर्शाद यांनी १९८४ मेमध्ये अशा स्वरूपाच्या बंदिस्त सीमांना विरोध केला होता.

४) चौथा महत्वाचा प्रश्न आहे तो दहशतवादाचा. सध्या बांगला देशातून मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय दहशतवादी भारतात दहशतवादी घुसखोरी करण्यापेक्षा ती नेपाळ व बांगला देशातून करणे त्यांना सोईचे असल्याचे जाणकारांचे मत आहे.

५) भारत बांगला परिसीमेमध्ये बे ऑफ बेंगाल म्हणजे न्यू मूर आईसलँड हा प्रांत जो बंगाल प्रांतात पूरबाशा नावाने ओखळला जातो व दक्षिण तळपट्टी प्रांत यावर बांगलाने मालकीहक्क दाखवला आहे. पण तो भारतीय भूप्रांताचा भाग आहे व तसा भारताने दावा केला आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपणास बांगला देशाच्या शासनव्यवस्थेबरोबर पहिल्या भागात ऐतिहासिक वारसा, स्वातंत्र्यलढा घटनानिर्मिती यांचा तर दुसऱ्या भागात कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ, व बांगला देशातील न्यायव्यवस्थेचा अभ्यास करावयाचा आहे. तिसऱ्या भागात या देशातील सामाजिक संरचना, अर्थव्यवस्था व एकंदर विकासाचा आढावा घ्यावयाचा आहे तर शेवटच्या भागात राजकीय पक्षांची माहितीचा आढावा घ्यायचा आहे.

## २.२.१ ऐतिहासिक वारसा

अ) ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य दिले पण याचवेळी पाकिस्तानची (पूर्व व पश्चिम पाकिस्तान म्हणजे सध्याचे अनुक्रमे बांगला व पाकिस्तान) निर्मिती केली. याला द्विराष्ट्रवाद म्हणतात. ही मागणी बॅ. जीना यांनी केली होती त्यामुळे भारताची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान, भारत व बांगला यांच्यात अनेक नवे प्रश्न तयार झाले.

इ. स. ७१२ पासून भारतात मुस्लीम संस्कृतीचा मोठा विकास झाला. बाबरानंतर अकबराने हिंदू मुस्लीम संबंध सलोख्याचे बनविण्याचा प्रयत्न केला. पण पुढे औरंगजेबाच्या काळात १६५८ ते १७०७ मध्ये आक्रमक व सनातन मुस्लीम धर्माला महत्व आले. औरंगजेबाने हुकूमशाही पद्धतीने कारभार केला पण पुढे त्याच्या मृत्यूनंतर मोगल साम्राज्याचे विघटन झाले. छ. शिवाजी महाराजानंतर मराठ्यातही प्रभावी नेतृत्व राहिले नाही व संपूर्ण भारतीय राजकारण सुस्त, थंड व ऐषआरामात अडकले. याच काळात भारतात ईस्ट इंडिया कंपनीने आपला व्यापार व नंतर राजकारणात आपला प्रभाव निर्माण केला. मुस्लीम व मराठीसत्ता संस्थानात विकेंद्रीत झाली व सामान्य जनता धर्म, कर्मकांड, दुष्काळ, सावकारी, दारिद्र्य, निरक्षरता यात अडकल्याने ब्रिटिशांना इथे राज्यकारभार करण्यात कोणताच विरोध शिल्लक राहिला नाही.

### १८५७ चे स्वातंत्र्याचे बंड व मुस्लीम सहभाग

ब्रिटिशांच्या आगमनाने भारतातील मुस्लीमांचा कापड व्यवसाय अडचणीत आला. त्यामुळे सहाजिकच ते ब्रिटिशांना शत्रू मानू लागले. याच काळात वाहाबी या मुस्लीम चळवळीने कट्टर मुस्लीम विचारांना पाठिंबा दिला. त्यामुळे सर्व धर्मिय कट्टर लोक एकत्र येऊन १८५७ चे स्वातंत्र्याचे बंड झाले. त्यात हिंदूप्रमाणे मुस्लीमांचा मोठा सहभाग होता पण त्यास अपयश आले.

### मुस्लीमांची स्वतंत्र मतदार संघाची मागणी

१८९२ च्या भारत प्रशासन कायद्याच्या निर्मितीवेळी सर सय्यद अहमद यांनी या कायद्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात प्रतिनिधित्वात मुस्लीमांचे स्थान कसे असेल? असा प्रश्न

विचारला होता. आपण अल्पसंख्य आहोत ही भिती व काहीशी वेगळेपणाची भावना त्यांच्या मनात होती. तशी ती काँग्रेस नेते कुतूबुद्दिन तय्यबजी यांनाही वाटत होती.

पुढे १९०६ मध्ये व १९०९ च्या मोर्लेमिंटो प्रशासन कायद्यात एच. एच. आगारवान यांनी असाच मुस्लीम प्रतिनिधित्वाचा प्रश्न उपस्थित केला होता. अगदी काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनातही मुस्लीम अध्यक्ष असताना हिंदू सदस्य व हिंदू अध्यक्ष असताना मुस्लीम सदस्य बऱ्यापैकी गैरहजर असत. हा धार्मिक अविश्वास अधूनमधून उफाळून वर येत असे. आगारवान यांच्या या मागणीवर लॉर्ड मिंटोने दिलेले उत्तर फारच उथळ व आशावादी स्वरुपाचे होते. ते म्हणतात, ''आम्ही मुस्लीम समाजाला संख्येच्या संदर्भात गृहित धरीत नाही तर आम्ही त्यांचे राजकीय कौशल्य व कृतीप्रवणता महत्वाची मानतो.'' १९०६ मध्ये मुस्लीम लीगची व त्याच समकाळात हिंदू महासभा व त्याअंतर्गत अभिनव भारत सारख्या चळवळी का उभ्या राहिल्या याची कारणे या देशाच्या इतिहासात आपणास सापडतात. हिंदू महासभा व बंगालच्या फाळणीच्या संदर्भात मुस्लीम लीगने प्रमुख दोन मागण्या या काळात केल्या. यात–

१) भारतीय मुस्लीमांची ब्रिटिशांप्रती असणारी प्रामाणिक निष्ठा सिद्ध करण्याचा प्रयत्न करणे.

२) भारतीय मुस्लीमांच्या राजकीय हक्कांचे संरक्षण करणे.

स्वतंत्र मतदार संघाच्या वरील मागण्यांना ब्रिटिश सेक्रेटरी लॉर्ड मोर्लेचा विरोध होता पण त्याच्यावर सर सय्यद अहमद भारत सरकार, प्रिं. बेक, प्रिं. आर्चबोल्ड यांचा अप्रत्यक्ष दबाव होता. प्रिं. बेक, सर सय्यद अहमद यांना असे वाटत होते की, राष्ट्रीय काँग्रेस ही ब्रिटिशांकडून सत्ता हस्तगत करून ती हिंदूना देणारी स्वातंत्र्य चळवळ आहे. १९०९ च्या मोर्लेमिंटो सुधारणेपासून ब्रिटिशांनी मुस्लीमांच्या मागण्यांचा आदर करणे चालू केले. मिंटोज डायरी मध्ये मिंटोने असे लिहिले आहे की, निवडणूका जाहिर केल्यावर हिंदू मुस्लीम यांच्यात संघर्ष वाढत जाईल व आपणास कारभार करणे सोपे होईल. या डावपेचांना शह देण्यासाठी १९१६ ला लो. टिळकांनी लखनौ करारात हिंदू मुस्लीम ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**१९१९ मॉर्टग्यू चेम्सफर्ड सुधारणा**

काँग्रेसच्या सूरत अधिवेशनानंतर द्विराष्ट्रवादाचे जनक बॅ. जीनांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. लखनौ कराराला सुरूवातीला त्यांचा पाठिंबा होता. १९२० पर्यंत ते राष्ट्रीय प्रवाहात सामील होते. पण १९१९ मध्ये शीख, ख्रिश्चन धर्मियांनी ही स्वतंत्र मतदार संघाची मागणी केल्याने मुस्लीम युवकांच्या याच प्रकारच्या मागणीला बॅ. जीना विरोध करू शकले नाहीत. त्यामुळे द्विराष्ट्रवादाला सतत खतपाणी मिळत राहिले.

**ब) पाकिस्तान निर्मितीची सुरूवात**

मुस्लीम लीगला संबोधीत करताना १९३० मध्ये पहिल्यांदा महंमद इकबाल यांनी 'पाकिस्तान' शब्दाचा वापर केला. यात या शब्दाचा अर्थ सांगताना चौधरी रहिमत अली म्हणतात. P म्हणजे

पंजाब, A म्हणजे अफगाणिस्तान, Ki म्हणजे काश्मिर, S म्हणजे सिंध Tan म्हणजे स्थान अथवा जागा प्रदेश होय. कवी इकबाल, चौधरी रहिमतअली व बॅ. जीना यांच्या पाकिस्तानसाठीच्या मागणीला ब्रिटिशांचा पाठिंबा होता. मुस्लीम समाजातील वरिष्ठ वर्गाला फाळणीत रस होता तर पूर्व पाकिस्तान म्हणजे बांगलातल्या मुस्लीमांना यात फारसा रस नव्हता. वरील पाकिस्तान शब्दाच्या विग्रहात बांगलाचा कुठेही उल्लेख नाही. यातून पहिल्यापासून पूर्व पाकिस्तान म्हणजे बांगला हा पाकिस्तानसाठी दुय्यम, उपेक्षीत व कमी दर्जाचा प्रांत होता. या मागणीला म्हणजे पाकिस्तानला पाठिंबा देण्यासाठी उत्सुक मुस्लीम रवानदानी लोकांनी १९३७ च्या निवडणूकीत मुस्लीम लीगला चांगला पाठिंबा दिला. पण प्रांतिक कौंसिलच्या कॅबिनेटमध्ये मुस्लीम प्रतिनिधी घेण्यास काँग्रेसने नकार दिल्याने बॅ. जीनांनी काँग्रेसवर प्रखर टीका केली. ते म्हणाले, ''मुस्लीम लीग केवळ मुस्लीमांसाठी काम करीत नसून ती सर्व अल्पसंख्य जाती जमातीच्यांसाठी राजकीय समान हक्क व सुरक्षेच्या संदर्भात काम करते.'' या वेळेपासून भारतात हिंदू मुस्लीम ही दोन राष्ट्रे आहेत. असे म्हणण्यास त्यांनी सुरूवात केली. आम्हाला साम्राज्यवादी ब्रिटिशांपासून व बहुसंख्य हिंदूंच्या धार्मिक दबावापासून स्वातंत्र्य हवे आहे व त्यास द्विराष्ट्रवाद हाच पर्याय आहे. मुस्लीमांचे स्वतंत्र राष्ट्र तयार झाल्याशिवाय मुस्लीमांची राजकीय आर्थिक, व्यापारी, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगती होणार नाही असे त्यांचे मत होते. १९४० च्या मुस्लीम लीगच्या लाहोर अधिवेशनात पहिल्यांदा पाकिस्तानची मागणी करण्यात आली. बॅ. जीना यावेळी म्हणाले, ''राष्ट्राच्या व्याख्येनुसार मुस्लीम हे राष्ट्र आहे व म्हणून त्यास स्वतःचा भूप्रदेश व राज्यशासन असणे गरजेचे आहे. हिदूं मुस्लीम हे दोन समांतर धर्म असून त्यांची भाषा, संस्कृती पद्धती चालीरिती भिन्न आहेत. म्हणूनच वायव्य सरहद्द प्रांत (पश्चिम पाकिस्तान) व पूर्व भारतीय पट्ट्यात (पूर्व पाकिस्तान-बांगला) मुस्लीमांसाठी स्वतंत्र स्वतःचे विदेश धोरण, संसूचन, संरक्षण, कस्टम, चलन असणारे राष्ट्र हवे आहे.''

**बिगर लीग मुस्लीम नेत्यांचा पाकिस्तान निर्मितीबाबतचा दृष्टिकोन**

भारतात बॅ. जीना व मुस्लीम लीगने स्वंतत्र पाकिस्तानची मागणी केली असली तरी भारतातील सर्व मुस्लीमांचा त्याला पाठिंबा नव्हता. आझाद मुस्लीम कॉन्फरन्स, जमात उल उलेमा या उदारमतवादद्यांना द्विराष्ट्रवादाला विरोध होता. यासंदर्भात आझाद मुस्लीम कॉन्फरन्स असे म्हणते की, ''ही संघटना देशाचे स्वातंत्र्य सुरक्षित राखण्यास वचनबद्ध आहे, तसेच ती देशाच्या चौकटीतच मुस्लीमांचे प्रश्न सोडवू इच्छिते. भारताला स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण अशी सामाईक साधनसंपत्ती आहे. मुस्लीम समाज या सर्व कृती व घटकांचा अविभाज्य भाग आहे. म्हणून ही सभा भारताचे पूर्ण स्वातंत्र्य मागत असून मुस्लीम समाजाने यासाठी पूर्वी त्याग केला असून पुढेही या स्वातंत्र्य व सार्वभौमत्वासाठी त्याग करण्यास त्यांनी तयार राहावे.'' या उदारमतवादी मुस्लीमांना 'अखंड भारतीय राष्ट्रवाद' मान्य होता.

**पाकिस्तान मागणीचा शेवटचा टप्पा**

द्विराष्ट्रवादाची मागणी मान्य करावी की करू नये यावरून काँग्रेसमध्येही दोन भिन्न विचारप्रवाह होते. डॉ. आंबेडकरांनी १९४० मध्ये Thoughts on Pakistan या ग्रंथात मोठी वैचारिक व सैधांतिक भूमिका मांडली. हिंदू मुस्लीम हे दोन समांतर धर्म असून त्यांचे धर्म व जीवनविषयक तत्वज्ञान परस्परविरूद्ध स्वरुपाचे असल्याने त्यांच्यात बळजबरीने समन्वय साधून त्यांना एकाच राष्ट्रात बांधून ठेवणे, चुकीचे आहे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. पण कोणत्याही परिस्थितीत भारताची फाळणी होऊ नये असा म. गांधींचा विचार होता.

१९४२ मध्ये छोडो भारत आंदोलनामुळे म. गांधी व राष्ट्रीय काँग्रेसचे महत्व खेड्यापाड्यात सामान्यांपर्यंत पोहोचले होते. १९४२ च्या क्रिप्स योजनेत पाकिस्तानचे अप्रत्यक्ष समर्थन केले होते. त्यास काँग्रेस वर्कींग कमिटीने विरोध केला. म. गांधी व बॅ. जीना आपापल्या भूमिकेवर ठाम होते. यावेळी पाकिस्तान निर्मितीसाठी सार्वमत घ्यावे व जर त्यास विभाजनाच्या बाजूने कौल मिळाला तर पाकिस्तानसाठी लोकसत्ताक पद्धतीने मान्यता देऊ असे म. गांधी म्हणाले. पण त्यास बॅ. जीना तयार नव्हते. १९४६ मध्ये कॅबिनेट मिशनने संघराज्यावर शिक्कामोर्तब केले. केंद्र व घटक राज्यमांडणी लीगला मान्य होती. पण लीगने स्वतःचा गटराज्यघटनेचा प्रस्ताव मांडल्याने काही विघटनवादी प्रश्न तयार झाले. यावर तोडगा काढण्यास पं. नेहरू व बॅ. जीना यांनी इंग्लंडमध्ये बोलणी केली. बहुसंख्याक समुदायाच्या इच्छेने तयार झालेली राज्यघटना अल्पसंख्य व इच्छा नसणाऱ्या गटावर लादणे लोकशाहीला संयुक्तीक नाही असे बॅ. जीना म्हणाले. त्यांनी भारतीय घटनासमितीवर बहिष्कार टाकला. त्यामुळे पाकिस्तान निर्मितीला वेग आला. २० फेब्रुवारी १९४७ रोजी ॲटली भारतात आले. जून १९४८ पर्यंत भारताला स्वातंत्र्य देण्याची त्यांनी घोषणा केली. प्रत्यक्षात हे सत्तांतर करण्यास शेवटचे गर्व्हनर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन भारतात आले व त्यांनी ३ जून १९४७ रोजी या सर्व सत्तांतराचा एक भाग म्हणून फाळणीची घोषणा केली. हिंदू मुस्लीम दंगली, गांधींचे उपोषण, बॅ. जीनांना पाकिस्तानचा आग्रह यांनी हा काळ विशेष गाजला. त्या सर्वाचे बरेवाईट परिणाम आजही आपणास भोगावे लागत आहेत.

**क) पाकिस्तानमधील राज्यघटना निर्मिती व बांगला देशाची घटनात्मक बैठक**

पाकिस्तान हे सुरूवातीपासून अतिशय अस्थिर व वादग्रस्त असे राष्ट्र आहे. या देशात बांगला देशाच्या निर्मितीपर्यंत दोन राज्यघटना व दोन वेळा मार्शल लॉ (लष्करी कायदे आणीबाणीसदृश्य) जारी करण्यात आले. पाकिस्तानच्या निर्मितीनंतरही १९४७ चा भारत स्वतंत्रता कायदा व १९३५ च्या भारत प्रशासन कायद्यात किरकोळ दुरुस्त्या करून पाकिस्तानात तात्पुरती राज्यघटना तयार करण्यात आली होती. बॅ. जीना हे १५ ऑगस्ट १९४७ च्या वेळी पाकिस्तानचे गर्व्हनर जनरल होते तर मुस्लीम लीगचे सेक्रेटरी लियाकत अलीखान जे पाकिस्तानचे पंतप्रधान झाले. त्यांच्या प्रयत्नांमुळे संघराज्य शासनपद्धती तेथे सुरू झाली. १९३५ च्या भारत प्रशासन कायद्याने पाकिस्तानने संघराज्याअंतर्गत पश्चिम पाकिस्तान, सिंध, पूर्व बंगाल (सध्याचा बांगलादेश) अशी प्रांतरचना केली.

बॅ. जीनांचा १९४८ मध्ये मृत्यू झाल्यानंतर पूर्व बंगाल प्रांताचे मुख्यमंत्री ख्वाजा निजामुद्दिन हे पाकिस्तानचे पहिले घटनात्मक जनरल झाले. या नव्या नेत्यांसमोर अनेक प्रश्न होते. या आर्थिक, राजकीय, घटनात्मक प्रश्नांबरोबर पूर्व पाकिस्तान (बांगला देश) व पश्चिम पाकिस्तानात समन्वय साधणे, हा सर्वात मोठा प्रश्न होता, कारण हे दोन्हीही प्रांत भौगोलीकदृष्ट्या एकमेकापासून खूपच दूर होते व या दोन्ही प्रांतांची एकंदर संस्कृतीही भिन्न स्वरुपाची होती.

मार्च १९४९ मध्ये घटनासमितीने राज्यघटनेची ध्येये तयार केली यात–

१) सार्वभौमत्व ही देवाची शक्ती असून ती लोकाद्वारे प्रगट होत असली तरी त्यामागे कुराण व सुन्नाहच्या प्रेरणा आहेत.

२) पाकिस्तान हे संघराज्य असेल.

३) लोकशाही, स्वातंत्र्य, समता, सहनशिलता व सामाजिक न्याय ही राज्यघटनेची प्रमुख तत्वे असतील.

४) लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीमार्फत राज्य आपले अधिकार वापरेल.

५) पाकिस्तानमधील सर्व नागरिकांना समान अधिकार असतील.

लियाकत अली यांचा खून व बॅ. जीनांचा मृत्यू यामुळे पाकिस्तानची घटनानिर्मितीची प्रक्रिया रेंगाळत गेली. प्रचंड अस्थिरता असणाऱ्या या देशाने उर्दू भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा दिला व या घोषणेमुळे बंगाली भाषेचा आग्रह धरणाऱ्या पूर्व पाकिस्तानात वेगळेपणाची भावना तयार झाली. यावर उपाय म्हणून पूर्व पाकिस्तानमध्ये प्रांतिक निवडणूका जवळ आल्याने त्यांना (बांगला देश) कायदेमंडळात समान स्थान देण्याचा निर्णय महंमद अली यांनी घेतला पण ही तात्पुरती मलमपट्टी होती, या निवडणूकात लीगचा पराभव झाला.

१९५६ मध्ये पाकिस्तानात दुसऱ्या राज्यघटना निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली. संसदीय शासनपद्धती, राष्ट्राध्यक्ष, कॅबिनेट मंत्री संसदेला जबाबदार, एकगृही कायदेमंडळ, स्त्रियांना आरक्षण, लोकसभेला ३०० सदस्य व पाच वर्षे मुदत, सर्वोच्च न्यायालय, इस्लामीक राष्ट्रबांधणीवर भर ही काही या राज्यघटनेची वैशिष्ट्ये होती. मात्र या राज्यघटनेला आपला खास प्रभाव पाडून पाकिस्तानचा विकास व लोकशाही स्थैर्य तयार करता आले नाही. कारण या देशातील लोकशाहीवर एका बाजूला धर्माचा प्रभाव होता. आर्थिक दारिद्र्यामुळे लोकशाहीला आधार मिळाला नाही. लष्कराचे सततचे प्रभुत्व यातून १९६० ते १९७० या काळात या देशात दोन वेळा मार्शल लॉ तयार झाले. पाकिस्तानात कायद्याचे अधिराज्य तयार न झाल्यानेच खरे तर बांगला देशाची निर्मिती झाली. या सर्व अराजकतेचा सविस्तर उल्लेख व त्याचे विवेचन या पुस्तकाच्या पाकिस्तानवरील प्रकरणात केलेले आहे.

**बांगला देशातील घटना निर्मिती**

बांगला देशाच्या राज्यघटनेवर पाकिस्तानच्या राज्यघटनेचा व काही मूलभूत विचारांचा प्रभाव असल्याचे आपणास दिसते. १९४९ मध्ये मुस्लीम प्रखर राष्ट्रवादाला विरोध करणारा एक विचारगट बांगलामध्ये तयार झाला. बंगाली भाषेचा आग्रह, लोकशाही, प्रजासत्ताक, सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य, मूलभूत अधिकार व उदारमतवादावर या गटाची श्रद्धा होती. अवामी लीग असे या नव्या गटाचे नाव होते व त्यात समन्वयवादी लोकशाही विचाराचे मौलाना भाषानी, शामसुल हक, शेख मुजबूर रहेमान असे काही तडफदार कार्यकर्ते व नेते होते. या पक्षाचा मोठा प्रभाव बांगला देशाच्या राज्यघटनेवर दिसतो.

बांगला देशाच्या राज्यघटनेच्या सरनाम्यात ही राज्यघटना अल्लाच्या नावे, लाभ घेणारे सर्व व दयाघन निर्माता यांना अर्पण केली आहे. ''आम्ही बांगला देशातील लोक २६ मार्च १९७१ रोजी स्वातंत्र्यदिन साजरा करीत आहोत व स्वतंत्र, सार्वभौम व बांगला देशातील लोकांचे प्रजासत्ताक तयार करीत आहोत. ही राज्यघटना कायद्याचे अधिराज्य, मूलभूत मानवी हक्क व स्वातंत्र्य, समता, न्याय की जी सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात निर्माण करण्यास बांधील आहे. त्या मानवी तत्वांना महत्व देते. म्हणूनच या राज्यघटनेचे पावित्र्य राखणे व तिचे संरक्षण करणे हे सर्व बांगलादेशीय नागरिकांचे कर्तव्य आहे. आपल्या घटना समितीमध्ये ४ नोव्हेंबर १९७२ रोजी ही घटना कार्यरत व स्वीकृत करीत आहोत.'' असा हा सरनामा आहे.

बांगला देशाने आपल्या राज्यघटनेमध्ये प्रजासत्ताक या लोकशाही तत्वाचा स्वीकार केला आहे. हे प्रजासत्ताक मुस्लीम प्रजासत्ताक असून येथे हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन व इतर धार्मियांनाही समान अधिकार असतील. प्रजासत्ताकाची भाषा बांगला असून 'अमर सोनार बांगला' हे त्यांचे राष्ट्रगीत असेल. बांगला देशाचा राष्ट्रध्वज गर्द हिरवा असून त्याच्या मध्यभागी लाल रंगाचे भरीव रंगीत वर्तुळ असेल. तिन्ही बाजुंनी वेढलेले ज्युटच्या पानांमध्ये पाण्यात असणारे शापला फुल प्रत्येक पानाजवळ दोन चांदण्या असे बांगलाचे राष्ट्रीय चिन्ह आहे. ढाका ही बांगलाची राजधानी असून कायद्याने पात्र नागरिकांना बांगलादेशी म्हणतात. राज्यघटना ही सार्वभौम असून त्यातील कायदे सर्वांना बंधनकारक आहेत.

बांगला राज्यघटनेच्या दुसऱ्या विभागात राज्याची प्रमुख उद्दिष्ट्ये दिलेली आहेत. ही राज्यघटना राष्ट्रवाद, समाजवाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता या प्रमुख राष्ट्रीय तत्वांसाठी वचनबद्ध असल्याचे म्हटले आहे. राष्ट्रवादामध्ये राष्ट्रीय भाषा, संस्कृती, स्वातंत्र्य चळवळीतील प्रतिके यावरील श्रद्धेचा विचार केला आहे; तर समाजवादात शोषणमुक्त समाज तयार करणे हे राष्ट्रीय ध्येय मानले आहे. राष्ट्रीय प्रगतीबरोबर राज्यघटनेत लोकशाहीच्या अनुशंगाने मूलभूत मानवी अधिकार स्वातंत्र्ये यासह मानसाचा दर्जा, प्रतिष्ठा याचा सन्मान राखण्यावर भर दिला आहे. लोक निवडणूकीतून आपल्या प्रतिनिधीद्वारे निर्णयप्रक्रियेत सहभाग घेऊन लोकशाही तयार करून ती वृद्धिंगत करू शकतात असा विश्वास घटनाकारांना वाटतो.

राज्याचे एक प्रधान कर्तव्य म्हणजे शेतकरी मागासवर्ग व कामगार कल्याणाची काळजी घेणे होय. त्यांचे शोषण होणार नाही व त्यांना अनावश्यक करातून मुक्ती देण्याचा राज्याने प्रयत्न करावा. यासाठीचा एक भाग म्हणून राज्याने अन्नधान्य, दैनंदिन उपयोगाच्या वस्तु, कपडे, निवारा, शिक्षण व आरोग्यसुविधांची सोय करावी. लोकांना बांगला देशात काम करण्याचा अधिकार असून संख्यात्मक व गुणात्मक गोष्टी विचारात घेऊन काम करणाऱ्याला योग्य वेतन द्यावे. राज्याने सामाजिक सुरक्षे अंतर्गत बेकार, आजारी, वृद्ध, निराधार, उपेक्षीत विधवा स्त्रिया, परित्यक्ता महिला यांना योग्य ती मदत द्यावी.

राज्याने भरीव स्वरूपात परिवर्तन करण्यासाठी ग्रामीण भागात कृषीक्रांती करावी, त्याबरोबर शेतीवर आधारित कारखानदारीवर भर द्यावा. जेणेकरून शहरी व ग्रामीण भागातील जीवन व राहाणीमानाच्या दर्जातील अंतर कमी करता येईल. व्यक्ती व्यक्तीमधील विषमता दूर करण्यासाठी शिक्षण महत्वाचे करावे. निरक्षरता दूर करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. तसेच लोकांच्या आरोग्याची काळजी घेणे याला राज्याने प्राथमिक व मूलगामी महत्व द्यावे. लोकांना वाईट व्यसनांपासून दूर ठेवताना सकस आहार व योग्य स्वस्त औषधोपचाराची राज्याने सुविधा तयार करावी. तसेच पर्यावरण व निसर्गाचा समतोल राखण्यास वनीकरण, जंगले, वनसंपत्ती व पशुपक्ष्यांचे जतन करणे तथा प्रदूषणमुक्त समाज तयार करण्यावर राज्याने भर द्यावा. लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी व आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय समतेसाठी राज्याने सर्वांना समान संधी द्यावी. देशाच्या राष्ट्रीय जीवनात सर्वांबरोबर स्त्रियांना समान संधी व न्याय द्यावा असे बांगला देशाच्या राज्यघटनेत नमूद केले आहे.

या देशाचे एक खास वैशिष्ट्ये म्हणजे काम करण्याचा अधिकार, ही राज्यघटना लोकांना देते आणि बांगला देशामध्ये प्रत्येकाला त्याच्या क्षमतेनुसार, पात्रता, कौशल्यानुसार व गरजेनुसार योग्य मोबदला देण्याचा प्रयत्न संबंधीत शासन, संस्था करते. ही तर आधुनिक सामाजिक न्यायाची संकल्पना असून बांगलाने त्याचा स्वीकार केला आहे. या बरोबर बांगला संविधान लोकांच्या मूलभूत कर्तव्याला हक्काएवढेच महत्व देते. लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी त्यांनी न्यायालयांना शासन व्यवस्थेपासून भारताप्रमाणे दूर ठेवले आहे. जेणेकरून अनावश्यक राजकीय हस्तक्षेप टाळता येईल आणि निःस्पृह तटस्थ न्यायदान करणे न्यायालयांना शक्य होईल.

देशाची एकात्मता अखंडता टिकवण्यासाठी सांस्कृतिक ऐक्याला बांगला देश महत्व देतो. अल्पसंख्य जमाती जाती व लोकांच्या संस्कृती व कला साहित्याचे जतन करण्याबरोबर राष्ट्रीय, ऐतिहासिक, आदरणीय प्रतिकांचा सन्मान ठेवण्यावर ते भर देतात.

बांगला देश हा तसा भारतीय भूप्रांताचा मूळ भाग असल्याने तो अलीप्त राष्ट्रसंघटना व सार्क संघटनेचा सभासद आहे. अर्थातच या संघटनेची मूलगामी तत्वे जसे आंतरराष्ट्रीय शांतता, सहजीवन, अहस्तक्षेप, सहकार्य, विकास, सामूहिक सुरक्षा, युद्ध व शस्त्र स्पर्धेला विरोध, इत्यादी पंचशील शांततामय विकासवादी तत्वांना ते बांधील आहेत.

राज्यघटनेच्या तिसऱ्या विभागात बांगला देशाच्या घटनाकारांनी मूलभूत अधिकारांना प्राधान्य देऊन लोकशाही, व्यक्तीस्वातंत्र्य व उदारमतवादाला पाठिंबा दिलेला दिसतो. भारताप्रमाणेच समतेच्या अधिकाराचा स्वीकार करताना त्यांनी ''कायद्यासमोर समता व कायद्याचे समान संरक्षण'' या तत्वांना प्राधान्य दिले आहे. त्यामुळेच राज्याला, शासनाला व्यक्तीव्यक्तीत धर्म, वंश, जाती, लिंग व जन्मस्थळावरून कोणताही फरक करता येणार नाही. सर्व सामाजिक क्षेत्रात स्त्रियांना समान संधी, स्थान व दर्जा दिला जाईल. वरील वैविध्यावरून शिक्षण व नोकरीही नाकारता येणार नाही. राष्ट्रपतीच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही व्यक्तीला बाहेरच्या देशातील सन्मान स्वीकारता येणार नाहीत. ही राज्यघटना प्रत्येकाला जीवन जगण्याचे व वैयक्तीक स्वरूपाचे जीवन उपभोगण्याचे स्वांतत्र्य देते. म्हणून कोणत्याही व्यक्तीला एकदम अटक करता येत नाही तसे केल्यास चोवीस तासाच्या आत त्याला जवळच्या मॅजिस्टेट कोर्टात उभे करावे लागते म्हणजे त्याला न्याय मिळू शकतो. या सर्व तरतूदी भारतीय राज्यघटनेप्रमाणेच असल्या तरी त्याचा प्रत्यक्ष वापर मात्र बांगला देशात होत नाही. बांगला देशात कोणत्याही व्यक्तीला बळजबरीने कामगार बनवता येत नाही कारण तो दखलपात्र गुन्हा असून त्यास शिक्षेची तरतूद आहे. एकाच गुन्ह्यासाठी एकाच व्यक्तीला दोनदा शिक्षा देता येत नाही वा स्वतःविरूद्ध साक्ष देता येत नाही. तसेच गतीमान नव्या न्यायालयातून झटपट व योग्य न्याय देण्याची तरतूद घटनेत आहे. कोणत्याही व्यक्तीला अमानवी त्रास छळ व त्याप्रकारच्या शिक्षा करता येत नाहीत. भारताप्रमाणेच ही बांगला राज्यघटना व्यक्तीला काही मर्यादा व नियम पाळून देशात कुठेही मुक्त संचार करण्यास परवानगी देते व त्याचप्रकारे एखाद्या बांगला देशाच्या भूभागात त्यास रहिवास करता येतो. भारताप्रमाणेच बांगला देशात संघटना स्थापन करणे, चळवळी उभारणे एकत्र येऊन शांततापूर्वक विधायक काम करणे इत्यादीचे व्यक्तीस्वातंत्र्य आहे. मात्र असे करताना सामाजिक सौख्य, शांतता, जातिय सलोखा, धार्मिक मैत्रीपूर्ण वातावरणाला बाधा पोहोचता कामा नये. व्यक्तीस्वातंत्र्याचा वापर करताना राष्ट्रीय ऐक्य, न्यायालयाचा सन्मान, थोर परंपरांचा आदर करून सर्व प्रकारची वांशिक, धार्मिक, जातीय, भाषिक, भौगोलिक व लिंगभेदावरील विषमता दूर करणे हे संविधान व राष्ट्राचे कर्तव्य आहे.

लोकशाहीचा आधार मानले जाणारे अभिव्यक्ती स्वातंत्र्यास बांगला देशाच्या संविधानात मध्यवर्ती स्थान दिलेले दिसते. या अंतर्गत भाषण करणे, मत व्यक्त करणे, वृत्तपत्रिय स्वातंत्र्य यांना महत्व आहे मात्र असे करताना राष्ट्रीय ऐक्य, सौहार्दपूर्ण वातावरण, सामाजिक शांतता, नैतिकता, सहकार्य भावना, प्रेम, राष्ट्रीय परंपरा, न्यायीक व्यवस्था यांना त्रास होणार नाही याचे भान प्रत्येक नागरिकाने ठेवावयाचे असते. अर्थातच योग्य त्या बंधनासहित स्वातंत्र्याचा या देशाने स्वीकार केला आहे. याच प्रकारे येथील नागरिकांना आवडणारा व पात्रतेनुसार योग्य असा समाजहितैषी व्यवसाय, व्यापार वा नोकरी उद्योग करता येतो.

बांगला देशाने धार्मिक स्वातंत्र्यालाही त्यांच्या राज्यघटनेत मौलीक स्थान दिले आहे. प्रत्येक व्यक्तीला सामाजिक व राष्ट्रीय भान पाळून आपला धर्म, उपासना, श्रद्धा जोपासण्याचा अधिकार

आहे. मात्र धर्माच्या नावाखाली बळजबरीने पैसा फंड गोळा करणे, जाणिवपूर्वक धार्मिक प्रचार व शिक्षण देणे आणि एखादा धर्म लोकांवर लादण्यास ही घटना विरोध करते.

या देशात राज्यघटनेने मालमत्तेचा अधिकार लोकांना दिला आहे. योग्य कायदेशीर मार्गाने संपत्ती मिळवणे, साठवणे व तिची विल्हेवाट लावण्याचा प्रत्येक नागरिकास अधिकार आहे. राष्ट्रीय कारणासाठी अशी खाजगी संपत्ती कायद्याने ठरवलेल्या मोबदल्याच्या पूर्ततेनंतर सरकार काढून घेऊ शकते मात्र असा मोबदला न्यायीक पातळीवर अपुरा वा कमी असू नये.

थोडक्यात बांगला देशाच्या राज्यघटनेवर ब्रिटिश संसदीय लोकशाहीचा, समाजवादाचा जसा प्रभाव आहे तसाच पूर्वाश्रमीचा बांगलाचा राजकीय इतिहास भारताशी संलग्न असल्याने १९०९ चा, १९१९ चा व १९३५ च्या कायद्याप्रमाणे भारतीय राज्यघटनेच्या लोकशाही, संसदीय, समाजवादी, न्यायीक व प्रशासकीय संरचनेचा व स्वातंत्र्य, समता, न्याय, मूलभूत हक्क व कल्याणकारी एकंदर राज्यव्यवस्थेचा बांगला देशातील राज्यघटनेवर प्रभाव दिसतो पण या सर्व उदारमतवादी आदर्श तत्त्वांचा त्यांना या पंचेचाळीस वर्षात फारसा वापर करता आलेला नाही. सतत राजकीय अस्थिरता, आर्थिक मागासलेपण, धार्मिक मूलतत्त्ववादी विचारांना प्राधान्य व आधुनिक विचार तथा विज्ञानदृष्टी, विवेकवाद आणि पुरोगामी विचारांना सनातनी समाजाचा विरोध यामुळे बांगला देश आजही सर्वच स्तरांवर एक मागास राष्ट्र म्हणून जगासमोर उभे आहे. असे मागासलेपण, परावलंबन, दहशतवाद व हिंसक कारवाया तथा अस्थिरतेला बळी पडते. पाकिस्तान, नेपाळ, श्रीलंका व बांगला देशासमोर हे सर्व मागासलेपणाचे समान प्रश्न आहेत व त्यांचा विशेषतः आशिया खंडाच्या राजकारण, परस्पर संबंध व विकासावर परिणाम झाल्याचे दिसते.

## घटक २ : शासनसंस्थांची कार्यपद्धती

## २.३.१ (अ) कायदेमंडळ (संसद)

बांगला देशाच्या राज्यघटनेच्या भाग ५ प्रकरण १ मध्ये संसदेसंदर्भात सर्व तरतूदींचे विवेचन आहे. या संसदेत एकच सभागृह असून त्याला हाऊस ऑफ नेशन असे म्हणतात. देशासाठी कायदे करण्याची जबाबदारी संसदेची असून बांगला देशामध्ये लोकसभेची सदस्य संख्या ३५० असून यातील ३०० जागा निवडणूक पद्धतीने प्रत्येक मतदारसंघातून एक अशा पद्धतीने भरल्या जातात तर ५० जागा या महिलांसाठी आरक्षीत असून त्यांची निवड आरक्षीत पद्धतीने अप्रत्यक्षरित्या केली जाते.

या एकगृहीय संसदेची मुदत पाच वर्षे असून पुढील संसद तयार होईपर्यंत ती कार्यरत असते. सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी एक सभापती, एक उपसभापती, सत्तारूढ पक्ष नेता, विरोधी नेता व सदस्य असतात. सध्या शेख हसिना यांच्या हातात बांगला देशाची सत्ता असून बेगम रौशन इर्शाद हे विरोधी पक्ष नेते आहेत. संसदेचे सभापती शिरिन शर्मीन चौधरी आहेत तर उपसभापती फजले रब्बी मियाँ आहेत. सध्याच्या सन २०१७ च्या आघाडी सरकारमध्ये अवामी लीगला २३४, राष्ट्रीय पार्टी (मंजू) ०३, जातीय समाजतांत्रिक दलास ०५, वर्कर्स पार्टी बांगला देशला ०६ बांगला तरिकत

फेडरेशन ०२, बांगला राष्ट्रवादी फ्रंट ०१ तर राष्ट्रीय पार्टी (इर्शाद) ३४ तथा अपक्षांना १५ जागा मिळाल्या आहेत. बांगला देशाची संसद, ढाका या राजधानीत २१५ एकर जागेत असून तो वास्तुकलेचा उत्तम नमुना आहे. हा भाग 'शेर ए बांगला' म्हणून ओळखला जातो. १९६१ मध्ये या वास्तुचे बांधकाम सुरू झाले व मोठ्या कालखंडानंतर ८ जानेवारी १९७२ मध्ये या इमारतीचे उद्‌घाटन झाले. प्रसिद्ध अमेरिकन वास्तुतज्ञ लुईस आय कहान यांनी ही रचना केली आहे.

**संसद सदस्यत्वासाठी पात्रता :**

बांगला देशाच्या अनुच्छेद ६६ अन्वये अशी व्यक्ती

१. बांगला देशाची नागरिक असली पाहिजे.

२. अशा व्यक्तीचे वय २५ वर्षापेक्षा अधिक असावे.

३. दुहेरी नागरिकत्व असणारे, मानसिक अपात्र, दिवाळखोर व अशी व्यक्ती गुन्हेगारी शाबीत नसावी.

४. अशा व्यक्तीला दुसरीकडे कोणतेही आर्थिक लाभाचे पद ग्रहण करता येत नाही.

५. निवडणुकीच्या संदर्भात जर परत काही अपात्रतेची शंका व्यक्त झाली व तशी अधिकृत तक्रार झाली तर त्याची सुनावणी व पात्रता निकषाची पडताळणी निर्वाचन आयोगासमोर केली जाते. घटनेच्या कलम ८० मध्ये तशी तरतूद आहे.

**संसदेचे सभासदत्त्व रद्द होण्याची कारणे :**

घटनेच्या कलम ६७ नुसार संसदेची एखादी जागा खालील कारणाने रद्द होऊ शकते.

१) संसदेच्या पहिल्या बैठकीपासून सलग नव्वद दिवस जर एखादा सदस्य संसदेत गैरहजर असेल तर व त्याने तशी सभापतीकडून रजा मंजूर करून घेतली नसेल तर त्याचे सभासदत्त्व रद्द होते. (भारतात ही मुदत साठ दिवसांची आहे.) पक्षाविरुद्ध मतदान करणाऱ्या सदस्याचे सभासदत्त्व रद्द होते.

२) संसदच जर बरखास्त झाली तर संसद सदस्याचे सभासदत्त्व रद्द होते.

३) जर स्वतःच्या हस्ताक्षरात संसद सदस्याने स्वखुशीने व स्वतःच्या वैयक्तीक कारणांसाठी संसद सभापतीकडे आपला राजीनामा सादर केला असेल तर त्यांची जागा रिकामी होते.

**संसद सदस्यांना सुविधा :**

कलम ६८ अन्वये बांगला देशातील कायद्यानुसार येथील संसद सदस्यांना सर्व प्रकारचे मानधन, भत्ते, दैनंदिन भत्ते व योग्य तो मोबदला मिळतो. तसेच संसद सदस्यांना असणाऱ्या सर्व सुविधा त्यांना मिळतात.

पण त्याने जर संसदीय संकेत मोडले व स्वतःची सभासदत्वासाठीची खरी पात्रता लपवली व तो कायद्याने अपात्र घोषित झाला तर त्यास बांगला देशात एक हजार टका (तिकडचे रुपये) एवढा किमान दंड होऊ शकतो. कोणत्याही सदस्याला दोन भिन्न मतदार संघातून त्या मतदार संघाचे प्रतिनिधित्व करता येत नाही. त्यासाठी निवडणुकीनंतर तीस दिवसात तो कोणत्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणार हे त्यास लेखी निवडणूक मंडळासमोर जाहिर करावे लागते. असे विवक्षीत वेळेत न केल्यास त्याचे दोन्ही ठिकाणचे प्रतिनिधित्व रद्द केले जाते.

**संसदेचे कामकाज :**

बांगला देशाच्या संविधानातील कलम नं ७२ (१) नुसार बांगला देशाचे राष्ट्रपती हे जाहिर निवेदन करून संसदेचे अधिवेशन कधी घ्यायचे हे संसदेला कळवू शकतो. यासंदर्भात त्यांना देशाचे प्रधानमंत्री सल्ला देऊ शकतात. साधारणतः संसदेच्या म्हणजे लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर एक महिन्यात संसदेची बैठक घेण्यात येते. बांगला संसद स्थापनेपासून भारताप्रमाणे पाच वर्षे काम करते. मात्र भारताप्रमाणेच युद्ध, युद्धजन्य परिस्थिती, राष्ट्रीय आणीबाणी घोषित झाली असताना संसदेची मुदत एक वर्षाने वाढवता येते म्हणजे ती यावेळी सहा वर्षे करता येते पण युद्ध संपल्यानंतर ती सहा महिन्यांपेक्षा जास्त वाढवता येत नाही. संसदीय कायदे, पद्धती व नेहमीच्या प्रक्रियेनुसार बांगला देशात संसदेचा कारभार चालतो.

**राष्ट्रपतींचे अभिभाषण :**

सार्वत्रिक निवडणुकीनंतर तयार झालेल्या नवनिर्वाचीत संसद सदस्यांना मार्गदर्शन करण्यासाठी संसदेच्या पहिल्या अधिवेशनात घटनेच्या कलम ७३ (१) नुसार अभिभाषण देण्याचा अधिकार भारतीय राष्ट्रपतीप्रमाणे बांगला देशाच्या राष्ट्रपतींना आहे. या भाषणावर सदस्यांना चिंतन करावे लागते.

**संसदेचा सन्मान व मंत्री :**

कलम ७३ (अ) नुसार मंत्रीमंडळातील सदस्यांना संसदेचा सन्मान व संसदेची प्रतिष्ठा यांचे जतन करावे लागते. त्यासाठी संसदीय कामकाजात त्यांना सहभाग घ्यावा लागतो. बांगला देशात मंत्रीमंडळाचे तीन स्तर दिसतात. प्रधानमंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री अशी ही रचना आहे. संसदेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर ज्या पक्षाला स्पष्ट बहुमत आहे त्या पक्षाचे सरकार तयार होते व त्या पक्षाच्या नेत्याला प्रधानमंत्री असे म्हणतात. घटनेनुसार राष्ट्रपती हा प्रधानमंत्री व कॅबिनेट मंत्र्यांची नियुक्ती करतो. विरोधी पक्ष अथवा इतर कोणत्याही संसद सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना संबंधीत मंत्र्यास उत्तर द्यावे लागते.

संसदेचे कामकाज घटनात्मक पद्धतीने चालण्यासाठी संसदेत 'संसदीय स्थायी समिती' तयार केली जाते. या समित्यांचे स्वरूप औपचारिक व सल्लादायी स्वरूपाचे असते. बांगला देशाच्या

सर्वोच्च न्यायालयानेही या समित्यांच्या कामकाजावर प्रतिक्रिया व्यक्त करण्याची गरज नसल्याचे म्हटले होते. बांगला देशात राष्ट्रसेवा करणाऱ्याला संरक्षण देण्याचे अधिकार संसदेला आहे.

**संसदेचे सभापती, त्यांची निवड व त्यांची भूमिका :**

बांगला देशाची संसद ही एकगृही असल्याने तेथे लोकप्रतिनिधींच्या सभागृहाला म्हणजेच लोकसभेला संसद म्हटले जाते. म्हणून संसदेचे कामकाज चालवण्यासाठी एका सभापतीची व एका उपसभापतीची म्हणजे संसदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षाची संसदेच्या/लोकसभेच्या पहिल्या बैठकीत निवड केली जाते. या अध्यक्षाला तिथे राष्ट्रपतीचे उपकार्यवाह म्हणून काम करावे लागते. बांगला देशात उपराष्ट्रपती पद नाही त्यामुळे राष्ट्रपतीच्या गैरहजेरीत संसदेचा सभापती हा राष्ट्रपतीच्या जबाबदाऱ्या पार पाडतो. बांगला देशात राज्यसभा नसल्याने समाजातील सांस्कृतिक, कला, विज्ञान, साहित्य, समाजसेवा व तंत्रज्ञान क्षेत्रातील लोक वरवर पहाता उपेक्षीत राहिल्याचे दिसते पण तेथील घटनाकारांनी मंत्रीमंडळाच्या रचनेत ९०% मंत्री संसदेतील बहुमतवाल्या पक्षाचे प्रधानमंत्री नियुक्त असे मंत्री असतील तर १०% मंत्री बिगर संसद तज्ञ लोक असतील अशी सोय केली आहे. ज्यांना 'तांत्रिक तज्ञ' (Technocrats) असे म्हणतात. अशांना मंत्रीमंडळात घेता येते. त्या सर्वांना राष्ट्रपती शपथ देतो. हे सर्व साहित्य, कला, विज्ञान, तंत्रज्ञान, समाजसेवा व सांस्कृतिक क्षेत्रातील तज्ञ असतात.

संसदेचे कामकाज चालवण्याची सर्वात मोठी जबाबदारी संसदेच्या सभापतीची म्हणजे अध्यक्षाची असते. कारण तो सभागृहाचा वरिष्ठ मार्गदर्शक, तटस्थ काम करणारा निस्पृह न्यायाधीशासारखा व संसदीय कामकाजाची माहिती असणारा असावा लागतो. त्याला सभेचे व कामकाजाचे संचालन, नियमन, नियंत्रण व मार्गदर्शन करावे लागते. असे केले तरच घटनात्मक वैध व लोकानुवर्ती कायदे तयार करणे संसदेला सोपे जाते. अध्यक्षाची निवड झाल्यापासून पुढे नविन संसद तयार होईपर्यंत तो संसदेचे कामकाज पहातो. सभापतीच्या गैरहजेरीत भारताप्रमाणेच उपसभापती हा सभेचे संसदेचे कामकाज चालवतो. त्यावेळी त्याला सभापतीचे सर्व अधिकार व विशेषाधिकार वापरता येतात. बांगला देशात संसदेच्या अध्यक्षाला काही वेळा परदेशातही देशाचे राजदूताप्रमाणे प्रतिनिधित्व करावे लागते.

संसदेच्या सभापतीची निवड अर्थातच संसदेचे सदस्य करतात. सभापती व उपसभापतींना पदाची शपथ देण्याचा अधिकार राष्ट्रपतीना आहे. सभापतीला संसदेएवढा म्हणजे पाच वर्षाचा कालावधी मिळतो. १० एप्रिल १९७२ रोजी शाह अब्दुल हमिद हे देशाचे पहिले संसद सभापती झाले. ते बांगलादेश अवामी लीग पक्षाचे होते व त्यांनी १ मे १९७२ पर्यंत काम पाहिले. साधारणतः अवामी लीग व बांगला देश नॅशनलिस्ट पक्षाचे अधिक सभापती झाल्याचे चित्र बांगला देशात दिसते व याच पक्षाची सरकारे सत्तेवर सातत्याने असल्याने प्रधानमंत्र्याचा सभापतीच्या अंगाने संसदेवर अंकुश दिसतो. आदर्श संसदीय लोकशाहीला हे मारक असल्याने बांगला देशात पक्षीय हुकूमशाही दिसते.

सभापतीने जर नंतर मंत्रीपद स्वीकारले किंवा संसदेने त्यास गैरवर्तनाखाली १४ दिवसाची नोटीस पाठवली व त्याचा खुलासा त्यास समाधानकारकरित्या करता आला नाही तर त्यास पद सोडावे लागते. जर सभागृहात त्याने सत्तारुढ पक्षाच्या बहुमताच्या बाजूने छुपा पाठिंबा वगैरे दिला असेल तर ते गैरवर्तन मानतात कारण त्याचे पद हे तटस्थ असून त्याने पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहावयाचे असते. जर सभापतीने स्वतःच्या हस्ताक्षरात आपल्या पदाचा राजीनामा राष्ट्रपतीकडे सादर केला तर त्याला पदमुक्त होता येते. नव्या संसदेनंतर नविन सभापती निवडल्यानंतर पहिल्या सभापतीला पद सोडावे लागते.

**सभापती, संसदीय प्रक्रिया व गणपुर्ती**

घटनेच्या ७५ व्या कलमात या संदर्भातील सर्व तरतूदी दिल्या आहेत. संसदेने पारित केलेल्या घटनात्मक आणि राष्ट्रपतीने संमती दिलेल्या संसदीय कायद्यानुसार संसदेचे कामकाज चालते.

संसदेत पारित होणाऱ्या सर्व विधेयकांना हजर राहून मतदान करणाऱ्या संसद सदस्यांच्या बहुमताची गरज असते. या प्रक्रियेत भारताप्रमाणे संसदेच्या सभापतीला मतदानाचा अधिकार नाही मात्र विधेयकावर सत्तारुढ व विरोधी पक्षाकडून समसमान मतदान झाले तर मात्र सभापतीला भारतीय पद्धतीप्रमाणे निर्णायक मत देता येते. अशावेळी तो ज्या बाजूने मतदान करतो त्याबाजुने विधेयक संमत होते.

भारतात ज्याप्रमाणे सभेचे कामकाज म्हणजे गणपुर्तीसाठी किमान $^{१}/_{१०}$ सभासद सभागृहात हजर असावे लागतात तसेच बांगला देशात गणपुर्तीसाठी किमान सभागृहात साठ सदस्य म्हणजे १७% सदस्य हजर असावे लागतात. अन्यथा सभागृहाचे कामकाज थांबवण्याचा वा सभा बरखास्त करण्याचा अधिकार सभापतीला आहे. सभापतीच्या परवानगीशिवाय सदस्यांना आपले मत मांडण्याचा अधिकार नाही. पूर्ण सभेचे कामकाज सभापतीच्या निर्देशानुसार चालते. या नियमांचा भंग करणाऱ्याला शिक्षा करण्याचे, त्याचे सभासदत्व काही काळ रद्द करण्याचा सभापतीला अधिकार आहे. सभापतीलाच गणपुर्ती, संसदीय प्रक्रिया व विधेयकाची मांडणी आणि त्यावरील मतदानाच्या सर्व प्रक्रियात अंतीम निर्णय घ्यावा लागतो. अशावेळी विधेयक व कायद्याची घटनात्मकता याबरोबरच संसद सदस्यांची प्रतिष्ठा त्यांचे हक्क व संसदीय लोकशाही मूल्यांची जपणूक करावी लागते. त्यामुळे शासनव्यवस्थेमध्ये त्याचे स्थान तसे राष्ट्रपतीच्या नंतर महत्वाचे आहे. अर्थविधेयक कोणते, हे ठरवण्याचा त्यास अधिकार आहे.

**संसदीय समित्या स्थायी समिती व इतर**

संसदीय पद्धतीला एका बाजुला मंत्रीमंडळात्मक पद्धती म्हटले जाते तर काही राजनीतीज्ञ तिला समिती व्यवस्था असे म्हणतात, कारण संसदेचा कारभार विशेषीकृत अशा तज्ञ समितीमार्फतच अधिक चालविला जातो. कलम ७६ अन्वये पब्लीक अकौंटस कमिटी, विशेषाधिकार समिती, विधीमंडळात्मक समिती याशिवाय संसदेला ज्या प्रकारच्या समित्यांची गरज भासेल तशा समित्या

वैधानिक चौकटीत तयार करण्याचा अधिकार बांगला देशातील संसदेला आहे. थोडक्यात बांगला देशात गणपुर्ती, समिती पद्धती व सभापती तथा सत्तारुढ पक्ष नेता व विरोधी पक्षनेता यांच्या आधारे संसदीय कामकाज चालते.

**लोकायुक्त**

बांगला देशाच्या राज्यघटनेच्या कालम ७७ अन्वये संसदेने लोकायुक्ताची नेमणूक केलेली आहे. सार्वजनिक सेवा, मंत्रालय यांच्यावर देखरेख करून भ्रष्टाचार दूर करणे व या सर्व सेवांना गती देणे हे या कार्यालयाचे व लोकायुक्ताचे प्रमुख काम आहे. लोकायुक्त आपल्या कामाचा वार्षिक अहवाल संसदेला सादर करतो.

**संसदेचे सचिवालय**

कलम ७९ नुसार संसदेला सहाय्य करण्यासाठी सचिवालयाची बांगला देशात व्यवस्था आहे. या संदर्भात अधिकारी व नोकरभरती आणि त्याच्या सेवाशर्ती, अटी, पगार व सुविधा ठरविण्याचा अधिकार संसदेला आहे. सचिवालय हे संसदीय कामकाजविषयी सर्व कागदपत्रे, नियम, कायदे यांचे जतन व व्यवस्थापन करते. संसदीय कामकाजात या सर्वांची नेहमीच आवश्यकता असते.

**संसदेचे आर्थिक अधिकार**

घटनेच्या भाग २ कलम ८० मध्ये संसदेच्या वित्तीय अधिकारांची व त्या संदर्भातील संसदीय कामकाज पद्धतीची माहिती दिलेली आहे. संसदेत कायदा बनण्यासाठी तसा प्रारुप प्रस्ताव हा विधेयकाच्या स्वरूपात संसदेत मांडावा लागतो. विधेयक याचा अर्थ कायद्याचे मूळ प्रारूप व आराखडा की ज्याला जोपर्यंत संसदेची परवानगी मिळालेली नसते मात्र ती मिळाली व सर्व संसदीय प्रक्रिया जसे राष्ट्रपतीची स्वाक्षरी इत्यादींची पूर्तता झाल्यावर संसदेच्या बहुमताने व राष्ट्रपतीच्या अंतीम स्वाक्षरीचे विधेयकाचे कायद्यात रुपांतर होते.

बांगला देशात विधेयक मांडण्यापूर्वी त्यास राष्ट्रपतींची पूर्वसंमती लागते. विधेयक राष्ट्रपतीकडे गेल्यानंतर अर्थविधेयक सोडून इतर विधेयका संदर्भात पंधरा दिवसात राष्ट्रपती आवश्यकता वाटल्यास त्या विधेयकात दुरुस्त्या सूचवून ते विधेयक परत संसदेकडे पाठवतो. अन्यथा ते रद्द होते. पण जर या पंधरा दिवसाच्या मुदतीत राष्ट्रपतीने असे दुरुस्ती सूचवणारे विधेयक संसदेने दुरुस्ती स्वीकारून वा न स्वीकारता पुन्हा दुसऱ्यांदा बहुमताने संमत केले तर सात दिवसाच्या आत राष्ट्रपतीला त्यावर स्वाक्षरी करावी लागते. भारताप्रमाणेच पॉकेट व्हेटो (पूर्ण नकार) व व्हेटोचा अधिकार बांगलादेशाच्या राष्ट्रपतीला आहे. कारण संसदीय पद्धतीत राष्ट्रपती हा संसदेचा व कार्यकारी मंडळाचाही अविभाज्य भाग आहे तरी संसदीय पद्धतीत कायदानिर्मिती क्षेत्रात संसद सार्वभौम असल्याने राष्ट्रपतीला कायम नकार देण्याचा अधिकार मर्यादित केला आहे. असा अधिकार अमर्याद वाढवला तर मग त्या शासनपद्धतीला संसदीय पद्धतीऐवजी अध्यक्षीय पद्धत म्हणावे लागेल.

भारताप्रमाणे संसदेच्या बहुमताने व राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीने बांगला देशात संसद देशासाठी कायदे तयार करते. साधारणतः बरीच विधेयके ही अर्थ विधेयके असू शकतात. मात्र कोणते विधेयके हे खरे अर्थविधेयक आहे, हे ठरवण्याचा अधिकार भारताप्रमाणेच येथे संसदेच्या (बांगला देशात फक्त लोकसभा आहे व तिलाच संसद म्हणतात) सभापतीला आहे. स्वहस्ताक्षरात विशिष्ठ विधेयक हे अर्थविधेयक आहे असे त्यास राष्ट्रपतीकडे ते विधेयक पाठवताना कळवावे लागते. तरी सुद्धा करप्रणाली व करप्रणालीची पुनर्रचना, राष्ट्रीय फंड आर्थिक सहाय्य यासारखे बॅक व कर्जप्रणालीशी संबंधीत विधेयके ही अर्थविधेयके असतात. आर्थिक दंड, लायसन फी, सेवाकर इत्यादी किरकोळ विषय यात येत नाहीत. अर्थातच राष्ट्रपतीच्या पूर्व संमतीनेच सर्व अर्थविधेयके संसदेत मांडली जातात. प्रत्येक आर्थिक वर्षाच्या अखेरीस सरकारला आपले वार्षिक उत्पन्न यात विविध कर, कर्ज व इतर पतपुरवठा यातून येणाऱ्या आर्थिक स्त्रोताचा व राष्ट्रीय विकास कामाबरोबर न्यायाधीश, लेखापरिक्षक, लोकायुक्त, निर्वाचन आयोग, लोकसेवा आयोगाचे सदस्य या सर्वावर किती खर्च झाला याचा ताळेबंद संसदेत मांडावा लागतो. यावर सरकारची पारदर्शकता अवलंबून असते.

**अध्यादेश**

यालाच वटहुकूम असे म्हणतात अध्यादेश हा जसा संसदीय कामकाजाचा भाग आहे तसाच तो राष्ट्रपतीच्या अधिकारांचा भाग आहे. संसदीय पद्धतीत कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ, न्यायमंडळ, प्रधानमंत्री व राष्ट्रपती तथा मंत्रीमंडळ व सचिवालय यांच्या कामाचे वाटप झाले असले तरी व्यापक अर्थाने या सर्वांनी मिळूनच शासनसंस्था तयार होते. म्हणूनच संयुक्त जबाबदारीचे उदात्त व आदर्श तत्व संसदीय लोकशाहीच्या मध्यवर्ती असावे लागते.

ज्यावेळेला संसद बरखास्त झालेली असेल किंवा संसदेची अधिवेशने चालू नसतील (संसदेची विश्रांती) त्यावेळी देशाला जर अचानक एखाद्या कायद्याची तातडीची गरज असेल व तसे राष्ट्रपतीला वाटले तर राष्ट्रपती स्वतः असा कायदा तयार करू शकतो. त्याला भारताप्रमाणे बांगलादेशात अध्यादेश, वटहुकूम असे म्हणतात. संसदेने नेहमी तयार केलेल्या कायद्याप्रमाणेच तो वटहुकूम सक्षम व प्रभावी असतो. अशा कायद्यास एक महिन्याच्या आत संसदेने पुन्हा बहुमताने मंजुरी दिली तर वटहुकूमाचे रुपांतर संसदीय कायद्यात होऊ शकते. अन्यथा विवक्षीत वेळेनंतर तो रद्द होतो.

थोडक्यात बांगला देशात एकगृहीय संसद असून तेथील लोकसभेलाच संसद म्हटले जाते. बांगला देशात एकात्म पद्धती असल्याने घटक राज्याचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणजे राज्यसभा नाही पण केवळ घटक राज्ये नाहीत म्हणून येथे राज्यसभा नाही असा याचा एकांगी अर्थ नाही तर राज्यसभेतून समाजातील कलाकार, शास्त्रज्ञ, तज्ञ, साहित्यीक यांना जे प्रतिनिधित्व मिळते ते त्यांनी मंत्रीमंडळात देऊन राज्यसभेची उणीव भरून काढली आहे. बांगला देशात देशासाठी कायदे करण्याचा सर्वोच्च अधिकार संसदेला असून संसदेचा सभापती, प्रधानमंत्री व मंत्रीपरिषद, विरोधी पक्ष, राष्ट्रपती, सचिवालय, विविध समित्या यांच्या सामूहिक जबाबदारीच्या जाणिवातून कायदानिर्मिती केली जाते.

## २.३.२ ब) बांगला देशातील कार्यकारी मंडळ

बांगला देशात संसदीय शासनपद्धती असल्याने राष्ट्रपती, प्रधानमंत्री व त्याच्या मंत्रीमंडळाला कार्यवाहीच्या संदर्भात कार्यकारी मंडळ म्हणून महत्वाची जबाबदारी पार पाडावी लागते. संसदेच्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर ज्या राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत मिळते. त्या राजकीय पक्षाची सत्ता व त्यांचे शासन कारभार पाहाते. या बहुमतवाल्या पक्षाच्या नेत्याला भारताप्रमाणेच प्रधानमंत्री असे म्हटले जाते. साधारणतः निवडणूकीच्या प्रचारा दरम्यान अवामी लीग, गण फोरम, बांगला इस्लामीक फ्रंट या पक्षाद्वारे अगोदरच नेता जाहिर केला जातो. विशिष्ट पक्षाला बहुमत प्राप्त झाल्यानंतर तो सरकार तयार करण्यासाठी राष्ट्रपतीला विनंती करतो. राष्ट्रपती बहुमताची खात्री करून बहुमतवाल्या पक्षाला सरकार बनवण्यास सांगतो. प्रधानमंत्र्याला त्याचे मंत्रीमंडळ बनवावे लागते व या सर्वांना राष्ट्रपती पद व गोपनीयतेची शपथ देतो.

**मंत्रीमंडळाची दुहेरी भूमिका**

संसदेने केलेले कायदे व त्यांची कार्यवाही करण्याबरोबर प्रधानमंत्री व त्याच्या मंत्रीमंडळाला कल्याणकारी विकासाभिमुख कार्यक्रम तयार करावे लागतात. संसदीय पद्धतीत कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणजे प्रधानमंत्री व त्याचे मंत्रीमंडळ जे मूळात संसदेचे सदस्य असल्याने त्यांचा कायदानिर्मितीमध्ये महत्वाचा सहभाग असतो. संसदेच्या अधिवेशनाच्या काळात मंत्रीसदस्य हे संसद सदस्य म्हणून विधेयके मांडतात. त्यावरील चर्चेत सहभाग घेतात. विधेयकावर मतदान करतात व बहुमताने कायदे पारित करतात. अशावेळी त्यांची भूमिका कायदा निर्मिती व धोरणनिश्चितीच्या संदर्भात महत्वाची असते. याच कायद्यांची कार्यवाही करण्यासाठी मंत्रीमंडळ प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली प्रशासकीय विभागांच्या सहकार्याने लोकहितवादी कायदे लोकांपर्यंत पोहोच करतात. संसदीय पद्धतीत व भारताप्रमाणे बांगला देशात प्रधानमंत्री व मंत्रीमंडळाला अशी दुहेरी भूमिका करावी लागते.

आपला राज्यकारभार व्यवस्थित व लोकशाही पद्धतीने चालविण्यासाठी त्याला समतोल व कर्तृत्वसंपन्न मंत्रीमंडळ तयार करावे लागते. मंत्रीमंडळात ९०% मंत्री हे संसद सदस्य असून ते बहुमतवाल्या पक्षाचे निर्वाचीत सदस्य असतात तर १०% मंत्री निवडण्याचा विशेषधिकार प्रधानमंत्र्याला असून राज्यसभा नसल्याची उणीव भरून काढण्याचा एक भाग म्हणून समाजातील निवडणूक न लढवलेले व लोकप्रतिनिधी नसणारे पण श्रेष्ठ विचारवंत, शास्त्रज्ञ, कलाकार, साहित्यिक, समाजसेवक त्यांना त्यास मंत्रीमंडळात घ्यावे लागते. जेणेकरून त्यांच्या विशेषीकृत क्षेत्रातील ज्ञान व अनुभवाचा फायदा कारभार करताना उपयोगी ठरतो. राष्ट्रपती हा कार्यकारी मंडळातील महत्वाचा अधिकारी आहे.

**मुदत**

कार्यकारी मंडळ हे संसदेतूनच बहुमताच्या आधारावर तयार होत असल्याने संसदेएवढी म्हणजे पाच वर्षे कार्यकारी मंडळाला काम करता येते. राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात जास्तीत जास्त आणखी एक वर्ष व त्यापुढे फारतर सहा महिने ही मुदत वाढू शकते. या सर्व पद्धती भारतीय संविधानासारख्याच असल्याचे दिसते. मुदतवाढीस संसदेची परवानगी लागते.

**प्रधानमंत्री कार्यालय**

हे कार्यालय ढाका शहरात असून त्याशी मंत्रालय जोडलेले आहे. या विभागाला शेर. ए. बांगला नगर या नावाने ओळखले जाते. या कार्यालयाजवळ सरकारी निवासस्थाने आहेत. बांगला देशात प्रधानमंत्र्याएवढेच विरोधी पक्ष नेत्याला महत्वाचे स्थान व दर्जा आहे. कारण तो सरकारवर नियंत्रण ठेवतो. चुकीच्या धोरणावर टीका करतो व कल्याणकारी वैध धोरणांना पाठिंबा देतो. कार्यकारीमंडळाला दिशा देण्याचे काम राष्ट्रप्रमुख व कार्यकारीमंडळ प्रमुख म्हणून राष्ट्रपतीचीही भूमिका महत्वाची असते. राष्ट्रपती हा राष्ट्र, शासन, संसद या सर्वांशी संलग्न सर्वात मोठा राष्ट्रीय पदाधिकारी आहे.

**मंत्रीमंडळ व कॅबिनेट**

बांगला देशाच्या राज्यघटनेनुसार कलम ५५ अन्वये प्रधानमंत्री व त्याच्या महत्वाच्या मंत्र्यांना कॅबिनेट मंत्री म्हटले जाते. यासाठी निश्चित नियम नसून त्याची रुपरेखा ठरवण्याचा अधिकार प्रधानमंत्र्याला आहे.

कार्यकारी मंडळाचा प्रमुख व शासनाचा प्रमुख म्हणून प्रधानमंत्राला राज्यघटनेनुसार बांगला प्रजासत्ताकासाठी आपले अधिकार वापरता येतात. भारत व इंग्लंडप्रमाणे बांगला देशात संसदीय पद्धत असल्याने त्यांनी 'सामुहिक जबाबदारीच्या' तत्वाचा जाणिवपूर्वक स्वीकार केला आहे. सामुहिक जबाबदारी म्हणजे मंत्रीमंडळातील एका मंत्र्याविरूद्ध अविश्वास म्हणजे संपूर्ण मंत्रीमंडळाविरूद्ध अविश्वास गृहित धरून त्यासर्वांना राजीनामा द्यावा लागतो किंवा प्रधानमंत्र्याने स्वतः राजीनामा दिला वा एखादे महत्वाचे विधेयक विशेषतः अंदाजपत्रकासारखे अर्थविधेयक जर संसदेत नामंजूर झाले तर संपूर्ण मंत्रीमंडळाविरूद्ध तो अविश्वास मानला जातो व त्यांना आपले पद सोडावे लागते. याला संयुक्त वा सामुहिक जबाबदारी असे म्हणतात अध्यक्षीय पद्धतीत अमेरिकेत मंत्री हे वैयक्तिक स्वतःच्या कारभार व खात्यापुरते अध्यक्षाला जबाबदार असतात. कारण हे मंत्री एका बहुमतवाल्या पक्षाचे नसतात. तसेच त्यांची निवड अमेरिकेत अध्यक्ष वैयक्तिक निकषावर व साधारणतः खाजगी पद्धतीने करतो. संसदीय पद्धत पक्षशिस्त शिकविते.

**मंत्रीमंडळ रचना**

बांगला देशात प्रधानमंत्री व त्याच्या कॅबिनेटसह राज्यमंत्री व उपमंत्र्यांमध्ये कामाची विभागणी दिसते.

१) **कॅबिनेट मंत्री**– शासनाची अधिक महत्वाची खाती म्हणजेच कॅबिनेटची रचना करण्याचा अधिकार प्रधानमंत्र्याला आहे.

२) **राज्यमंत्री**– साधारणतः राज्यमंत्र्यांकडे स्वतंत्र विषयांचा कारभार असतो. ही खाती ही महत्वाची व विशेषीकृत असतात.

३) **उपमंत्री** – ज्या विषयांची व्याप्ती मोठी आहे वा मूळात त्या विषयात काही विभाग आहेत. अशा मोठ्या कॅबिनेट वा राज्यमंत्र्यांना सहकार्य करण्यासाठी उपमंत्री असू शकतात.

मंत्रीमंडळाची संख्या ठरवण्याचा व खातेवाटप व एकंदर रचना करण्याचा अधिकार प्रधानमंत्र्याला आहे. साधारणतः बांगला देशात ३० कॅबिनेट मंत्री असतात तर राज्यमंत्री १७ ते २० व उपमंत्री २ ते ४ असू शकतात. प्रशासकीय गरज व संभाव्य कामाचा समतोल लक्षात घेऊन हे मंत्रीमंडळ तयार केले जाते. या मंत्रीमंडळात अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे ९०% मंत्री पक्षातील निर्वाचीत सदस्यांमधून व १०% मंत्री बिगरसंसदीय असे असावे लागतात. ते ठरवण्याचा अधिकारही प्रधानमंत्र्याला आहे. स्वतः मंत्री आपल्या वैयक्तीक कारणास्तव आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात. अशा काही कारणातून रिकाम्या जागा भरण्याचा व नव्या कार्यक्षम चेहऱ्यांना मंत्रीमंडळात स्थान देण्याचा खातेबदल करण्याचा अथवा मंत्रीमंडळाची वाढ करण्याचा सर्व बदलात्मक अधिकार प्रधानमंत्र्याला आहे. एखाद्या अकार्यक्षम मंत्र्याला पद सोडण्यास सांगण्याचाही त्यास अधिकार आहे.

शासनसंस्थेचा प्रमुख या नात्याने प्रधानमंत्र्याला बांगला देशात कायद्यांची कार्यवाही करावी लागते. याबरोबर लोकांच्या, दबावगटांच्या मागण्या लक्षात घेऊन घटनात्मक नवी विकासवादी धोरणे देखील राबवावी लागतात. यासाठी संसदीय प्रक्रियेत त्यांचा सहभाग कायदा निर्मितीच्या प्रक्रियेपासून ग्रामीण स्तरावरील सर्वसामान्य व्यक्तीच्या हिताच्या व राष्ट्रीय समग्र विकासाच्या संदर्भात महत्वपूर्ण असतो. या कामात त्याला सर्व मंत्री, सचिवालय, विरोधी पक्ष सदस्य, प्रशासन व स्वतः राष्ट्रपती सहकार्य करीत असतो कारण राष्ट्रपतीची संसदीय पद्धतीमध्ये असणारी भूमिका केवळ राष्ट्रप्रमुख म्हणून महत्वाची नाही तर तो कार्यकारी मार्गदर्शक म्हणूनही लोकशाहीचा प्रमुख आधार आहे.

### बांगला देशाचा राष्ट्रपती

बांगला देशाच्या संविधानाच्या भाग चार मध्ये कलम ४८ अन्वये राष्ट्रपतीची तरतूद केली आहे. संसदीय पद्धतीत सर्व राज्यकारभार राष्ट्रप्रमुख या नात्याने राष्ट्रपतीच्या नावाने चालतो.

### निवड

बांगला देशात राष्ट्रपतीची निवड संसद सदस्य मतदानाच्या आधारे कायद्यानुसार करतात. तो देशाचा प्रमुख असतो. म्हणून राज्यघटनेने दिलेल्या सर्व जबाबदाऱ्या व घटनात्मक कामे त्यास पार पाडावी लागातात. देशाचा कारभार करण्यासाठी तो कलम ५६ (३) नुसार प्रधानमंत्र्याची व कलम ९५ (१) नुसार सर न्यायाधीशांची नेमणूक करतो. ही सर्व कामे तो अर्थातच प्रधानमंत्र्याच्या सल्ल्याने करतो. याशिवाय सर्व महत्वाच्या प्रशासकीय नेमणूका त्यास कराव्या लागतात.

**पात्रता**

राष्ट्रपतीच्या निवडणूकीसाठी आवश्यक असणारी पात्रता बांगला देशाच्या राज्यघटनेने खालील प्रकारे सांगितली आहे.

१) त्याचे वय ३६ वर्षाच्या वर असावे.

२) त्याने संसदेची निवडणूक लढवू नये किंवा

३) महाभियोगाच्या आरोपाखाली त्यास अगोदर राष्ट्रपती पदावरून दूर केलेले नसावे.

गुन्हेगारांची शिक्षा कमी वा माफ करण्याचा अधिकार– घटनेच्या ४९ व्या कलमानुसार न्यायालयाने दिलेली शिक्षा कमी करण्याचा तसेच फाशीच्या शिक्षा झालेल्या अपराध्याची शिक्षा रद्द करण्याचा त्यास अधिकार आहे.

**मुदत व कालावधी**– बांगला देशाच्या राष्ट्रपतीला संसद व प्रधानमंत्र्याएवढा पाच वर्षाचा कालावधी मिळतो. नविन राष्ट्रपतीची निवड होईपर्यंत पहिल्या राष्ट्रपतीला आपल्या पदाचा वापर करता येतो. अमेरिका व भारताप्रमाणे बांगला देशातही एका व्यक्तीने दोनपेक्षा जास्त वेळा राष्ट्रपती पद स्वीकारू नये असे घटनेत सूचित करण्यात आले आहे. राष्ट्रपतीला आपल्या पदाचा राजीनामा लेखी स्वरूपात स्वतःच्या मर्जीनुसार देता येतो. असा राजीनामा तो संसदेच्या सभापतीकडे देऊ शकतो. राष्ट्रपती पदाच्या काळात त्याला कोणतीही निवडणूक लढवता येत नाही. त्याच्या कार्यकाळात त्याला कोणतेही न्यायालय त्याची चौकशी करू शकत नाही, तसेच त्याला तुरुंगात टाकता येत नाही.

**राष्ट्रपतीवरील महाभियोग**– घटनेच्या कलम ५२ नुसार राष्ट्रपती विरोधात महाभियोगाचा आरोप लावण्याचा व तो सिद्ध करून त्याला पदावरून दूर करण्याचा अधिकार संसदेला आहे. जर राष्ट्रपतीने–

१) राज्यघटनेतील नियमांचा भंग करून त्याचा घटनाबाह्य पद्धतीने गैरवापर केला असेल तर

२) अशावेळी संसदेच्या बहुमताने तसा गैरवर्तनाच्या आरोपाची नोटीस राष्ट्रपतीला चौदा दिवस अगोदर त्याचा खुलासा करण्यास द्यावी लागते. अशी नोटीस संसदेच्या सभापतीमार्फत द्यावी लागते व त्यासाठी राष्ट्रपतीकडे तीस दिवसांचा जास्तीत जास्त अवधी असतो.

३) राष्ट्रपतीच्या लेखी समर्थन व खुलाशानंतर ही जर संसदेचे आरोपाबाबत समाधान झाले नाही तर संसदेत हजर राहून मतदान करणाऱ्यांच्या $^{२}/_{३}$ बहुमताने राष्ट्रपतीला पदच्युत करण्याचा अधिकार संसदेला आहे.

४) राष्ट्रपतीने आपले पद सोडले तर वा त्यास ते सोडावे लागले तर नविन राष्ट्रपती त्या पदावर येईपर्यंत संसदेचा सभापती राष्ट्रपतीचा अतिरिक्त कारभार सांभाळतो. भारतीय संसदीय पद्धतीपेक्षा ही पद्धती वेगळी आहे कारण बांगला देशात उपराष्ट्रपती पद उपलब्ध नाही.

बांगला देशात राष्ट्रपतीला संसद व कार्यकारी मंडळाच्या संदर्भात व्यापक अधिकार संविधानाने दिले आहेत. राष्ट्रपतीचे प्रमुख अधिकार खालीलप्रमाणे–

**राष्ट्रपतीचे अधिकार**– बांगला देशात राष्ट्रप्रमुख या नात्याने राष्ट्रपतीला अधिकार आहेत.

१) देशाचा सर्व राज्यकारभार राष्ट्रप्रमुख या नात्याने राष्ट्रपतीच्या नावाने चालतो.

२) संसदेला देशासाठी कायदे करण्याचा अधिकार आहे पण जोपर्यंत राष्ट्रपतीची अशा पारित विधेयकावर स्वाक्षरी होत नाही तोपर्यंत विधेयकाचे अधिकृत कायद्यात रुपांतर होत नाही.

३) संसदेला आपले काम करता यावे यासाठी संसदेचे अधिवेशन बोलावण्याचा वा ती तहकुब, बरखास्त करण्याचा त्याला अधिकार आहे.

४) प्रत्येक नव्या संसदेसमोर राष्ट्रपती अभिभाषण देतो. या अभिभाषणात तो देशाची उद्दिष्ट्ये जबाबदाऱ्या व नविन विकास कार्यक्रमाच्या बाबतीत सभागृहाला मार्गदर्शन करतो. या मार्गदर्शनाचा नवनिर्वाचीत सदस्यांना अधिक फायदा होतो कारण त्यांना बऱ्याच वेळा संसदीय प्रक्रिया व तेथील कार्यपद्धती माहित नसते.

५) संसदेला म्हणजे बहुधा सत्तारुढ पक्षाला विधेयके मांडण्यापूर्वी खासकरून अर्थविधेयकांना संसदेत मांडण्यापूर्वी राष्ट्रपतीची पूर्वपरवानगी लागते.

६) यासंदर्भात राष्ट्रपतीला विशिष्ट वेळेत परवानगीबाबत मौन पाळून नकार देण्याचा पॉकेट व्हेटो सारखा अधिकार आहे किंवा तो संबंधीत विधेयकात दुरुस्ती करून संसदेकडे पुनर्विचारास परत पाठवतो मात्र या दुरुस्त्या संसदेवर बंधनकारक नसतात.

७) प्रधानमंत्री, कॅबिनेट मंत्री व मंत्रीपरिषद, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश, लोकायुक्त, महालेखापाल, विदेश राजदूत, राष्ट्रीय समित्यांचे अध्यक्ष, इत्यादींना कायदेशीर पद्धतीने नेमण्याचा औपचारिक राष्ट्रप्रमुख म्हणून राष्ट्रपतीला अधिकार आहे.

८) भारताप्रमाणेच वटहुकूम म्हणजे अध्यादेश काढण्याचा राष्ट्रपतीला आहे. बांगला देशात संसदेचे अधिवेशन चालू नसताना म्हणजे संसदेच्या विश्रांतीच्या काळात देशाला जर अचानक एखाद्या कायद्याची आवश्यकता भासली तर स्वतःच्या अखत्यारीत कायदा बनविण्याचा राष्ट्रपतीला अधिकार आहे. या वटहुकूमास संसदीय कायद्याएवढेच महत्व व दर्जा असतो. अशा वटहुकूमांना जर परत विशिष्ट मुदतीत संसदेने बहुमताने मंजुरी दिली तर या वटहुकूमांचे संसदीय कायद्यात रुपांतर होऊ शकते.

९) बांगला देशात राष्ट्रपती हा आंतरराष्ट्रीय सभा संमेलनात, शिखर परिषदात देशाचे प्रतिनिधित्व करतो. वाटाघाटी व आंतरराष्ट्रीय करार, संधी करू शकतो.

१०) राष्ट्रपतींना अपराधी व गुन्हेगारांची शिक्षा वा फाशी रद्द करता येते किंवा ती कमी करता येते मात्र त्यास सबळ अशी वैधानिक कारणे असावी लागतात.

११) राष्ट्रपती हा राष्ट्रप्रमुख असल्याने देशातील सर्व सभा संमेलने व राष्ट्रीय उत्सवात तथा कार्यक्रमात त्यास मानाचे स्थान असते.

१२) परकीय आक्रमण युद्ध व इतर तत्सम राष्ट्रीय संकटाच्या वेळी आणीबाणी घोषित करण्याचा त्यास अधिकार आहे. तो देशाचा सरसेनापती असतो.

१३) राष्ट्रपती हा राष्ट्राचा प्रमुख असल्याने त्यास राष्ट्रीय जीवनात विशेषाधिकार आहेत जसे त्यास तुरुंगात टाकता येत नाही. महाभियोगाच्या आरोपातही त्यास त्याची बाजू मांडण्याची पुरेशी संधी दिली जाते.

थोडक्यात बांगला देशात राष्ट्रपती हे घटनात्मक सर्वोच्च असे अधिकारसंपन्न व मानाचे पद आहे.

## २.३.३ क) बांगला देशातील न्यायव्यवस्था

संसदीय लोकशाही असणाऱ्या बांगला देशात शासनव्यवस्थेची तिसरी शाखा म्हणून सर्वोच्च न्यायालयाला महत्वाचे स्थान आहे. कायदा निर्मितीत संसद, कायदा कार्यवाहीत प्रधानमंत्री व मंत्री, न्याय क्षेत्रात सर्वोच्च न्यायालय तर राष्ट्रप्रमुख म्हणून राष्ट्रपती व संसदेचे सभापती आपापल्या क्षेत्रात सार्वभौम व अंतरीम आहेत. बांगला देशाच्या संविधानाच्या १०० व्या कलमानुसार राजधानी ढाका येथे सर्वोच्च न्यायालय काम करते.

या न्यायालयाचे प्रमुख दोन विभाग असून अपीलीय विभाग व दुसरा उच्च न्यायालय विभाग होय. २०१७ मध्ये अपीलीय विभागात सात व उच्च न्यायालयात ८६ न्यायाधीश कार्यरत आहेत. यालाच उच्च न्यायालय म्हणतात. बांगला देशाच्या स्वातंत्र्यापूर्वी याला हायकोर्ट असे म्हणत.

**बांगला देशातील न्यायालयाची पार्श्वभूमी–**

बांगला देशातील न्यायालयीन पद्धतीवर ब्रिटिश व भारतीय न्यायव्यवस्थेचा मोठा प्रभाव आहे. १७२६ मध्ये ब्रिटिश महाराज जॉर्ज प्रथम यांच्या आदेशानुसार कलकत्ता, मुंबई व मद्रास येथील न्यायालयांना ब्रिटिश अंमलाखाली आणण्यात आले. याचाच एक भाग म्हणजे सर्वोच्च न्यायालयाला त्यावेळी कलकत्ता (फोर्ट विलीयम) येथे अधिकार देण्यात आले. २६ मार्च १७७४ मध्ये असे सर्वोच्च न्यायालय सुरू झाले. १८६१ च्या कायद्याने भारतीय न्यायव्यवस्थेची पुनर्रचना करण्यात आली व त्यामुळे मुंबई, मद्रास व कलकत्ता ही सर्वोच्च न्यायालये रद्द करून त्यांना उच्च न्यायालयांचा दर्जा मिळाला. या काळात इंग्लंडमधील प्रिव्ही कौंसिल भारतीय राज्यकारभारावर व न्यायपद्धतीवर देखरेख करणारी संस्था होती.

१९४७ मध्ये भारताच्या फाळणीबरोबर पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान अशी फाळणी झाली. तयार झालेले पाकिस्तानचे दोन भाग एकाच म्हणजे पश्चिम पाकिस्तानच्या अधिपत्याखाली होते. त्यामुळे पूर्व पाकिस्तान म्हणजे सध्याच्या बांगला देशात ढाका येथे असणाऱ्या न्यायालयाला

'ढाका हायकोर्ट' असे म्हणत. त्याला प्रारंभिक व अपीलीय असे अधिकार होते. त्यांच्या दृष्टिने ते सर्वोच्च न्यायालय होते. बांगला देशाच्या स्वातंत्र्यानंतर याच न्यायालयाला सर्वोच्च न्यायालयाचे स्थान प्राप्त झाले.

बांगला देशात सर्वोच्च न्यायालयाला राज्यघटनेने कलम १११ अन्वये न्यायालयिन क्षेत्रातील सर्वोच्च अधिकार दिलेले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय अपीलीय न्यायालयावर बंधनकारक असतात. हे सर्व निर्णय अभिलेख न्यायालयाच्या धर्तीवर जतन केले जातात. त्यातील काहींचे प्रकाशनही केले जाते. सध्या ते चान्सरी लॉ क्रॉनिकल या बांगलादेशाच्या वेबसाईटवर वाचता येतात.

बांगला देशाच्या सर्वोच्च न्यायालयात राष्ट्रपती नियुक्त एक सरन्यायाधीश व इतर काही न्यायाधीश असतात. इतर न्यायाधीशांची संख्या बदलणारी असते. ती संख्या राष्ट्रपती व सरन्यायाधीश ठरवतात.

**सर्वोच्च न्यायालयाचे कार्यक्षेत्र–**

सर्वोच्च न्यायालय हे बांगला देशातील सर्वश्रेष्ठ अंतरीम न्यायालय असून त्याचे अपीलीय विभाग व उच्च न्यायालय विभाग असे दोन भाग आहेत. कलम १०१ मध्ये उच्च न्यायालयाचे व कलम १०७ मध्ये अपीलीय न्यायालयाचे कार्यक्षेत्र दिलेले आहे. उच्च न्यायालयात इतर कनिष्ठ न्यायालयांची न्यायधिकरणे यावर न्याय निवाडा दिला जातो तर कलम १०२ नुसार रिट आवेदन, कंपनी सेनाविभाग, मूलभूत अधिकार यावरील निवाडे अपीलीय विभागात चालतात. सरकारविरूद्धही निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. या दृष्टिने न्यायालयिन स्वातंत्र्य जपण्याचा प्रयत्न बांगला झाल्याचे दिसते.

**न्यायधीश नियुक्ती–**

बांगला देशात सर्वोच्च न्यायालयाच्या सर न्यायाधीश व इतर न्यायाधीशांच्या नेमणूका राष्ट्रपती प्रधानमंत्री व कायदेपंडिताच्या सल्ल्याने करतो. अतिरिक्त न्यायाधीश ज्यांना विधीपरिषदेवर काम करावयाचे असते. त्यांना कलम ९५ नुसार दोन वर्षासाठी नेमले जाते. साधारणतः ८०% न्यायाधीश स्थायी तर २०% न्यायाधीश अस्थायी असतात. कलम १४८ नुसार या सर्व नियुक्त न्यायाधीशांना पद व गोपनीयतेची राष्ट्रपतीसमोर शपथ घ्यावी लागते. २००४ च्या १३ व्या घटनादुरुस्तीने न्यायाधीशांचे निवृत्ती वय ६७ वर्षे केले आहे. त्या निवृत्त न्यायाधीशास परत कोठेही न्यायीक काम करता येत नाही.

**सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश होण्यासाठी आवश्यक पात्रता–**

१) तो बांगला देशाचा नागरिक असावा.

२) त्याने किमान दहा वर्षे सर्वोच्च न्यायालयात वकीली केलेली असावी.

३) त्याने किमान दहा वर्षे बांगला देशात कोठेही न्यायीक कार्यालय चालवलेले असावे.

४) संसदेने केलेले वेळोवेळीचे कायदे या नियुक्त्यांना बंधनकारक.

५) राष्ट्रपतीच्या मते तो कायदेपंडित असावा.

**पदच्युती–**

सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांना वयाच्या ६७ व्या वर्षापर्यंत काम करता येते. पण राष्ट्रपतीस त्याचे वर्तन घटनाबाह्य आहे, असे वाटले तर तो संसदेस तसे कळवू शकतो. यावर संसदेत अशा न्यायाधीशाविरूद्ध २/३ बहुमताने त्याच्या पदच्युतीचा ठराव संमत झाला तर त्याला आपले पद सोडावे लागते. येथे संसदीय सार्वभौमत्व सिद्ध होते. कारण गैरवर्तन वा घटनाबाह्य या शब्दाची व्याख्या करण्याचा संसदेला अधिकार आहे. स्वतः न्यायाधीश आपला राजीनामा राष्ट्रपतीस सादर करू शकतात. सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाच्या गैरहजेरीत त्या अपीलीट न्यायालयाचा जेष्ठ न्यायाधीश काही काळ सरन्यायाधीशाचे कामकाज पाहू शकतो.

थोडक्यात बांगला देशात सर्वोच्च न्यायालय हे

१) घटनेचे संरक्षण करते.

२) सरकारवर नियंत्रण ठेवते.

३) लोकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करते.

४) आणि उच्च न्यायालय व अपीलीय न्यायालयाकडून आलेल्या अपिलांवर न्याय देते. व वाद कमी करते.

देशात कायद्याचे अधिराज्य व सामाजिक न्याय तयार करण्याची जबाबदारी न्यायालयाची असून यासाठी न्यायाधीश, वकील व त्यांचा नोकर वर्ग काम करत असतो.

**दुय्यम न्यायालये व लवाद मंडळे–**

घटनेच्या कलम ११५ नुसार वरिष्ठ न्यायालयांना सहकार्य करण्यास व दुय्यम स्वरूपाचे विवाद मिटवण्यासाठी बांगला देशात स्थानिक व दुय्यम न्यायालयांची तरतूद आहे. त्या संदर्भात सर्व तरतूदी, अटी, पात्रता, कार्यक्षेत्र, संख्या ठरवण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असून राष्ट्रपती सरन्यायाधीशांच्या सल्ल्याने दुय्यम न्यायालयांचे व्यवस्थापन करतो.

सध्याच्या काळात सर्वच देशात न्यायालयीन कामकाजाचा ताण सातत्याने वाढत आहे. शिवाय मानवी जीवनाचे प्रत्येक कार्यक्षेत्र हे देखिल वेगाने विशेषीकृत व गुंतागुंतीचे बनत आहे. मानवी जीवनाच्या व सामजिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राला सध्या न्यायाची गरज भासत आहे. या गरजेतून न्यायीक लवाद मंडळे व प्रशासकीय न्यायालयांची संकल्पना सर्वच देशात रुढ होत आहे. याला बांगला देशही अपवाद नाही. घटनेच्या ११७ व्या कलमानुसार बांगला देशात संसद गरजेनुसार लवाद

मंडळाची स्थापना करू शकते. थोडक्यात लोकशाही सक्षम करण्याची काळजी बांगला देशात दिसते व त्यासाठीच्या तरतूदी घटनाकारांनी केल्या आहेत.

### २.३.४ समाज व अर्थव्यवस्था

अ) सामाजिक संरचना- जाती, जमाती व अल्पसंख्यांक लोक

ब) सामाजिक चळवळी

क) अर्थव्यवस्था व विकास

**अ) सामाजिक संरचना- जाती, जमाती व अल्पसंख्याक लोक**

बांगला देशातील सामाजिक रचना संमिश्र स्वरूपाची आहे. या देशात शेती हा प्रमुख व्यवसाय असून मुख्यतः ज्युट व ऊसाचे मोठे उत्पन्न बांगला देशात होते. या शेतमालावर विशेषतः ज्युट, तागावर प्रक्रिया करून कापड व्यवसाय असणाऱ्या मोठ्या गिरण्या स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात म्हणजे कलकत्ता येथे होत्या. त्या आता बांगला देशाशी संलग्न नसल्याने नव्याने बांगला देशात कापड गिरण्या तयार झाल्या आहेत, तरी ज्यूटची मोठी निर्यात या देशातून होते.

बांगला देशात साधारणतः प्रमुख तीन प्रकारचे वर्ग आहेत. मुस्लीम समाज मुख्य प्रधान समाज असून त्यात जमिनदार, मध्यम प्रकारची शेती करणारे व पूर्वीचे मालगुजार म्हणजे मजुरी करणारे लोक या देशात आहेत. हिंदू जमिनदार व सरंजामदाराचा मोठा वर्ग पूर्वी बांगला देशात होता; पण बांगला देशाच्या निर्मितीनंतर मोठ्या प्रमाणात या देशातील हिंदू, बौद्ध व ख्रिश्चन लोकांनी भारतात स्थलांतर केले. कारण बांगला देश हा संकुचित धर्मवादी व मागास प्रकारचा देश आहे. त्यांच्या राज्यघटनेने प्रजासत्ताक, धर्मनिरपेक्ष, लोकशाही असे मोठे शब्द वापरले असले तरी हे राष्ट्र कट्टर मुस्लीम धर्मिय असून शिक्षण प्रसार नसल्याने पुरोगामी, समाजवादी व परिवर्तनवादी कोणत्याही चळवळी या देशात तयार झालेल्या नाहीत. उलट पुरोगामी लेखिका तस्लिमा नसरीनला देश सोडून पळून जावे लागले. आधुनिक विचाराच्या पत्रकारांच्या हत्या इथे झाल्या.

मुस्लीम धर्मियांतर्गत शिया व सुन्नी हे दोन पंथ इथे असून हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, जैन अल्पसंख्य स्वरुपात येथे आहेत.

**ब) सामाजिक चळवळी**

१९६८ च्या दरम्यान शेख मुजबूर रहेमान यांनी सोनार बांगलासाठी काढलेली लोकसत्ताक, प्रजासत्ताक व स्वातंत्र्यवादी चळवळ वगळता येथे फारशा सामाजिक चळवळी तयार झाल्या नाहीत. एकतर पारंपरिक उच्चभ्रू सरंजामदार वर्गाचे आजही या देशात प्रभुत्व आहे. त्यामुळे सामाजिक गुलामगिरीचे मोठे प्रमाण बांगला देशात असून पुरोगामी चळवळी मोडून काढताना इसिससारख्या चळवळींना मात्र येथे एक सनातन वर्ग प्राधान्य देतो.

## क) अर्थव्यवस्था व विकास

बांगला देश हे मागास राष्ट्रगटातील राष्ट्र असून येथील अर्थव्यवस्था कृषी उत्पन्नावर आधारीत आहे. तरी या देशात शेतीशी निगडीत कारखानदारी आहे. १९६९-७० मध्ये चहाचे ११७ कारखाने, साखर १०, वनस्पती तेल १९, तंबाखू १५, कापड गिरण्या ४६, रेशीम व रेयॉन ११ गिरण्या, ज्यूट गिरण्या ११, रबर टायर कारखाने २ युरिया व खत कारखाने २, काडीपेटी २० कारखाने सिमेंट १, पेपर कागद १० कारखाने होते. या देशाला ज्यूट, चहाबरोबर, कापड, कातडी व मासळी तांदूळ यापासून मोठे उत्पन्न मिळते. तांदूळ, गहू, बार्ली, ऊस, तंबाखू, ज्यूट हे येथील प्रमुख उत्पादन आहे.

१९४७ मध्ये पाकिस्तान (पश्चिम व पूर्व पाकिस्तान) तयार झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय समुदायाकडून जी आर्थिक मदत मिळाली, ती पश्चिम पाकिस्तानने स्वतःच्या विकासासाठी वापरली. त्यातील फार थोडा वाटा पूर्व पाकिस्तानला म्हणजे बांगलाला मिळाला. त्या काळात बांगलाचा दर्जा घटक राज्यासारखा होता. त्यामुळे बांगला देशाला स्वतःचा विकास १९७१-७२ नंतरच करावा लागला. ढाका, चितगाव, फरिदपूर, साल्हेट, दिनाजपूर, रंगपूर, बोगरा, पावना, बाकेरगंज या सारख्या काही शहरात मोठ्या प्रमाणात आधुनिक कारखानदारी वाढत आहे.

बांगला देशाच्या स्वातंत्र्यानंतर त्यांनी चार कलमी आर्थिक विकास कार्यक्रमावर भर दिला आहे. त्यामध्ये-

१) पाण्याचे व्यवस्थान यात ब्रह्मपुत्रा व गंगेच्या पाण्याचे शेतीसाठी नियोजन.

२) ज्यूट, तांदूळ, चहा उत्पादन व निर्यातीवर भर आणि त्यांचे राष्ट्रीयकरण.

३) साक्षेपी किंमत व चलनावर नियंत्रण यात भारताच्या सहकार्याने व्यवसाय करणे.

४) सहकारी तत्वावर स्वव्यवस्थापनाची नवी ग्रामीण रचना की ज्यात बेघरांना घरे, लघुउद्योगास मदत, स्वातंत्र्यसैनिकांचे व्यवस्थापन आणि या सर्वांसाठी संमिश्र अर्थव्यवस्थेचा व सहकाराचा त्यांनी स्वीकार केला. सार्क संघटना व भारताच्या सहकार्यामुळे बांगला देशाने काही प्रमाणात दारिद्र्यावर मात केली आहे.

## २.३.५ समकालीन राजकारण

अ) पक्षीय राजकारण

ब) एकी व एकात्मतेला आव्हान

### १) अवामी लीग व नॅशनल अवामी पक्ष

बांगला देशाच्या स्वातंत्र्याच्या वेळी या देशात शेख मुजबूर रहेमान यांच्या अवामी लीग पक्षाचा मोठा प्रभाव बांगला देशावर होता. या देशात आज बहुपक्षपद्धती असली तरी या पक्षापक्षात वैचारिक व कार्यक्रमात्मक फार मोठे वेगळेपण नाही. पाकिस्तानात असणाऱ्या मुस्लीम लीगच्या कडवेपणाला

व अतिरेकी धर्मांधतेला कंटाळून १९४९ मध्ये पूर्व पाकिस्तानात अवामी जीग पक्ष तयार झाला. आपली धर्मनिरपेक्षता सिद्ध करण्यास त्यांनी अवामी मुस्लीम लीग हा सुरूवातीचा पक्षाच्या नामकरणावेळचा शब्द बदलून त्यातील मुस्लीम शब्द पुढे वगळला. या पक्षाने उर्दू भाषेला विरोध केला. स्थानिक भाषा बंगाली भाषेचा त्यांनी आग्रह धरला. मौलाना अब्दुल हमीद खान भाषानी हे या पक्षाचे प्रमुख होते. ज्यांनी पूर्वी आसाम मुस्लीम लीगचे काम केले होते. या पक्षाचे सुरूवातीला शामसुल हक हे सेक्रेटरी होते. पुढे या पक्षाला आकार देण्याचे काम शेख मुजबूर रहेमान यांनी केले. भाषिक अस्मितेमधून हा पक्ष तयार झाला. यातूनच पुढे बांगला देशाची मागणी पुढे आली. भारतात ज्याप्रकारे राष्ट्रीय काँग्रेसला स्थान आहे. त्याचप्रकारे बांगला देशात अवामी लीग पक्षाला महत्व आहे. याच पक्षाला काही काळ नॅशनल अवामी लीग असे म्हणत.

राष्ट्रीय संपत्तीचे समान वितरण, ज्यूट व्यवसायाचे राष्ट्रीयकरण ज्यूट उत्पादकांना योग्य मोबदला, सामुहिक सहकारी शेती व समाजवादाचे प्रयोग सूतगिरण्यामध्ये मानवी श्रमाऐवजी यांत्रिकीकरण, मोफत व सक्तीचे शिक्षण, वृत्तपत्र, भाषण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, न्यायालयीन स्वातंत्र्य, बंगाली भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा व बांगलाच्या निर्मितीपूर्वी मुस्लीम लीग (झुल्फिकार अली भुट्टो, बनेझीर भुट्टो यांचा पक्ष) पक्षाला ठाम विरोध ही या पक्षाची तत्वे होती. लोकशाही, समाजवाद, प्रजासत्ताक व धर्मनिरपेक्षतेवर या पक्षाची श्रद्धा होती. स्थानिक स्वराज्य संस्था व विकेंद्रिकरणावर त्यांनी भर दिला.

१९८४ नंतर या पक्षाचे नेतृत्व शेख मुजबूर रहेमान यांची मुलगी शेख हसिना यांच्या हातात गेले. बांगला देशात ७ एप्रिल १९७३ ते ६ नोव्हेंबर १९७५ पर्यंत शेख मुजबूर रहेमान यांच्या नेतृत्वाखाली अवामी लीगची सत्ता होती. एप्रिल १९७९ ते ४ मार्च १९८६ पर्यंत झिया उल रहेमान यांच्या बांगला देश नॅशनल पक्षाची सत्ता होती. १० जुलै १९८६ ते डिसेंबर १९८७ मध्ये नॅशनलचे एच. एम. इर्शाद बांगलाचे प्रधानमंत्री बनले. पुन्हा १५ एप्रिल १९८८ ते ६ डिसेंबर १९९० पर्यंत तेच प्रधानमंत्री राहिले. याच बांगला देश नॅशनल पक्षाच्या खलिदा झिया ५ एप्रिल १९९१ ते १४ नोव्हेंबर १९९५ पर्यंत प्रधानमंत्री होत्या. त्याच पुढे १४ जुलै १९९६ ते १३ जुलै २००१ मध्ये अवामी लीगला परत सत्ता मिळाली. ८ ऑक्टोबर २००१ ते २००६ या काळात खलीदा झिया प्रधानमंत्री बनल्या. ५ जानेवारी २००९ ते आजअखेर शेख हसिना यांच्या हातात सत्ता आहे.

**२) इतर पक्ष**– बांगला देशात बहुपक्ष पद्धती असून

१) बांगला देश अवामी लीग

२) बांगला देश नॅशनल पार्टी

३) जातीय पार्टी (इर्शाद)

हे तीन प्रमुख पक्ष असून

१) लिबरल डेमॉक्रेटिक पक्ष

२) जातीय पार्टी (मंजू)

३) बांगला देश कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी-लेनिनवादी)

४) कृषक श्रमिक जनता लीग

५) कम्युनिस्ट पार्टी ऑफ बांगला देश

६) राष्ट्रीय अवामी लीग

७) वर्कर्स पार्टी ऑफ बांगला देश

८) विकल्पधारा बांगला देश

९) राष्ट्रीय समाजतांत्रिक दल

१०) बांगला देश जातीय पार्टी-बीजेपी

११) बांगलादेश खिलाफत आंदोलन

१२) गणफोरम

१३) प्रोग्रेसीव्ह डेमॉक्रॅटिक पक्ष

१४) बांगला देश जातीय पक्ष

१५) इस्लामिक फ्रंट बांगला देश

१६) इस्लामी ऐक्य जोट

१७) बांगला देश खिलाफत मजलीस

१८) इस्लामी आंदोलन बांगलादेश

१९) खिलाफत मजलीस

२०) बांगला देश इस्लामिक फ्रंट

इत्यादी छोटे पक्ष आहेत. पक्षांची संख्या वाढल्याने भारताप्रमाणे बांगला देशातही आघाडी सरकारे तयार होत आहेत.

## २.३ सारांश

१९७१ मध्ये पाकिस्तान पासून स्वातंत्र्य मिळवून शेख मुजबूर रहेमान यांनी बांगला देशाची निर्मिती केली. याला पूर्वी पूर्व पाकिस्तान असे नाव होते. मूळात हे भारतीय भूखंडाचेच अविभाज्य घटक होते. बांगला देशाची निर्मिती भौगोलिक दूरत्व, दुय्यम स्थान व बंगाली भाषेच्या अस्मितेमधून झाली. सोनार बांगलाच्या निर्मितीमध्ये भारताने मोठा सहभाग घेतला. स्वातंत्र्यानंतर या देशाने संसदीय

(एकगृहीय-फक्त लोकसभा) प्रजासत्ताक, धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा स्वीकार केला. या देशात भारताप्रमाणे राष्ट्रप्रमुख म्हणून राष्ट्रपती, कार्यकारी मंडळ प्रमुख म्हणून बहुमत मिळविलेल्या पक्षाचा नेता म्हणजे प्रधानमंत्री व मंत्री आणि त्यांना सहकार्यास विरोधी पक्ष व सचिवालय असते. संसद देशासाठी कायदे करते. त्यासाठी संसदीय पद्धती वापरतात. संसदेचे कामकाज चालविण्यास सभापती व उपसभापती असतो. कायदे व्यवहारात आणण्याची जबाबदारी मंत्रीमंडळाची असते. त्यांचे कॅबिनेट, राज्यमंत्री व उपमंत्री असे तीन स्तर आहेत. संसदेत मांडल्या जाणाऱ्या विधेयकांना राष्ट्रपतीची पूर्वपरवानगी लागते. राष्ट्रपती काही पारित विधेयके नाकारू शकतो. तो प्रधानमंत्री सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, राजदूत, महालेखापाल, लोकायुक्त, महान्यायवादी स्पर्धा परीक्षा व निवड मंडळाचे प्रमुख, निर्वाचन प्रमुख यांच्या निवडी करतो. त्यास आणीबाणीचा अधिकार आहे. बांगला देशात कारभार संसदीय म्हणजेच संयुक्त जबाबदारीच्या तत्वाने चालतो. कार्यकारी मंडळ, संसद व राष्ट्रपती पाच वर्षे काम करतात. सर्वोच्च न्यायालय राज्यघटना व लोकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करते व लवादमंडळे व इतर न्यायालयातून कायद्याचे अधिराज्य व सामाजिक न्याय तयार करते. बांगला देशात बहुपक्ष पद्धती असून अवामी लीग व नॅशनल पक्ष अधिक महत्वाचा आहे. हा देश तसा मागास असून  कृषीप्रधान आहे. शेतीमध्ये ज्यूट, ऊस, गहू ही प्रमुख उत्पादने आहेत. थोडी कारखानदारी सहकार व संमिश्र अर्थव्यवस्थेचा त्यांनी स्वीकार केला आहे. या देशात मुस्लीम वर्चस्व असून बाकी धर्मिय अल्पसंख्य आहे. पुरोगामी चळवळी नगण्य असून सध्या बांगला इसिसचे केंद्र बनत आहे. त्यांच्या राज्यपद्धतीवर भारताचा प्रभाव असला तरी व्यवहारात लोकशाही उदात्त तत्वांचा फारसा स्वीकार व वापर येथे दिसत नाही.

## २.४ पारिभाषिक संकल्पना

- **द्विराष्ट्रवाद**- एका राष्ट्राची फाळणी करून दोन राष्ट्रे तयार करणे.
- **सनातन** - जुन्या विचारांचा
- **सोनार बांगला** - स्वतंत्र बांगला, सोनार हा शब्द बंगाली आहे.
- **मूलतत्ववादी** - कट्टर धार्मिक
- **उदारमतवादी** - सहिष्णू
- **ज्यूट** - ताग या पासून कृत्रिम कापड तयार करतात.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे/ वस्तुनिष्ठ प्रश्न

१) बांगला देशाची निर्मिती कोणत्या नेत्याने केली?

२) बांगला निर्मितीत कोणत्या पक्षाने पुढाकार घेतला?

३) कोणत्या प्रमुख कारणामुळे बांगला निर्मितीला चालना मिळाली?

४) बांगला देशात संसदेला किती गृहे आहेत?

५) संसदेत विनापरवानगी किती दिवस सलग गैरहजर राहिल्यास त्या सदस्याचे सभासदत्व रद्द होते?

६) राष्ट्रपतीच्या गैरहजेरीत त्याची कामे कोण करतो?

७) व्हेटो म्हणजे काय?

८) बांगला देशात कोणती पक्ष पद्धती आहे?

९) बांगला देशात मंत्रीमंडळाचे किती व कोणते स्तर आहेत?

१०) शेख हसिनांचा पक्ष कोणता?

**उत्तरे**

१) शेख मुजबूर रहेमान या नेत्याने बांगलाची निर्मिती केली.

२) शेख मुजबूर रहेमान यांच्या अवामी लीगने यात पुढाकार घेतला.

३) उर्दू भाषा नको तर बंगाली भाषा हवी या मागणीने बांगला स्वातंत्र्याला चालना मिळाली.

४) बांगला देशात राज्यसभा नाही. ही एक सभागृहाची संसद आहे.

५) संसदेत सलग नव्वद दिवस गैरहजर राहिल्यास त्याचे सभासदत्व रद्द होते.

६) राष्ट्रपतीच्या गैरहजेरीत त्याची कामे संसदेचा सभापती करतो.

७) व्हेटो म्हणजे राष्ट्रपतीचा विधेयकाला नकार होय.

८) बांगलात बहुपक्षपद्धती आहे.

९) बांगला देशात मंत्रीमंडळाचे तीन स्तर आहेत.

१) कॅबिनेट २) राज्यमंत्री ३) उपमंत्री

१०) शेख हसिनांचा पक्ष अवामी लीग आहे.

## २.६ सरावासाठी स्वाध्यायाचे प्रश्न

१) बांगला देशाच्या स्वातंत्र्याची सविस्तर माहिती द्या.

२) बांगला देशाच्या राष्ट्रपतीचे घटनात्मक स्थान सांगून त्याची कामे सांगा.

३) बांगला देशाच्या राज्यघटनेची ठळक वैशिष्ट्ये सांगा.

४) बांगला देशाच्या प्रधानमंत्र्याची निवड व कर्तव्ये यांचे परीक्षण करा.

५) पाकिस्तान व बांगला देशातील संघर्षावर भाष्य करा.

६) बांगला देशातील सर्वोच्च न्यायालयाची रचना व कामे सांगा.

७) बांगला देशातील पक्षपद्धतीवर निबंध लिहा.

८) बांगला देशात लोकशाही मूल्ये रुजली नाहीत कारण त्यांचे सार्वत्रिक मागासलेपण होय. या विधानावर तुमचे मत लिहा.

९) बांगला देशाचे विदेश संबंध विषद करा.

**टीपा लिहा.**

१) सोनार बांगला व भारत

२) संयुक्त जबाबदारी तत्व व बांगला देश

३) संसदेच्या सभापतीची कामे व बांगला देश

४) राष्ट्रपतीचा नकाराधिकार

५) बांगला देशातील लवाद मंडळे

६) इसिस व बांगला देशाचे भवितव्य

७) अवामी लीग पक्षाची तत्वे

८) संमिश्र अर्थव्यवस्था व बांगला देश

९) लोकायुक्ताची भूमिका व बांगला देश

१०) महान्यायवादी व बांगला देश

## २.७ संसदर्भ व अभ्यासासाठी आवश्यक पुस्तके


१) Ahmed Ishtiag 1196- State Nation and Ethnicity in Contemporary south Asia (London Printer)

२) Bjorkman James W. (ed) 1991- Fundamentalism Revivalists and violence in south Asia (Delhi, Manohar)

३) Bose Sugata and Ayesha Jalal 1998 – Modern South Asia, History Culture Political Economy (New Delhi, OUP)

४) Brass Paul R (ed) 2010 – Routledge Handbook of south Asian Politics (London & NY, Routtedge)

५) Jalal Aysha 1991- Democracy and Authoritarianism in South Asia (Cambridge, University Press)

६) Phandnis Urmila 1991- Ethnicity and Nation Building in South Asia (New Delhi)

७) SDSA Team 2008- State of Democracy in South Asia (New Delhi OUP)

८) Rao V. K. R. V. (Ed) – Bangala Desh Economy Problems and Prospects, vikas pub- Delhi- 1972

९) Dutt V. P. – Indias Foreign Policy, vikas pub House Delhi 1984

१०) Gulab Mishra Prakhar - Indo Pakistan Relations, Ashish Pub House Delhi, 1987

❑❑❑

## सत्र ४ : घटक ३

# नेपाळ

## ३.१ राज्यघटना व ऐतिहासिक वारसा

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ वासाहतिक कालखंड

    ३.२.२ स्वातंत्र्याच्या दिशेने

    ३.२.३ घटना निर्मितीच्या दिशेने

३.३ सारांश

३.४ महत्त्वाच्या पारिभाषिक संकल्पना

३.५ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे / वस्तुनिष्ठ प्रश्न

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भग्रंथ


## ३.० उद्दिष्टे

सदरच्या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील बाबींचे आकलन होईल.

- नेपाळचा ऐतिहासिक वारसा समजून घेता येईल.
- नेपाळमधील वसाहतकालीन कालखंडाचे आकलन होईल.
- नेपाळने स्वातंत्र्याच्या दिशेने कशी वाटचाल केली याची माहिती मिळेल.
- नेपाळमधील राज्यघटनानिर्मितीची प्रक्रिया लक्षात येईल.

## ३.१ प्रस्तावना

नेपाळ हा छोटासा असणारा हिमालय पर्वताच्या दक्षिण उतारावर असलेला परंतु भूराज्यशास्त्रीयदृष्ट्या महत्वाचा देश आहे. या घटकामध्ये आपण नेपाळचा ऐतिहासिक वारसा वसाहतकालीन कालखंड तसेच नेपाळमधील स्वातंत्र्याची चळवळ आणि घटनानिर्मिती या बाबी समजून घेणार आहोत.

नेपाळ हा लहान असणारा देश परंतु भूराज्यदृष्ट्या महत्वपूर्ण असणारा देश आहे. नेपाळच्या उत्तरेला चीनची (तिबेट) सीमा असून इतर सर्व बाजूनी भारताची सीमा आहे. यामध्ये पूर्वेस सिक्कीम व प. बंगाल दक्षिणेस बिहार व उत्तरप्रदेश आणि पश्चिमेस उत्तरप्रदेश या भारताच्या राज्यांचा समावेश होतो. नेपाळला समुद्रकिनारा नाही त्यामुळे हा संपूर्ण देश भूवेष्टित-पूर्णतःजमिनीने वेढलेला आहे. तिबेटी भाषेत 'ने' म्हणजे घर आणि पाळ म्हणजे लोकर. लोकरीच्या विपुलतेमुळे या देशाला नेपाळ हे नाव मिळाले असावे किंवा 'ने' म्हणजे मध्ये व 'पा' म्हणजे देश यावरुन तिबेटी लोक याला 'नेपा' म्हणत असावेत. नेपाळच्या ७५% भूप्रदेश डोंगराळ आहे. यामध्ये प्रामुख्याने उत्तरेकडील भागाचा समावेश होतो. तर दक्षिणेकडील भाग सुपीक आहे. यामध्ये तराई प्रदेशाचा समावेश होतो. या भागात दाट लोकसंख्या आहे. एकूण लोकसंख्येच्या ६५% लोक डोंगराळ भागात, ३०% लोक तराई भागात व ५% लोक काठमांडू खोऱ्यात राहतात. नेपाळमध्ये ७% लोक हिंदू धर्मीय असून त्या खालोखाल बौद्धधर्मीय आहेत. नेपाळची अधिकृतभाषा गुरख्यांची गोरखाली म्हणजेच सध्याची नेपाळी असून लिपी देवनागरी आहे. नेपाळ मध्ये मोठी शहरे फारशी नाहीत. काठमांडू हे राजधानीचे शहर व त्याच्या जवळची ललितपूर, भक्तपूर, नेपाळगंज इ. छोटी शहरे आहेत.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ वासाहतिक कालखंड

नेपाळचा राजकीय इतिहास हा प्रामुख्याने राजेशाहीचा आहे. यामध्ये किरातवंशी, सोमवंशी, सूर्यवंशी तसेच राजवंशी घराण्याची राजसत्ता होती. १८ व्या शतकातील कर्तबगार व शक्तिशाली राजा पृथ्वी नारायण याने अनेक छोट्या स्वतंत्र राज्यांना एकत्र आणून एकसंध नेपाळची निर्मिती केली. म्हणून त्याला आधुनिक नेपाळचा जनक म्हणतात. पुढे भारतातील ब्रिटिश काळात जंगबहादूरची सत्ता विशेष प्रभावी ठरली. ब्रिटिशांनी नेपाळमध्ये आपली सत्ता प्रस्थापित केली नाही. याउलट भारत व चीन यांच्यामधील एक तटस्थ प्रदेश म्हणून नेपाळविषयी धोरण राबविले. १९२३ च्या ब्रिटिश-नेपाळ तहानुसार नेपाळचे स्वातंत्र्य ब्रिटिशांनी मान्य केले.

तिबेट भारत व चीन येथील लोक नेपाळमध्ये वास्तव्यास येत असल्यामुळे नेपाळची लोकसंख्या ही विविध वंशाची बनली. मोगल काळात राजस्थान व उत्तरप्रदेशातून मोठ्या प्रमाणात लोक आले. तसेच नेपाळच्या मध्यभागात भारतातून आलेल्या रजपूत व ब्राम्हणांचा समावेश तर तराई भागात भारतातून आलेले शेतकरी व मुसलमान तसेच व्यापारी यांचा समावेश होतो. तराईच्या भागातले

मूळचे रहिवासी हे आदिवासी म्हणून ओळखले जातात. त्यांना थरु म्हणतात. हा मधेश म्हणून ओळखला जातो, राजघराणे व रजपूतांच्याच कांही उपजाती या हिंदू असल्यामुळे नेपाळ हे हिंदू राज्य म्हणून जाहिर केले गेले. नेपाळी भाषा ही हिंदीसारखीच असून ती संस्कृतोद्भव आहे. रजपूतांतील प्रमुख जाती या ठाकुरी आहेत. खाटमांडू खोऱ्यातील नेवार समाज हा सुशिक्षित असून राज्यकारभारात ते सहभागी होतात. तसेच नेपाळ मध्ये बौद्ध समाज लक्षणीय असून अनेक बौद्धांनी हिंदूच्या चालीरिती स्वीकारल्या आहेत. गौतमबुद्धांचे जन्मस्थळ लुंबिनी हे नेपाळमध्ये असून सम्राट अशोकांचा एक स्तंभ तेथे आहे. तामांग शेरपा तिबेटी हे ही बौद्ध असल्याचे पहावयास मिळते.

चीन-नेपाळ यांच्यातील संघर्षामुळे ईस्ट इंडिया कंपनीने नेपाळ आपल्या नियंत्रणाखाली आणण्याचे प्रयत्न केले होते. पृथ्वीनारायण शहा यांच्या निधनानंतर शाह घराण्यातीलच एक शाखा चौतारिया या नावाने ओळखली जात होती. ती १७७५ पर्यंत प्रबळ होती. १८३७ पर्यत पांडे व थापा या कुटुंबाचा प्रभाव वाढत गेला.

पृथ्वीराज शहा हे राजघराणे २४० वर्षे सत्तेवर असले तरी प्रत्यक्षात राणा कुटुंबीयांनी १०० वर्षे सत्तेचा उपभोग घेतला त्यानंतर राजा राजेंद्र यांच्या हाती सत्ता आली पण तो लोकप्रिय ठरू शकला नाही. त्याच्याकडून पंतप्रधान जंगबहादूर यांच्याकडे सत्तेची सुत्रे आली. १८५६ मध्ये राजाच्या सहीने एक सनद जारी होऊन जंगबहादूर यांच्याकडे वंशपरंपरागत पंतप्रधानपद देण्यात आले. जंगबहादूर याने ब्रिटिशांशी सलोख्याचे संबंध ठेवून लष्करात कांही सुधारणा घडवून आणल्या. त्याने इंग्लंड, फ्रान्स या देशाना भेटी दिल्या. इंग्लंडच्या औद्योगिक क्रांतीचा आणि तंत्रज्ञानाचा प्रभाव त्याच्या मनावर झाला. भारताच्या बाबतीत त्याने सलोख्याचे धोरण ठरविले. पण अंतर्गत बंडाळीमुळे त्याच्यानंतर रणदीपसिंग हा पंतप्रधान झाला. त्याने लष्करामध्ये प्रगती करण्याचा प्रयत्न केला. रणदीप सिंग यांचा पुतण्या वीरसिंग याने रणदीपसिंगचा खून करून पंतप्रधानपद मिळविले. या काळात कांही नेपाळी भारतात आश्रयास आले. वीरसिंग यांचा मृत्यू १९०१ साली झाला व चंद्रसभशेर सत्तेवर आला. तेव्हा भारतात लॉर्ड कर्झन हे व्हॉईसरॉय होते. चंद्रसभशेर हा ब्रिटिश सत्तेकडून शस्त्रास्त्रे मिळविण्याचा प्रयत्न करित होता. भारतात त्यावेळी ब्रिटिश सरकारविरोधी आंदोलने होत होती. भारत सरकारने याची कल्पना नेपाळला दिलेली होती त्यामुळे अनेक भारतीय वृत्तपत्राना नेपाळ सरकारने मज्जाव केला होता. याचवेळी ब्रिटिश सत्ता कांही प्रमाणात नेपाळला शस्त्रपुरवठा करीत होती.

दरम्यान पहिले महायुद्ध सुरू झाले होते. युद्धाच्या चार वर्षाच्या काळात दोन लाख नेपाळी, सैन्यात भरती होऊन युरोप व मध्य पूर्वेच्या अनेक युद्धक्षेत्रात लढले. त्यांच्या शौर्याची प्रशंसा होऊ लागली. मात्र युद्धसमाप्तीनंतर नेपाळने स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा मान्य करण्याचा आग्रह धरला. परंतु प्रत्यक्षात ही मागणी मान्य होण्यास १९२३ साल उजाडावे लागले.

### ३.२.२ स्वातंत्र्याच्या दिशेने

नेपाळमध्ये पहिल्या महायुद्धानंतर स्वतंत्र राष्ट्राच्या मागणीने जोर धरला होता. भारतातील सामाजिक व राजकीय आंदोलनाचा प्रभाव नेपाळवर पडत होता. १८९६ साली काठमांडूत

आर्यसमाजाची स्थापना झाली. नेपाळमधील अनेक हिंदूंचा आर्य समाजास पाठिंबा होता. म. गांधींच्या विचारांनी प्रेरित झालेल्या आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांनी चरख्याचा प्रसार सुरू केला. मात्र सरकारने ही सनदशीर चळवळ दडपून टाकली. त्यानंतर बंगाली क्रांतिकारकांचा प्रवेश सुरू झाला. सशस्त्र क्रांती करून राणाशाही नष्ट करण्याचे प्रयत्न सुरू झाले. मात्र ते यशस्वी होऊ शकले नाहीत. याहीपूर्वी महाराष्ट्रातील कांही मंडळी नेपाळमध्ये बंदुका तयार करण्यासाठी गेले होते. यात कोल्हापूरच्या शिवाजी क्लबचे म्हणजेच सावरकराच्या क्रांतिकारक अभिनव भारतचे दामू जोशी होते. परंतु त्यांनी राणाशाहीविरोधी विचार किंवा प्रसार केला नव्हता. १९३० नंतर नेपाळमध्ये कांही संघटना स्थापन होऊ लागल्या. १९३१ ला 'प्रचंड गुरखा' ही संघटना स्थापन झाली व ती राणा कुटुंबिय नष्ट करण्यासाठी प्रयत्न करू लागली. मात्र याचा सुगावा लागल्याने राणाने त्याच्याविरोधात कारवाई करून संघटनेच्या सदस्यांना कारागृहात पाठविले. त्यानंतर 'नागरिक अधिकार परिषद' समिती स्थापन झाली. तिने राजकीय व सामाजिक सुधारणावर लक्ष केंद्रित केले पण सरकारने ती ही संघटना दडपण्याचा प्रयत्न केला. यातच भारतात स्थायिक झालेल्या नेपाळीनी स्वदेशात 'प्रजा परिषद' स्थापन करून 'जनता' नावाचे साप्ताहिक चालविले. पण राणा सरकारने त्यांच्यावरही कारवाई करून कांहीना अटक करून चार जणांना फासावर चढविले.

१९३५ मध्ये 'प्रजा परिषद' स्थापन झाली. सामूहिक आंदोलनाद्वारे राणाशाही नष्ट करणे हा प्रजा परिषदेचा उद्देश होता. राजेत्रिभुवन व प्रजापरिषद यांचे उद्दिष्ट एकच होते. त्याच वेळी भारतात बनारस येथे नेपाळी नागरिकांनी नियतकालिके सुरू केली. तसेच अनेक नेपाळीनी अखिल भारतीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला. म. गांधी व पं. जवाहरलाल नेहरू यांच्या विचारांच्या प्रभावाने काँग्रेसमध्ये समाजवाद्यांचा वेगळा गट स्थापन होऊन अनेक नेपाळी नागरिक व बिश्वेश्वर प्रसाद कोईराला हे काँग्रेसच्या आंदोलनात सहभागी झाले. बिश्वेश्वर प्रसाद कोईराला हे राजकीयदृष्ट्याही जागरुक होते व ते गांधी विचाराचे होते. १९४२ ते १९४५ या कालखंडात त्यांना नेपाळमध्ये कारावास भोगावा लागला होता. १९४६ ला कांही नेपाळी नागरिकांनी बनारस येथे 'अखिल भारतीय नेपाळी राष्ट्रीय काँग्रेसची' स्थापना केली होती. त्यात बी. पी. कोईराला हे ही सहभागी झाले होते. १९४७ ला अखिल भारतीय ही उपाधी सोडून बनारसचा नेपाळी संघ व कोलकत्यांची गुरखा काँग्रेस हे दोन्ही पक्ष संघटनेत सहभागी करून घेण्यात आले.

सनदशीर आणि शांततापूर्ण मार्गाने राणांची हुकूमशाही नष्ट करणे हे नेपाळी राष्ट्रीय काँग्रेसचे धोरण होते. तागाच्या गिरणीतील संप. संपामुळे भारतात जाणाऱ्या 'जोगबनी' येथील रेल्वे वाहतूक विस्कळीत होऊन संपाला वेगळे वळण लागले व त्यात लष्कराने हस्तक्षेप केला. यावेळी बी. पी. कोईराला व त्यांच्या सहकाऱ्यांना तुरुंगवास भोगावा लागला. पंतप्रधान युद्धसमशेर यांनी राजीनामा दिला व त्याठिकाणी पद्मसमशेर यांची निवड करण्यात आली. त्यांनी स्वतंत्र न्यायव्यवस्था, नगरपालिका व जिल्हा मंडळे यांच्यासाठी निवडणूका, शिक्षणाची वाढ, देशाच्या अर्थसंकल्पाची प्रसिद्धी, अधिक सुधारणा सुचविण्यासाठी एका समितीची स्थापना अशा सुधारणा जाहिर केल्या व त्यानंतरच १९४८ साली घटना जाहिर करण्यात आली.

### ३.२.३ घटना निर्मितीच्या दिशेने

नेपाळ हा स्वायत्त व सार्वभौम असलेला छोटा देश आहे. नेपाळचे अस्तित्व भारताशी संलग्न आहे. अर्थव्यवस्थाही भारतावर अवलंबून असल्याचे दिसते. नेपाळच्या राज्यघटनानिर्मितीत भारताने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. नेपाळला पर्यटनक्षेत्र मोठे आहे. बऱ्याच अंशी भारताचा छोटा भाऊ म्हणून नेपाळचे अस्तित्व आहे.

द्रव्य शहा या राजाने १५५९ ला नेपाळची स्थापना केली. त्यानंतर राजशहा सत्तेवर आला. त्याने राज्याचा विस्तार मोठ्या प्रमाणात केला. १७७३ ला पृथ्वीनारायण शहा सत्तेवर आला. त्यानेही राज्याचा विस्तार केला. आजचे विस्तारित नेपाळ हे त्यानेच स्थापन केले. १७७५ ला पृथ्वीनारायण शहा यांचा मृत्यू होऊन शहा घराण्याची सत्ता संपुष्टात आली. कारण त्याच्या मृत्यूनंतर नेपाळमध्ये मोठ्या प्रमाणात अराजकता निर्माण झाली. त्याच्या वारसाला डावलून तेथील पंतप्रधान जंगबहादूर राणाने स्वतःला राजा म्हणून घोषित केले. व राणा घराणे सत्तेवर आले जंगबहादूर राणा यांच्यानंतर पद्मसमशेर राणा सत्तेवर आले त्यावेळी भारताला स्वातंत्र्य मिळाले होते. वसाहतवादाच्या विरोधातील भारतातील चळवळीचा परिणाम नेपाळमध्ये झाल्याशिवाय राहणार नाही हे ओळखून पद्मसमशेर राणा यांनी १ एप्रिल १९४८ ला पहिली राज्यघटना तयार केली. त्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

- **पहिली राज्यघटना- १ एप्रिल १९४८**
- भारतातील तीन तज्ञांना निमंत्रीत करून त्यांच्या सल्ल्याने व घटना परिषदेने मिळून राज्यघटना निर्माण केली.
- द्विगृही कायदेमंडळ पद्धत स्वीकारण्यात आली. त्यामध्ये राजकीय पक्षांना मुभा असणार नाही अशी तरतूद करण्यात येऊन कायदेमंडळाला पंचायत असे नाव दिले.
- पंतप्रधान म्हणून राणा पद्मसमशेर यांचे नाव निश्चित करण्यात आले.
- राज्यघटनेच्या प्रस्तावनेत 'नेपाळ' हे पशुपतीनाथ यांचे पवित्र राज्य असेल असे घोषित केले.
- नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य, कायद्यापुढे समानता व कांही प्रमाणात मूलभूत हक्क बहाल करण्यात आले.

अशा रितीने नेपाळची पहिली राज्यघटना तयार केली गेली परंतु ती अंमलात आली नाही व आहे तीच व्यवस्था राहिली. जनतेच्या मनात प्रचंड संभ्रमावस्था निर्माण झाली. जनमत पद्मसमशेर राणा यांच्या विरोधात गेले. याचवेळी चीनमध्ये कम्युनिष्ट राजवट आली होती. तिबेटवर कब्जा केला होता या स्थितीत भारत सरकारला नेपाळच्या घडामोडीबाबत स्वस्थ रहाता येणे शक्य नव्हते. नेहरू व इतर काँग्रेस नेत्यांना नेपाळमधील राणाशाहीबद्दल उठाव दाबण्याचे प्रयत्न चालू केले होते परंतु परिस्थिती हाताबाहेर जात होती. तेव्हा दिल्लीत राणा राजवटीचे प्रतिनिधी भारत सरकारशी तडजोडीची बोलणी करू लागले. यात स्वतः मोहनसमशेरही होते. त्यांनी ८ जानेवारी रोजी राणाशाही

नष्ट केल्याची घोषणा केली. राजे त्रिभुवन हे सत्तेवर आले. त्यांनी सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता केली. १८ फेब्रुवारी १९५१ रोजी त्रिभुवन राजांनी नेपाळ लोकशाही राज्य म्हणून घोषित केले आणि ११ एप्रिल, १९५१ रोजी पुन्हा नेपाळची दुसरी राज्यघटना तयार केली. याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

- **दुसरी राज्यघटना - १८ फेब्रुवारी १९५१**
- या राज्यघटनेने शहा घराण्याच्या राजाला राज्याचे प्रमुख केले व कार्यकारी अधिकार त्याच्याकडे सोपविले. तसेच राजाला सल्ला देण्यासाठी सल्लागार मंडळ, न्यायमंडळ तयार करण्यात आले.
- नागरिकांना मूलभूत अधिकाराबरोबर मार्गदर्शक तत्वेही देण्यात आली.
- नेपाळ हे लोकशाही राज्य घोषित करून राजकीय पक्षांना निवडणुकीत येण्यास मुभा दिली.

यानंतर १९५५ साली त्रिभुवन राजाचा मृत्यू झाला. त्याच्या जागी त्याचा मुलगा महेंद्र हा सत्तेवर आला व त्याने पुन्हा एकदा राजेशाही दृढ करण्याचा प्रयत्न केला. त्याने घटनापरिषदेच्या निवडणूका घेण्यास नकार देऊन व स्वतः राज्यघटना तयार करण्याचा निर्णय घेतला. त्याने ब्रिटिश विचारवंत तज्ञ सर आयव्हर जेनिंग्ज यांना पाचारण केले व राज्यघटना तयार केली. नेपाळमध्ये १९५१ ते १९५९ पर्यंत राजकीय अस्थिरता राहिली व अनेकदा मंत्रीमंडळ बनविले जात होते. त्याचबरोबर सतत सत्याग्रहाचे वातावरण चालू होते. १९५९ साली राजे महेंद्र यांनी १८ फेब्रुवारी रोजी निवडणूका होतील असे जाहीर करूनही मधल्या काळात एका नव्या घटनेची घोषणा केली व घटनात्मक राजेशाही प्रस्थापित केली. १२ फेब्रुवारी, १९५९ या दिवशी या राज्य घटनेचा अंमल सुरू झाला. अशा रितीने नेपाळमध्ये तिसरी राज्यघटना अस्तित्वात आली. त्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

- **तिसरी राज्यघटना - १२ फेब्रुवारी १९५९**
- घटनात्मक राजेशाही आणि संसदीय व्यवस्था निर्माण केली.
- अंतिम सत्ता राजाकडे देण्यात आली.
- द्विगृही कायदेमंडळ तयार करण्यात आले.
- मूलभूत अधिकार देण्यात आले परंतु धार्मिक अधिकार नाकारण्यात आला.
- या राज्यघटनेने संसदीय व्यवस्था स्वीकारली.

१९५९ ला संसदेच्या निवडणूका घेण्यात आल्या. या निवडणुकीत नेपाळी काँग्रेसला बहुमत मिळाले व बिश्वेश्वर प्रसाद कोईराला हे पंतप्रधान झाले. १९६० ला राजा महेंद्रने सत्तेपोटी कोईराला यांचे पद बरखास्त करून मंत्र्यांना तुरुंगात डांबले तर काहींना भारतात पाठविले. सरकार बरखास्तीनंतर त्याने आणीबाणीची घोषणा केली व राजकीय पक्षावर बंदी आणली आणि घोषित केले की, नेपाळी

लोक संसदीय व्यवस्था राबविण्यात परिपक्व नाहीत म्हणून सर्व पक्षावर बंदी घातली व एक नव्या प्रकारची व्यवस्था रुजविण्याचा प्रयत्न केला. त्याला पंचायती व्यवस्था असे नाव देण्यात आले. १९६० ते १९६२ दोन वर्षे त्याने आपल्या हाती सत्ता ठेवली. याची प्रतिक्रिया म्हणून १९६१ च्या अखेरीस भारत व नेपाळच्या सीमाभागात नेपाळी काँग्रेस व इतरांनी सशस्त्र उठाव करण्यात झाली.

तथापि १९६२ साली चीन व भारत यांच्यात सीमावादावरुन युद्ध सुरू झाले आणि परिस्थिती बदलली. राजे महेंद्र यांनी आणिबाणीचे उपाय अधिक व्यापक व कडक केले. राजे महेंद्रनी पंचायत राज्याची घोषणा करून राजकीय पक्षांना आपोआपच बाहेर काढले. राष्ट्रीय पंचायतीत मात्र नेपाळी काँग्रेसने अनधिकृतरित्या $^{१}/_{३}$ प्रतिनिधी निवडून आणण्यात यश मिळविले होते. १९६८ पासून हप्त्याहप्त्याने राजबंदी सोडण्यास सुरुवात केली तोपर्यंत नेपाळी काँग्रेसमध्ये तीन गट पडले होते परंतु या ठिकाणी चौथ्या राज्यघटनेची वैशिष्ट्ये पहाणे क्रमप्राप्त ठरते.

- **चौथी राज्यघटना– १६ डिसेंबर १९६२**
- या राज्यघटनेने राजकीय पक्षाची भूमिका नाकारली.
- राजाचा शासनाच्या सर्व शाखामध्ये सहभाग असेल ज्या योगे राजा आणि प्रजा यांच्यामध्ये एक नवे नाते तयार होईल.
- नेपाळच्या केंद्रस्थानी राष्ट्रीय पंचायती या नावाच कायदेमंडळ असेल परंतु त्यांना केवळ सल्ला देण्याचा अधिकार असेल.
- राष्ट्रीय पंचायतीचे काही सदस्य राजाकडून तर काही सदस्य जनतेकडून अप्रत्यक्षपणे निवडले जातील.
- पंचायत व्यवस्थेचे चार स्तर तयार करण्यात येऊन त्यातील प्रतिनिधीची निवड प्रौढमताधिकाराने करण्यात येईल.

अशा तरतुदींचा स्वीकार करण्यात आला.

या घटनेप्रमाणे कारभार सुरू झाला. राजे महेंद्र यांनी काही जमीन सुधारणा केल्या होत्या. तीन पंचवार्षिक योजना पासून चौथी योजना तयार करण्यात आली होती. तसेच ल्हासा व काठमांडू यांना जोडणारा रस्ताही तयार करण्यात आला होता. १९७३ ला राजा महेंद्र यांचा मृत्यू झाला व वीर विक्रम गादीवर आले. या संक्रमण काळांत नेपाळमध्ये अशांतता व हिंसाचार यात वाढ झाली. सर्वत्र अराजकता निर्माण झाली मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू झाला. अर्थव्यवस्था ठप्प झाली आणि डाव्या विचारांचे गट क्रियाशील झाले. या पार्श्वभूमीवर राजे विक्रम यांनी या राज्यघटने बदल घडवून आणण्यासाठी घटनादुरूस्ती आयोग नेमला. पण भारतात आणीबाणी जाहीर झाल्यावर या आयोगाने काही जुजबी सुधारणा केल्या. चिनी युद्धानंतर नेपाळमध्ये राज्यसत्ता असतानाही भारत नेपाळ संबंध

सुधारण्यासाठी लालबहादूर शास्त्री, भगवान सहाय्य व डॉ. करणसिंग या तिघांच्या शिष्टमंडळाने काठमांडूला अनौपचारिक भेट देऊन चर्चा केली.

**१९७५ ते १९९० कालखंड**

१९७५ राजे वीरविक्रम यांनी घटनादुरुस्तीसाठी एक आयोग नेमला होता. लालबहादूर शास्त्री, भगवान सहाय्य, व डॉ. करणसिंग यांनी काठमांडूला भेट देऊन चर्चा केली होती. महेंद्र यांनी भारताच्या सुरक्षिततेच्या प्रश्नांची जाणीव ठेवून काही बदल केले तर भारताने आपल्या प्रवक्त्यानी आशिया संबंधात जपून वक्तव्ये करून भारताच्या प्रभावक्षेत्राची भाषा करण्याचे थांबविले.

भारतात पंतप्रधान इंदिरा गांधीच्या काळात नेपाळने दोन देशातल्या व्यापारविषयक करारात अनेक सुधारणा करण्याची मागणी केली. तागाचा चोरटा व्यापार होत असल्याने इंदिरा गांधी सरकारने दोन मार्ग वगळून नेपाळकडील सर्व मार्ग वाहतूकीसाठी बंद केले. भारतात राजीव गांधी ज्यावेळी सत्तेवर आले तेव्हा भारत-नेपाळ यांच्यातील व्यापारविषयक कराराची मुदत संपत आली होती. दोन्ही देशांच्या सरकारांनी वाटाघाटीत दिरंगाई केल्याचे आरोप एकमेकांवर केले. शेवटी २३ मार्च, १९८९ रोजी भारताने करार संपुष्टात आल्याचे जाहीर केले व नेपाळकडील वाहतूक बंद केली. त्यानंतर भारताचे पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांनी नेपाळमधून वाहणाऱ्या नद्यांच्या पाणी वाटपाबद्दल नेपाळची मागणी मान्य केली. १९६० ते १९९० या काळात नेपाळमध्ये पंचायत पद्धती स्थिर झाली. राजे वीरेंद्र यांनी घटनेत दुरुस्ती करून लोकमताने पंतप्रधानाची निवड करण्याची तरतूद केली. या मतदानावर प्रमुख पक्षांनी बहिष्कार घातला पण सूर्यबहादूर थापा हे पंतप्रधानपदी निवडून आले. तीन वर्षे त्यांचे सरकार टिकले. यानंतर वारंवार मंत्रीमंडळे बदलत राहिली. याच काळात राजकीय पक्षांवरील बंधने सैल होत गेली व १९९० साली त्यांच्यावर कायदेशीरपणाचा शिक्का बसला व १९९० ची नवी राज्यघटना अस्तित्वात आली. या राज्यघटनेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

- **पाचवी राज्यघटना - १९९०**
  - या राज्यघटनेने एकात्म व्यवस्था निर्माण करून व राजेशाही स्वीकारून राजा हा संसदेचा सदस्य असेल हे तत्व स्वीकारले.
  - द्विगृही कायदेमंडळ निर्माण करण्यात आले.
  - स्वतंत्र न्यायमंडळ निर्माण करण्यात येऊन न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार देण्यात आला.
  - मूलभूत अधिकारांचा समावेश करण्यात आला.
  - भारतीय राज्यघटनेप्रमाणे राखीव जागांची तरतूद करण्यात आली.
  - या राज्यघटनेने नेपाळला बहुभाषिक, धार्मिक व वांशिक राष्ट्र म्हणून घोषित केले.
  - नेपाळी ही सरकारी भाषा म्हणून घोषित केली.

अशा प्रकारच्या तरतूदी स्वीकारण्यात आल्या. नेपाळमध्ये अमेरिका, इंग्लंड व भारत या देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून मसुदा तयार करण्यात आला होता. १० सष्टेंबर, १९९० ला हा मसुदा स्वीकारण्यात आला होता. ही नवी राज्यघटना १९९० सालच्या नोव्हेंबर मध्ये अंमलात आली व १९९१ च्या निवडणूकीत नेपाळी कॉंग्रेसला बहुमत मिळून गिरीजाप्रसाद कोईराला हे पंतप्रधान झाले. मात्र राजघराण्यांमध्ये संघर्ष सुरूच होता. २००१ मध्ये राजे ग्यानेंद्र यांनी पंतप्रधान देऊबा यांचे सरकार बरखास्त करून नेपाळमध्ये आणीबाणी घोषीत केली. परंतु कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (माओवादी) ने ग्यानेंद्र यांच्या विरोधात मोठी आघाडी उघडली. २००८ च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये ग्यानेंद्र यांना राजपदावरून हटविले व २३ जुलै, २००८ रोजी रामबरन यादव हे पहिले राष्ट्रपती बनले तर प्रचंड (पुष्पकुमार दहल) हे माओवादी नेते पंतप्रधान झाले. २००६ नंतर नेपाळमध्ये दुसऱ्या बाजूने प्रचंड मोठ्या प्रमाणात अराजकता माजली होती. हिंदू मूलतत्ववादाचा प्रश्न गंभीर झालेला होता. माओवाद्यानी समाजात अस्थिरता निर्माण केली होती. वांशिक दंगली मोठ्या प्रमाणात होत होत्या. अनेक वांशिक गट सक्रिय झाले होते. मागील दहा वर्षात घटनानिर्मितीच्या निमित्ताने मोठे अस्थैर्य निर्माण झाले होते. त्यानंतर नोव्हेंबर २०१३ च्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही. मात्र फेब्रुवारी २०१४ मध्ये यावर तोडगा काढण्यात यश आले व कम्युनिष्ठ पक्षाच्या पाठिंब्याने नेपाळ कॉंग्रेसचे अध्यक्ष सुशील कोईराला हे पंतप्रधान झाले. २० सष्टेंबर २०१५ रोजी नेपाळने लोकशाही व धर्मनिरपेक्ष राज्यघटना स्वीकारून राजेशाही पूर्णपणे संपुष्टात आणली आहे. के. पी. शर्मा ओली हे नेपाळचे पंतप्रधान झाले. सध्या रामबरन यादव हे अध्यक्ष आहेत तर सध्या पुष्प कमल दहल ऊर्फ प्रचंड हे नेपाळचे पंतप्रधान आहेत. एकूणच नेपाळमध्ये राजेशाहीमुळे लोकशाही स्थापनेमध्ये अनेक अडथळे आल्याचे दिसून येते.

- **सहावी राज्यघटना– २० सप्टेंबर, २०१५**

नेपाळची ही सहावी राज्यघटना तयार करताना नेपाळने भारताची मोठ्या प्रमाणात मदत घेतली आहे. दि. २० सप्टेंबर, २०१५ रोजी नेपाळमध्ये पूर्णपणे धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी राज्यघटनेचा स्वीकार करण्यात आला. यामुळे नेपाळमधील राजेशाही पूर्णपणे संपुष्टात येऊन नेपाळ हा प्रजासत्ताक लोकशाही देश बनला आहे. नेपाळचे अध्यक्ष रामबरन यादव यांनी राज्यघटनेचे अनावरण करून ती लागू झाल्याची घोषणा केली. या राज्यघटनेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे–

- द्विगृही कायदेमंडळ पद्धती स्वीकारण्यात आली.
- ७ प्रांताचा समावेश व ७ परिशिष्टे घालण्यात आली.
- धर्मनिरपेक्षता या तत्वाचा स्वीकार करण्यात आला.
- अधिकृत हिंदू राष्ट्राचा दर्जा संपुष्टात आणला.

नेपाळमधील संसदेच्या ८५% सदस्यांनी या राज्यघटनेला मान्यता दिली आहे. बहुतांशी नेपाळी जनतेने या राज्य घटनेचे स्वागत केले आहे. या राज्यघटनेने लिंगभेद संपुष्टात आणून सर्वांना मुख्य प्रवाहात आणले आहे.

एका बाजूला पूर्व व मध्य भागात राज्यघटनेला पाठिंबा मिळत असतानाच दुसऱ्या बाजूला मधेशी आणि थारू समाजाच्या गटाने या राज्यघटनेला विरोध केला आहे. त्यांना घटनेद्वारे नेपाळची सात प्रांतामध्ये केलेली विभागणी मान्य नाही. त्यांच्यामते यामुळे दोन्ही समाजाची शक्ती विभागली गेली असून त्यांना योग्य प्रतिनिधीत्व मिळणार नाही.

मधेशी समुदाय हे नेपाळच्या पर्वतीय भागात राहणारा भारताच्या बिहार व उत्तरप्रदेश नजीकच्या तराई प्रदेशात राहणारा आहे. या पन्नास किलोमीटरच्या पट्ट्यात नेपाळचे बहुतांशी लोक राहतात. हा मधेशी भाग सर्वात मागास गरीब व उपेक्षीत आहे. मधेशी समाजात मूळ भारतीय वंशाच्या मैथिली, भोजपूरी व अवधी भाषा बोलणाऱ्यांचा तसेच दलितांचा समावेश होतो. नेपाळमधील सत्ता ब्राम्हण क्षत्रिय नेवाडी लोकांच्या हातात राहिली होती. मात्र २००७ च्या अंतरिम राज्यघटनेमुळे मधेशी समाजाच्या लोकांना संसदेमध्ये तसेच उच्च पदावर चांगले प्रतिनिधीत्व मिळाले होते. सत्तारुढ लोकांना मधेशींच्या प्रतिनिधीत्वाची भीती वाटत होती. मात्र २० सप्टेंबर, २०१५ च्या राज्यघटनेने या मधेशी भागाची विभागणी केली असल्यामुळे त्यांना पुर्वीसारखे प्रतिनिधीत्व मिळणार नाही अशी अवस्था झाली आहे. नवीन राज्यघटनेने आपल्या आकांक्षा दाबून टाकल्या आहेत अशी भावना मधेशी समाजाची झाली आहे. त्यामुळेच त्यांनी नवीन राज्यघटनेला प्रखर विरोध दर्शविला व मोठ्या प्रमाणावर आंदोलने केली. नेपाळ सरकारने मधेशींचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला. गोळीबारामध्ये अनेक मधेशी नागरिक मृत्यूमुखी पडले. नेपाळ सरकारने मानवाधिकारांचे उल्लंघन केले. याला प्रत्युत्तर म्हणून मधेशीनी भारत नेपाळ सीमा बंद केली. नेपाळी जनतेचे प्रचंड हाल झाले या स्थितीला भारत सरकारच कारणीभूत आहे. अशी भावना नेपाळी जनतेची व सरकारची होती. १७ वर्षानंतरच्या प्रदीर्घ कालावधीनंतर नेपाळला भेट देणारे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी नेपाळ सरकारला मधेशींच्या मागण्या विचारात घेण्यात याव्यात अशी मागणी केली. तसेच नेपाळचे पंतप्रधान के. पी. शर्मा. ओली यांनीही अशीच भूमिका घेतल्याने नेपाळच्या राज्यघटनेत २५ जानेवारी, २०१६ ला काही बदल करण्यात आले ते पुढीलप्रमाणे-

- आर्थिक व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी कलम ४२ मध्ये दुरुस्ती करण्यात आली.
- संसदेची रचना विस्तारित करण्यासंबंधी कलम ८४ मध्ये बदल करण्यात आला.
- कलम ८६ मध्ये बदल करून मतदारसंघ पुनर्रचनेसाठी काही नवीन तरतूदी करण्यात आल्या.

अशा प्रकारचे बदल करण्यात आले असले तरी मधेशी समाजाला ते मान्य नाही. त्यांच्या मते काही घटनादुरुस्त्या आमच्याशी चर्चा न करताच केल्या आहेत. त्यामुळे राज्यघटना पूर्णतः

स्वीकारण्यास ते तयार असल्याचे दिसून येत नाही. अशा प्रकारे राजेशाहीकडून लोकशाहीकडे घटनात्मक मार्गाने नेपाळची वाटचाल झालेली दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणात नेपाळचा ऐतिहासिक वारसा, वासाहतिक कालखंड स्वातंत्र्यप्राप्तीच्या दिशेने टाकलेले पाऊल व घटनानिर्मितीच्या दिशेने नेपाळने केलेली प्रगती याचा आढावा घेण्यात आला आहे.

**वस्तुनिष्ठ प्रश्न**

१) ...... यांनी अनेक छोट्या स्वतंत्र राज्यांना एकत्र आणून एकसंध नेपाळची निर्मिती केली.

अ) कोईराला ब) पृथ्वीनारायण क) राजे महेंद्र ड) विश्वनारायण

२) ...... ब्रिटिश नेपाळ तहानुसार नेपाळचे स्वातंत्र्य ब्रिटिशांनी मान्य केले.

अ) १९०१ ब) १९१० क) १९२३ ड) १९३०

३) नेपाळची पहिली राज्यघटना केव्हा अस्तित्वात आली?

अ) २० ऑगस्ट, २०१५ ब) २० सप्टेंबर, २०१५

क) २० ऑक्टोंबर, २०१५ ड) २० डिसेंबर, २०१५

**उत्तरे**– १) ब २) क ३) अ ४) ब

**स्वाध्याय**

१) नेपाळच्या ऐतिहासिक वारसा व राज्यघटनेच्या निर्मितीची वाटचाल स्पष्ट करा.

२) नेपाळमधील ऐतिहासिक वारसा व वासाहतिक कालखंड स्पष्ट करा.

**टीपा**

१) नेपाळमधील राज्यघटना निर्मिती

२) नेपाळमधील वासाहतिक कालखंड

**संदर्भ**

१) विश्वकोश

२) देवळाणकर शैलेंद्र : भारतीय परराष्ट्र धोरण, प्रतिमा प्रकाशन पुणे, २०१०

३) तळवळकर गोविंद : नेपाळ जटिल समाजव्यवस्था, राजेशाही आणि वर्गविग्रहाचे राजकारण, साधना– ६१ वा वर्षारंभ विशेषांक, भारताचे शेजारी, १२ ऑगस्ट २००८.

४) Constitution of Nepal- wikipedia, https://en.m.wikipedia.org

❑❑❑

## सत्र ४ : घटक ३

# ३.२ नेपाळ : शासकीय संस्थांचे कामकाज

अ) नेपाळचे कायदेमंडळ

ब) नेपाळचे कार्यकारी मंडळ

क) नेपाळचे न्यायमंडळ

## उद्दिष्ट्ये

या प्रकरणात आपण नेपाळचे कायदेमंडळ या घटकाची माहिती घेणार आहोत. या घटकाच्या अभ्यासाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) नेपाळचे कायदेमंडळ समजून घेणे. नेपाळच्या कायदेमंडळास संसद म्हणतात.

२) कायदेमंडळामधील प्रतिनिधी गृह या सभागृहाची रचना, अधिकार व कार्ये समजून घेणे.

३) संसदेच्या राष्ट्रीय सभा या सभागृहाची रचना, अधिकार व कार्ये समजावून घेणे.

## अ) नेपाळचे कायदेमंडळः संसद

### प्रस्तावनाः

नेपाळचा राजा ग्यानेंद्र यांनी नेपाळमधील यादवी तसेच माओवादी बंडखोरांच्या कारवायामुळे निर्माण झालेल्या अस्थिर परिस्थितीमध्ये नेपाळची संसद बरखास्त केली. पुढे २००८ मध्ये राजाचे अधिकार कमी करण्यात आले व राज्यघटना निर्मितीसाठी घटना समिती निवडणूकीद्वारे तयार करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार २००८ मध्ये पहिली घटना समिती साठी निवडणूक झाली व ६०१ सदस्य असलेली घटना समिती अस्तित्वात आली. परंतु या घटना समितीला नेपाळसाठी नवीन राज्यघटना निर्माण करता आली नाही. पुढे २०१३ मध्ये दुसऱ्या संविधान समिती साठी निवडणूका झाल्या व ही संविधान समिती संसद म्हणून कार्यरत झाली.

### रचनाः संविधान समिती–हंगामी संसद–‘व्यवस्थापिका संसद’:

२०१३ च्या ‘संविधान समिती’ ला संसद म्हणून मानण्यात आले, या संसदेला ‘व्यवस्थापिका संसद’ असे संबोधण्यात आले आहे. ही संविधान समिती हंगामी संसद म्हणून काम करेल.

**एकगृही सभागृह**

या व्यवस्थापिका संसदेमध्ये एकगृही सभागृह असून याची सदस्य संख्या ६०१ आहे. २१ जानेवारी २०१४ पासून ही हंगामी संसद कार्यरत आहे. या ६०१ सदस्यापैकी १९६ सदस्य नेपाळी काँग्रेस पक्ष, ८० सदस्य कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ या पक्षाचे असून आघाडीच्या माध्यमातून हे दोन्ही पक्ष सत्तेवर आले.

**राज्यघटना निर्मितीः**

व्यवस्थापिका संसदेने सातत्याने चर्चा करून २० सप्टेंबर, २०१५ रोजी नेपाळसाठी सहावी राज्यघटना तयार केली. या राज्यघटनेने राजेशाही पूर्णपणे संपुष्टात आणून धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य या तत्वावर नवीन राज्यव्यवस्था निर्माण केली आहे. या नवीन राज्यघटनेनुसार 'संघीय संसद' (Federal Parliament) निर्माण करण्यात आली आहे.

**संघीय संसद** (Federal Parliament)

नेपाळच्या ६ व्या राज्यघटनेने(२०१५) भाग ८ मध्ये कलम ८३ ते १०८ मध्ये संघीय कायदेमंडळाची तरतूद केली आहे. कलम ८३ नुसार या संघीय कायदेमंडळास 'संघीय संसद' असे म्हटले आहे.

**द्विगृही संघीय संसदः**

संघीय संसद ही द्विगृही आहे. यामध्ये एक 'प्रतिनिधी गृह' व दोन 'राष्ट्रीय सभा' या दोन सभागृहांचा समावेश आहे. या सभागृहांची रचना अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) प्रतिनिधी गृह** (House of Representatives)

प्रतिनिधी गृह हे जनतेचे सभागृह आहे. जनतेद्वारे प्रत्यक्षपणे निवडलेल्या सदस्यांचा यामध्ये समावेश होतो. रूढ अर्थाने हे प्रथम व कनिष्ठ सभागृह आहे. याला 'हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह' असे म्हणतात.

**रचनाः सदस्य संख्या २७५**

नेपाळच्या राज्यघटनेमध्ये (२०१५) कलम ८४ मध्ये प्रतिनिधी गृहाची रचना सांगितली आहे. या सभागृहाची एकूण सदस्य संख्या २७५ आहे. यापैकी

१) १६५ सदस्य गुप्त व प्रौढ मतदान पद्धतीने, जनतेकडून प्रत्यक्षरीत्या प्रादेशिक प्रतिनिधीत्वाच्या पद्धतीने निवडले जातात. यासाठी लोकसंख्या व भौगोलिक आकार यानुसार १६५ मतदारसंघ तयार केले असून त्या मतदारसंघातून हे सदस्य निवडून येतात.

२) ११० सदस्य प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या पद्धतीने निवडून येतात. यामध्ये संपूर्ण नेपाळ देश हा एकत्र मतदारसंघ मानला जातो. मतदार राजकीय पक्षाला मतदान करतात. यामध्ये राजकीय

पक्षाला मिळालेल्या मतांच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व दिले जाते. राजकीय पक्ष आपल्या उमेदवारांची यादी जाहीर करतो. यामध्ये दलित, स्त्रीया, मधेशी, मुस्लिम, थारू, मागास प्रदेशातील उमेदवार यांचा समावेश असलाच पाहिजे अशी तरतूद फेडरल कायद्यामध्ये केली आहे.

**उमेदवाराची पात्रता:**

१) ती व्यक्ती नेपाळची नागरिक असली पाहिजे.

२) वयाची २५ वर्षे पूर्ण असावीत.

३) कोणत्याही प्रकारची गुन्हेगारी खटल्यामध्ये तिला शिक्षा झालेली नसावी.

४) अशा व्यक्तीने कोणतेही शासकीय लाभाचे पद स्वीकारलेले असू नये.

५) ती व्यक्ती राष्ट्रीय कायद्यामुळे अपात्र नसावी.

६) एकाच वेळेस ती संसदेच्या दोन्ही सभागृहाचा सदस्य असू नये.

**मतदाराचे वय:**

१८ वर्षे पूर्ण झालेल्या नेपाळी नागरिकास मतदान करण्याचा अधिकार दिलेला आहे.

**कार्यकाल:**

प्रतिनिधी गृहाचा कार्यकाल पाच वर्षाचा आहे. अपवादात्मक परिस्थिती किंवा आणीबाणीच्या काळामध्ये प्रतिनिधी गृहाचा कालावधी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढविला जातो. (कलम ८५८३)

**महिला सभापती किंवा महिला उपसभापती:**

राज्यघटनेने महिलांना संसदेमध्ये जास्तीत प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून अनेक तरतूदी केल्या आहेत. यापैकी महत्वाची तरतूद म्हणजे प्रतिनिधी गृहामध्ये सभापती किंवा उपसभापती यापैकी एका पदावर महिला असलीच पाहिजे. तसेच सभापती व उपसभापती दोन वेगवेगळ्या पक्षाचे प्रतिनिधी असले पाहिजेत. राज्यघटनेच्या या तरतूदीनुसार १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी श्रीमती ओन्सारी घात्री मगर या महिला सभापती म्हणून निवडल्या गेल्या आहेत.

**सभापतीची कार्ये:**

प्रतिनिधी गृहाच्या सभापतीचे स्थान महत्वाचे मानले जाते. सभापतीला खालील कार्ये करावी लागतात.

१) सभागृहात शांतता व सुव्यवस्था राखून सभागृहाचे कामकाज जास्तीत जास्त काळ कसे चालविले जाईल याची दक्षता घेणे.

२) सभागृहाच्या पद्धती, परंपरा, प्रथा यांचे पालन करून सभागृहाची प्रतिष्ठा वाढविणे.

३) सभागृहाच्या कामकाजाचे संचलन करणे प्रत्येक सदस्याला चर्चेत सहभागी होण्यासाठी वेळ देण्याचा प्रयत्न करणे.

४) सभागृहात विधेयकावर समान मते पडली तर निर्णायक मत देणे.

५) सभागृहाच्या सदस्यांचे विशेषाधिकारांचे संरक्षण करणे.

६) राज्यघटनेच्या (२०१५) कलम ११० (४) नुसार एखादे विधेयक धनविधेयक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार सभापतीला आहे.

७) सभागृहामध्ये शिस्त राखणे. बेशिस्त सदस्यांना निलंबन करणे किंवा त्यांचे सदस्यत्व काही काळासाठी रद्द करण्याचे अधिकार सभापतींना आहेत.

एकूणच, सभापतींना सभागृहाच्या कामकाजाबाबतचे महत्वपूर्ण अधिकार आहेत. सभापतींच्या गैरहजेरीत किंवा सभापती पद रिक्त झाले तर त्यावेळी उपसभापतींना सभापतींचे अधिकार प्राप्त होतात व ते सभापतीप्रमाणे कार्यरत होतात. ही पद्धती भारताप्रमाणे असल्याचे दिसते.

**गणसंख्याः**

प्रतिनिधी गृहाच्या गणपूर्तीची संख्या ही सभागृहाच्या एकूण सभासद संख्येच्या $^{१}/_{४}$ इतकी करण्यात आली आहे.

**प्रतिनिधी गृहाचे अधिकार व कार्येः**

प्रतिनिधी गृह हे जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे महत्वाचे सभागृह आहे. या सभागृहाला खालीलप्रकारचे अधिकार व कार्ये आहेत.

**१) कायदेविषयक अधिकारः**

कायदे करणे. हे या सभागृहाचे पहिले व महत्वाचे कार्य आहे. जनतेच्या आशा, आकांक्षा, मागण्या इ. सर्व बाबींचा विचार करून हे सभागृह कायदे करीत असते. यामध्ये बदलत्या परिस्थितीनुसार नवीन कायदे करणे व नियमबाह्य कायदे रद्द करण्याचे कार्य हे सभागृह करते. सर्व प्रकारची विधेयके या सभागृहात मांडता येतात. या सभागृहामध्ये विधेयक मंजूर केल्यानंतर ते विधेयक 'राष्ट्रीय सभा' या दुसऱ्या सभागृहाकडे पाठविले जाते. सामान्य विधेयक 'राष्ट्रीय सभा' हे सभागृह जास्तीत जास्त २ महिने चर्चेसाठी ठेवून घेऊ शकते. जर 'राष्ट्रीय सभा' या सभागृहाने सदरचे विधेयक २ महिन्यात मंजूर करून प्रतिनिधी गृहाकडे परत पाठविले नाही तर प्रतिनिधी गृह ते विधेयक 'राष्ट्रीय सभा' या सभागृहाला मंजूर आहे असे समजण्यात येते. प्रतिनिधी गृह सदरचे विधेयक थेट राष्ट्रपतीच्या सही साठी पाठविते. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते.

जर एखाद्या विधेयकाबाबत दोन्ही सभागृहामध्ये मतभेद असतील तर त्यावेळेस दोन्ही सभागृहाचे संयुक्त अधिवेशन भरविले जाते. प्रतिनिधी गृहाची संख्या जास्त असल्यामुळे या सभागृहाच्या निर्णयानुसार विधेयक मंजूर किंवा नामंजूर होते.

**२) आर्थिक अधिकार:**

प्रतिनिधी गृहाला आर्थिक बाबतीत विशेष अधिकार आहेत. धनविधेयक हे फक्त प्रथमतः प्रतिनिधी गृहामध्येच सादर करावे लागते. प्रतिनिधी गृहाच्या मंजुरीनंतर अर्थविधेयक राष्ट्रीय सभेकडे पाठविले जाते. राष्ट्रीय सभेस अर्थविधेयकास १५ दिवसाच्या आत मंजुरी किंवा नामंजुरी देऊन ते परत प्रतिनिधी गृहाकडे पाठवावे लागते. १५ दिवसामध्ये जर राष्ट्रीय सभेने अर्थविधेयकाबाबत प्रतिनिधी गृहास काहीही कळविले नाही तर ते राष्ट्रीय सभेस मंजूर आहे असे समजले जाते. व पुढे ते राष्ट्रपतींच्या सहीसाठी पाठविले जाते. राष्ट्रपतींना ते विधेयक मंजूर करावे लागते. अंदाजपत्रक मंजूर करणे, नवीन कर लागू करणे, जुने कर रद्द करणे इ. अर्थविषयक अधिकार 'प्रतिनिधी गृहाला' आहेत.

**३) कार्यकारी अधिकार:**

नेपाळने संसदीय शासनपद्धती स्वीकारली आहे. त्यानुसार पंतप्रधान व मंत्रीमंडळ हे प्रतिनिधी गृहास जबाबदार असतात. जर प्रतिनिधी गृहाने मंत्रीमंडळाविरूद्ध अविश्वास ठराव मंजूर केला तर पंतप्रधान व मंत्रीमंडळास राजीनामा द्यावा लागतो. पंतप्रधान व मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयावर, धोरणावर प्रतिनिधी गृहामध्ये प्रश्न विचारले जातात त्यांची लेखी किंवा तोंडी उत्तरे संबंधित मंत्र्यांना द्यावी लागतात. राष्ट्रपतींनी काढलेल्या वटहुकूमास प्रतिनिधी गृहाची मान्यता घ्यावी लागते.

न्यायालयीन परिषद, लोकसेवा आयोग इ. घटनात्मक संस्थाचे अहवाल प्रतिनिधी गृहात मांडले जातात त्यावर चर्चा करून शिफारशी करण्याचा अधिकार प्रतिनिधी गृहास आहे.

**४) महाभियोगाचा खटला भरणे:**

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश तसेच सरन्यायाधीशांवर राज्यघटना (२०१५) कलम १०१ नुसार महाभियोगाचा खटला भरण्याचा आधिकार प्रतिनिधी गृहाला आहे. जर संसदेच्या दोन्ही सभागृहांनी महाभियोग मंजूर केला तर संबंधितांना बडतर्फ केले जाते.

**५) घटनादुरूस्तीचा अधिकार:**

राज्यघटनेमध्ये काही कलमामध्ये बदल करण्याचा, ती कलमे काढून टाकण्याचा घटनादुरूस्तीचा अधिकार प्रतिनिधी गृहाला व राष्ट्रीय सभेला राज्यघटना (२०१५) कलम २७५ नुसार देण्यात आला आहे.

**६) राष्ट्रपतीच्या निवडणूकी संबंधी अधिकारः**

राष्ट्रपतीची निवडणूक निर्वाचक मंडळामार्फत केली जाते. या निर्वाचक मंडळामध्ये प्रतिनिधी गृहाच्या सदस्यांचा समावेश केला आहे. तसेच राष्ट्रीय सभेच्या सदस्यांचा समावेश असतो.

**७) इतर अधिकारः**

राष्ट्रीय प्रश्नाबरोबरच परराष्ट्र व्यवहारावरसुद्धा प्रतिनिधी गृहात चर्चा होते. परराष्ट्र मंत्री तसेच पंतप्रधान परराष्ट्र धोरणाबाबत घेतलेल्या भूमिकेची चर्चा या सभागृहात करतात. विविध समित्यांची निर्मिती करून प्रशासनावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे अधिकार प्रतिनिधी गृहाला आहेत. राष्ट्रपतींनी पुकारलेल्या आणीबाणीस संसदेची मान्यता आवश्यक आहे.

**प्रतिनिधी गृहाचे स्थानः**

भारतामध्ये जसे लोकसभेला महत्वाचे स्थान आहे तसेच स्थान नेपाळमध्ये प्रतिनिधी गृहाला आहे. जनतेच्या प्रश्नावर, आकांक्षावर चर्चा करण्याचे प्रतिनिधी गृह हे प्रमुख व्यासपीठ आहे.

## ब) नेपाळ – कार्यकारी मंडळ

### प्रस्तावना

नेपाळ या संघराज्यीय देशात दुहेरी शासनव्यवस्था आहे. भारताने संसदीय लोकशाही शासनव्यवस्थेचा स्वीकार केला आहे. संसदीय लोकशाहीत सामूहिक जबाबदारीचे तत्त्व असल्याने मंत्रीमंडळ हे सामुदायिकरित्या लोकसभेला जबाबदार असते.

संसदीय शासनपद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे एक नामधारी शासनप्रमुख तर एक वास्तववादी प्रमुख. शासनसंस्थेचा कारभार हा घटनात्मक प्रमुखाच्या नावे चालतो तर प्रत्यक्षात त्याची सत्ता ही वास्तववादी शासनप्रमुख वापरीत असतो. त्यामुळे पंतप्रधान आणि त्याचे मंत्रीमंडळ हे वास्तववादी प्रमुख तर राष्ट्रपती किंवा राष्ट्राध्यक्ष हा नामधारी शासन प्रमुख असतो. पंतप्रधान हाच खरा वास्तववादी शासनप्रमुख म्हणून काम पहातो.

**राष्ट्रपती :** घटनात्मक शासनप्रमुख म्हणून देशाचा सर्व कारभार त्यांच्याच नावाने चालविला जातो. नेपाळमध्ये राष्ट्रप्रमुखाला राष्ट्राध्यक्ष म्हंटले जाते. राज्यघटनेच्या ६१ व्या कलमात याची तरतूद करण्यात आली आहे. राष्ट्राध्यक्षाची निवडणूक जनतेकडून प्रत्यक्षरित्या होत नाही. तर ती अप्रत्यक्षरित्या होते. म्हणजेच जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीमार्फत होते. संसदेतील निर्वाचित सभासद आणि घटक राज्यातील विधानसभांचे निर्वाचित सभासद यांच्याकडून अध्यक्षाची निवड केली जाते. यालाच निर्वाचक मंडळ असे म्हणतात. ही पद्धतही भारतासारखीच आहे.

**पात्रता :**

१) ती व्यक्ती नेपाळची नागरिक असली पाहिजे.

२) संघीय संसदेच्या सभागृहाचा सदस्य होण्यास ती पात्र असली पाहिजे.

३) संसद किंवा घटकराज्याच्या विधीमंडळाची ती व्यक्ती सभासद नसावी.

४) तिने वयाची ४५ वर्षे पूर्ण केलेली असावी.

५) संसदेने वेळोवेळी केलेल्या अटींचे पालन करणारी ती असावी.

**निवड :** निर्वाचक मंडळ

राष्ट्रपतींची निवड जनतेमार्फत प्रत्यक्ष होत नाही तर ती त्यांच्या प्रतिनिधीमार्फत होते. राष्ट्रपतींची निवड ही 'निर्वाचक मंडळामार्फत (Electoral College) मार्फत होते. या निर्वाचक मंडळामध्ये संघीय संसदेमधील दोन्ही सभागृहामधील सदस्य तसेच प्रांतामधील (घटक राज्ये) प्रांतीय विधानसभांच्या सदस्यांचा सभावेश होतो. या निर्वाचक मंडळामधून ज्याला बहुमत मिळते त्याची राष्ट्रपती म्हणून निवड होते.

**कार्यकाल :**

- ❊ राष्ट्रपतीचा कालावधी हा ५ वर्षे असतो.
- ❊ राष्ट्रपती आपल्या पदाचा राजीनामा हा उपराष्ट्रपतीकडे देऊ शकतात.
- ❊ राष्ट्रपतीना संघीय संसद महाभियोगाद्वारे पदावरून बडतर्फ करू शकते.

**राष्ट्रपतीचे अधिकार व कार्ये :**

राष्ट्रपती हे नेपाळ संघराज्याचे प्रमुख आहेत. संपूर्ण देशाचा कारभार हा राष्ट्रपतींच्या नावे चालतो. मात्र प्रत्यक्षात राष्ट्रपती हे नामधारी शासनप्रमुख आहेत. कांही विशिष्ट प्रसंगी राष्ट्रपतीना स्वविवेक अधिकार वापरावा लागत असला तरी सर्वसाधारण राष्ट्रपती हे पंतप्रधान आणि मंत्रीमंडळ यांच्या सल्ल्यानुसारच कार्य करीत असतात.

**१) कार्यकारी अधिकार :**

सार्वत्रिक निवडणुकीत बहुमत प्राप्त झालेल्या राजकीय पक्षाच्या नेत्याची पंतप्रधान म्हणून नेमणूक करणे व पंतप्रधानाच्याच सल्ल्याने मंत्रीमंडळातील इतर मंत्र्याची नेमणूक करणे. ज्यावेळी कोणत्याच पक्षाला बहुमत नसते त्यावेळी सर्वाधिक मते प्राप्त झालेल्या राजकीय पक्षाला मंत्रीमंडळ बनविण्यास पाचारण केले जाते.

- ❊ केंद्र सरकारचे सर्व आदेश राष्ट्रपतींच्या नावाने काढले जातात व कायद्याची अंमलबजावणी राष्ट्रपतींच्या नावे केली जाते.

* मंत्रीमंडळाने घेतलेले निर्णय पंतप्रधानामार्फत राष्ट्रपतीना कळविले जातात.
* परराष्ट्राशी मैत्री, तह, करार करणे. राजनयिक अधिकाऱ्यांच्या नेमणूका करणे, विविध राष्ट्रांना भेटी देणे.
* राष्ट्रपती पंतप्रधानाकडून केंद्र शासनाच्या कामकाजाच्या प्रशासनाबाबत कोणतीही माहिती विधीनियमांबाबतच्या तरतूदींबाबत कोणत्याही माहितीची मागणी करू शकतात.

**२) कायदेविषयक अधिकार :**

राष्ट्रपती हे केवळ कार्यकारी मंडळाचे प्रमुख नसून ते संसदेचे अविभाज्य घटक आहेत. त्यानुसार त्यांना विविध कायदेविषयक अधिकार प्राप्त होतात.

* संसदेचे अधिवेशन बोलाविणे, तहकूब करणे व समाप्त करणे.
* संसदेच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक बोलाविणे. मात्र अशा बैठकीचे अध्यक्षस्थान कनिष्ठ गृहाचे सभापती भूषवितात.
* सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या पहिल्या अधिवेशनाच्या सुरुवातीला राष्ट्रपती संसदेसमोर अभिभाषण करतात. या भाषणात अधिवेशनात चर्चिल्या जाणाऱ्या विषयांची आणि प्रस्तावांची माहिती देण्यात येते.
* संसदेचे अधिवेशन बोलाविणे, तहकूब करणे, समाप्त करणे, तसेच पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार कनिष्ठ सभागृह विसर्जित करणे.
* दोन्ही सभागृहाच्या संयुक्त बैठकीसमोर भाषण करणे. सार्वत्रिक निवडणुकीनंतर संसदेच्या सभागृहात अभिभाषण करणे. अधिवेशनात चर्चिल्या जाणाऱ्या विषयांची आणि प्रस्तावांची माहिती या अभिभाषणातून सभागृहाला दिली जाते.
* विधेयकाना संमती देणे संसदेने मंजूर केलेल्या विधेयकाला राष्ट्रपतींची संमती मिळाल्याशिवाय त्याचे कायद्यात रुपांतर होत नाही. आर्थिक विधेयकाला राष्ट्रपती संमती नाकारू शकत नाहीत. पण सामान्य विधेयकाबाबत राष्ट्रपतींना विशेषाधिकार प्राप्त झालेला आहे. सामान्य विधेयक राष्ट्रपतीकडे आल्यानंतर त्यांच्याकडे तीन पर्याय असतात. १) विधेयक संमत करणे, २) विधेयक संमतीसाठी राखून ठेवणे, ३) विधेयक आपल्या सूचनांसह परत पाठविणे.

**३) आर्थिक अधिकार :**

राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीनेच अर्थविधेयक संसदेच्या कनिष्ठ सभागृहात सादर केले जाते.

* अनुदानाची मागणी राष्ट्रपतीच्या संमतीनेच करता येते.
* अचानकपणे उद्‌भवलेला खर्च करण्यासाठी राष्ट्रपती आकस्मिक खर्च निधीमधून तरतूद करू शकतात.

* अर्थविधेयक संसदेने मंजूर केल्यानंतर राष्ट्रपतीना त्यावर सही करावीच लागते.

**४) न्यायविषयक अधिकार :**

राष्ट्रपतीचे न्यायविषयक अधिकार पुढीलप्रमाणे

* सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणूका राष्ट्रपतींकडून होतात.
* राष्ट्रपती कोणत्याही कायदेविषयक बाबीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाकडून मत मागवू शकतात मात्र सर्वोच्च न्यायालयाने दिलेले मत/सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक नसतो.
* अपराधांबद्दल दोषी ठरविण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तिला शिक्षेत क्षमादान करण्याचा अधिकार राष्ट्रपतीना आहे. त्यानुसार शिक्षेमध्ये सूट देणे, शिक्षा थांबविणे, किंवा शिक्षादेश निलंबीत करणे, किंवा शिक्षा सौम्य करणे असे अधिकार राष्ट्रपतीना आहेत. मात्र शिक्षा ही गंभीर स्वरूपाची म्हणजेच फाशी अथवा जन्मठेप या स्वरूपाची असली पाहिजे.

**५) वटहुकूम काढणे :**

ज्यावेळेस संसदेचे अधिवेशन चालू नसते व एखाद्या विषयासंबंधी कायदा करणे अत्यंत आवश्यक असते अशा काळात राष्ट्रपती राज्यघटनेच्या (२०१५) कलम ११४ नुसार वटहुकूम काढतात. मात्र या वटहुकूम आदेशाला नजीकच्या संसद अधिवेशनात मान्यता घ्यावी लागते. हा वटहुकूम जास्तीत जास्त सहा आठवडे चालू शकतो. जर या वटहुकूमास संसदेची मान्यता मिळाली तर त्याचे कायद्यात रूपांतर होते.

**६) राष्ट्रपतींचे आणीबाणीविषयक अधिकार :**

नेपाळच्या राज्यघटनेमधील (२०१५) भाग ३० मधील कलम २७३ मध्ये राष्ट्रपतींच्या आणीबाणीविषयक तरतूद केलेली आहे. राष्ट्रपतींना पुढील दोन प्रकारे आणीबाणी घोषित करता येते.

**१) राष्ट्रीय आणीबाणी :** कलम २७३ (१) नुसार संपूर्ण नेपाळमध्ये किंवा देशाच्या एखाद्या भागामध्ये युद्ध, परकीय आक्रमण, सशस्त्र उठाव, अत्यंत टोकाची आर्थिक गोंधळाची अवस्था, नैसर्गिक संकट किंवा संसर्गजन्य रोगाची साथ यामुळे अत्यंत कठीण परिस्थिती निर्माण झाली असेल तर राष्ट्रपती संपूर्ण देशामध्ये किंवा संबंधित भागापुरती आणीबाणी घोषित करू शकतात.

**२) घटक राज्यामध्ये आणीबाणी :** कलम २७३ (२) नुसार एखाद्या घटक राज्यामध्ये नैसर्गिक संकट व रोगाची साथ तसेच इतर कारणामुळे घटक राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली असेल तर राष्ट्रपती संबंधित घटक राज्यात आणीबाणी घोषित करतात.

राष्ट्रपतीनी आणीबाणी घोषित केल्यानंतर एक महिन्याच्या आत संघीय संसदेमध्ये मंजूरी घ्यावी लागते. राष्ट्रपती आणीबाणी केव्हाही मागे घेण्याची घोषणा करू शकतात.

**राष्ट्रपतींचे स्थान :**

नेपाळमध्ये संसदीय शासनपद्धती स्वीकारल्यामुळे राष्ट्रपती हे नामधारी शासनप्रमुख आहेत. तरीही त्यांना 'सन्माननीय राष्ट्रपती' म्हणून आदराचे, मानाचे स्थान आहे. २९ ऑक्टोबर, २०१५ पासून श्रीमती विद्यादेवी भंडारी या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून कार्यरत आहेत.

**उपराष्ट्रपती** :

राष्ट्रपतीच्या गैरहजेरीत राष्ट्रपती पदाचा कार्यभार सांभाळण्यासाठी घटनेच्या ६७ व्या कलमात उपराष्ट्रपती पदाची तरतूद करण्यात आली आहे.

**निवड :**

उपराष्ट्रपतींची निवड राष्ट्रपतीप्रमाणेच 'निर्वाचक मंडळामार्फत' होते. या निर्वाचक मंडळामध्ये संघीय संसद व प्रांतीय घटक राज्यांच्या सदस्यांचा समावेश असतो. या निर्वाचक मंडळामध्ये ज्याला बहुमत मिळते त्यांची उपराष्ट्रपती म्हणून निवड होते.

**पात्रता :**

उपराष्ट्रपती पदासाठी राष्ट्रपतीप्रमाणेच पात्रता आहे. (कलम ६९)

* तो नेपाळचा नागरिक असावा.
* त्याने वयाची ४५ वर्षे पूर्ण असावीत.
* तो कोणत्याही सरकारी नोकरीतील आर्थिक प्राप्तीचे पद धारण करणारा नसावा.
* तो संघीय संसदेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असावा.

**कार्यकाल :**

उपराष्ट्रपतीची निवड ५ वर्षांसाठी होते. या काळात ते केव्हाही आपल्या पदाचा राजीनामा राष्ट्रपतींच्याकडे देऊ शकतात. महाभियोगाच्या खटल्या प्रक्रियेद्वारे संसद उपराष्ट्रपतींना बडतर्फ करू शकते.

**कार्ये आणि अधिकार :**

राष्ट्रपती पद कांही कारणांमुळे रिकामे झाल्यास उपराष्ट्रपती हे राष्ट्रपती म्हणून काम करतात. या काळात त्यांना राष्ट्रपतींचे सर्व अधिकार प्राप्त होतात. तसेच राष्ट्रपती पदाचे वेतन व इतर सुविधाही प्राप्त होतात.

**नेपाळ : पंतप्रधान**

प्रस्तावना : नेपाळने भारतीय राज्यघटनेच्या आधारे आपली राज्यघटना बनवली आहे. नेपाळच्या संसदीय शासनपद्धतीमधील महत्त्वाचे पद म्हणजे पंतप्रधान होय. पंतप्रधान हा राष्ट्रपती व

मंत्रीमंडळ यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. मंत्रीमंडळाचा प्रमुख पंतप्रधान असला तरी तो जनतेचा प्रतिनिधी असतो. पंतप्रधानपदाची विस्तृत माहिती खालील विश्लेषणाआधारे घेता येईल.

**पंतप्रधान निवड :**

प्रतिनिधीगृहाच्या सार्वत्रिक निवडणुकीत बहुमत मिळालेल्या पक्षाचे सदस्य House of Representatives (प्रतिनिधी सभा) गृहाचे सदस्य होतात. निर्वाचित सदस्यांपैकी एका नेत्याची सभागृह नेता म्हणून निवड केली जाते, तोच पंतप्रधान म्हणून निवडला जातो.

**पंतप्रधानपदाचे विशेष स्थान :**

नेपाळची संसद ही भारतीय संसदेप्रमाणे द्विगृही सभागृह असून House of Representatives (प्रतिनिधी सभा) (२७५ सदस्य) आणि National Assembly (राष्ट्रीय सभा) (५९ सदस्य) अशी तिची दोन सभागृहे आहेत. भारताप्रमाणे, पंतप्रधान हा देशाचा वास्तववादी प्रमुख असून राष्ट्रपती हे घटनात्मक प्रमुख असतात. नेपाळचे पंतप्रधान हे House of Representatives सभागृहाचे सदस्य आहेत.

**पंतप्रधान व मंत्रीमंडळ निर्मिती :**

१) पंतप्रधान निर्वाचित सदस्यांची मंत्रीमंडळात मंत्री म्हणून करतो, परंतु त्यांची औपचारिक निवड ही राष्ट्रपतींच्या सल्ल्याने होते.

२) पंतप्रधान हा मंत्रीमंडळ बैठकांचे अध्यक्षस्थान भूषिवतो, बैठकीत झालेल्या योग्य त्या निर्णयांची, चर्चेची माहिती तो राष्ट्रपतींना अहवालाद्वारे कळवतो.

३) पंतप्रधान हा आपल्या मंत्रीमंडळातील सदस्याने जर गुन्हा, चूक वा मंत्रीपदाशी गैरवर्तन केले असेल तर त्याचा राजीनामा घेतो.

४) पंतप्रधान पात्रतेनुसार मंत्र्यांना मंत्रालय देतो आणि मर्जीनुसार मंत्रीमंडळात योग्य तो फेरबदल करतो.

५) पंतप्रधान - मंत्र्यांना आपल्या कामाविषयी योग्य त्या सूचना-मार्गदर्शन करतो आणि वेळोवेळी कामाचा अहवाल मागतो.

६) पेचप्रसंगावेळी पंतप्रधान हा मंत्रीमंडळाला बरखास्त सुद्धा करू शकतो. (मंत्रीमंडळ बरखास्ती म्हणजे सामूहिक जबाबदारीने राजीनामे देणे होय)

**पंतप्रधान : राष्ट्रपतीचा मार्गदर्शक :**

१) पंतप्रधान हा राष्ट्रपतीचा मार्गदर्शक व सल्लागार असतो.

२) मंत्रीमंडळ व राष्ट्रपतींना जोडणारा दुवा म्हणजे पंतप्रधान होय.

३) पंतप्रधान हा महत्त्वाच्या पदनियुक्ती संदर्भात राष्ट्रपतींना सल्ला देतो.

**पंतप्रधान व मंत्रीमंडळ (जबाबदारी व कार्ये विभागणी)**

१) पंतप्रधान व मंत्रीमंडळ यांचे नाते म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू होय.

२) नेपाळचे मंत्रीमंडळ हे त्रिस्तरीय स्वरूपाचे आहे.

३) i) कॅबिनेट मंत्री, ii) राज्यमंत्री व iii) उपमंत्री असे तीन स्तर आहेत.

४) मंत्र्यांना सहाय्य करण्यासाठी त्यांना सचिव, प्रधान सचिव व सहसचिव स्तराचे अधिकारी असतात.

५) मंत्रीमंडळात – कॅबिनेट मंत्री हे वरिष्ठ दर्जाचे तर राज्यमंत्री हे दुय्यम दर्जाचे मंत्री असतात.

६) कॅबिनेट मंत्र्यांकडे – गृह, अर्थ, परराष्ट्र, उद्योग, संरक्षण, रेल्वे, दळणवळण इ. खाती असतात.

७) पंतप्रधान हा मंत्र्यांच्या पात्रतेनुसार त्यांना ‘पद’ देतो.

त्यासाठी ‘मंत्री’ म्हणून निवडणाऱ्या सदस्याकडे – राजकीय कौशल्ये, प्रशासकीय क्षमता, कामांची माहिती, पक्षसंघटनेतील प्रभाव, अशा महत्त्वपूर्ण घटकांचा विचार केला जातो.

**पंतप्रधान विशेष कार्ये :**

१) पंतप्रधान हा मंत्रीमंडळाचे नेतृत्व करतो.

२) देशाचे व जनतेचे नेतृत्व सुद्धा पंतप्रधान करतो.

३) जनतेच्या हिताची कामे मंत्र्यांमार्फत पंतप्रधान करत असतो.

४) पंतप्रधान हा महिन्यातून एकदा आपल्या सर्व मंत्र्यांची बैठक बोलावतो आणि संबंधित मंत्रालयाच्या कामांचा आढावा घेतो आणि मंत्र्यांना योग्य त्या सूचना व मार्गदर्शन करतो.

५) पंतप्रधान हा बैठकींना अनुपस्थित असेल तर मंत्रीमंडळातील वरिष्ठ मंत्री हा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवितो.

६) पंतप्रधान हा विशेष आढावा बैठकसुद्धा घेतो. त्याद्वारे कामे पूर्ण करण्यासाठी संबंधित मंत्र्यांना निर्देश देतो.

अशा प्रकारची कार्ये पंतप्रधान व मंत्रीमंडळ करतात. त्यामध्ये पंतप्रधानाची भूमिका ही महत्त्वाची आहे.

**पंतप्रधानाचे अधिकार व कार्ये :**

१) नेपाळमध्ये वास्तववादी (कार्यकारी) प्रमुख हा पंतप्रधान असून घटनात्मक प्रमुख हे राष्ट्रपती असतात.

२) पंतप्रधान हा आपल्या मंत्रीमंडळासाठी निर्वाचित सदस्यांची निवड करतो. त्याची यादी ही तो राष्ट्रपतींकडे सादर करतो आणि राष्ट्रपती मंत्रीमंडळाला औपचारिक मान्यता देतात.

३) पंतप्रधान हा ''समाजातील प्रमुख नेता'' असतो. मंत्र्यांवर नियंत्रण ठेवणे, कामांवर देखरेख ठेवणे, मंत्र्यांना सूचना देणे, मार्गदर्शन करणे इ. कामे पंतप्रधान करतो.

४) मंत्रीमंडळाची व कार्याची ध्येयधोरणे ठरवून पंतप्रधान हा मंत्र्यांना विश्वासात घेऊन कामे सोपवितो व पूर्णत्वासाठी वेळोवेळी सूचना देतो.

५) पंतप्रधान हा प्रशासन कार्यात सातत्य व कार्यक्षमतेत प्रगती होण्यासाठी मंत्रीमंडळात एकसूत्रीपणा आणतो.

६) मंत्रीमंडळाचा नेता या नात्याने मंत्रीमंडळाचे सर्व निर्णय अहवाल स्वरूपात राष्ट्रपतींना कळवतो.

७) संसद प्रतिनिधी सभा (House of Representatives) आणि राष्ट्रीय सभा (National Assembly) या दोन्ही सभागृहात पंतप्रधान उपस्थित असतो आणि निवेदने देतो, चर्चेत उपस्थित राहतो, सहभाग घेतो.

८) पंतप्रधान देशाची कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी, सार्वभौमत्व टिकून राहण्यासाठी प्रशासनाला व मंत्रीमंडळाला सूचना व मार्गदर्शन करतो.

९) पंतप्रधान हा प्रत्येक मंत्रीमंडळाचा सदस्य असल्याने सामान्य विधेयके, अर्थ विधेयके, वार्षिक अंदाजपत्रक निर्माण करण्याची जबाबदारी मंत्रीमंडळावर (अर्थ खाते) असली तरी पर्यायाने पंतप्रधान ती जबाबदारी घेत असतो. पंतप्रधान मंत्रीमंडळाच्या बैठका घेऊन संबंधित विधेयक निर्मितीचे कार्य करतो.

१०) देशाच्या सुरक्षेची महत्त्वपूर्ण जबाबदारी ही पंतप्रधानाची असते. तो परराष्ट्र संबंध बळकट करण्यासाठी विविध देशांना भेटी देतो. मैत्रीपूर्ण संबंध वाढवितो. परराष्ट्रांशी महत्त्वपूर्ण करार, तह, सहकार्य आदी मार्गांनी देशाचे व देशहिताचे महत्त्वपूर्ण काम पार पाडतो.

११) पंतप्रधान विविध कल्याणकारी योजना - विविध धोरणे ठरवून त्या पूर्णत्वासाठी संबंधित प्रशासन यंत्रणा व मंत्रीमंडळात समन्वय व संवाद करून त्याची अंमलबजावणी करतो.

१२) पंतप्रधान देशहित, देशकल्याण आणि प्रगतीसाठी वेळोवेळी मंत्रीमंडळाला आणि मंत्र्यांशी संवाद करत असतो.

अशा प्रकारे पंतप्रधान आपली कार्ये पूर्ण करतो आणि त्याद्वारे जनहित, राष्ट्रहित व विकास साधतो.

**पंतप्रधान : ''जनतेचा नेता'' आणि ''मंत्रीमंडळातील त्याचे स्थान''**

**अ) जनतेचा नेता**

पंतप्रधान हा मतदान (जनता) प्रक्रियेद्वारे निवडलेला असतो, म्हणजे जनतेच्या मतामुळे तो निर्वाचित होतो आणि त्यानंतर सभागृहातून म्हणजे निर्वाचित सदस्यांकडून तो ''देशाचा पंतप्रधान'' निवडला जातो. पंतप्रधान हा जनतेला विश्वासात घेऊन मंत्रीमंडळ व प्रशासनयंत्रणेद्वारे जनहित व विकासाचे कार्य करतो. म्हणजे जनतेच्या इच्छा, मागणी, आणि प्रश्न निरसणासाठी तो सदैव तत्पर असतो, म्हणून प्रधानमंत्री हा ''जनतेचा नेता'' असतो.

**ब) मंत्रीमंडळातील स्थान**

- ''पंतप्रधान म्हणजे मंत्रीमंडळरूपी कमानीची 'कोनशिला (मध्यशिला)' होय.'
- पंतप्रधान हा शासन यंत्रणेचा संपूर्ण कारभार करणारा 'नेतृत्वाचा प्रमुख' होय.
- पंतप्रधान हा राष्ट्रपती, संसद व मंत्रीमंडळ यांच्यात 'समन्वय साधणारा दुवा' होय.

**मंत्रीमंडळ**

पंतप्रधानाला त्यांच्या कार्यामध्ये मदत करण्यासाठी मंत्रीमंडळाची निर्मिती केली आहे. या मंत्रीमंडळाची रचना, अधिकार व कार्ये खालीलप्रमाणे

**मंत्रिमंडळाची रचना :**

पंतप्रधान व इतर मंत्री मिळून मंत्रिमंडळ बनते. हे मंत्रीमंडळ त्रिस्तरीय असते. मंत्र्याच्या दर्जानुसार १) कॅबिनेट मंत्री २) राज्यमंत्री ३) उपमंत्री असे तीन स्तर असतात. याशिवाय मंत्रिमंडळाला त्याच्या कार्यात साहाय्य करण्यासाठी संसदीय सचिव असतात, परंतु ते मंत्रिमंडळाचे सभासद नसतात.

मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री हे वरिष्ठ दर्जाचे असतात. गृह, अर्थ, परराष्ट्र, संरक्षण, उद्योग, रेल्वे, दळणवळण, व्यापार अशी महत्वाची खाती कॅबिनेट मंत्र्याकडे असतात. कॅबिनेट हा मंत्रिमंडळाचा गाभा असतो. त्याची मंत्री म्हणून नियुक्ती करताना राजकीय कौशल्ये, प्रशासकीय क्षमता, पक्षसंघटनेतील प्रभाव अशा घटकांचाही विचार केला जातो.

कॅबिनेट मंत्र्याना प्रशासकीय कार्यात साहाय्य करण्यासाठी राज्यमंत्री असतात. खात्यातील काही प्रशासकीय विभागांचा कारभार त्या राज्यमंत्र्याकडे सोपवलेला असतो.

उपमंत्र्याचे स्थान मंत्रिमंडळात दुय्यम असते. वरिष्ठ मंत्र्यांना त्यांच्या कार्यात साहाय्य करण्याचे काम उपमंत्री करतात.

तसेच मंत्रिमंडळ संसदेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांना उत्तर देणे, शासनाच्या धोरणांद्दलची माहिती जनतेला प्रसार माध्यमांद्वारे देणे, अशी कामे करत असतात. केंद्रसरकार आणि राज्यसरकार यांच्या राज्यकारभाराची अंतिम जबाबदारी मंत्रिमंडळावर असते. प्रशासनावर सतत देखरेख ठेवण्याचे काम मंत्रिमंडळाचे असते. मंत्रिमंडळाच्या बैठका नियमितपणे घेतल्या जातात. साधारणपणे आठवड्यातून किमान एकदा बैठक असते. महत्वाचा किंवा गंभीर प्रश्न निर्माण झाल्यास तातडीची बैठक घेतली जाते. बैठकीचे अध्यक्षस्थान पंतप्रधान भूषवितात. पंतप्रधानांच्या गैरहजेरीत सर्वात ज्येष्ठ **मंत्री अध्यक्षस्थानी असतात.**

कॅबिनेटने ठरविलेल्या धोरणांच्या अंमलबजावणीचे काम मंत्रिमंडळाकडून केले जाते. त्यांची अंमलबजावणी मंत्रिमंडळ करते. प्रत्यक्षात संपूर्ण मंत्रिमंडळ संसदेला सामूहिकरित्या जबाबदार असते.

**मंत्रिमंडळाचे अधिकार व कार्ये:**

देशाची वास्तविक कार्यकारी सत्ता ही पंतप्रधान व मंत्रिमंडळ यांच्याकडे असते. देशाचे कार्यकारी धोरण ठरवून ते अंमलात आणणारा मंत्रिमंडळ हा सर्वोच्च घटक असतो.

मंत्रिमंडळाची कार्ये पुढीलप्रमाणेः

**१) शासनाचे धोरण ठरविणे**

मंत्रिमंडळाकडून सर्व राज्यकारभार केला जातो. प्रशासन चालवले जाते. यासाठी धोरण आखणी करणे महत्वाचे असते. संपूर्ण देशाच्या विकासासाठी, नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी निश्चित ध्येयधोरणे ठरविणे आवश्यक असते. त्याची पूर्ण जबाबदारी मंत्रिमंडळ घेत असते. शासनाचे धोरण मंत्रिमंडळाकडून ठरविले जाते.

**कायदे करणे:**

एखाद्या देशातील प्रशासन प्रक्रिया म्हणजे तेथील धोरणे ठरविणे, त्या धोरणांच्या अनुषंगाने कायदे करणे व त्या कायद्यांची अंमलबजावणी करणे होय. मंत्री हे कायदेमंडळाचे देखील सभासद असतात. त्यामुळे ते धोरणांशी सुसंगत असे कायदे तयार करतात.

**धोरणांची अंमलबजावणी:**

देशाचे धोरण मंत्रिमंडळाकडून ठरविले जाते. या धोरणानुसारच देशाच्या म्हणजे तेथील नागरिकांच्या विकासासाठी विविध योजना ठरवाव्या लागतात. प्रत्येक मंत्री आपापल्या खात्याच्या कार्यक्षेत्रानुसार योजना आखतात. त्या योजना किती यशस्वीपणे राबविल्या जातात. त्यावर त्या खात्याच्या मंत्र्याचे यश अवलंबून असते.

**देशाचे संरक्षणः**

प्रत्येक देशाचे दुसऱ्या देशाशी जे संबंध प्रस्थापित होतात. ते मंत्रिमंडळामार्फतच परराष्ट्र व्यवहार खात्याचे मंत्री, परदेशांशी तह तयार करतात. तसेच संरक्षण मंत्री हे देशाच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारतात.

**आर्थिक व्यवहारः**

देशातील सर्व आर्थिक व्यवहार अर्थमंत्र्याकडून पाहिले जातात. देशातील उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबी अर्थमंत्र्याकडून निश्चित केल्या जातात. वेगवेगळ्या खात्यांकडून त्यांच्या खर्चाचा तपशील मागून घेऊन त्यानुसार प्रत्येक खात्याच्या आवश्यकतेनुसार रकमेची तरतूद करण्याचे काम अर्थमंत्री करतात. ह्या जमाखर्चाच्या अपेक्षित तरतूदीलाच अंदाजपत्रक असे म्हणतात. असे अंदाजपत्रक संसदेत मांडणे व ते मंजूर करून घेणे ही जबाबदारी मंत्रिमंडळाची असते.

**समन्वयः**

संपूर्ण मंत्रिमंडळाच्या एकमेकांशी संबंध असणे गरजेचे आहे. संपूर्ण मंत्रिमंडळ हे सामुदायिक जबाबदारीच्या तत्वावर आधारलेले असते. प्रामुख्याने सर्व खात्यांमध्ये समन्वय साधण्याचे काम पंतप्रधान पार पाडतात. तसेच कॅबिनेट मंत्रीदेखील यामध्ये महत्वाची भूमिका बजावतात.

**सारांशः**

नेपाळने संसदीय शासनपद्धती स्वीकारली असल्यामुळे पंतप्रधानाला वास्तव सत्ता मिळाली आहे. नेपाळमध्ये नवीन राज्यघटनेने (२०१५) पंतप्रधानाला विस्तृत अधिकार दिले आहेत. या सर्व बाबींचा अभ्यास सदरच्या प्रकरणात करता आला आहे.

**वस्तुनिष्ठ प्रश्नः**

१) नेपाळमध्ये नामधारी प्रमुख कोणास म्हणतात?

अ) राष्ट्रपती ब) पंतप्रधान क) सभापती ड) उपपंतप्रधान

२) राष्ट्रपतींना काढून टाकण्यासाठी कोणती प्रक्रिया संसदेमध्ये राबविली जाते?

अ) साधे बहुमत ब) महाभियोग क) स्थगन प्रस्ताव ड) कपात सूचना

३) नेपाळमध्ये वास्तव सत्ता ...... यांच्याकडे असते.

अ) राष्ट्रपती ब) पंतप्रधान क) उपराष्ट्रपती ड) सभापती

४) राष्ट्रपतींची निवड कोणामार्फत केली जाते?

अ) प्रतिनिधी गृह

ब) राष्ट्रीय सभा

क) घटक राज्य विधानसभा

ड) वरील तीन मधील सदस्यांच्या निर्वाचक मंडळामार्फत

**उत्तरे:**

१) अ २) ब ३) ब ४) ड

**स्वाध्याय:**

१) नेपाळच्या राष्ट्रपतींची अधिकार व कार्ये स्पष्ट करा.

२) नेपाळच्या पंतप्रधानांचे अधिकार व कार्ये सांगा.

**टीपा लिहा.**

१) राष्ट्रपतींचे अधिकार

२) मंत्रीमंडळ

**संदर्भ:**


१) www.presidentofnepal.gov.np

२) Dhungel D. N., A Guide to Government in Nepal: Structures, Functions and Practices –

The Asia Foudation, Nepal, 2012- www.asiafoundation.org>pdfs>A Guide

३) Nepal Government, www.nepalgov.in

४) www.constitutionnet.org>item>constitution


## क) नेपाळचे न्यायमंडळ

**उद्दिष्ट्ये:**

सदरच्या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील बाबींचे आकलन होईल.

- नेपाळच्या न्यायमंडळाची रचना, अधिकार व कार्ये समजून घेता येतील.
- नेपाळच्या न्यायमंडळाचे महत्व लक्षात येईल.
- नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाची रचना, अधिकार व कार्ये समजतील.

**प्रस्तावनाः**

नेपाळच्या स्थापनेनंतर राजेशाही, वासाहतिक राजवट पुन्हा राजेशाही व लोकशाही अशी अनेक स्थित्यंतरे नेपाळमध्ये झाली आहेत. त्यामधूनच लोकशाहीला पूरक अशा राज्यघटनांची निर्मिती होऊ लागली व पद्मसमशेर राणा यांनी १ एप्रिल १९४८ ला पहिली राज्यघटना तयार केली. त्यानंतर पाच राज्यघटना तयार करण्यात व अंमलात आणण्यात आल्या. सध्या २० सप्टेंबर, २०१५ पासून सहावी राज्यघटना अंमलात आणली आहे. या राज्यघटनेने न्यायमंडळाला विशेष महत्व दिले असून न्यायमंडळाचे स्वातंत्र्य आणि महत्व वाढविले आहे. या राज्यघटनेमधील कलम १२६ ते १५६ यामध्ये न्यायमंडळाच्या रचना, अधिकार व कार्याबाबत तरतूदी केल्या आहेत.

कलम १२७ नुसार नेपाळमध्ये खालील तीन प्रकारची न्यायव्यवस्था किंवा न्यायालये आहेत.

अ) सर्वोच्च न्यायालय

ब) उच्च न्यायालये

क) जिल्हा न्यायालये

वरील न्यायव्यवस्थेबरोबरच स्थानिक पातळीवर काही न्यायिक मंडळे आहेत.

**१) सर्वोच्च न्यायालयः**

नेपाळमध्ये २१ मे १९५६ रोजी सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली आहे. या सर्वोच्च न्यायालयाला ‘सर्वोच्च अदालत’ असे म्हटले जाते. २० सप्टेंबर, २०१५ च्या राज्यघटनेमधील कलम १२८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाची तरतूद करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्यालय ‘काठमांडू’ येथे आहे. या सर्वोच्च न्यायालयाची रचना, अधिकार व कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

**रचनाः**

सर्वोच्च न्यायालयामध्ये १ मुख्य न्यायाधीश व इतर २० न्यायाधीश असे जास्तीत जास्त एकूण २१ न्यायाधीश असतात.

**न्यायाधीशाची पात्रताः**

१) सदरची व्यक्ती नेपाळची नागरिक असली पाहिजे.

२) तिने उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी पाच वर्षे काम केलेले असावे.

३) उच्च न्यायालयामध्ये किंवा न्यायिक सेवेमध्ये किमान १५ वर्षे वकिली केलेली असावी किंवा

४) सर्वोच्च न्यायालयामध्ये किमान ३ वर्षे न्यायाधीश म्हणून कार्यरत असणारी व्यक्ती मुख्य न्यायाधीश पदासाठी पात्र असेल.

५) सदरची व्यक्ती सुप्रसिद्ध कायदेपंडित असावी. तिने मान्यताप्राप्त विद्यापीठामधून कायद्याची पदवी घेतलेली असावी.

६) ती व्यक्ती प्रमाणिक व कार्यक्षम असावी दिवाळखोर नसावी.

**निवडः**

१) सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांची निवड राष्ट्रपती घटनात्मक परिषदेच्या शिफारशीवरून करतात.

२) इतर न्यायाधीशांची निवड न्यायालयीन परिषद (Judicial Council) च्या शिफारशीवरून राष्ट्रपती करतात.

**कार्यकालः**

न्यायाधीशांचे निवृत्ती वय ६५ वर्षे आहे. तर सरन्यायाधीश म्हणून जास्तीत जास्त ६ वर्षे पदावर राहू शकतात.

**पदच्युती किंवा पदमुक्तीः**

१) न्यायाधीशांनी स्वतःराष्ट्रपतीकडे राजीनामा पाठविला तर त्यास पदमुक्त होता येते.

२) राज्यघटनेमधील कलम १०१ नुसार महाभियोगाचा खटला संसदेने मंजूर केला तर न्यायाधीशांना पदमुक्त व्हावे लागते.

३) घटनात्मक परिषदेच्या (Constitutional Council) शिफारशीवरून मुख्य न्यायाधीशांना तर न्यायालयीन परिषदेच्या शिफारशीवरून इतर न्यायाधीशांना राष्ट्रपती पदमुक्त करून शकतात.

४) न्यायाधीशाचा मृत्यू झाल्यास त्याचे पद रिकामे होते.

**सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारः**

नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाला राज्यघटनेने अत्यंत महत्वाचे अधिकार दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार खालीलप्रमाणे आहेत.

**१) राज्यघटनेचे संरक्षकः**

सर्वोच्च न्यायालय हे राज्यघटनेचे संरक्षणकर्ता आहे. राज्यघटनेमधील कलमांचा अर्थ लावणे तसेच राज्यघटनेमध्ये कोणत्याही प्रकारे चुकीच्या पद्धतीने बदल होऊ नये याची काळजी सर्वोच्च न्यायालय घेते.

**२) याचिकांची सुनावणीः**

सर्वोच्च न्यायालय नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षक आहे. कलम १३३ नुसार नागरिक सर्वोच्च न्यायालयामध्ये सार्वजनिक जनहित याचिका दाखल करू शकतात. बंदी प्रत्यक्षीकरण,

परमादेश, अधिकार पृच्छा, उत्प्रेषण व प्रतिषेध अशा प्रकारच्या भारतीय राज्यघटनेप्रमाणे नेपाळच्या नागरिकांना घटनात्मक उपाययोजनांचे अधिकार आहेत. या उपाययोजनाद्वारे नागरिक सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करतात व न्यायालय या याचिंकांची सुनावणी घेऊन निर्णय देते. या याचिकामधून नागरिकांचे मूलभूत अधिकार सुरक्षित ठेवले जातात. तसेच सार्वजनिक हिताचेही संरक्षण केले जाते.

### ३) मूलभूत अधिकारांची अंमलबजावणी:

नागरिक याचिकाद्वारे आपल्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करतात. परंतु त्याबरोबर सर्वोच्च न्यायालय स्वतःहून मूलभूत अधिकारांच्या संरक्षणाची जबाबदारी घेत असते. याबाबतीत कोर्ट आदेश काढून अधिकारांचे संरक्षण करते.

### ४) अपिलीय अधिकार:

सर्वोच्च न्यायालय नेपाळमधील शेवटचे व अंतिम अपीलाचे न्यायालय आहे. नेपाळमधील सर्व उच्च न्यायालयांनी दिलेल्या निर्णयांना सर्वोच्च न्यायालयामध्ये आव्हान देता येते. कलम १०७ नुसार तसेच न्याय प्रशासन कायदा, १९९१ च्या सेक्शन ९ नुसार सर्वोच्च न्यायालयाला अपीलीचे अधिकार प्राप्त झाले आहेत. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या प्रारंभिक किंवा मूळच्या अखत्यारीमधील निर्णय, कनिष्ठ न्यायालयाने १० वर्षे पेक्षा जास्त कालावधीसाठी दिलेली शिक्षा, तसेच आजन्म कारावासाची शिक्षा याविरूद्ध अपील करता येते.

### ५) कायद्याची वैधता, घटनात्मकता तपासणे: न्यायालयीन पुनर्विलोकन

सर्वोच्च न्यायालय एखाद्या कायद्याची घटनात्मकता तपासू शकतो. जर एखादा कायदा घटनेच्या विसंगत असेल तर तो रद्द करण्याचा न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.

### ६) कायद्याचा अर्थ लावणे:

उच्च न्यायालयामध्ये चालू असलेल्या तसेच इतर खटल्यामध्ये घटनेच्या अर्थाच्या बाबतीत वाद निर्माण झालेला असेल तर संबंधित कायद्याचा अर्थ लावण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.

### ७) पुनर्विचार करण्याचा अधिकार:

सर्वोच्च न्यायालय स्वतः दिलेल्या निर्णयावर पुनर्विचार करू शकते. योग्य वाटल्यास दिलेल्या निर्णयात बदल करू शकते. एखाद्या खटल्याच्या बाबतीत नवीन वास्तविकता लक्षात आली असेल अशावेळी देखील सर्वोच्च न्यायालय पुनर्विचार करू शकते.

**८) प्रारंभिक अधिकार क्षेत्र– घटनात्मक खंडपीठ**

सरन्यायाधीश व इतर चार न्यायाधीशांचे मिळून, न्यायालयीन परिषदेच्या शिफारशीवरून घटनात्मक खंडपीठ तयार केले जाते. यामध्ये संघ आणि राज्य विरूद्ध राज्य, राज्य विरूद्ध स्थानिक संस्था यांच्यामधील वादाचे खटले सर्वोच्च न्यायालयात चालविले जातात. यालाच सर्वोच्च न्यायालयाचे प्रारंभिक अधिकार क्षेत्र म्हटले जाते. संघीय संसद व घटक राज्याच्या विधान सभेच्या निवडणूकीमधील सदस्याच्या अपात्रतेचे खटले सुद्धा यामध्ये समाविष्ट आहेत.

याचबरोबर विशेष खंडपीठ, विभागीय खंडपीठ एक सदस्य खंडपीठ निर्माण करून महत्वाचे खटले सोडविले जातात.

**९) खटल्यांचे हस्तांतरणः**

एखादा महत्वाचा सार्वजनिक खटला एकाचवेळी सर्वोच्च व उच्च न्यायालयासमोर चालू असेल अशा वेळी सर्वोच्च न्यायालय सदरचा खटला आपल्याकडे हस्तांतरीत करावा असा आदेश देऊन खटल्याचे हस्तांतरण करू शकते.

**१०) न्यायव्यवस्थेसाठी नियम निर्मिती– न्यायालय प्रशासन**

कलम १३६ नुसार सर्वोच्च न्यायालय संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या प्रभावी प्रशासनासाठी नियम निर्माण करीत असते. उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालये, विशेष न्यायालये यांच्याप्रशासनासाठी सर्वोच्च न्यायालय नियम तयार करते. संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या प्रशासनावर सर्वोच्च न्यायालयाचे नियंत्रण असते.

**११) न्यायालयीन धोरण निर्मितीः**

सर्वोच्च न्यायालय देशामधील न्यायव्यवस्थेसाठी धोरण निर्माण करते. यामध्ये पूर्ण खंडपीठ ही भूमिका पार पाडते. सर न्यायाधीश व इतर सर्व मुख्य न्यायाधीशांचा समावेश या पूर्ण खंडपीठामध्ये (Full Bench) मध्ये होतो. या पूर्ण खंडपीठाच्या बैठकीमध्ये न्यायालयीन प्रशासनाबाबत, न्यायालयांच्या व्यवस्थापनाबाबत धोरण ठरविले जाते. सर्वोच्च न्यायालयाचा वार्षिक अहवाल मंजूर करणे तसेच नवीन धोरण निर्माण करणे इ. चा समावेश होतो.

**१२) वार्षिक अहवाल सादर करणेः**

सर्वोच्च न्यायालय, न्यायालयीन सेवा आयोग, न्यायालयीन परिषद यांना आपला वार्षिक अहवाल राष्ट्रपतींच्याकडे सादर करावा लागतो. राष्ट्रपती पंतप्रधानांच्या माध्यमातून हा अहवाल संघीय संसदेमध्ये मांडतात.

**१३) नोंद न्यायालय किंवा अभिलेख न्यायालयः**

सर्वोच्च न्यायालयाला 'नोंद न्यायालयाचे' (Court of Records) स्थान दिले आहे. या न्यायालयात सर्व निर्णयांच्या नोंदी ठेवल्या जातात व दुसऱ्या न्यायालयामध्ये या नोंदी सादर केल्यास त्यांच्या खरेपणाबद्दल शंका घेता येणार नाही. सर्वोच्च न्यायालय 'न्यायालयाची बेअदबी' केल्याबद्ल दंड किंवा शिक्षा देऊ शकते.

**१४) सल्लादायी अधिकारः**

सार्वजनिक हित तसेच महत्वाच्या राष्ट्रीय प्रश्नावर राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाकडे सल्ला मागू शकतात. मात्र हा सल्ला त्यांच्यावर बंधनकारक नाही.

अशा प्रकारे नेपाळच्या राज्यघटनेने सर्वोच्च न्यायालयाला व्यापक अधिकार दिलेले आहेत. लोकशाहीच्या, नागरिकांच्या तसेच राज्यघटनेच्या संरक्षणाची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर आहे.

**२) उच्च न्यायालय**

**प्रस्तावनाः**

नेपाळच्या नवीन राज्यघटनेमध्ये उच्च न्यायालयांची तरतूद केली आहे. प्रत्येक प्रांतासाठी उच्च न्यायालय असेल अशी तरतूद कलम १३९ मध्ये करण्यात आली आहे. पूर्वीच्या अपीलीय न्यायालयाऐवजी उच्च न्यायालयाची तरतूद २०१५ च्या नवीन राज्यघटनेने केली आहे. सध्या ७ प्रांतामध्ये उच्च न्यायालयाची स्थापना केली आहे. या सर्व उच्च न्यायालयामध्ये एकूण १८० न्यायाधीश कार्यरत होत आहेत. बिराटनगर, जनकपूर, पाटण, पोखारा, तुलसीपूर, बिरेंद्रनगर आणि दिपयाल या सात प्रांतामध्ये नवीन उच्च न्यायालयांची स्थापना केलेली आहे. सर्वोच्च न्यायालय व जिल्हा न्यायालय यामधील दुवा म्हणजे उच्च न्यायालये आहेत.

**रचनाः**

फेडरल कायद्यानुसार उच्च न्यायालयामध्ये एक मुख्य न्यायाधीश व या कायद्यानुसार इतर न्यायाधीशांची संख्या ठरविण्यात येते.

**न्यायाधीशांची पात्रताः**

१) ती व्यक्ती नेपाळी नागरिक असली पाहिजे.

२) तो कायद्याचा पदवीधर असला पाहिजे व कमीत कमी जिल्हा न्यायालयामध्ये ५ वर्षे जिल्हा न्यायाधीश असावा किंवा

३) कमीत कमी १० वर्षे वकिली चा अनुभव असावा किंवा न्यायालयीन सेवेचा १० वर्षे अनुभव तिला असावा.

**निवडः**

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायालयीन परिषदेच्या शिफारशीनुसार उच्च न्यायालयाच्या मुख्य व इतर न्यायाधीशांची नियुक्ती करतात.

**कार्यकालः**

उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचा कार्यकाल त्यांच्या ६३ वर्षे वयापर्यंत आहे.

**पदच्युतीः**

१) त्यांनी स्वतः राजीनामा दिला तर ते पदमुक्त होतात.

२) गैरवर्तन, अकार्यक्षता, अप्रामाणिकपणा इ. आरोप सिद्ध झाल्यास न्यायालयीन परिषदेच्या शिफारशीनुसार सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मुख्य न्यायाधीशांना बडतर्फ करतात.

**उच्च न्यायालयाचे अधिकारः**

२०१५ च्या नवीन राज्यघटनेनुसार निर्माण झालेल्या उच्च न्यायालयाचे अधिकार पुढीलप्रमाणे आहेत.

**१) प्रारंभिक अधिकार क्षेत्रः**

जे खटले प्रथम दर्शनी उच्च न्यायालयामध्ये दाखल केले जाऊ शकतात त्यांचा समावेश प्रारंभिक अधिकारक्षेत्रामध्ये होतो. यामध्ये नागरिकांच्या मूलभूत अधिकारांच्या अंमलबजावणी संबंधी बाबी, फेडरल कायद्यानुसार अंमलबजावणीबाबते खटले यांचा समावेश होतो.

**२) अपीलाचे अधिकार क्षेत्रः**

उच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या जिल्हा न्यायालयांच्या निर्णयाविरूद्ध दिवाणी आणि फौजदारी अशा दोन्ही खटल्याबाबत अपिलाचे अधिकारक्षेत्र उच्च न्यायालयाकडे आहे.

**३) नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण व अंमलबजावणीः**

राज्यघटनेमधील कलम १४४ (१ आणि २) नुसार उच्च न्यायालय सर्वोच्च न्यायालयाप्रमाणे मूलभूत अधिकारांचे संरक्षण आहे.

जर एखाद्या नागरिकाच्या मूलभूत अधिकारावर अतिक्रमण झाले असेल तर हेबियस कॉर्पस, मंडॅमस, सर्टिओरॅरी, प्रोहिबिशन आणि क्वो वॉरंटो याद्वारे नागरिक उच्च न्यायालयात दाद मागू शकतो. उच्च न्यायालय याबाबतीत निर्णय घेऊन मूलभूत अधिकाराच्या संरक्षणाबाबत व अंमलबजावणीबाबत आदेश काढते.

**४) खटल्यांचे हस्तांतरणः**

राज्याचा कायदा किंवा जिल्हा कोर्टाच्या अखत्यारीत नसणारा खटला जर जिल्हा कोर्ट चालवत असेल तर असे खटले उच्च न्यायालयाकडे हस्तांतरित करावेत असा आदेश उच्च न्यायालय देते व सदरचे खटले उच्च न्यायालयाकडे हस्तांतरित केले जातात.

**५) न्याय प्रशासनाची प्रभावी अंमलबजावणीः**

उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रामधील जिल्हा व इतर कनिष्ठ न्यायालयामधून न्यायालयीन विलंब होऊ नये, निर्णय प्रक्रियेमध्ये भ्रष्टाचार, पक्षपाती पणा होऊ नये व न्यायप्रक्रिया गतीमान आणि जास्तीत जास्त पारदर्शी झाली पाहिजे याची जबाबदारी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशावर असते.

**६) जिल्हा व कनिष्ठ न्यायालयावर देखरेखः**

उच्च न्यायालय जिल्हा व कनिष्ठ न्यायालयावर सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनानुसार नियम तयार करून देखरेख ठेवते.

अशा प्रकारे उच्च न्यायालयाचे अधिकार व कार्ये आहेत.

**३) जिल्हा न्यायालयेः**

नेपाळमधील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा न्यायालय असेल अशी तरतूद घटनेच्या कलम १४८ मध्ये केली आहे. २०१५ च्या नवीन राज्यघटनेनुसार ७ प्रांत, १४ प्रशासकीय विभाग आणि ७५ जिल्ह्यांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यानुसार ७५ जिल्हा न्यायालयांची निर्मिती केली आहे.

**रचनाः**

फेडरल कायद्यानुसार जिल्हा न्यायालयामधील न्यायाधीशांची संख्या ठरविली जाते. न्यायाधीशांच्या रिक्त जागा पुढील प्रमाणे भरल्या जातात. यामध्ये २०% जागा कायद्याचा पदवीधर असणारा व कमीतकमी ३ वर्षे न्यायालयीन सेवेमध्ये राजपत्रित अधिकारी असणाऱ्या मधून सेवाज्येष्ठतेनुसार भरल्या जातात. ४०% जागा न्यायालयीन सेवेमध्ये ३ वर्षे कार्यरत असणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्यामधून विभागीय किंवा मर्यादित स्पर्धा परीक्षामधून भरल्या जातात तर राहिलेल्या ४०% जागा संपूर्ण देशामधील कायदा पदवीधारक व ८ वर्षे वकिली करणाऱ्या पात्र उमेदवारामधून खुल्या स्पर्धा परीक्षा मार्फत भरल्या जातात.

**जिल्हा न्यायाधीश नियुक्तीः**

जिल्हा न्यायाधीशाची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायालयीन परिषदेच्या शिफारशीवरून करतात.

**कार्यकाळः**

जिल्हा न्यायाधीशांचा कार्यकाळ त्यांच्या वयाच्या ६३ वर्षे वयापर्यंत आहे.

**पदच्युती/ पदमुक्तीः**

१) जिल्हा न्यायाधीशाने स्वतः राजीनामा दिला किंवा त्याचा मृत्यू झाला तर

२) वय वर्षे ६३ पूर्ण झाल्यानंतर ते पदमुक्त होतात.

३) अकार्यक्षमता, गैरवर्तणूक इ. कारणावरून न्यायालयीन परिषदेच्या शिफारशीनुसार सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश जिल्हा न्यायाधीशांना बडतर्फ करू शकतात.

**अधिकार व कार्येः**

१) जिल्हा न्यायालयामध्ये दिवाणी आणि फौजदारी स्वरूपाचे खटले दाखल करून घेतले जातात. व्यक्तीगत स्वरूपाच्या खटल्यांचा यामध्ये समावेश असतो.

२) कनिष्ठ न्यायालये तसेच अर्धन्यायालयीन अधिकार असणाऱ्या समित्या, संस्था यांनी दिलेल्या निर्णयाविरूद्ध जिल्हा न्यायालयात अपील करता येते.

३) हेबियस कॉर्पस व प्रोहिबिशन या फक्त दोन प्रकारच्या याचिका जिल्हा कोर्टात दाखल करून घेतल्या जातात.

४) कनिष्ठ न्यायालयावर नियंत्रण व देखरेख ठेवण्याचे काम जिल्हा न्यायालय करते.

५) फेडरल कायद्यानुसार जिल्हा न्यायालयाला अधिकार मिळाले आहेत.

अशा प्रकारे जिल्हा न्यायालये नेपाळमध्ये कार्यरत आहेत.

**इतर न्यायालये व न्यायालयीन संस्थाः**

नेपाळमध्ये न्यायमंडळामध्ये सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय आणि जिल्हा न्यायालये अशी प्रमुख रचना आहे. याव्यतिरिक्त काही विशेष न्यायालये, मिलिटरी न्यायालये, ट्रायब्यूनल्स, स्थानिक न्यायालये यांचा समावेश होतो. या सर्वांच्यावर सर्वोच्च न्यायालय हे उच्च आणि जिल्हा न्यायालयामार्फत देखरेख व नियंत्रण ठेवत असते.

**न्यायालयीन परिषद** (Judicial Council)

नेपाळमध्ये न्यायालयीन परिषद ही अत्यंत महत्वाची संस्था आहे. २०१५ च्या कलम १५३ नुसार न्यायालयीन परिषदेची निर्मिती केली आहे. न्यायालयीन परिषदेची रचना पुढील प्रमाणे आहे. १) सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश- चेअरपर्सन २) फेडरल कायदा व न्यायमंत्री-सदस्य ३) सर्वोच्च न्यायालयामधील ज्येष्ठ वकील- सदस्य ४) राष्ट्रपती नियुक्त कायदेपंडित- सदस्य ५) राष्ट्रपती मार्फत नियुक्त नेपाळ बार असोसिएशन मधील जेष्ठ वकील- सदस्य

वरील प्रकारे पाच सदस्य असणारी ही परिषद न्यायाधीशांची निवड, बडतर्फी, बदल्या, न्यायव्यवस्थेबाबत सल्ला देणे इ. महत्वाची कार्ये करीत असते.

याबरोबरच ज्युडीसिएल सर्व्हिस कमिशन ही संस्था न्यायाधीश तसेच न्यायव्यवस्थेमधील राजपत्रित अधिकारी इतर अधिकारी यांच्या सेवाशर्ती, कर्तव्ये जबाबदाऱ्या इ. बाबत कार्यरत आहे.

**समारोपः**

नेपाळमध्ये न्यायमंडळाला विशेष महत्व दिले आहे. विद्यमान राज्यघटनेने प्रजासत्ताक, लोकशाही स्वीकारून राजेशाही पूर्णतः नाकारली आहे. त्यामुळे नेपाळमधील लोकशाही, नागरिकांचे मूलभूत हक्क, राज्यघटनेचे संरक्षण, नागरिकांना न्याय मिळवून देणे, न्यायव्यवस्था गतीमान व पारदर्शी करणे यासाठी सर्वोच्च न्यायालयाला अधिकार व स्वातंत्र्य देण्यात आले आहे. राज्यघटनेने दिलेल्या अधिकारामुळे नेपाळमधील न्यायव्यवस्था स्थिर व कार्यक्षम बनत आहे. एकूणच नेपाळमध्ये न्यायव्यवस्थेला महत्वाचे स्थान आहे.

**वस्तुनिष्ठ प्रश्नः**

१) नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्यालय....... येथे आहे.

अ) पोरेखा ब) तुलसीपूर क) काठमांडू ड) बिरेंद्रनगर

२) सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांची नियुक्ती कोण करतात?

अ) पंतप्रधान ब) राष्ट्रपती

क) संसदेचा सभापती ड) यापैकी नाही.

३) उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे निवृत्ती वय ...... वर्षे आहे.

अ) ६५ ब) ६३ क) ६० ड) ५८

**उत्तरेः**

१) क २) ब ३) क

**स्वाध्यायः**

१) सर्वोच्च न्यायालयाची रचना, अधिकार व कार्ये स्पष्ट करा.

२) उच्च न्यायालयाची रचना, अधिकार व कार्ये सांगा.

**टीपाः**

१) जिल्हा न्यायालये

२) उच्च न्यायालय

**संदर्भः**


१) https://en.m.wikipedia.org>wiki

२) www.constitutionnet.org>item>constitution

(Constitution of Nepal 2015 official translation by the ministy of law, Justice and Parliamentary Affairs of Nepal)


❑❑❑

## सत्र ४ : घटक ३

# ३.३ नेपाळ : सामाजिक संस्थांचे कामकाज

अ) सामाजिक व्यवस्था

ब) सामाजिक चळवळी

क) अर्थव्यवस्था आणि विकास

## अ) सामाजिक व्यवस्था

## उद्दिष्ट्ये

सदरच्या घटकाचा अभ्यास केल्यानंतर पुढील बाबींचे आकलन होणार आहे.

१) नेपाळमधील सामाजिक व्यवस्था कोणत्या प्रकारची आहे.

२) नेपाळमधील जात, धर्म, भाषा याबद्दल माहिती होणार आहे.

३) नेपाळमधील सामाजिक व्यवस्था तसेच सामाजिक चळवळींचे आकलन होणार आहे.

४) नेपाळमधील अर्थव्यवस्था व तिचा विकास याचेही आपणास ज्ञान मिळणार आहे.

## प्रस्तावना

१८ व्या शतकामध्ये नेपाळच्या एकीकरणानंतर नेपाळमध्ये विविध स्वदेशी जातीबरोबर इतर जनजातीही सामील झाल्या. नेपाळमध्ये चार सामाजिक वर्णव्यवस्था आहेत. त्याचबरोबर नेपाळ हे हिंदू धर्म स्वीकारलेले एक प्रमुख राष्ट्र असलेले दिसून येते. त्याचबरोबर तिथे बौद्ध, इस्लाम व इसाई धर्म ही काही प्रमाणात अस्तित्वात आहेत. नेपाळमध्ये नेपाळी भाषा ही प्रमुख असून ती इंडो आर्यन भाषेतील आहे.

### नेपाळमधील जातीव्यवस्था:

नेपाळमधील जातिव्यवस्था ही सामाजिक स्तरावरील पारंपरिक प्रणालीशी निगडीत आहे. नेपाळमध्ये प्रामुख्याने नेवार, मधेशी या समाजात जातिव्यवस्था प्रचलित आहेत. १८ व्या शतकात नेपाळच्या एकीकरणानंतर जनजाती समूहाचा समावेश जातीव्यवस्थेत झाला, परंतु यात आदिवासी समूहाचा समावेश झाला नाही.

### १) पारंपरिक जातिव्यवस्था:

नेपाळमधील जात ही मूळ समूहाच्या सामाजिक रचनेत दिसून येते. जी हिंदू समूहाशी निगडीत आहे. यात वर्णांचा समूह येत नाही. नेपाळमधील जातीची संख्या ४०% आहे. पूर्व केसास ही प्रमुख

जात असून त्याचे प्रमाण १८.२% आहे. सेवा जातीलाच अस्पृश्य म्हटले जाते. अशाप्रकारे हिंदूमध्येच मधेशी जाती व्यवस्थेचा उदय झाला. या मधेशी जाती व्यवस्थेत चार वर्णांचा समावेश दिसून येतो. यात भोजपुरी, मैथिली, अवध या भाषिकांचा समावेश होतो. 'मधेशी' जात ही मध्यप्रदेश मध्ये जास्त प्रमाणात आढळते. त्यांची लोकसंख्या १४% आहे. या मधेशी जातीत ब्राह्मण, रजपूत, कायस्थ, वैश्य, कुशवाह, कर्मो, मल्लाह अशा विविध उपजाती यात दिसून येतात. यानंतर नेपाळमध्ये नेवार जातिव्यवस्था आढळून येते. ही हिंदू आणि बौद्ध या धार्मिक व्यवस्थेशी निगडीत असून त्याची लोकसंख्या नेपाळमध्ये ५.५% आहे. तसेच त्यामध्ये उपजाती दिसून येतात. अशाप्रकारे नेपाळमध्ये प्रामुख्याने मधेशी, नेवार ह्या प्रमुख जातिव्यवस्था असून इतर जातिव्यवस्थेमध्ये वर्णव्यवस्था दिसून येते.

नेपाळमध्ये चार वर्णव्यवस्था असून त्यामध्ये ब्राह्मण हा उच्च कोटीचा वर्ण, दुसरा क्षत्रिय, तिसरा वैश्य आणि चौथा शूद्र अशी वर्णव्यवस्था होती. नेपाळमध्ये जातिव्यवस्था आजही अस्तित्वात असून १९६२ च्या कायद्याने या जातिव्यवस्थेतील अनिष्ट प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**नेपाळमधील धर्म:**

नेपाळ हे एक धर्मनिरपेक्ष राज्य असले तरी २००८ पर्यंत ते एक अधिकारित रूपात हिंदू राष्ट्र म्हणून अस्तित्वात होते. नेपाळमध्ये हिंदू धर्म जास्त प्रमाणात असून त्याच्याबरोबर बौद्ध धर्म ही अस्तित्वात आहे. परंतु या धर्मावर हिंदू धर्माचा प्रभाव दिसून येतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे नेवार जमात होय. नेवार जमातीने बौद्ध धर्म स्वीकारला असला तरी हिंदू धर्माच्या परंपरा त्यात दिसून येतात.

२०११ च्या जणगणनेनुसार नेपाळच्या एकूण लोकसंख्येच्या ८१.३% हिंदू, ९% बौद्ध, ४.४% मुस्लिम, ३% ख्रिस्ती ०.९% इतर धर्मिय लोक आहेत.

धार्मिक समूहाचे विवरण पाहिले असता प्रत्येक भौगोलिक क्षेत्रामध्ये हिंदू धर्मांचे ८१% लोक आढळतात आणि यात बौद्ध धर्म १०% आढळून येतो. नेपाळमध्ये हिंदू आणि बौद्ध एकमेकांच्या रूढी, प्रथा, परंपरा स्वीकारताना दिसतात.

नेपाळमध्ये हिंदूची मंदिरे व बौद्ध धर्मियांचे मठ मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. ज्यातून दोन्ही संस्कृतीचा मिलाफ नेपाळमध्ये दिसून येतो.

**नेपाळमधील भाषा:**

नेपाळी भाषा ही इंडो आर्यन भाषेचा प्रकार असून नेपाळी ही मुख्य अधिकारिक भाषा आहे. या भाषेवर नेपाळी तिबेट, बर्मातील भाषेचा प्रभाव पडला आहे. त्याचबरोबर बंगाली भाषेचाही प्रभाव या भाषेवर दिसून येतो.

नेपाळी भाषेच्या विकासावर साहित्य हा घटक महत्व पूर्ण आहे. १९ व्या शतकांमध्ये विविध साहित्याचा विकास येथे झाला. यामध्ये लोककथा व रामायणाचे रूपांतर, व इतर अनेक साहित्य लिहिले गेले त्यातून ही भाषा अनेक ठिकाणी विकसीत झाली. २०११ च्या जणगणनेनुसार ४४.६% लोक नेपाळी भाषेचा वापर करतात. नेपाळी भाषा ही पारंपरिकरित्या पहाडी भाषा म्हणून बोलली जाते. पण सरकारी व्यवस्थेमध्ये नेपाळी भाषेचा वापर केला जातो. नेपाळमध्ये असंख्य भाषेचा प्रभाव दिसतो. तसेच नेपाळच्या सीमेजवळ असणारे पं. बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश या राज्यातील बोलीभाषेचा तेथे प्रभाव पडलेला दिसून येतो.

**समारोपः**

नेपाळमधील जात, धर्म व भाषा यांचा विचार केला असता नेपाळमध्ये वेगवेगळ्या जातिव्यवस्था अत्यंत प्रभावीपणे अस्तित्वात असलेल्या दिसतात.

## ब) नेपाळः सामाजिक चळवळी

**प्रस्तावना**ः

भारत व चीन यांच्यामधील राष्ट्र म्हणजे नेपाळ होय. नेपाळ राष्ट्राचा अभ्यास करताना नेपाळची भौगोलिक स्थिती, भूराज्यदृष्ट्या असणारे विशेष महत्व आणि नेपाळ-राजेशाही ते लोकशाही पर्यंत चा प्रवास आपण अभ्यासला आणि माओवाद हे लोकशाही पुढील आव्हान आहे याचाही आढावा आपण घेतला आहे. आपल्या ''नेपाळ-सामाजिक चळवळ'' या प्रकरणात आपण नेपाळच्या सामाजिक चळवळी विषयीची पार्श्वभूमी, टप्पे व वैशिष्ट्ये आणि सिद्धता याविषयीचे विस्तृत आकलन करणार आहोत.

### उद्दिष्ट्ये

१) नेपाळमध्ये उदय झालेल्या चळवळींचा आढावा घेणे.

२) राजकीय संघर्ष व राजकीय अस्थिरता आणि चळवळींचा आढावा घेणे.

३) नेपाळमध्ये युवा व महिलांनी केलेल्या चळवळी अभ्यासणे आणि कारणमीमांसा करणे.

४) माओवादाने लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केल्यानंतर निर्माण झालेल्या पेचप्रसंग आणि चळवळींचा आढावा घेणे.

५) ठळक व प्रभावी मोठ्या चळवळींचा आढावा घेणे. (१९५१ ची क्रांती, १९९० चे जनआंदोलन, २००६ चे लोकतंत्र आंदोलन इ.)

**अ) सामाजिक चळवळ: पार्श्वभूमी व पैलू:**

- **पार्श्वभूमीः**

कोणत्याही राष्ट्राच्या विकासासाठी वा उद्धारासाठी किंवा प्रगतीसाठी बदल व परिवर्तन आवश्यक असते. सामाजिक चळवळ ही एक सामूहिक बदलाची सामूहिक कृती असून तिच्यामध्ये समाजातील सर्वच स्तराचे घटक सहभागी होत असतात त्यामध्ये लहान, थोर माणसे ही राजकीय, राष्ट्रवादी आणि शांतता प्रस्थापनेच्या विचारांनी प्रेरित झालेली असतात.

- **नेपाळः सामाजिक चळवळः**

नेपाळच्या ७० वर्षांच्या इतिहासात अनेक राजकीय व सामाजिक बदल घडून आले. या प्रवासात देशात सन-१९५१, १९७९,१९९० आणि २००६ चे सामाजिक चळवळी व आंदोलने अनुभवली व हाच नेपाळच्या ऐतिहासिक सामाजिक चळवळीचे पैलू होय.

- **उदयाची कारणे (पैलू):**

१) राजकीय पक्षपद्धती आणि टोकाचा पक्षसंघर्ष यातून होणारी अराजकता.

२) सातत्याने होणारे राजकीय बदल आणि विरोध व लोकांमध्ये निर्माण होणारी संभ्रमावस्था.

३) नेपाळमधील विभाजित राज्ये आणि भिन्न राजकीय दृष्टीकोन व स्वार्थी भूमिका आणि संघर्ष.

४) नेपाळ मधील भिन्न जाती-धर्म व्यवस्था आणि लोकांची बदललेली मानसिकता.

५) माओवादी हिंसाचार आणि राजकीय दबाव.

६) दारिद्र्य, शिक्षण महिला प्रश्न व सुधारणा यांबाबत असलेली उदासिनता.

- **सामाजिक चळवळी-टप्पे आणि स्वरूपः**

प्रामुख्याने नेपाळमधील सामाजिक चळवळींचे एकूण तीन प्रमुख टप्पे किंवा कालखंड आहेत ते पुढील प्रमाणेः

१) सामजिक चळवळः १९२० ते १९५१.

२) सामाजिक चळवळः १९६० ते १९९०.

३) सामाजिक चळवळः १९९० ते २००६.

उपरोक्त टप्पे किंवा कालखंड आपणांस पुढील विश्लेषणाद्वारे समजून घेता येतीलः-

- **पहिला कालखंड**

**१९२० ते १९५१:**

या कालखंडात-अभ्यास करत असताना आपणांस नेपाळमधील सामाजिक परिस्थितीचा आढावा घेता येईलः

नेपाळची सामाजिक परिस्थिती ही कमकुवत स्वरूपाची होती. या काळात प्रभावी राजकीय नेतृत्व वा परिस्थिती नेपाळमध्ये नव्हती.

ह्या परिस्थितीमुळे नेपाळची सामाजिक व्यवस्था ही समूह स्वरूपात विभागली होती. लोकांमध्ये मूल्यांची रुजवणूक वा जाणिवा भारताप्रमाणेच अभाव स्वरूपात होती.

१९२० ते १९५१ हा कालखंड म्हणजे नेपाळच्या जनतेसाठी आणि नेतृत्वासाठी अस्तित्व-सिद्धतेची लढाई होती. तत्कालीन परिस्थितीत नेपाळ हे राजेशाही व्यवस्थेच्या अधिन होते.

म्हणजे नेपाळमध्ये राजेशाही व्यवस्था अस्तित्वात होती. या राजेशाही व्यवस्थेमुळे-लोकांमध्ये स्वातंत्र्य, हक्क, न्याय याविषयी कसलीही जाणिव नव्हती. लोक हे शिक्षणापासून वंचित असल्याने राजेशाही व्यवस्थेच्या दडपणाखाली ते जीवन जगत होते.

१९२० च्या सामाजिक चळवळीतून लोकांच्या प्रबोधनास सुरूवात झाली. तत्कालीन समाज हा हिंदू व बौद्ध या जातींत विभागला गेला होता.

हळूहळू लोकांमध्ये शिक्षणाविषयीची जागरूकता निर्माण झाली, लोक राजकीय शिक्षण घेऊ लागले, सुजाण होऊ लागले. लोकांना आपल्या हक्कांची जाणिव होण्यास सुरूवात झाली.

राष्ट्रपती-आदर व प्रेमाची भावना वाढीस लागली आणि लोकं आपल्या हक्काविषयी जागरूक झाले.

**१९५१ ची क्रांती:**

- नेपाळमध्ये सुजाण व जाणिवा झालेल्या लोकांनी राजकीय चळवळीचा प्रारंभ केला.
- राजकीय जागरूकतेची व लोकशाही मूल्ये प्रसारणाची ही सुरुवात होती.
- राजेशाही व्यस्थेला विरोध होण्यास प्रारंभ झाला.
- याच काळात, प्रजापरिषद व नेपाळी राष्ट्रीय काँग्रेस हे दोन राजकीय पक्ष उदयास आले.

या प्रजापरिषद पक्षाने लोकांमध्ये लोकशाही मूल्यांची रुजवणूक होण्यासाठी लेख पत्रके प्रसारणाची मोहिम हाती घेतली. कालांतराने प्रजापरिषद पक्ष विसर्जित करण्यात आला.

२६ जाने. १९४७ रोजी नेपाळी राष्ट्रीय काँग्रेस हा पक्ष उदयास आला. यावेळी बिश्वेश्वर प्रसाद कोईराला हे या पक्षाचे नेतृत्व करित होते. या पक्षाने भारतातील स्वातंत्र्य लढ्याप्रमाणे 'सत्याग्रह' ही नागरी चळवळ उभारली व बदलास प्रारंभ झाला.

- **जयक्तु संस्कृतम्– युवा चळवळः**
  - याच दरम्यान जुलै १९४७ रोजी विद्यार्थ्यांनी राजेशाही ला विरोध करण्यासाठी आणि लोकशाही मूल्यांचा पुरस्कार करण्यासाठी जयक्तु संस्कृतम् या नावे व्यापक लढा सुरू केला.
  - ही नेपाळच्या इतिहासातील ऐतिहासिक चळवळ होय.
  - याच काळात–नेपाळी काँग्रेस लिबरेशन आर्मी यांनी बंड पुकारले तसेच – बिरतनगर येथे कामगारांनी मजदूर हरताळ म्हणजे 'संपालो' सुरूवात केली होती.

– हाच १९५१ चा नेपाळ मधील सामाजिक चळवळींचा व्यापक लढा होय.

**दुसरा कालखंडः**

**१९६० ते १९९०ः**

या कालखंडात आपण राजेशाहीला थेट विरोध कसा झाला याचा आढावा घेणार आहोतः

या कालखंडातील सामाजिक चळवळ ही राजेशाहीला प्रचंड व प्रकर्षाने विरोध करणारी होती. राजे महेंद्र यांनी १९६० साली राजेपदावरून पायउतार होऊन लोकशाही पद्धतीने बी. पी. कोईराला हे (१८ महिने) पंतप्रधान झाले.

या कालखंडात पंचायतराज व्यवस्थेचा उदय झाला. तसेच राज्यांना अधिकार बहाल करण्यात आले. वर्ग आधारीत संघटनांचा उगम याच कालखंडात झाला.

प्रशासनव्यवस्था निर्माण झाली परंतु भिन्न जाती आणि पंथाला एकाच व्यवस्थेत गुंफण्याचे मोठे आव्हान प्रशासकीय व्यवस्थेसमोर होते.

राजकीय पक्षांना थेट निवडणूक लढविण्याचे अधिकार नव्हते. खेड्यातील लोक हे जाती–धर्म–समूहांमध्ये राहत होते.

याच कालखंडात राजकीय पक्षांनी, विद्यार्थी आणि शिक्षक संघटनांनी आपल्या व जनतेच्या मागणीच हक्कांचा लढा सुरू ठेवला होता.

राजकीय दबाव गट निर्माण होऊन नव्या सामाजिक चळवळींचा प्रभाव नेपाळमध्ये होता.

याच कालखंडात शेतकऱ्यांचे पुढे येवू लागले आपल्या मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी संघटन उभे केले.

**१९९० जनआंदोलनः (भाग ०१)**

१९९० चे जनआंदोलन म्हणजे–'संसदीय लोकशाही' व्यवस्थेची रुजवणूक होण्यासाठीचा लढा होय. हा लढा नेपाळमधील सर्व राजकीय पक्षांनी एकीतून सुरू केला त्यामुळे संयुक्त डावे पक्ष, कॉंग्रेस, कम्युनिष्ट पार्टी सर्व राजकीय पक्ष एकत्र आले.

याद्वारे सर्व पक्षांनी आपल्या मागण्या जनतेपर्यंत पोहोचवल्या व जनतेला या व्यापक जनआंदोलनाशी जोडून घेतले.

या जनआंदोजनाद्वारे भेट राजेशाही बरखास्तीच्या मागणीने राजा महेंद्र मोठ्या पेचप्रसंगात अडकले. या जनआंदोलनाला शांत करण्यासाठी तडजोडीचा मार्ग स्वीकारण्यात आला परंतु राजकीय पक्षांनी त्यास विरोध केला.

लोकशाही महत्व आणि जनआंदोलनात सहभागी होण्यासाठी जनतेला व युवा वर्गाला त्यावेळी असणाऱ्या 'रेडिओ' संपर्क माध्यमांद्वारे आवाहन करण्यात आले.

या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाला व जनआंदोलनाचे स्वरूप अधिक व्यापक बनले.

जनआंदोलनावर भक्तपूर येथे पोलिसांकडून गोळीबार करण्यात आला यामध्ये १२ आंदोलनकर्ते मृत्यूमुखी पडले. हा संघर्ष अधिक चिघळला आणि विद्यार्थी आंदोलक व पोलिसांमध्ये समोरासमोर हल्ले झाले, १०० च्या वर आंदोलकांना पोलिसांनी अटक केले अनेक आंदोलक पोलिसांच्या लाठीमाराने जखमी झाले, यामुळे सार्वत्रिक बंद पुकारण्यात आला.

हे जनआंदोलन नेपाळची राजधानी काठमांडूपर्यंत पोहोचले व हिंसक घटना घडल्या. यामुळे राजे महेंद्र यांनी आंदोलकांशी बोलणी करण्याचे आश्वासन केले मात्र बोलणीचा मार्ग आंदोलकांनी नाकारला.

या अराजकतेला जबाबदार ठरलेल्या राजे महेंद्र यांनी राजेपद सोडले.

यानंतर या जनआंदोलनाचे फलित म्हणजे राज्यघटना निर्मिती आणि संसदीय प्रक्रियेला वेग आला.

या जनआंदोलनामुळे नेपाळमध्ये संसदीय लोकशाही पद्धतीचा पाया रचला गेला आणि नेपाळचा नव्या राजकीय वाटचालीकडे प्रवास सुरू झाला.

**तिसरा कालखंडः**

**१९९० ते २००६:**

हा कालखंड नेपाळमधील सुधारणांचा मागण्यांचा आणि आव्हानांचा कालखंड मानला जातो. याच कालखंडात ''नेपाळमधील दलितांचे प्रश्न'' पुढे आले. ''स्त्री हक्कासाठी सामाजिक चळवळी'' झाल्या आणि ''माओवाद्यांचा उदय'' होऊन माओवादी आव्हाने याची कारणीमीमांसा झाली.

या कालखंडाचा अभ्यास करताना आपणांस सुधारणांबरोबरच इतर तीन प्रमुख घटकांचा अभ्यास करणे गरजेचे आहे त्यामध्येः

१) नेपाळमधील दलितांचे प्रश्न

२) स्त्री हक्क सामाजिक चळवळ

३) माओवाद उदय आणि आव्हाने यांचा समावेश होतो.

- **१९९० ते २००६: लोकशाही व्यवस्थेतील काही बदलः**

  अ) राजकीय पक्षांना राजकीय प्रक्रियेत स्थान मिळाले म्हणजे राजकीय पक्षांमुळे सामाजिक बदलांना नवी दिशा मिळाली.

  ब) समूहाने राहणारे लोक हळू हळू एकत्रित पणे राहू लागले. त्यामुळे नव्या सामाजिक बदलांना आराम मिळाला. नागरी म्हणजे शहरी व ग्रामीण भागातील युवांना शैक्षणिक संधी प्राप्त होण्यास सुरूवात झाली. कृषी व आर्थिक विकासात वाढ होऊन प्रगतीला चालना मिळाली.

  क) जाती-धर्मापुरता मर्यादीत असणारा समूह हा मुक्तपणे राहू लागला. खेडी व समाज सुधारून नव्या सामाजिक बांधिलकीचा प्रारंभ झाला.

  ड) युवा वर्गाला रोजगाराचे मार्ग मिळण्यास प्रारंभ झाला.

  इ) हे बदल असले तरी नेपाळच्या दलित आदिवासींचा प्रश्न हा अजूनही सुटलेला नाही हे वास्तव आहे.

- **नेपाळः दलित जनतेचा प्रश्नः**

नेपाळ हे विविध जाती-धर्मांचे भौगोलिक दृष्ट्या महत्वाचे राष्ट्र असले तरी येथील दलित जनतेचा वा त्यांच्या हक्कांचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही हे वास्तव आहे.

**अ) मूलनिवासी दलित परंतु तरी वंचितः**

नेपाळमध्ये दलित हे मूलनिवासी असून सुद्धा ते वंचित आहेत किंवा त्यांच्या कडे दुर्लक्ष होत आहे. अलिकडच्या काळात ही परिस्थिती सुधारली आहे.

**ब) दलितांवर होणारा अन्याय आणि दखलः**

काही काळापर्यंत दलित कल्याणाची तरतूद नेपाळच्या राज्यघटनेत नव्हती आणि राजकीय पक्ष याबद्दल संवेदनशील नव्हते. परंतु अलीकडे ही परिस्थिती पूर्णतः सुधारली आहे. हे सकारात्मक पाऊल होय.

- **स्त्री हक्क, अस्तित्व व सामाजिक चळवळः**

नेपाळमधील महिला सबलीकरणाचा मुद्दा हा महत्वाचा होता. १९९० नंतर महिलांनी आपल्या हक्कांसाठी लढा सुरू ठेवला.

सध्याची नेपाळमधील महिलांची मागणी म्हणजे, त्यांना अस्तित्व व हक्कासाठी पुढे यायचे आहे.

सामाजिक चळवळीचा विचार केला असता महिलांनी आपल्या मागण्यांचा लढा हा १९९० पासून सुरू ठेवला. त्याचे फलित म्हणजे नेपाळमध्ये महिलांना ३३% आरक्षण देण्यात आले आहे. (''२०१३'' मध्ये तरतूद) सध्या नेपाळमध्ये Feminist Dalit Organisation (FEDO) ही संघटना महिला हक्क आणि अन्याविरूद्ध दाद मिळवून देण्यासाठी प्रभावीपणे काम करते.

- **१९९६: नेपाळमध्ये माओवादाचा प्रारंभ आणि २००६: माओवादविरोधी जनआंदोलन**

✻ १९९६ मध्ये नेपाळमध्ये माओवादाने हिंसक मार्गाने आपल्या हिंसाचाराची सुरुवात केली. याद्वारे सरकारवर दबावे आणण्याची हिंसेची पद्धत माओवाद्यांनी स्वीकारली.

✻ माओवाद्यांनी सशस्त्र संघर्षाचा मार्ग स्वीकारला होता आणि ग्रामीण भागातूनच माओवाद्यांनी सशस्त्र संघर्षाला सुरूवात केली होती.

✻ हिंसाचाराला व माओवादाला रोखण्यासाठी नेपाळमधील राज्यकर्त्यांनी तडजोडीचा मार्ग स्वीकारला आणि यानंतर माओवाद्यांना संसदेत आपले स्थान मिळवत आले.

✻ माओवाद्यांनी लोकशाही मार्गाचा अवलंब केला व ते सत्ताधीश बनले. पुष्पकमल दहल म्हणजे प्रचंड हे नेपाळचे पंतप्रधान बनले होते.

✻ परंतु मधेशी लोकांनी आंदोलने करून प्रचंड सरकारला तीव्र विरोध केला.

**२००६: जनआंदोलन: (भाग–२)/ लोकतंत्र आंदोलन**

२००६ चे जनआंदोलन म्हणजे माओवाद्यांना लोकशाही व्यवस्थेत सहभाग देण्यासाठीचा तीव्र विरोध होता.

कारण हिंसाचार विद्रोह करणारे, माओवादी देशाचे नेतृत्व कसे करणार हा प्रश्न व संभ्रावस्था लोकमनात होती.

- **सारांश:**

नेपाळमधील सामाजिक चळवळींचा आढावा घेतला असता आपणांस लक्षात आले की, नेपाळमध्ये सामाजिक चळवळी का उदयास आल्या, नेपाळमध्ये सामाजिक चळवळीचे तीन प्रमुख टप्पे–''१९२० ते १९५१/ १९६० ते १९९०/ १९९० ते २००६'' चे पैलू आणि घटना अभ्यासता आल्या. १९५१ ची क्रांती, १९९० चे जनआंदोलन (भाग १) २००६ चे जनआंदोलन (भाग २) म्हणजे लोकतंत्र आंदोलन या घटकांचा सर्वस्पर्शी अभ्यास आपण या घटकात केला.

- **समारोप:**

उपरोक्त विस्तृत विश्लेषणावरून आपणांस नेपाळमधील सर्व सामाजिक चळवळी विस्तृतपणे अभ्यासता आल्या.

**संदर्भ:**


१) Understanding social Movements in Nepal- Mohandas Manandhar- Excutive Director Niti foundation

२) "New social Maovements in Nepal"- The Orgnization_2004 edition

३) "Socio-Political Agenda in Nepal" - Social Inclusion Reaseach Foundation- 2006 publication.

४) "The Concept of socail Movement" Kate Nash edt-

Contemporary Political Sociology oxford- Blackwell Publishers- Ltd 2000 edition.

५) States of Nepal- Research Reports Social Inclusion Reaserch Foundation 2010

## क) नेपाळची अर्थव्यवस्था आणि विकास

**प्रस्तावना:**

नेपाळ हे भारतीय सीमेलगत असलेले एक स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र आहे. तसेच नेपाळची अर्थव्यवस्था ही भारताशी निगडीत असून नेपाळ हे सामाजिक व राजकीयदृष्ट्या भारतावर अवलंबून असलेले दिसून येते.

२० व्या शतकाच्या मध्यापर्यंत जगापासून अलिप्त असलेली नेपाळची समाजव्यवस्था होती. जी १९५१ पर्यंत शाळा, दवाखाने, रस्ते, संदेशवहन, विद्युत कारखाना व नागरी सेवा इ. पासून अलिप्त होती. परंतु १९५० च्या आर्थिक उदारीकरणानंतर प्रगतीच्या मार्गावर आहे. नेपाळने आतापर्यंत ९ पंचवार्षिक योजना राबवून वेगवेगळ्या क्षेत्रात आर्थिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केलेला असून सार्वजनिक क्षेत्रातल्या उद्योगांचे खाजगीकरण केले आहे. तसेच १९७५ पासून प्रशासकीय व ग्रामीण विकासामध्ये प्रगती केलेली दिसून येते.

तसेच शेती नेपाळच्या आर्थिक घटकांमधील महत्वाचा भाग असून नेपाळच्या लोकसंख्येपैकी ७०% लोक शेतीवर अवलंबून असलेले दिसतात. त्यामध्ये GDP चा ३७% हिस्सा शेतीवर आधारित आहे. नेपाळच्या एकूण भूभागापैकी २०% भूभाग शेतीयोग्य आहे तर ३३% भूभाग जंगलांनी व्यापला असून उर्वरित प्रदेश डोंगराळ आहे. भात व गहू नेपाळची प्रमुख पिके आहेत. ती हिमालयाच्या तराई भागात घेतली जातात.

नेपाळची GDP मुख्यत्वे परदेशात काम करणाऱ्या नागरिकांवर व त्यांच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून आहे. त्यामुळे नेपाळची आर्थिक व सामाजिक स्थिती मंदावलेली दिसून येते.

**अ) परकीय गुंतवणूक आणि करप्रणाली (नेपाळ)**

नेपाळमध्ये मोठ्या प्रमाणावर लहान-लहान परकीय गुंतवणूकी होतात. उदा NRI नेपाळी (Non-Resident Nepali) शॉपिंग मॉल, प्लाझा Real Estate Business पर्यटनामधील गुंतवणूक त्याचबरोबर नेपाळमध्ये जलविद्युत निर्मितीची प्रचंड क्षमता असल्यामुळे परदेशी कंपन्या गुंतवणूक करताना दिसतात. परंतु नेपाळच्या राजकीय अस्थैर्यामुळे या गुंतवणुकीत अडथळे निर्माण होतात. तसेच नेपाळने १० देशांबरोबर Double Taxation Avoidance करार केला आहे. नेपाळमध्ये २००० पासून स्थापित व विकसित झालेल्या कारपेट आणि कापड उद्योगांमुळे तेथील अर्थव्यवस्थेत आमुलाग्र बदल झालेला आहे सन २०००-०१ मध्ये नेपाळमधील निर्यात १४% वाढून व्यापारी तूट ४% पर्यंत खाली आली होती. तसेच अलीकडे युरोपीयन संघ ही नेपाळच्या कारपेट आणि कापड उद्योगाचा उपभोक्ता असून एकूण उद्योगातील ४६.१५% वाटा उचलत असलेला दिसून येतो.

## ब) पर्यटन

जगातील १० सर्वांत उंच शिखरांपैकी ८ शिखरे नेपाळमध्ये आहेत. त्यामध्ये माऊंट एव्हरेस्ट हे सर्वांत उंच शिखर नेपाळमध्ये असल्यामुळे जगभरातील पर्यटक नेपाळकडे आकर्षित होतात. त्यामुळे पर्यटन विकासाकडे नेपाळचे शासन विशेष लक्ष पुरवत आहे, व त्यातूनच सार्वजनिक क्षेत्रातील व खाजगी क्षेत्रातील प्रकल्प पूर्ण करण्यात आलेले आहेत.

## क) जलविद्युत

८३००० MW मेगावॅट इतकी प्रचंड मोठी जलविद्युत क्षमता असलेल्या नेपाळमध्ये गुंतवणूक करण्यासाठी वेगवेगळ्या देशांमधील परदेशी कंपन्या तसेच भारत, बांगलादेश, चीन सारखे शेजारील देश उत्सुक आहेत. ज्यामुळे नेपाळच्या अर्थव्यवस्थेवर अनुकूल फरक पडेल. परंतु काही राजकीय अडथळे असलेले दिसतात. ते दूर करून आर्थिक व पायाभूत विकासाला चालना देण्यासाठी नवनिर्वाचित नेपाळ शासन पावले उचलत आहे.

## ड) वार्षिक मान्सून पर्जन्य

नेपाळच्या अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम करते. तरीही १९९६-९९ केवळ ४% असणारा GDP दर १९९९ मध्ये ६% पोहोचला व त्यांनतर ५.५ ते ५.४ इतका स्थिरावला आहे.

निर्यातीमधील वाढ परकीय थेट गूंतवणूक तसेच इंग्लंड, अमेरिका, जपान, जर्मनी, इत्यादी देशांकडून मिळणारी आर्थिक मदत तसेच वेगवेगळ्या संघटना जसे की जागतिक बँक, एशियन डेव्हलपमेंट बँक, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम इ. कडून मिळणारी मदत नेपाळच्या आर्थिक विकासाचा एक भाग आहे.

**सांख्यिकी माहितीः**

GDP -$ 42.60 billion (2012), $ 67 billion(2014)

GDP -$ per capita $ 2374.2(2014)

GDP Composition by sector

१) शेती (कृषी) -३५%

2) उद्योग -२०%

3) सेवा -५०%(२०१४ est)

लोकसंख्येचे दारिद्र्य रेषेखालील प्रमाण-२५.२%(२०१०)

नेपाळमधील व्यवसाय वर्गीकरण

१) शेती- ८१%

२) सेवा- १६%

३) उद्योग - ३%

बेरोजगारी दरः ३८%(२०१२)

नेपाळचे चलन Nepalese Rupee(NPR=100 Paisa)

आर्थिक वर्ष 16 July to 15 July

Public Finances

1) Revenues- $6 billion(2013)

2) Expenditure- $ 7 billion (2013)

कृषी उत्पादक भात, मका, गहू, ऊस, दूध

एकूण निर्यातः $ 1.2 billion(2016) f.o.b.

निर्यात वस्तू- कपडे, चामड्याच्या वस्तू विविध कारपेटस्, चहा, कॉफी ज्यूट निर्यातील सहभागी देश

i) India- 61.2%

ii) US- 9.4%

iii) जर्मनी- 6.6%

एकूण आयातः $ 7.2 billion f.o.b. (2016)

आयात वस्तू- सोने, Machinary equipment खते व पेट्रोलियम पदार्थ.

आयात सहभागी देश

i) India- 61.4%

ii) China- 15.4% (2015)

iii) UAE- 2.6%

iv) Singapure - 2.1%

v) Soudi- 1.2%

अशा पद्धतीने नेपाळची अर्थव्यवस्था ही भारताशी निगडीत असून नेपाळमध्ये १९७५ पासून प्रशासकीय व ग्रामीण विकास घडून आलेला आहे.

**वस्तुनिष्ठ प्रश्नः**

१) नेपाळी ही भाषा..... समूहातील आहे.

अ) इंडो-बांग्ला ब) इंडो आर्यन क) इंडो-जपान ड) यापैकी नाही

२) नेपाळमध्ये ...... धर्माच्या लोकांची जास्त संख्या आहे.

अ) हिंदू ब) बौद्ध क) इस्लाम ड) ख्रिश्चन

३) नेपाळमध्ये 'युवा चळवळ' ...... साली सुरू झाली.

अ) १९४० ब) १९४७ क) १९५५ ड) १९६०

४) नेपाळची जास्तीत जास्त जनता कोणत्या व्यवसायावर अवलंबून आहे?

अ) पर्यटन ब) शेती क) सेवा क्षेत्र ड) उद्योगधंदे

**उत्तरे**: १) ब २) अ ३) ब ४) ब

**स्वाध्याय:**

१) नेपाळमधील सामाजिक चळवळींचा सविस्तर आढावा घ्या.

२) नेपाळमधील सामाजिक व्यवस्था तसेच अर्थव्यवस्था स्पष्ट करा.

**टीपा लिहा.**

१) नेपाळमधील जन आंदोलन

२) नेपाळमधील जातीव्यवस्था

३) नेपाळमधील अर्थव्यवस्था व विकास

**संदर्भ**: 1) https://en.m.wikipedia.org

❑❑❑

### सत्र ४ : घटक ३

## ३.४ नेपाळ : समकालीन राजकारण

अ) नेपाळमधील राजकीय पक्ष व राजकारण

ब) नेपाळमधील एकात्मता आणि एकात्मतेसमोरील आव्हाने

### अ) राजकीय पक्ष व राजकारण

**प्रस्तावना**

भारताच्या सीमेलगत, श्रीलंकेला लागून असणारे राज्य म्हणजे, नेपाळ होय. नेपाळ हे सार्वभौम राज्य असून, नेपाळची अर्थव्यवस्था ही भारताशी निगडीत आहे. नेपाळ हे आर्थिक, सामाजिक व राजकीय अशा बऱ्याच गोष्टींसाठी भारतावर अवलंबून आहे. नेपाळच्या राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला असता, नेपाळ हे राजेशाही ते लोकशाहीकडे वाटचाल करणारे राष्ट्र आहे. सध्या त्यांच्या लोकशाहीपुढील आव्हान म्हणजे माओवाद हे आहे. नेपाळच्या राजेशाही शासन व्यवस्थेचा अभ्यास केला असता, पृथ्वीनारायण हे राजेघराणे २४० वर्षे सत्तेवर असले तरी, राणा कुटुंबीयांनी १०० वर्षे सत्तेचा उपभोग करून घेतला. पृथ्वीनारायणाने नेपाळच्या राजकीय परिस्थितीत खूप मोठे बदल केले. १८५६ मध्ये जंगबहादूर राणा या राजाची सत्ता नेपाळवर होती.

राणा घराण्याला शह देण्यासाठी राजा त्रिभुवन याने काँग्रेस पक्षाचा आधार घेतला. १९४६ साली बनारस येथे ''अखिल भारतीय नेपाळी काँग्रेसची'' स्थापना झाली.

यातुनच पुढे नेपाळच्या राजकीय प्रवासाची सुरूवात झाली. नेपाळमध्ये बहुपक्षपद्धती आहे. लहान मोठे नेपाळमध्ये जवळपास २५ ते ३० राजकीय पक्ष आहेत.

**उद्दिष्टेः**

१) नेपाळच्या राजकीय पक्षपद्धतीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

२) नेपाळच्या राजकीय परिस्थितीची माहिती घेणे.

३) नेपाळची राजेशाही, लोकशाही आणि माओवादाचे आव्हान यावर अभ्यास करणे.

४) नेपाळचे विविध घटक पक्ष आणि प्रदेशाच्या राजकारणाचे हित जपणारे पक्ष यांचा अभ्यास.

**१) नेपाळ काँग्रेस पक्षः**

नेपाळ काँग्रेस हा सुधारलेला व सुधारणांना प्रमुख मानणारा राजकीय पक्ष आहे. पद्मसमशेर राणा हे काँग्रेस पक्षातून झालेले नेपाळचे पंतप्रधान होय. १९६० ला राजा महेंद्र यांनी अनेक नेत्यांना कैद केले होते. १९९० च्या जनआंदोलनाचे नेतृत्व नेपाळी काँग्रेसने केले. १९९१ च्या सार्वत्रिक

निवडणूकीमध्ये नेपाळी काँग्रेसला बहुमत प्राप्त झाले. गंगाप्रसाद कोईराला हे पंतप्रधान असताना, १९९४ साली मुदतपूर्व निवडणूका घेण्यात आल्या. परंतु या निवडणूकीमध्ये कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही.

१९९९ च्या झालेल्या निवडणूकीत नेपाळी काँग्रेसला बहुमत मिळाले. पुढे नेपाळी काँग्रेसमध्ये दोन गट निर्माण झाले.

१) भट्टाचार्य गट २) कोईराला गट

२००१ साली शेरदेवबा हे पंतप्रधान झाले आकडेवारीचा विचार केला असता.

**नेपाळी काँग्रेसः**

२००८ः ११५ जागा-२२% मते

२०१३ः १९६ जागा- २९.८०% मते

हा नेपाळी काँग्रेसचा लेखा जोखा अभ्यासता येतो.

**२) जनमोर्चा नेपाळः (जनमुक्ती पक्ष)**

स्थापनाः २००२

नेपाळमधील दुसरा राजकीय पक्ष म्हणजे जनमोर्चा नेपाळ पक्ष होय. हा पक्ष साम्यवादी विचारसरणीचा पुरस्कार करतो.

राष्ट्रीय जनमोर्चा आणि जनमोर्चा नेपाळ २००२ (१० जुलै) ला संयुक्तपणे एकत्र आले. १९९१ च्या निवडणुकीत संयुक्त जनमोर्चा या रूपाने दोनी पक्ष सहभागी झाले होते. यावेळी या पक्षांना ०९ जागा प्राप्त होऊन संसदेत तिसरे स्थान प्राप्त झाले.

२००२ मध्ये दोन्ही पक्षाचे २३-२३ असे सदस्य एकूण ४६ जण जनमोर्चा (संयुक्तपणे) नेतृत्व करत होते.

या पक्षाच्या स्थापनेवेळी एकूण ०६ सदस्य होते.

१) लीला मनी पोरखेल २) हरि आचार्य

३) चित्रा बहादूर (ke) ४) पारी थापा

५) नराज सुबेदी ६) दिलाराम आचार्य

२००६ मध्ये जनआंदोलनात या पक्षाने ०७ पक्षांबरोबर युती केली.

२००८ साली मिळालेल्या जागा ०८ एकूण टक्केवारी १.३३%

२०१३ मध्ये या पक्षाला ०३ जागा मिळाल्या.

### ३) मधेशी जनाधिकार फोरमः

नेपाळमधील तिसरा पक्ष म्हणजे मधेशी जनाधिकार फोरम होय. २००८ मध्ये नेपाळच्या निवडणूक आयोगाने या पक्षाच्या काही त्रुटी निदर्शनास आणून दिल्या.

या पक्षात त्यावेळी केवळ ०३ महिला होत्या व नियमानुसार ३३% महिला असणे बंधनकारक होते.

१६ मार्च २००८ मध्ये या पक्षाने जाहिर केलेल्या आपल्या जाहिरनाम्यात नेपाळ हे सांघिक राष्ट्र आहे असे घोषित केले.

या पक्षाचे निकाल आकडेवारीः

२००८ः ५४ जागा ६.१५% मते

२०१३ः १४ जागा ३.१३% मते

### ४) नेपाळ परिवार दलः

२००८ च्या सार्वत्रिक निवडणूकीत या पक्षाचा ०१ उमेदवार निवडून आला होता.

आपला पक्षप्रतिनिधी व विधानसभेत विधानमंत्री या नावे एकनाथ धकल यांचे नाव पक्षाने जाहिर केले होते.

०९ नोव्हे. २०१३ च्या निवडणुकीत विधानसभेसाठी २४० उमेदवारांची यादी जाहिर केली आणि ०२ जागा जिंकल्या.

२००८ः ०१ जागा

२०१३ः ०२ जागा ०.१६% मते.

### ५) नेपाळ कम्युनिष्ठ पार्टीः

नेपाळ कम्युनिष्ठ पार्टी हा पक्ष नेपाळमधील मोठा व व्यापक स्वरूपाचा पक्ष आहे. ०६ जाने. १९८१ साली नेपाळी मार्क्सवादी व लेनिन वादी या संघटनेतून हा पक्ष तयार झाला.

या संघटीत पक्षाने नेपाळी कॉंग्रेसविरूद्ध एक जनआंदोलन केले आणि यामुळे नेपाळमध्ये लोकशाही टिकवून राहण्यास मदत झाली.

२०१३ च्या सार्वत्रिक निवडणुकीत या पक्षाने ५७५ पैकी १७५ जागा जिंकून आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

पुढे मदन भंडारी हे पक्षाचे जनरल सेक्रेटरी झाले तर, मनमोहन हे अध्यक्ष झाले. पुढे भंडारी यांचे निधन झाल्यामुळे माधव कुमार हे २००८ पर्यंत जनरल सेक्रेटरी या पदावर कार्यरत होते.

२०१४ च्या निवडणुकीत अध्यक्ष म्हणून के. ची. ओली यांची निवड करण्यात आली व माधव कुमार सार्वत्रिक निवडणुकीत पराभूत झाले.

**निवडणूका निकालः**

२००८ः १०८ जागाः २१.६३% मते

२०१३ः १७५ जागाः २७.५५% मते

**६) नेपाळ कामगार शेतकरी पक्षः**

स्थापनाः ०६ जाने. १९९१

मुख्यालयः काठमांडू

नेपाळ कामगार शेतकरी पक्ष हा नेपाळमधील साम्यवादी राजकीय पक्ष आहे. या पक्षाला युवा संघटन Nepal Revolutionery youth union म्हणजे या नावे सुद्धा ओळखले जाते.

या पक्षाने नेपाळच्या साम्यवादी चळवळीत लोकांची लोकशाही आणि अधिकार याबद्दल संघर्ष सुरू ठेवला. (१९९९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत या पक्षाला ०१ जागा मिळाली) ठराविक प्रदेशापुरता हा पक्ष प्रभावशाली आहे. त्यामुळे हा पक्ष मर्यादित स्वरूपाचा आहे असे म्हणता येईल.

या पक्षाने २००६ च्या जनआंदोलनात ०७ पक्षांसोबत युती केली. परंतु सरकारला पाठिंबा या पक्षाने कधीच दिलेला नाही.

२००८ मध्ये सार्वत्रिक निवडणुकीत या पक्षाने ०५ जागा जिंकल्या असून २०१३ मध्ये ०४ जागा जिंकल्या आहेत.

आकडेवारीः २००८ः ५ जागा– ०.६४%

२०१३ः ०४ जागा ०.६०%

**७) छुरे बाबर राष्ट्रीय एकता पार्टीः**

छुरे बाबर राष्ट्रीय एकता पक्ष हा २००८ च्या निवडणुकांमध्ये सक्रिय झाला. या पक्षाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे हा पक्ष दुर्गम क्षेत्रातील जनतेचे संरक्षण करतो. सार्वत्रिक निवडणुकीत या पक्षाने ०१ जागा जिंकली आहे.

पुष्प कमल दहल हे या पक्षात काही काळ होते परंतु १९ ऑगस्ट २००८ रोजी पक्षातून बाहेर पडले.

**८) कम्युनिष्ठ पार्टीः (मार्क्सवाद लेनिनवाद)**

स्थापनाः २००२

ठिकाणः काठमांडू

२००६ च्या जनआंदोलनात हा पक्ष सक्रीय होता.

२००८ च्या विधानसभा निवडणुकीत या पक्षाने आपले १६८ उमेदवार घोषित केले आणि ०९ जागा जिंकल्या.

पुढे या पक्षाचे नाव बदलून ''समाजवादी'' असे देण्यात आले.

आकडेवारीः

२०१३-०५ जागा/२००८-०९ जागा

**९) राष्ट्रीय प्रजातंत्र पार्टीः**

नेपाळमधील राष्ट्रीय प्रजातंत्र पार्टी या पक्षाची स्थापना १९९० साली झाली. १९९० च्या निवडणुकीत या पक्षाने २०५ पैकी ११ जागा मिळल्या. डिसेंबर २००२ मध्ये पोखरा येथे पक्षाच्या संमेलनात अध्यक्ष सूर्य बहादूर थापा हे निवृत्त झाले. पुढे तीन उमेदवारांची नावे जाहिर करण्यात आली.

यामध्ये महासचिव पशुपति एस.जे.बी. राणा, उपाध्यक्ष प्रकाश चंद लोहोनी केंद्रीय सचिव रविंद्रनाथ वर्मा यांचा समावेश होता.

यामध्ये एस.जे.बी. राणा यांना सर्वाधिक मते मिळाली, लोहोनी दुय्यम तर शर्मा हे तृतीय स्थानी होते. पुढे २००५ साली या पक्षाचे विभाजन झाले. जनशक्ती पक्ष अस्तित्वात आला.

या पक्षामध्ये तीन मुख्य आधारस्तंभ होते. राष्ट्रवाद, लोकशाही आणि उदारमतवाद या विचारांचा यात समावेश होता.

२००८ मध्ये या पक्षाला अधिकृत मान्यता मिळाली. पुढे विभानसभा निवडणुकीत या पक्षाला ५७५ पैकी २४ जागा मिळाल्या, २०१३ साली या पक्षाला १३ जागा मिळाल्या.

**१०) तराई मधेश लोकतांत्रिक**

पक्षः(२००७)

माजी मंत्री व नेपाळ काँग्रेसचे नेते महांथा यांनी या पक्षाची स्थापना केली. २७ डिसेंबर रोजी हा पक्ष राजकीय पक्ष म्हणून घोषित करण्यात आला.

२००७ मध्ये तराई मधेशी लोकतांत्रिक पार्टीमधील महांथा ठाकूर यांनी संसदेतील ०४ संसद सदस्यांच्या मदतीने या पक्षाची स्थापना केली अध्यक्ष म्हणून महांथा ठाकूर यांची निवड करण्यात आली. यामधील सदस्य पुढीलप्रमाणेः

महेंद्र कुमार यादव, रामचंद्र राय, अनिश अन्सारी, रामचंद्र कुशवाह, माजी न्यायमूर्ती श्रीकृष्ण यादव, गोंविद प्रसाद चौधरी, रामकुमार शर्मा, जितेंद्र सोनल, दिलीप सिंग, आणि इतर काही सदस्य होते.

२००८ च्या निवडणुकीत या पक्षाला २१ जागा मिळाल्या, तर २०१३ मध्ये ११ जागा मिळाल्या.

अनुक्रमे-३.३५% व १.९०%

ही आकडेवारी समोर येते.

**समारोपः**

एकंदरीत नेपाळ मधील राजकीय पक्षपद्धतीचा अभ्यास करताना प्रत्येक घटकामधून आपणांस राजकीय पक्षाचे कार्य, भूमिका आणि निवडणूका निकाल व स्थान हे अभ्यासता आले.

नेपाळः राजकीय पक्षांमधील मोठे आव्हान म्हणजे माओवाद होय, हे सुद्धा आपणांस अभ्यासता आले.

**ब) नेपाळः एकात्मता आणि एकात्मतेसमोरील आव्हाने**

''**भाग अः नेपाळः एकात्मता**''

**प्रस्तावनाः**

नेपाळ हे राष्ट्र भूराज्यदृष्ट्या महत्वाचा प्रदेश आहे. एकात्मतेच्या दृष्टीने विचार केला असता नेपाळचा राजकीय प्रवास हा राजेशाही ते लोकशाही आणि त्यापुढील प्रमुख आव्हान म्हणजे माओवाद आणि आपण अभ्यासत असलेल्या या घटकात एकात्मता आणि एकात्मतेपुढील आव्हानांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

नेपाळः एकात्मता आणि एकात्मतेपुढील आव्हाने अभ्यासणे हे पुढील उद्दिष्टांवरून स्पष्ट होईल.

**उद्दिष्टेः**

१) राष्ट्रीय एकात्मतेच्या घटकांचा आढावा घेणे.

२) नेपाळमधील जात व धर्मव्यवस्था यांचा अभ्यास करणे.

३) जात व धर्म आणि त्यांचा एकात्मतेवरील परिणामांची चर्चा करणे.

४) सामाजिक व भौगोलिक परिस्थिती भाषिक समूह यांचा एकात्मतेवरील परिणाम याचा आढावा घेणे.

५) एकात्मतेपुढील आव्हानांचे विविध पैलू यांचा अभ्यासपूर्व आढावा घेणे.

- **एकात्मता म्हणजेः**

''एकात्मता ही एक विस्तारवादी प्रणाली असून त्यामध्ये समाज, जात, धर्म, भाषा, परिस्थितीनुसार होणारे बदल आणि बदलांमुळे झालेल्या देशावरील परिणाम'' यांचा अभ्यास केला जातो.

**प्रस्तावनाः नेपाळ पार्श्वभूमी**

चीन व भारत यांच्यामध्ये ''नेपाळ'' असून नेपाळ हा टेकड्यांचा प्रदेश आहे. नेपाळच्या टेकड्यांच्या प्रदेशात 'पृथ्वीनारायण शाह' हा एका छोट्या राज्याचा प्रमुख होता. हा टेकड्यांचा प्रदेश म्हणजे 'गुरखा' किंवा 'गोरखा' या नावे परिचित आहे. गुरखा ही जात नसून प्रदेश आहे आणि त्या प्रदेशात राहणारे लोक म्हणजे गोरखा किंवा गुरखा लोक होय.

- **सांस्कृतिक पार्श्वभूमीः**

सांस्कृतिक पार्श्वभूमीचा विचार केला असता, तिबेट, भारत आणि चीन या राष्ट्रांतून लोक नेपाळमध्ये वास्तव्यास येत होते.

* त्यामुळे नेपाळी संस्कृती ही भिन्न स्वरूपाची आहे. म्हणजे आर्य व हिंदू या घटकांचा समावेश होतो.
* भिन्न संस्कृती असली तरी नेपाळमध्ये 'विविधतेतून एकता' आहे यात शंका नाही.
* काही अंशी लोक हे 'एक भाषा एक राष्ट्र' या तत्वाचे समर्थन करतात.
* नेपाळच्या भौगोलिक बाजूचा विचार केला असता, हवाई वाहतूक, रस्ते जोडणी, संपर्क माध्यमे यामुळे नेपाळमधील एकता ही अबाधित आहे.
* नेपाळची राष्ट्रीय एकता ही भिन्न धर्म, भिन्न जाती, भिन्न पेहराव (पोशाख) भिन्न प्रदेश, भिन्न संस्कृती व परंपरा आणि समाज यामध्ये सामावलेली आहे.

- **राष्ट्रीय एकात्मता विविध पैलूः**

**१) राजकीयः**

राजकीय एकात्मतेच्या दृष्टीने विचार केला असता भिन्न स्तर आणि भिन्न राजकीय घडामोडी आणि राज्यांची भूमिका, या मुद्द्यांचा अभ्यास केला असता राज्यांनी जनतेच्या हितासाठी निर्माण केलेल्या योजना, जनतेच्या हितासाठी अवलंबलेले उपाय आणि त्यामध्ये असणारा जनतेचा सहभाग या सर्व बाबींचा अभ्यास आणि राज्यकर्त्यांना वा योजनांना मिळणारे जनतेचे सहकार्य याचा अभ्यास होय.

### २) सामाजिकः (जाती धार्मिक भिन्नता)

सामाजिक पैलूंचा अभ्यास केला असता, नेपाळमधील भिन्न जातीचे लोक हे प्रदेशाआधारे राहतात. समूहाने नेपाळच्या मध्यभागात वस्ती किंवा समूहाने राहणारे लोक म्हणजे भारतातून स्थलांतरीत झालेले रजपूत व ब्राह्मण होय. तराई भागात भारतातून स्थलांतरीत झालेले शेतकरी, मुस्लीम, आणि व्यापारी वर्गाचा समावेश होतो. तराई भागातील मूलनिवासी म्हणजे आदिवासी होय. त्यांना 'थरू' असे म्हणतात. हा प्रदेश 'मधेश' म्हणून ओळखला जातो.

राजघराणे व रजपूतांच्या उपजाती असल्याने त्यांना हिंदू म्हणून ओळखले जाते. त्यामुळे हा समाज 'चार्तुवर्ण्य व्यवस्था' मानणारा आहे. नेपाळी भाषा हिंदीसारखी असून यात संस्कृत भाषेचा अंशतः प्रभाव समाविष्ठ आहे.

रजपूतांच्या प्रमुख जाती या 'ठाकुरी' म्हणजे 'ठाकूर' आहेत.

खाटमांडू खोऱ्यातील प्रमुख समाज म्हणजे 'नेवार' या समाजतील सुशिक्षित लोकांचा प्रभाव राज्यकारभारातील अधिकारी आणि तंत्रकुशल आणि व्यापारात प्रमुख स्थान आहे.

नेपाळमध्ये 'बौद्ध' समाजाची संख्या लक्षणीय असून अनेकांनी हिंदू चालिरिती स्वीकारल्या आहेत.

उत्तरेकडील डोंगराळ भागात राहणारे तामांग हेही आदिवासी असून त्यांच्यावर सुद्धा बौद्ध धर्माचा प्रभाव आहे. मगर व गुरुंग या सुद्धा आदिवासी जमाती असून त्या मध्यभागातील प्रदेशात राहतात.

यावरून आपणांस हे समजून घेता येईल की, भिन्न जाती, धर्म, परंपरा, संस्कृती, लोक आदी सर्व बाबींचा समावेश नेपाळमध्ये आहे. (विविधतेतून एकता)

### ३) आर्थिकः

राष्टीय एकात्मता व आर्थिक स्थैर्याचा जवळचा संबंध आहे. एका अहवालानुसार ४२.०५% लोकसंख्या ही दारिद्र्यरेषेखाली आहे. याचा परिणाम असा की, बहुतांश लोक हे काम व कौशल्यहिन जीवन जगत आहेत. जर यांच्या हाताला कौशल्याची जोड दिली नक्कीच त्याचा सकारात्मक परिणाम आर्थिक एकात्मतेवर होईल आणि जीवनमान सुधारून त्याचे सामाजिक जीवनावरील परिणाम हे सकारात्मक स्वरूपात दिसतील.

### ४) मानसिकताः

नेपाळ या राष्ट्राची एकात्मता अबाधित राहिल व ती सतत बदलण्याची वा परिवर्तनाची भूमिका ठेवणाऱ्या जनतेमुळेच भिन्न जाती, धर्म, भाषा संस्कृती आणि परंपरा यामुळे नेपाळचे लोक समूहाने राहत आहेत त्यांच्या मानसिकतेत बदल करून जर भारतीय राज्यघटनेतील तत्वाप्रमाणे 'आम्ही

एकात्म जनता' किंवा 'एकता' मूल्यांची रुजवणूक केली तर नक्कीच राष्ट्रीय एकात्मता अबाधित राहिल.

## समारोपः

उपरोक्त सर्व मुद्द्यांवरून आपणांस नेपाळच्या राष्ट्रीय एकात्मतेचे विविध पैलू अभ्यासता आले. नेपाळ च्या राष्ट्रीय एकात्मतेसाठी सांस्कृतिक, धार्मिक भिन्नता ही एकतेशी जोडणे व लोकांच्या मानसिकतेत बदल करून एकता मूल्यांची रुजवणूक करण्याची गरज आहे हे अभ्यासावरून स्पष्ट होते.

**''भाग बः एकात्मतेसमोरील आव्हाने''**

**प्रस्तावनाः**

नेपाळच्या राष्ट्रीय एकात्मतेचा अभ्यास केल्यांनतर आपणास एकात्मतेसमोरील आव्हानांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. एकात्मतेसमोरील आव्हानांची कारणमीमांसा, त्याचे घटक आणि आव्हाने कोणती हे वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासणे गरजेचे आहे.

या आव्हानांचा अभ्यास करताना पुढील टप्पे समजून घेणे आवश्यक आहे.

**अ) एकात्मतेपुढील समस्याः**

**१) सुरक्षा दलात जनतेचा किंवा युवकांचा अल्प सहभागः**

i] नेपाळ राष्ट्रांतील मर्यादित राज्ये सोडली असता, बहुतांश भागातील युवा वर्ग हा नागरी सेवा, पोलीस आणि सुरक्षा दलात सहभागी होण्यासाठी अल्प प्रतिसाद देतो. (सध्याची परिस्थिती सुधारलेली आहे, आता अंशतः प्रमाणात कमी प्रतिसाद मिळतो)

**२) जातीनिर्मूलन एक समस्याः**

i] नेपाळच्या विविध भागात किंवा राज्यांत भिन्न जाती धर्माचे लोक वास्तव्यास आहेत.

ii] जाती धर्माचा प्रभाव लोकांवर असल्याने जातीय भेद आणि भिन्नता आढळते.

तसेच जातींमध्ये उच्च निच असा भेदभाव असल्याने एकात्मतेसमोर जाती निर्मूलनाचे मोठे आव्हान आहे.

**३) भिन्न भाषा व हिंदू धर्मः**

i] नेपाळमध्ये भिन्न भाषा, भिन्न जाती असणारे लोक राहतात, बहुतांशी लोक हे स्वतः हिंदू आहेत.

ii] त्यामुळे नेपाळमध्ये सततपणे 'एक भाषा एक राष्ट्र' या तत्वाच्या प्रस्थापनेसाठी प्रयत्न होत आहेत.

**४) निरक्षरता (शैक्षणिक प्रमाण):**

i] गरिबी, दुर्गम भागात दळणवळणाच्या साधनांचा अभाव याबरोरच 'निरक्षरता' ही एक समस्या नेपाळमध्ये आहे.

ii] निरक्षर असल्याने बहुतांश लोक अद्यापही समूहात राहिले आहेत.

या समस्यांचा आढावा घेतल्यानंतर आपणांस एकात्मतेपुढील आव्हाने अभ्यासता येतील.

**प्रस्तावना:**

आव्हांनांचा आढावा घेताना नेपाळमधील प्रमुख आव्हाने म्हणजे

अ) अंमली पदार्थ सेवन रोखणे हे बलाढ्य आव्हान.

ब) माओवाद आणि हिंसा.

नेपाळच्या आव्हांनांमध्ये उपरोक्त आव्हाने ही व्यापक स्वरूपाची असून एकात्मतेस धोका निर्माण झाला असून त्यांना वेळीच पायबंद घालणे गरजेचे आहे.

**अ) अंमली पदार्थ: एक आव्हान**

**पार्श्वभूमी:**

अंमली पदार्थ चे सेवन ही जागतिक स्वरूपाची समस्या असून नेपाळमध्ये ही समस्या फोफावली आहे.

१९९० नंतर या समस्येने व्यापक रूप धारण केले आणि त्याचा परिणाम सामाजिक, आर्थिक व राजकीय घटकांवर दिसून आला. अंमली पदार्थाचे सेवन नेपाळमधील लाखो लोक करत असून दिवसेंदिवस त्याचे प्रमाण वाढत आहे.

अंमली पदार्थाच्या सेवनात व्यसन इंजेक्शन द्वारे सेवन आदी घटकांचा समावेश होतो, तसेच HIV चे प्रमाण सुद्धा नेपाळमध्ये वाढले आहे.

या अंमली पदार्थांना रोखण्यासाठी गृहमंत्रालय आणि अशासकीय संघटना प्रतिबंधात्मक उपाय करत आहेत.

अंमली पदार्थ सेवन विषयक अहवाल अभ्यासले असता ऑगस्ट २०१२ ते मार्च २०१३ पर्यंत मोठ्या प्रमाणात नेपाळी लोकांनी अंमली पदार्थांचे सेवन केले आहे.

* नेपाळमध्ये सर्वाधिक प्रमाणात 'गांजा, भांग, दारू' चे सेवन दीर्घकाळापासून होत आहे.
* या पदार्थांचे सेवन नेपाळमध्ये महाशिवरात्री वेळी करण्यात येते असा अहवाल एका NGO ने दिला आहे.

* वयोमानानुसार अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांचे प्रमाण पाहिले असता ३० वर्षांच्या आतील युवा वर्ग हा अंमली पदार्थांच्या आहारी गेला आहे.
* एका दुसऱ्या अहवालानुसार नेपाळमध्ये भिन्न स्वरूपांच्या अंमली पदार्थ सेवनामध्ये गांजाबरोबर हिरॉईन, वेदना नाशक औषधे आणि खोकला प्रतिबंधक औषधे आदी घटकांचा समावेश होतो.
* नेपाळमधील ८३% लोक हे बहुद्रव्य मादक किंवा अंमली पदार्थांचे सेवन करतात. त्यामध्ये १५ ते २०, २० ते २४ आणि २५ ते २९ वयोगटाचा समावेश होतो.
* नेपाळमध्ये दिवसाला ३८.०४% लोक हे अंमली पदार्थाचे सेवन करतात.
* या अंमली पदार्थाचे सेवन आरोग्यास अपायकारक असले तरी नेपाळी लोक त्याला जगण्याची सवय म्हणून सेवन करतात.

**सारांशः**

अंमली पदार्थाचे सेवन हे एकात्मतेसमोरील तगडे आव्हान असून त्याला प्रतिबंध करणे नेपाळसाठी मोठी तपश्चर्याच आहे. कारण अंमली पदार्थाचे सेवन हे १५ ते २९ वयोगटात होत आहे. म्हणजे युवा वर्ग हा अंमली पदार्थ सेवनाच्या मोठ्या प्रमाणात आहारी गेला आहे आणि हे देशहित वा विकासाला बाधक आहे.

नेपाळ सरकारने लोकांची मानसिकता बदलण्यासाठी मोठ्या प्रमाणात जागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**ब) माओवाद आणि हिंसाः**

नेपाळमधील राजेशाही व्यवस्थेचा अस्त झाल्यानंतर लोकशाही पर्वाला प्रारंभ झाला. लोकशाहीसाठी पूरक असलेल्या महत्वपूर्ण बाबी निर्माण होण्यास प्रारंभ झाला. त्यामध्ये प्रथमतः राज्यघटना निर्मिती प्रक्रियेचा प्रारंभ झाला. राज्यघटनेतील प्रक्रिया ही विविध स्वरूपात राज्यघटना निर्मिती प्रक्रिया अंमलात येवू लागली राज्यघटना निर्मिती प्रक्रियेत लोकशाही मूल्ये सुधारणा, निवडणूक प्रक्रिया, मतदान प्रक्रिया आदी गोष्टींना महत्व आले.

नेपाळमध्ये माओवादाचा प्रारंभ हा हिंसाचारातून झाला. हिंसाचार हेच माओवादाचे खरे वैशिष्ट्य आहे. नेपाळमधील माओवादाचा प्रारंभ होण्यास प्रमुख कारणे होती. त्यामधील प्रमुख कारणे पुढीलप्रमाणेः

१) राजेशाही संपुष्टात येऊन सुद्धा राजेशाही मूल्य वा प्रभाव लोकशाहीवर होता.

२) भिन्न-भिन्न राजकीय पक्षांची सत्ता दीर्घकाळ नेपाळमध्ये टिकत नव्हती. हे राजकीय व्यवस्थेचे अपयश होते.

३) नेपाळमध्ये असणारी गरिबी, दारिद्र्य व्यवस्था विकासासाठी उपलब्ध निधीतून होणारा भ्रष्टाचार यामुळे झालेल्या सत्ताभ्रष्ट कारभार आणि जनतेचा वाढलेला असंतोष.

* या परिस्थितीचा परिणाम म्हणजे नेपाळ कम्युनिष्ठ पक्षाने (माओवादी विचारांचा पक्ष) १६ डिसेंबर १९९६ रोजी लोकयुद्धाची घोषणा केली. आणि नेपाळमध्ये हिंसाचाराचे पर्व सुरू झाले.

'हीच माओवादाची सुरूवात होय.' माओवाद्यांनी बँका लुटणे, शेतकरी कर्ज करार पत्रके नष्ट करणे, टपाल कचेऱ्या जाळणे अशा विविध प्रकार हिंसाचार सुरू करून महिला, दलित, गरिब या घटकांचे प्रश्न ग्रामीण भागातून हाती घेतले.

* **ग्रामीण भागातील माओवाद**

- माओवाद्यांनी खाटमांडू या राजधानीच्या शहरात संघर्ष सुरू न करता ग्रामीण भाग निवडले.
- त्यानी पोलीसांना ठार मारण्याचे तंत्र हाती घेतले.
- नेपाळी काँग्रेस पक्षाला खिळ बसविण्याचे काम ग्रामीण भागातूनच हाती घेतले होते.
- माओवाद्यांना आणि हिंसाचाराला प्रतिबंध करण्यासाठी (चारवेळा) पंतप्रधान झालेले गिरिराज प्रसाद कोईराला यांनी सशस्त्र पोलिस दलाची स्थापना केली.
- परंतु या उपायांना माओवाद्यांनी प्रतिआव्हान उभे केले. बॉम्बस्फोट, हिंसाचारामुळे अनेकांना आपले प्राण गमवावा लागला.
- तत्कालीन शासनाने माओवाद्यांविरूद्धची मोहिम थांबवली. यातुन अराजकता पसरली.
- माओवाद्यांनी काही ग्रामीण भागांत ''समांतर सरकारची लोकन्यायालये स्थापन'' केली. कित्येक ग्रामीण भागात लष्कराचेच (माओवादी लष्कर) राज्य स्थापन झाले.

* **माओवादी आणि शासनावर दबावः (माओवादी शक्तींचा राज्यकर्त्यावरील दबाव)**

माओवादी हे सातत्याने शासनयंत्रणेवर दबाव आणत होते. त्यांना शासनयंत्रणेचा ताबा हवा होता. माओवादी विविध दबावतंत्रांचा वापर करून शासनयंत्रणेवर धाक निर्माण करण्याचा प्रयत्न करत होते.

हा दबाव शमवण्यासाठी राज्यकर्त्यांनी माओवाद्यांशी बोलणी करण्याचा प्रयत्न केला परंतु बोलणीची मागणी माओवाद्यांनी फेटाळली. सन २००० ते २००६ सालापर्यंत नेपाळमधील अशांतता वाढत होती आणि वारंवार अराजकता पसरत होती. अखेर राजे ज्ञानेंद्र यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा देवून सरकार बरखास्त केले. त्यांच्या जागी गिरिजा प्रसाद कोईराला हे पंतप्रधान झाले.

नोव्हेंबर २००६ साली, माओवाद्यांनी आपले आंदोलन (बंड) मागे घेतले. युनोने केलेल्या मध्यस्थीमुळे थोड्या प्रमाणात तडजोड झाली. या आंदोलनामुळे पंधरा हजार लोकांचा नाहक बळी गेला. मोठ्या प्रमाणात निर्वासित जखमी झाले.

* **माओवाद्यांचे राजकीय सत्तेवर प्रभुत्व आणि परिणामः**
  - १० एप्रिल, २००८ च्या निवडणुकीत ५७५ जागांपैकी २२२ जागांवर (बहुमत) माओवादी उमेदवार विजयी झाले.
  - यामुळे माओवाद्यांनी सशस्त्र क्रांती वा हिंसेचा मार्ग सोडून संसदीय (लोकशाही मार्ग) व्यवस्थेचा स्वीकार केला.
  - पुढे शिक्षण व्यवस्थेत आणि सामाजिक परिस्थितीवर त्याचे विपरित परिणाम झाले.
  - माओवाद्यांनी लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केलेला होता तरी लोकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली होती.
  - लोकांचे प्रश्न सुटण्याऐवजी ते अधिक बिकट होत चालले होते.
  - याचा विपरित परिणाम शिक्षण व सामाजिक विकास प्रक्रियेवर दिसून येत होता.
* **माओवाद्यांपुढील निर्माण झालेली आव्हानेः**

१) माओवादी सत्ताधारी बनले होते पण जनतेत संभ्रावस्था होती.

२) सशस्त्र क्रांतीशी एकरूप असणारे माओवादी हे सामाजिक व राजकीय परिस्थितीत कसे परिवर्तन करतील हा प्रश्नच होता.

३) नेपाळमध्ये माओवादी सत्तेवर आल्याने मधेशी लोकांना असुरक्षतेची जाणिव निर्माण झाली. त्यामुळे अप्रत्यक्षपणे नेपाळमध्ये अराजकता पसरली.

* **माओवादी शासनकर्ते आणि मधेशी आंदोलनः**
  - माओवाद्यांचे पुष्पकमल दहल ऊर्फ प्रचंड हे पंतप्रधान झाल्यानंतर मधेशी जनतेने आंदोलन निर्माण झाले.
  - मधेशी जनतेला माओवाद्यांनी केलेला हिंसाचार व सशस्त्र अन्याय अमान्य होता.
  - त्यामुळे मधेशी जनतेने पुष्पकमल दहल यांच्या शासानविरूद्ध बंड पुकारले होते.

  हे नेपाळच्या एकात्मतेला बाधक होते.

## सारांशः

नेपाळमधील एकता किंवा एकात्मता विविध अंगानी आपणांस सर्व घटकांमधील मुद्दे व विश्लेषणावरून समजून घेता आली.

एकात्मता म्हणजे काय हे समजून घेता आले. तसेच अंमली पदार्थ सेवन, माओवाद आणि माओवादाचे आव्हान हे एकात्मतेसमोरील व्यापक आव्हान आहे हे अभ्यासावरून स्पष्ट होते.

## समारोपः

उपरोक्त विस्तृत विश्लेषणावरून आपणांस नेपाळचे एकात्मता घटक राष्ट्रविकास आणि एकात्मतेसमोरील आव्हाने विस्तृतपणे अभ्यासता आली आणि विविध पैलूंचा अभ्यास करता आला.

- **वस्तुनिष्ठ प्रश्नः**

१) नेपाळमध्ये ..... प्रकारची पक्षपद्धती आहे.

अ) एकपक्ष ब) बहुपक्ष क) द्विपक्ष ड) यापैकी नाही.

२) राष्ट्रीय प्रजातंत्र पक्षाची स्थापना केव्हा झाली?

अ) १९९० ब) १९९५ क) १९९९ ड) २०००

३) नेपाळमध्ये हिंसक कारवाया कोणत्या गटाद्वारे केल्या जातात?

अ) माओवादी बंडखोर ब) नेपाळी लोकशाही पक्ष

क) शांती मोर्चा ड) यापैकी नाही.

**उत्तरेः**

१) ब २) अ ३) अ

- **वर्णनात्मक प्रश्नः**

१) नेपाळमधील प्रमुख पक्षाविषयी सविस्तर निबंध लिहा.

२) नेपाळच्या एकात्मतेसमोरील आव्हाने स्पष्ट करा.

- **टीपा लिहा.**

१) नेपाळ काँग्रेस पक्ष

२) नेपाळी कम्युनिष्ट पार्टी

३) नेपाळच्या एकात्मतेचे पैलू

## संदर्भः

१) National Integration in Nepal - (लेख) [Dr. Ganesh Garing & Dr. Bishnu Bhandari]

- Angell Rober C: 1941
- The Integration of American Societies
- New york- New Mc Graw Hill

२) Angell Rober C: 1951

- The Moral Integration of American Cities
- The American Journal: Sociology, Part 1 & 2.

३) साधना साप्ताहिकः ६१ वा वर्षारंभ विशेषांक ऑगस्ट १६-२३/२००८

❑❑❑

**सत्र ४ : घटक ४**

# पाकिस्तान

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ ऐतिहासिक वारसा
- ४.२.२ शासन संस्थांची कार्यपद्धती
- ४.२.३ समाज व अर्थव्यवस्था
- ४.२.४ समकालीन राजकारण

४.३ सारांश

४.४ महत्त्वाच्या पारिभाषिक संकल्पना

४.५ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे / वस्तुनिष्ठ प्रश्न

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भग्रंथ


## ४.० उद्दिष्टे

विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर तिसऱ्या जगाचा उदय झाला. त्यामध्ये ब्रिटिशांच्या साम्राज्यशाहीतून अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली. यामध्ये लॅटिन अमेरिका, दक्षिण आफ्रिका आणि दक्षिण आशिया खंडातील छोट्या राष्ट्रांचा समावेश होता. तिसऱ्या जगातील या नवोदित राष्ट्रांमुळे अमेरिका, रशियाबरोबर लॅटिन अमेरिका, दक्षिण आफ्रिका आणि दक्षिण आशिया हे अभ्यासाचे नवे विषय जगासमोर आले. या तिसऱ्या जगातील विकसनशील व मागास राष्ट्रांमधील स्वातंत्र्य चळवळ, त्यांचे वासाहतिक प्रश्न, राज्यघटना व राजकीय व्यवस्थेची निर्मिती, या राष्ट्रातील शासनव्यवस्थांचे नवनवे प्रयोग, अशा राष्ट्रातील समाजव्यवस्था व त्यातील विविध धर्म, जाती गटातील आंतरसंघर्ष, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळी तथा पक्षीय गटांचे राजकारण या सर्वच विषयांना नव्याने महत्त्व आले.

नव्या राष्ट्रांच्या या निर्मितीमुळे केवळ पाकिस्तान, बांगला, नेपाळ, श्रीलंका किंवा क्युबा, टांझानिया, पेरु, युगोस्लाव्हिया, व्हिएटनाम यासारख्या राष्ट्रांच्या राजकारणाचा व समाजकारणाचा अभ्यास महत्वाचा ठरला नाही तर या नव्या राष्ट्रातील परस्पर संबंध त्याचे बड्या राष्ट्रांशी असणारे संबंध त्यातून तयार झालेले त्यांचे राष्ट्रीय धोरण व त्याचा एकंदर विकासावर होणारा परिणाम याचाही अभ्यास यासंदर्भात विशेष लक्षणीय व महत्वाचा ठरत आहे.

दक्षिण आशियातील तौलनिक राजकारण हा अत्यंत महत्वाचा विषय असून यात श्रीलंका, बांगला, नेपाळ व पाकिस्तान ही राष्ट्रे निर्णायक भूमिका बजावताना दिसतात. या राष्ट्रांच्या राजकारणाचा सार्क, राष्ट्रकुल व अलिप्त राष्ट्रसंघटनेवर प्रभाव पडताना दिसतो. त्याचबरोबर या राष्ट्रांच्या राष्ट्रीय व परराष्ट्रीय धोरणाचा अमेरिका, रशिया व युरोप खंडावर सार्वत्रिक काय परिणाम होतो हेही समजून घेणे हा या विषयाच्या अभ्यासाचा प्रमुख हेतू आहे.

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात परावलंबनाच्या सिद्धांताद्वारे संपूर्ण जगातील राष्ट्रे एकमेकाशी बांधलेली दिसतात. त्यामुळे २० व्या शतकाच्या सुरुवातीला इंग्लंड व नंतर अमेरिका, रशिया भोवती केंद्रित झालेले राजकारण उत्तर वसाहतवादी कालखंडात तिसऱ्या जगाच्या संदर्भात महत्वाचे ठरू लागले. यादृष्टिने प्रस्तुत प्रकरणात आपणास पाकिस्तानच्या राजकीय व्यवस्थेचा अभ्यास करावयाचा आहे. विशेषतः भारतीय राजकारणावर विशेष प्रभाव पाडणारे राष्ट्र म्हणून प्रस्तुत विषय अधिक महत्वाचा आहे. पाकिस्तानची निर्मिती ही १९४७ मध्ये भारतामधूनच फाळणीद्वारे झाली असल्याने पाकिस्तानच्या राजकीय व्यवस्थेवर भारतीय संस्कृतीमधील काही घटकांचा व ब्रिटिश राजनितीचा प्रभाव दिसतो. तरीसुद्धा बांगला देशाच्या निर्मितीनंतर पुढे आलेल्या पाकिस्तानने आपल्या राज्यघटनेत काही महत्वाचे बदल करून पाकिस्तानने अधिक आक्रमक धार्मिक मूलतत्ववाद व लष्करप्रधान शासनव्यवस्थेला प्राधान्य दिले. या पाकिस्तानी धोरणाचा विशेषतः दक्षिण आशियाई राष्ट्रसमूहावर अधिक प्रभाव पडलेला दिसतो. प्रस्तुत प्रकरणात पाकिस्तानच्या शासनव्यवस्थेचा आणि त्या अनुशंगाने असणाऱ्या राजकीय संस्कृतीचा आपणास अभ्यास करावयाचा आहे.

## ४.१ प्रास्ताविक

पहिल्या महायुद्धापर्यंत जागतिक राजकारणावर इंग्लंडचा प्रभाव होता. संसदीय लोकशाही, न्यायव्यवस्था व प्रशासनाचा इंग्लंडच्या संदर्भात या काळात अभ्यास केला जाई. मात्र १९१७ मध्ये रशियात साम्यवादी क्रांती झाली व लोकशाहीच्या ऐवजी साम्यवादी समतेचा व कष्टकऱ्यांच्या न्याय्य व्यवस्थेचा पर्याय जगासमोर आला. १९१९ मध्ये पहिले महायुद्ध संपले व पॅरिस शांतता संमेलनाच्या निमित्ताने अमेरिकेने जागतिक राजकारणात प्रवेश केला. जगाला साम्यवादापेक्षा लोकशाही विचारांची अधिक गरज आहे. असा अमेरिकेने प्रचार केल्याने इंग्लंडच्या साम्राज्यवादाला कंटाळलेल्या राष्ट्रांनी लोकसत्ताक अमेरिकन गटात तर काही राष्ट्रांनी व्यापक समतेसाठी व समग्र विकासासाठी साम्यवादी रशियन गटात प्रवेश केला. जगाचे हे द्विध्रुवीकरण दुसऱ्या महायुद्धापर्यंत टिकून होते. त्यामुळे जागतिक राजकारणात अमेरिका व रशिया हे अभ्यासाचे केंद्रबिंदू होते परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर म्हणजे १९४५

नंतर इंग्लंडच्या साम्राज्यवादाला ओहोटी लागली. अमेरिकन लोकशाहीच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. रशियन साम्यवादातील अतिरेकी एकाधिकारशाहीमुळे व खाजगी मालमत्तेच्या टोकाच्या राष्ट्रीयकरणामुळे सामाजिक, आर्थिक समतेऐवजी सोविएट रशियात सार्वत्रिक नैराश्यवाद तयार झाला आणि यातूनच १९८६ मध्ये गोर्बाचेव्ह यांना ग्लासनोस्त व पेरेस्त्रोईका (स्वायत्तता व पुनर्रचना तत्व) या तत्वाची घोषणा करावी लागली. या सर्व परिवर्तनाच्या काळात सत्ताकेंद्रे ही इंग्लंडकडून अमेरिका रशियाकडे परावर्तीत झाली पण बहुध्रुवीकरणाच्या काळात अमेरिका व रशियाऐवजी तिसऱ्या नवोदित स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना अधिक महत्व प्राप्त झाले. इंग्लंडचा साम्राज्यवाद व वसाहतवाद १९४५ च्या आसपास संपला आणि तिसरे जग तयार झाले. लॅटिन अमेरिका, दक्षिण आफ्रिका व आशिया खंडातील ही नवोदित विकसनशील व मागास राष्ट्रे अलिकडच्या काळात अभ्यासाची नवी केंद्रे बनली. यात लॅटिन अमेरिकेत क्युबासारखे राष्ट्र अभ्यासाचे अधिक महत्वाचे केंद्र बनले. दक्षिण आफ्रिकेत प्रिटोरिया सरकारच्या विरोधात स्वातंत्र्य चळवळ राबवणाऱ्या टांझानिया, ऱ्होडेरिया, पेरु या सारख्या छोट्या राष्ट्रांना पुढे महत्व आले. विशेषतः नेल्सन मंडेला, विनी मंडेला यासारख्या सत्याग्रही लोकसत्ताक नेत्यांमुळे दक्षिण आफ्रिका अभ्यासाचा केंद्रबिंदू बनली. तर आशिया खंडात अलिप्त राष्ट्रसंघटना, सार्क सारख्या शांततावादी व विकासवादी चळवळींमुळे भारताला महत्व आले. पं. नेहरु, म. गांधी, इंदिरा गांधी, सरहद गांधी, मुजबूर रहेमान, बंदारनायके दांपत्य यासारख्या विचारवंत व नेत्यांमुळे दक्षिण आशिया अभ्यासाचा नवा केंद्रबिंदू झाला. यासंदर्भात भारताबरोबर पाकिस्तान, बांगला, नेपाळ, श्रीलंका या राष्ट्रांना नव्याने महत्व आले. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात व २१ व्या शतकाच्या सुरुवातीला संपूर्ण जग एक बनण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्याचबरोबर आधुनिक विकासवादी धोरणाकडून उत्तर आधुनिकवादाकडे जाताना जगासमोर काही समान स्वरुपाचे प्रश्न तयार झाले. यात लोकसंख्येचा व त्या अनुशंगाने दारिद्र्य, बेकारीचे प्रश्न, धार्मिक मूलतत्ववाद, साधनसंपत्तीचे वितरण व निर्मितीचा प्रश्न, पर्यावरण इत्यादीचा समावेश होतो. यातील काही प्रश्न सोडवण्यासाठी जगात जसे शांततेचे प्रयत्न झाले तसेच आक्रमक मार्गांचा व दहशतवादी मार्गांचा वापरही सुरू झाला. या आक्रमक व हिंसक राष्ट्रवादाने जगात पुन्हा एकदा तिसरे महायुद्ध होईल काय? अशी भिती निर्माण झाली. इसिस सारखी धर्मांध मूलतत्ववाद जोपासणारी राष्ट्रे, दहशतवादाला खतपाणी घालणारे पाकिस्तान, श्रीलंका, बांगला देश सारखी राष्ट्रे व कोरियाने अलिकडे चीन बरोबर अमेरिकेला दिलेली गंभीर आव्हाने यामुळे संपूर्ण जग व्यापक संघर्षाच्या उंबरठ्यावर उभे आहे.

या सर्व गुंतागुंतीच्या पार्श्वभूमीवर बड्या राष्ट्रांची भूमिका जशी महत्वाची ठरणार आहे. तशीच छोट्या राष्ट्रांची भूमिकाही निर्णायक ठरणार आहे. बड्या राष्ट्रांना आपली धोरणे अधिक लोकसत्ताक व पारदर्शी बनवावी लागतील; त्याचबरोबर छोट्या राष्ट्रांना आपला समतोल विकास साध्य करताना अधिक सकारात्मक, मानवतावादी विचारांना प्राधान्य द्यावे लागेल. प्रस्तुत प्रकरणात पाकिस्तानच्या एकंदर राजनितीचा या सर्व प्रश्नांच्या संदर्भात आपणास सखोल अभ्यास करावयाचा आहे. पाकिस्तानमधील सार्वत्रिक मागासलेपण, कट्टर धर्मांधता, प्रचंड दारिद्र्य व शिक्षणाचा अभाव, पाकिस्तानमधील अस्थिर शासनव्यवस्था, लोकशाहीऐवजी लष्करशाहीचा असणारा प्रभाव आणि

आशिया खंडात आपले प्रभुत्व सिद्ध करण्यासाठी अमेरिकेने पाकिस्तानचा केलेला वापर या सर्व वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानमध्ये लोकशाही, समाजवादी, धर्मनिरपेक्ष विचार कसे वाढतील? किंवा दहशतवाद, लष्करशाही व धार्मिक मूलतत्ववादात पाकिस्तानचा सार्वत्रिक ऱ्हास होईल याचाही अभ्यास प्रस्तुत प्रकरणात अपेक्षीत आहे. आशिया खंडात चीन, भारत व पाकिस्तान ही अधिक महत्वाची राष्ट्रे असून साधारणतः या राष्ट्रांच्या राष्ट्रीय राजनितीवर दक्षिण आशियन इतर छोट्या राष्ट्रांचे प्रशासन व राजकारण अवलंबून असणार आहे. नजिकच्या काळात अमेरिकेचा आशिया खंडाकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा आहे यावरही आशियन राजकीय व्यवस्था अवलंबून असणार आहे.

## ४.२ विषय विवेचन

प्रस्तुत प्रकरणात एकूण चार उपघटकांमध्ये आपणास पाकिस्तानच्या राजकीय व्यवस्था व राजनितीचा सखोल अभ्यास करावयाचा आहे. कोणत्याही देशातील राजकारणाचा अभ्यास करताना त्या देशाची एकंदर राजकीय संस्कृती लक्षात घ्यावी लागते. ही संस्कृती त्या देशाच्या ऐतिहासिक आढाव्यातून स्पष्ट होते. म्हणूनच या प्रकरणाच्या पहिल्या घटक भागात आपणास पाकिस्तानचा ऐतिहासिक वाटचालीचा तपशील तपासून घ्यावा लागेल.

अखंड भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात झालेल्या द्विराष्ट्रवादी चळवळीतून मोठ्या प्रमाणात मुस्लिम समाज असणारे पाकिस्तान १४ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाले. ब्रिटिश साम्राज्यवादी राजवटीतून बाहेर पडलेल्या पाकिस्तानचा पूर्वेतिहास भारताचाच पूर्वेतिहास होता. त्यामुळे नविन भारतासमोर ज्या समस्या होत्या त्याच समस्या काही अपवाद वगळता पाकिस्तान समोर होत्या. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पाकिस्तानमध्ये एकूण चार राज्यघटनांचा वापर करण्यात आला तर दोनवेळा पाकिस्तानने मार्शल लॉ प्रशासनाचा अनुभव घेतला. भारतात मात्र स्वातंत्र्यानंतर एकच राज्यघटना तयार झाली आणि आवश्यक घटनादुरुस्त्या करीत आपण राज्यघटनेची मूलभूत चौकट आजही सार्वभौम व अंतीम मानली.

पाकिस्तानच्या इतिहासात १९४७ ते १९५६ पर्यंत १९३५ चा भारत प्रशासन कायदाच वापरला गेला. मार्च १९५६ ते ऑक्टोंबर १९५८ पर्यंत १९५६ च्या दुसऱ्या घटनात्मक विधीसभेने तयार केलेली राज्यघटना वापरली गेली. ऑक्टोंबर १९५८ ते जून १९६२ या काळात पाकिस्तानात अयुब खान यांनी पहिला मार्शल लॉ जारी केला. जून १९६२ ते मार्च १९६९ या काळात घोषित केलेल्या वटहुकूमामुळे मार्च १९६९ ते डिसेंबर १९७१ या काळात याह्याखान यांनी दुसरा मार्शल लॉ जारी केला. ऑगस्ट १९७२ मध्ये म्हणजेच पूर्वीचे पूर्व पाकिस्तान व सध्याच्या बांगला देशाच्या निर्मितीनंतर पाकिस्तानच्या राष्ट्रीय विधीसभेने पाकिस्तानची सुधारीत राज्यघटना तयार केली. याचाच अर्थ सुरुवातीच्या पाकिस्तानमधील राज्यघटना या सदोष होत्या आणि त्या पाकिस्तानमधील मूलभूत प्रश्न सोडवू शकल्या नाहीत. यातील सर्वात महत्वाचे कारण म्हणजे पाकिस्तानने लोकशाहीचा स्वीकार केला असला तरी एक मुस्लीम राष्ट्र म्हणून स्वतःची निर्माण केलेली ओळख त्यांना कधीच

धर्मनिरपेक्ष लोकशाहीकडे नेता आली नाही. बुद्धिप्रामाण्यवादी मोजके मुस्लिम विचारवंत व नेते आणि दुसऱ्या बाजुला बहुजन मुस्लीम धर्मनिष्ठ तथा पारंपरिक प्रथा, परंपरा, मुस्लीम कायदे व कलमांना मानणारा बहुसंख्य समाज यात नेहमीच संघर्ष झाल्याचे आपणास पाकिस्तानमध्ये दिसते.

वास्तविक पहाता पाकिस्तानची निर्मिती हिच धार्मिक कारणातून झाल्यामुळे त्यांना धर्मनिरपेक्षतेचा व उदार लोकसत्ताक मूल्यांचा वापर करणे कठिण जात आहे. इ. स. १८८५ मध्ये सुरु झालेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये व त्यापूर्वी १८५७ च्या बंडातही मुस्लीम समाजाची भूमिका प्रखर राष्ट्रवादी व स्वातंत्र्यवादी होती. १८८५ मध्ये स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सर सय्यद अहमदसारखे विचारवंत नेते होते. त्यांनी अहमदिया नावाची चळवळ सुरू करून उदारमतवादी विचारांना पाठिंबा दिला होता, त्यांनी अलिगढ मुस्लीम विद्यापीठाचा पाया घातला. मुस्लिम समाजात जागृतता, बुद्धिप्रामाण्यता व नैतिकता तयार व्हावी यासाठी त्यांनी १८८५ मध्येच अंजुमन ए हिमायत इस्लाम नावाची संस्था काढली होती. महंमद अब्दुल वाहाबी यांनी वाहाबी नावाची मुस्लीम पुनरुज्जीवनवादी चळवळ सुरु करून इस्लामला विशुद्ध रूप देण्याचा प्रयत्न केला. याच काळात परव्तु गांधीवादी नेते सरहद्द गांधी म्हणजेच खान अब्दुल गफारखान यांनी खुदाई खिदमदगार नावाची चळवळ सुरू करून मुस्लीम समाजात नवजागरण तयार करण्याचा प्रयत्न केला. पुढे महंमद अली जीना यांनी मुस्लीम लीगची जी स्थापना केली त्याचाही हेतू असाच व्यापक होता.

पण विसाव्या शतकात मुस्लीम नेत्यांनी मांडलेला उदारमतवाद, समन्वयवाद व लोकशाही विचार उत्तरोत्तर संकुचित, धार्मिक व स्वयंकेंद्री बनला. विशेषतः बंगालच्या फाळणीनंतर हिंदू मुस्लीम या दोन धार्मिक समाजातील मतभेद वाढवण्यात ब्रिटिशांना यश आले म्हणूनच हिंदू महासभा, अभिनव भारत यासारख्या हिंदुत्ववादी संघटना जशा तयार झाल्या तशी मुस्लीम लीगचीही स्थापना झाली. बहुसंख्य हिंदुपासून आपणास धोका होईल ही भीती या पाठिमागे होती. या काळात राष्ट्रीय काँग्रेसचे मुस्लीम नेते आपली संभाव्य शंका व्यक्त करताना म्हणतात, ''भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही भारतीय स्वातंत्र्यासाठी संघर्ष करीत आहे. या राष्ट्रीय चळवळीमध्ये मुस्लीमांनी मनापासून सहभागी व्हावे कारण राजकीय स्वातंत्र्य सर्वांनाच आवश्यक आहे पण पुढे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यात मुस्लीमांचा वाटा किती असेल कारण मला तर असे वाटते की, पुढे मिळणारे भारतीय स्वातंत्र्य म्हणजे हिंदुंचे स्वातंत्र्य. या देशाची भावी संसद म्हणजे हिंदू, या देशाची भावी राज्यघटना म्हणजे देखील हिंदू व या देशातील संभाव्य कायदे व लोकमत तथा न्याय म्हणजेही हिंदू अशा वेळी मुस्लीमांनी स्वतःच्या विकासाचा वेगळा विचार करणे गरजेचे आहे.'' सर सय्यद अहमद यांना स्वतंत्र भारतात मुस्लीमांचे स्वातंत्र्य व त्यांचा विकास याबद्दल चिंता वाटत होती. अगदी अशीच चिंता डॉ. आंबेडकर तथा शिख नेते तेजबहाद्दूर सप्रू यांनीही व्यक्त केली होती. भारतीय राजकारणाचा पाया धर्म व जात असल्याने मूळातच भारतात बहुराष्ट्रवादी भावना होत्या. त्यापैकी एक भावना म्हणजे पाकिस्तानची निर्मिती होय. वासाहतिक पारतंत्र्यामधून पाकिस्तानची निर्मिती ही तिसऱ्या जगातील एक महत्वाची घटना होती.

पाकिस्तानच्या निर्मितीनंतर पाकिस्तानला त्यांची राज्यघटना तयार करावी लागली. मात्र भारताप्रमाणे एकच प्रभावी राज्यघटना तयार न होता राज्यघटना व मार्शल लॉ च्या माध्यमातून ती टप्प्या टप्प्याने प्रमुख चार वेळा विकास पावली. पाकिस्तानच्या राजनीतीवर ब्रिटिशांचा प्रभाव होता. तरी स्वतःला मुस्लीम राष्ट्र संबोधण्यात त्यांना सातत्याने आवडले. त्यांनी अध्यक्षीय लोकशाहीचा स्वीकार करताना कार्यकारी सर्वोच्च अधिकार राष्ट्राध्यक्षांना दिले. तसेच कार्यकारी मंडळात राष्ट्राध्यक्षांबरोबर मंत्रीपरिषदेचे ९ ते १० सदस्य व नॅशनल अॅसेंब्लीच्या काही सदस्यांना कार्यकारी अधिकार दिले. कायदेमंडळात नॅशनल असेंब्ली, राष्ट्रीय विधीसभेमध्ये १५६ सदस्यांची तरतूद केली. पाकिस्तानी न्यायालयाला सर्वोच्च न्याय परिषद व सर्वोच्च न्यायालय असे म्हटले जाते. याचबरोबर पाकिस्तानमध्ये भारताप्रमाणे प्रमाणित संघराज्याचा प्रयोग राबवला आहे. या शासकीय संरचनेचा अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे.

प्रस्तुत प्रकरणाच्या तिसऱ्या भागात समाज व्यवस्था, अर्थव्यस्था पाकिस्तानातील जाती जमाती, सामाजिक चळवळी व त्यांच्या विकासाचा स्थुल आढावा घ्यावयाचा आहे. पाकिस्तानी राज्यघटनेच्या २२७ व्या कलमात इस्लामिक तत्वज्ञानाचा स्वीकार करण्यात आला आहे की जे तत्वज्ञान कुराण व सुन्नाह यावर आधारित आहे. वरील कलमानुसार पाकिस्तानात ‘इस्लाम परिषद’ स्थापन केली असून ही परिषद रशियातील साम्यवादी प्रेसिडियम प्रमाणे राष्ट्राध्यक्ष, घटक राज्य व त्यांचे राज्यपाल व सर्व कार्यकारी प्रमुखांना सूचना करून इस्लामी तत्वज्ञान राबवण्यात सूचना करीत असते व त्याचा मोठा प्रभाव पाकिस्तानी समाज जीवनावर झाल्याचे दिसते. भारताप्रमाणेच पाकिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणात वर्गिय विषमता असून मुस्लीम धर्म शिया व सुन्नी या दोन परस्पर विरोधी पंथामध्ये विभागला गेला आहे. प्रखर असे दारिद्र्य एका बाजुला व नबाबी थाट दुसऱ्या बाजूला अशी आर्थिक विषम रचना आपणास पाकिस्तानमध्ये पहावयास सापडते. साधारणतः सिंध, पंजाब व सक्कर धरणाच्या परिसरातील प्रदेश सुपिक असून या प्रदेशात पाकिस्तानचे क्वेट्टा हे शहर आहे. जिथे लष्करी साहित्याचे कारखाने आहेत.

पाकिस्तानच्या उत्तरेकडचा प्रदेश आदिवासी व मागास असून तो परव्तुनिस्तान व बलुचिस्तानच्या सीमारेषांच्या जवळ आहे. हा भाग वाळवंटी असून येथे परव्तु, बलुचि, आफ्रिदी या जमाती आहेत. चित्राल, दिर, स्वात हजारा, झोब, लोलारी, दलबंदी, बुगटी या प्रांतात मागास जातींचे वास्तव्य आहे. शेती, पशुपालन हे त्यांचे व्यवसाय असून भटकंती करीत ते उदरनिर्वाह करतात. राष्ट्राध्यक्ष त्या प्रांतातील राज्यपालांना आदेश देऊन मागास जाती व जमातींसाठी विकास कामे करवून घेतो.

पाकिस्तान हे मुस्लीम धार्मिय राष्ट्र असल्याने उर्दू ही त्यांची राष्ट्रीय भाषा असली तरी इंग्रजीचाही वापर तेथे केला जातो. शैक्षणिक मागासलेपण, दारिद्र्य व अस्थिरता यामुळे पाकिस्तानचा म्हणावा तसा विकास झालेला नाही. साधारणतः राष्ट्रीय उत्पन्नाच्या ७०% खर्च ते लष्करावर करीत असल्याने पाकिस्तानी जनतेला सतत महागाईशी सामना करावा लागतो. भारताप्रमाणे

पाकिस्ताानमध्येही नोव्हेंबर २०१६ मध्ये त्यांच्या चलनातील पाच हजार रुपयांच्या नोटा रद्द केल्याने डिसेंबर २०१६ मध्ये तिथे सोन्याचे दर पंच्चावन्न ते साठ हजार रुपये तोळा असे महागडे बनले. याचा अभ्यास या उपघटकात आपणास विस्ताराने करावयाचा आहे.

या प्रकरणातील शेवटच्या चौथ्या भागात पाकिस्तानातील पक्षीय राजकारणाचा आढावा घ्यावयाचा आहे. पाकिस्तानमधील सर्वच राजकीय पक्ष हे कमी अधिक धार्मिक असून त्यांच्यात तत्वज्ञानात्मक साम्य व प्रत्यक्ष कार्यक्रमात मात्र फरकाचे मुद्दे दिसतात. साधारणतः अवामी लीग, पाकिस्तान पीपल्स पार्टी, मुस्लीम लीग, मरकाझी जमियत, जमियत उल उलेमा, नॅशनल अवामी वाली ग्रुप, जम्मते इस्लामी, पाकिस्तान डेमॉक्रॅटिक पार्टी, हे प्रमुख पक्ष इथे दिसतात. पाकिस्तानच्या राजकीय इतिहासात अवामी लीग व पाकिस्तान पीपल्स पार्टी या दोन पक्षांनी अधिक वर्चस्व गाजवलेले दिसते. पाकिस्तानमध्ये राष्ट्राध्यक्षांनी नियुक्त केलेले निर्वाचन मंडळ असले तरी त्यावर इस्लामिक परिषदेचा प्रभाव दिसतो. त्यामुळे या देशातील निवडणूका पूर्ण पारदर्शी व लोकशाही पद्धतीने होत नाहीत. या सर्व प्रश्नांचाही सखोल अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे.

## ४.२.१ ऐतिहासिक वारसा

### अ) वासाहतिक कायदे

ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य दिले पण त्याचवेळी भारताची फाळणी करून पाकिस्तानची निर्मिती केली. बांगला देशाच्या निर्मितीपूर्वी याला पूर्व पाकिस्तान व सध्याच्या पाकिस्तानला पश्चिम पाकिस्तान असे नाव होते. याला द्विराष्ट्रवाद असे म्हटले जाते आणि वेगळ्या पाकिस्तानची मागणी करणाऱ्यामध्ये मुस्लीम लीगचे जनक बॅ. जीना यांचे योगदान महत्वाचे तरी वादग्रस्त म्हटले जाते.

मोगल सम्राट बाबरापूर्वी भारतात वेगवेगळ्या प्रांतात साधारणतः पाचशे वर्षे मुस्लीम राजांची सत्ता होती. इ. स. ७१२ पासून मुस्लीम संस्कृतीचा भारतात विकास होत गेला. बाबरानंतर विशेषतः अकबराच्या काळात हिंदू मुस्लीम संबंध सलोख्याचे बनले होते कारण अकबर हा सहिष्णू व उदारमतवादी लोकसत्ताक सम्राट होता पण पुढे औरंगजेबाच्या काळात म्हणजे १६५८ ते १७०७ च्या काळात मुस्लीम संकुचित धर्मवादाला व आक्रमक मुस्लीम राष्ट्रवादाला अधिक महत्व प्राप्त झाले. मुस्लीम सोडून बाकीचे धर्म हे मुस्लीमांचे शत्रू आहेत, हे गृहित धरून औरंगजेबाने हुकूमशाही पद्धतीने राज्यकारभार केला पण औरंगजेबाच्या मृत्यूनंतर भारतातील केंद्रीय प्रभावी मुस्लीम सत्ता विघटित व नेतृत्वहिन बनली. मराठेशाहीतही पराक्रमी असे नेतृत्व शिल्लक न राहिल्याने त्यांची सत्ता पेशव्यांच्या हातात गेली आणि स्वराज्य, पराक्रम व राष्ट्रवादाऐवजी पेशवाई ऐशआरामात अडकली. त्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या निमित्ताने भारतात ब्रिटिशांची राजवट हळूहळू प्रभावी ठरू लागली. अर्थातच हिंदू व मुस्लीम समाज कृतीशील राजकीय प्रक्रियांपासून बाजूला पडला आणि इंग्रजी शिकलेला व्यापार करणारा पारसी सुशिक्षित, श्रीमंत वर्ग ब्रिटिशांच्या जवळ गेला. विकेंद्रित झालेली मुस्लीमशाही व मराठेशाही ही संस्थानिक जहागिरदारांच्या निमित्ताने छोट्या छोट्या केंद्रात म्हणजेच संस्थानात केंद्रीत झाली. अशा संस्थानिकांच्या वैयक्तिक हितसंबंधांना ब्रिटिशांनी शक्यतो हात न लावल्याने

संस्थानिकांचा पाठिंबा ब्रिटिशांना मिळाला व भारतीय जनता स्वातंत्र्य, स्वराज्य यासारख्या संकल्पनापासून दूर जाऊन धर्मकारण, कर्मकांड, उपासना, अंधश्रद्धा व निरक्षरतेमध्येच स्वतःचा आनंद शोधू लागली. पर्यायाने भारतात समाजीकरणाच्या व राजकीयकरणाच्या प्रक्रिया थंडावल्या आणि भारतीय समाज स्थितीशील, कुपमंडूक व स्वयंकेंद्री बनला.

**१८५७ चे बंड व मुस्लीमांची भूमिका**

ब्रिटिशांच्या आगमनामुळे विशेषतः मुस्लीम समाजाचे कापड व्यवसाय अडचणीत आले. त्यामुळे मुस्लीम समाज ब्रिटिशांना शत्रू मानू लागला. याच काळात वाहाबी मुस्लीम चळवळीने कट्टर मुस्लीम विचारांचा पाठपुरावा केल्याने ब्रिटिशांना व ख्रिश्चन धार्मियांना ही वाहाबी चळवळ ब्रिटिश सत्ता विरोधी वाटू लागली. या सार्वत्रिक असंतोषातून १८५७ मध्ये ब्रिटिश सत्तेच्या विरोधात सार्वत्रिक उठाव झाला. टिपू सुलतान, तात्या टोपे, झाशीची राणी आदी शूरवीरांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी मोठी क्रांती केली यात हिंदूप्रमाणे मुस्लीमांचे योगदान मोठे होते.

**स्वतंत्र मतदार संघाची मागणी**

१८९२ च्या भारत प्रशासन कायद्याची निर्मिती होताना सर सय्यद अहमद खान यांनी या कायद्या अंतर्गत होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्या संदर्भात मुस्लीमांचे प्रतिनिधित्व कसे असेल? हा प्रश्न उपस्थित केला होता. एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात मुस्लीम समाज अल्पसंख्य असल्याने त्यांना या प्रक्रियेत निवडणूकीच्या माध्यमातून कसे स्थान मिळेल असे त्यांना वाटत होते. १८९२ च्या कायद्यात खान यांची मागणी स्वतंत्र मतदारसंघासाठी सूचीत करणारी होती ती कायद्यात आली नाही.

पण पुढे पुन्हा १९०६ मध्ये १९०९ च्या मोर्ले मिंटो कायद्याच्या पार्श्वभूमीवर एच. एच. आगाखान यांनी पुन्हा जातिय प्रतिनिधित्वाचा प्रश्न उपस्थित केला. भारतासारख्या संमिश्र जाती, धर्म असणाऱ्या देशात लोक जर धर्म व जातीच्या आधारे प्रतिनिधी निवडत असतील तर धार्मिक व जातीय बहुसंख्य असणाऱ्या जातीधर्माच्या बहुमताला अल्पसंख्य जातीधर्म कसा प्रतिबंध करू शकतील? अशी त्यांची गणिती संख्यात्मक शंका होती. पुढे १९४६ च्या सप्रू अहवालातही तेजबहादूर सप्रूंनी प्रत्येक धर्माच्या प्रतिनिधीला स्वित्झर्लंड प्रमाणे समान राष्ट्राध्यक्ष बनण्याची संधी द्यावी व सामूहिक अध्यक्ष पद्धती स्वीकारावी असे म्हटले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही स्वतंत्र मतदार संघाची मागणी करून पुणे करारात स्वतंत्र मतदारसंघाऐवजी प्रांतिक कौंसिलमध्ये जादा जागा पदरात पाडून घेतल्या होत्या. एच. एच. आगा खान यांच्या या मागणीवर लॉर्ड मिंटोने दिलेले उत्तर खुपच उथळ व आदर्शवादी होते. मिंटो म्हणतात, ''आम्ही मुस्लीम समाजाला संख्येच्या संदर्भात मोजत नाही तर आम्ही त्यांचे राजकीय कौशल्य महत्वाचे मानतो.'' या मागणीच्या दृष्टिने १९०६ मध्ये मुस्लीम लीगची झालेली स्थापना कशासाठी होती हे अभ्यासकांच्या लक्षात येते. हिंदू महासभेच्या व बंगालच्या फाळणीच्या संदर्भात हिंदू महासभेला शह देण्यासाठी मुस्लीम लीगने यावेळी प्रमुख दोन मागण्या केल्या होत्या यात–

१) भारतीय मुस्लीमांची ब्रिटिशांप्रती असणारी निष्ठा सिद्ध करण्याचा प्रयत्न करणे व

२) भारतीय मुस्लीमांच्या राजकीय हक्कांचे संरक्षण करणे.

स्वतंत्र मतदार संघाच्या वरील मागण्यांना भारतीय ब्रिटिश सेक्रेटरी लॉर्ड मोर्लेचा विरोध होता पण त्यांच्यावर सर सय्यद अहमद, भारत सरकार व प्रिं. बेक, प्रिं. आर्चबोल्ड यांचा वैचारिक दबाव होता. प्रिं. बेक यांचे असे मत होते की, मुस्लीमांनी राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रवाहात सामील होऊ नये कारण काँग्रेस ही ब्रिटिशांकडून सत्ता हस्तगत करून ती हिंदूना देणारी राजकीय चळवळ आहे. १९०९ च्या मोर्लेमिंटो सुधारणेपासून ब्रिटिशांनी मुस्लीमांच्या मागण्यांबाबत आदर दाखवून 'फोडा व झोडा' या तत्वाचा वापर करण्यास सुरूवात केली. मिंटोने लिहिलेल्या 'मिंटोज डायरी' या त्याच्या डायरीत तो म्हणतो की, या देशात लवकरात लवकर निवडणूका घोषित केल्या तर हिंदू मुस्लीम पक्ष गट तयार होऊन त्यांच्यात अंतस्थ तणाव वाढेल व आपणास राज्यकारभार करणे सोपे जाईल. या ब्रिटिश डावपेचांच्या संदर्भात त्यांना शह देण्यासाठी राष्ट्रीय काँग्रेसने ही आपले डावपेच तयार केले आणि १९१६ मध्ये लो. टिळकांनी हिंदू मुस्लीम ऐक्याचा 'लखनौ करार' तयार केला.

**१९१९ च्या माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा**

काँग्रेसच्या सूरत अधिवेशनानंतर बॅ. जीनांनी काँग्रसमध्ये प्रवेश केला व हिंदू मुस्लीम ऐक्याचे प्रयत्न सुरू केले. लखनौ करार घडवून आणण्यात बॅ. जीनांचा मोठा वाटा होता. यावेळी मुस्लीमांना वेगळा मतदार संघ देण्यास राष्ट्रीय काँग्रेसने तयारी दाखवली व ब्रिटिशांच्या डावपेचांना शह दिला. १९२० मध्ये म. गांधीच्या हातात काँग्रेसची सूत्रे जाईपर्यंत बॅ. जीना राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रवाहात होते नंतर मात्र क्रमाक्रमाने त्यांनी द्विराष्ट्रवादाचा विचार विकसीत केला, याचकाळात मुस्लीम मध्यमवर्गीय सुशिक्षीत युवकांमध्ये मुस्लीम समाजाच्या भविष्याची काळजी वाढत गेली. १९०९ च्या मोर्ले मिंटो सुधारणेत स्वतंत्र मतदारसंघाची तरतूद मुस्लीमांसाठी करण्यात आली. यालाच 'जातीय निवाडा' असे म्हणतात. अशीच मागणी १९१९ मध्ये शिख, ख्रिश्चन या अल्पसंख्य धर्मिय लोकांनी केली होती. १९०९ मध्ये जाहीर झालेला मुस्लीम स्वतंत्र मतदार संघाचा निर्णय नवाब सादीक अली खानसारख्या काही विचारवंताना मान्य नव्हता. १९१८ च्या मॉन्टफोर्ट रिपोर्ट मध्येही स्वतंत्र मतदार संघ धोकादायक असल्याचे म्हटले होते. यामुळेच १९२७ च्या सायमन कमिशनला सामूहिक विरोध झाला. यातून स्वतंत्र मतदारसंघाचा निर्णय घेण्यासाठी मोतीलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमण्यात आली. १९२८ मध्ये हा नेहरू रिपोर्ट जाहीर झाला. तो उच्च दर्जाचा व समाधानकारक होता पण सर शहापत अहमद खान म्हणतात, ''नेहरू रिपोर्टमुळे मुस्लीम अल्पसंख्याकाचे प्रश्न पूर्णतः सुटले नाहीत.''

**ब) पाकिस्तानच्या निर्मितीची सुरुवात – स्वातंत्र्यप्राप्तीकडे**

स्वतंत्र मतदार संघ, जातिय निवाडा किंवा कायदे कौंसिलमध्ये आरक्षण देऊनही अल्पसंख्य धर्म व जातींच्या सुरक्षा तथा विकासाचे प्रश्न सुटले नाहीत. यातूनच भारतात द्विराष्ट्रवादाचा पाया मजबूत

होऊ लागला. मुस्लीम लीगला संबोधीत करताना १९३० मध्ये पहिल्यांदा महंमद इक्बाल यांनी पाकिस्तान शब्दाचा वापर केला. यात Pakistan या शब्दाचा अर्थ सांगताना चौधरी रहिमतअली म्हणतात. P म्हणजे पंजाब A म्हणजे अफगाणिस्तान Ki म्हणजे काश्मिर S म्हणजे सिंध व Tan स्थान म्हणजे प्रदेश होय. रहिमतअली हे केंब्रिज विद्यापीठाचे हुषार विद्यार्थी होते. या कवी इक्बाल, चौधरी रहिमतअली व बॅ. जीना यांच्या पाकिस्तानच्या मागणीला ब्रिटिशांचा पाठिंबा होता. मुस्लीम लीग ही या काळात मुस्लीम मध्यमवर्गीय समुदायाची संघटना होती मात्र सामान्य मुस्लीम समाजाला फाळणीत फारसा रस नव्हता कारण तो पारंपरिकरित्या हिंदू व भारतीय संमिश्र संस्कृतीमध्ये स्वतःला धन्य मानत होता. १९१६ च्या फैजपूर अधिवेशनानंतर काँग्रेस ही अधिक गांधीवादी व लोकानुवर्ती बनली. तरीसुद्धा १९३७ च्या निवडणूकात मुस्लीम लीगला चांगल्या जागा मिळाल्या. यावेळी बॅ. जीना यांनी काँग्रेसला सर्व प्रकारचे सहकार्य करून राष्ट्रीय रचनात्मक कार्यक्रम पुढे नेण्यासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले पण जून १९३७ मध्ये प्रांतिक कौंसिलच्या कॅबिनेटमध्ये मुस्लीम प्रतिनिधी घेण्याचे लीगचे आवाहन काँग्रेसने फेटाळून लावले. त्यामुळे १९३७ मध्ये लखनौ येथे भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात बॅ. जीना यांनी काँग्रेसवर कठोर अशी टीका केली. आपल्या भाषणात बॅ. जीना म्हणाले, ''मुस्लीम लीग ही केवळ मुस्लीमांसाठी काम करीत नसून ती भारतातील सर्व अल्पसंख्य जाती जमातीच्या राजकीय, समान अधिकारांच्या सुरक्षेच्या संदर्भात काम करते.'' बॅ. जीनांनी पुढे असा आरोप केला की, काँग्रेस चळवळ ही मुस्लीमांवर हिंदू संस्कृती, हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न करते. याच वेळेपासून भारतात हिंदू व मुस्लीम अशी दोन राष्ट्रे आहेत असे म्हणण्यास बॅ. जीना यांनी सुरूवात केली. ब्रिटिश साम्राज्यशाही, हिंदू बहुसंख्यांक यांच्या तुलनेत मुस्लीम समाज सर्वच बाबतीत दुर्बल आहे असे बॅ. जीनांचे मत होते. एकतर मुस्लीम समाज हा पूर्व भारत वायव्य भारत वगळता सर्व ठिकाणी संख्येने कमी आहे. या समाजात इंग्रजी भाषा अवगत असणारे लोक कमी आहेत. काँग्रेसमध्ये मुस्लीम नेत्यांचे प्रमाण कमी आहे. व्यापार व उद्योगात हिंदूंची व बिगर मुस्लीमांचे प्रमाण मोठे आहे. म्हणूनच बॅ. जीना असे म्हणू लागले की, आम्हाला साम्राज्यवादी ब्रिटिशांपासून व बहुसंख्य हिंदूंच्या धार्मिक दबावापासून स्वातंत्र्य हवे आहे व यासाठी द्विराष्ट्रवाद हा एकमेव पर्याय शिल्लक आहे. १९३८ ते १९४० या म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात पाकिस्ताननिर्मितीच्या प्रक्रियेला अधिक वेग आला. १९४० मध्ये मुस्लीम लीगच्या लाहोर अधिवेशनात पहिल्यांदा उघडपणे पाकिस्तानची मागणी करण्यात आली. यावेळी आपल्या भाषणात द्विराष्ट्रवादाचे समर्थक बॅ. जीना म्हणाले, ''राष्ट्राच्या कोणत्याही व्याख्येनुसार मुस्लीम हे राष्ट्र आहे आणि म्हणूनच त्यांना स्वतःचा भूप्रदेश व राज्य असणे गरजेचे आहे.'' ते पुढे म्हणाले की, हिंदू व मुस्लीम हे दोन समांतर धर्म असून त्यांचे भिन्न तत्वज्ञान, सामाजिक चालीरिती व साहित्य संस्कृती भिन्न आहे. म्हणूनच वायव्य सरहद्द प्रांत व पूर्व भारतीय पट्ट्यात मुस्लीमांसाठी पूर्णतः स्वतंत्र, संरक्षणावर नियंत्रण असणारे व स्वतःचे विदेश धोरण, संसूचन, कस्टम चलन असणारे राष्ट्र हवे आहे. मुस्लीम लीग अशी मागणी करते असे बॅ. जीना म्हणाले. मात्र बॅ. जीनांच्या द्विराष्ट्रवादाला काही मुस्लीम नेत्यांचा विरोध होता.

## बिगर लीग मुस्लीम नेत्यांचा पाकिस्तान निर्मितीबाबतचा दृष्टिकोन

एप्रिल १९४० मध्ये आझाद मुस्लीम कॉन्फरन्स की, जी संघटना जमात उल उलेमा व इतर काही उदारमतवादी मुस्लीम चळवळींशी संबंधीत होती अशांनी बॅ. जीनांच्या फाळणीच्या विचारांना विरोध केला. ही परिषद दिल्ली येथे आयोजित केली होती. या संदर्भात आपले विचार मांडताना आझाद मुस्लीम कॉन्फरन्स असे जाहिर करीत होती की, ''ही भारतीय मुस्लीम संघटना देशाचे स्वातंत्र्य सुरक्षित राखण्यास वचनबद्ध आहे. तसेच ही संघटना सर्व भारतीय मुस्लीमांचे प्रश्न देशाच्या चौकटीत सोडवू इच्छिते.'' यासंदर्भात आपला खुलासा देताना ते म्हणतात, ''भारताला स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण असा स्वतःचा भूप्रदेश व राजनीती असून ती सर्वांसाठी सामाईक साधनसंपत्ती आहे. त्यामुळे येथे सर्वांचे समान हितसंबंध असून, सर्वांच्या समान जबाबदाऱ्या आहेत. त्यामुळे मुस्लीम समाज या सर्व कृती व घटकांचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे ही सभा भारताचे पूर्ण स्वातंत्र्य मागत असून मुस्लीम समाजाने या स्वातंत्र्य व सार्वभौमत्वासाठी पूर्वी मोठा त्याग केला असून पुढेही असा त्याग करण्यास तो तयार आहे.''

म्हणूनच फारूक असे म्हणतात की, त्यांना लीगचा द्विराष्ट्रवाद मान्य नाही तर आझाद मुस्लीम कान्फरन्स 'अखंड भारतीय राष्ट्रवाद' मान्य करते. या अंतर्गत मतभेदातून सुद्धा भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या शेवटच्या टप्प्यात पाकिस्तानच्या मागणीने पुन्हा अधिक जोर धरला.

## पाकिस्तानच्या मागणीचा शेवटचा टप्पा

द्विराष्ट्रवादाची मागणी मान्य करावी अथवा करू नये यासंदर्भात काँग्रेस पक्षाअंतर्गतही भिन्न स्वरूपाचे विचार होते. डॉ. आंबेडकरांनी १९४० मध्ये 'Thoughts on Pakistan' नावाचा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये त्यांनी पाकिस्ताननिर्मितीच्या पाठिमागची सैधांतिक भूमिका स्पष्ट केली. ते लिहितात, ''हिंदू आणि मुस्लीम हे समांतर स्वरुपाचे धर्म असून या दोन धर्मातील तत्वज्ञान परस्पर विरुद्ध स्वरुपाचे आहे. त्यांच्यामध्ये बळजबरीने समन्वय साधून त्यांना एका राष्ट्रात बांधून ठेवणे चूकीचे आहे.'' मात्र डॉ. आंबेडकरांची ही भूमिका म. गांधींना मान्य नव्हती. कोणत्याही परिस्थितीत भारताची फाळणी होऊ नये. असे त्यांचे मत होते १९४० नंतर उच्चभ्रू लोकांची असणारी मुस्लीम लीग सर्वसामान्यांची बनू लागली.

१९४२ मध्ये छोडो भारत आंदोलनामुळे म. गांधी व राष्ट्रीय काँग्रेसचे महत्व खेड्यापाड्यापर्यंत व सर्वसामान्यापर्यंत अधिक लोकप्रिय आणि जिव्हाळ्याचे बनले. याचवेळी १९४२ मध्ये क्रिप्स योजना जाहिर झाल्या. यामध्ये पाकिस्तान किंवा भारतीय राज्यसंघाबाहेर एक राज्य याप्रकारे वेगळ्या पाकिस्तानचे समर्थन केले होते. याला काँग्रेस वर्कींग कमिटीने विरोध केला होता. सप्टेंबर १९४४ मध्ये म. गांधी व बॅ. जीना यांच्यात फाळणीच्या संदर्भात महत्वपूर्ण चर्चा झाली. यावेळी हिंदू व मुस्लीम ही भिन्न राष्ट्रे आहेत असा पुनरुच्चार बॅ. जीना यांनी केला तर म. गांधी म्हणाले की, भारत हे पूर्वी व आजही एक राष्ट्र आहे. यावेळी पाकिस्तान निर्मितीसाठी सार्वमत घ्यावे आणि जर ते विभाजनाच्या बाजुने झाले तर भारताला स्वातंत्र मिळाल्याबरोबर पाकिस्तानच्या निर्मितीला मंजुरी

देण्यात येईल असा एक लोकसत्ताक विचार म. गांधींनी मांडला होता पण बॅ. जीनांना तो मान्य नव्हता. १९४६ मध्ये कॅबिनेट मिशन संघराज्य सदृश्य राजकीय व्यवस्थेचा स्वीकार करून केंद्र व घटक राज्यांमध्ये अधिकारांचे विभाजन केले. हा कॅबिनेट मिशनने सूचवलेला पर्याय काँग्रेस व लीगला मान्य होता. पण पुढे त्यांनी स्वतःच्या गटराज्यघटनेचा (Group Constitution) प्रस्ताव मांडल्याने काही प्रश्न तयार झाले. यावर तोडगा काढण्यासाठी ब्रिटिश सरकारने पं. नेहरू व बॅ. जीना यांना इंग्लंडमध्ये बोलणी करण्यास बोलवले व असे सूचित केले की, बहुसंख्याक समुदायाच्या इच्छेने तयार झालेली राज्यघटना अल्पसंख्य आणि इच्छा नसणाऱ्या गटावर लादणे लोकशाहीला संयुक्तीक नाही. ब्रिटिश सरकारच्या या धोरण व मतामुळे मुस्लीम लीगच्या मागणीला आणखी वेग आला आणि भरीव पुष्ठी मिळाली. त्यामुळे त्यांनी घटनासमितीवर बहिष्कार टाकला. हा बहिष्कार पुढेही कायम राहिल्याने पाकिस्तानच्या निर्मितीला अधिक चालना मिळाली. २० फेब्रुवारी १९४७ रोजी ॲटली भारतात आले. त्यांनी अशी घोषणा केली की, कोणत्याही परिस्थितीत जून १९४८ पूर्वी ब्रिटिश सरकार भारतातील जबाबदार लोकांच्या हातात त्यांची सार्वभौम, राजकीय सत्ता देऊ इच्छिते. प्रत्यक्ष हे सत्तांतर करण्यासाठी शेवटचे गव्हर्नर जनरल म्हणून लॉर्ड माऊंटबॅटन भारतात आले व त्यांनी ३ जून १९४७ रोजी या सत्तांतराचाच एक भाग म्हणून फाळणीची घोषणा केली. हिंदू मुस्लीम दंगली, गांधीचे उपोषण, बॅ. जीनांचा पाकिस्तानचा आग्रह यांनी हा कालखंड भारतीय राजकारणात विशेष गाजला व त्याचे दूरगामी परिणाम आजतागायत भारत व पाकिस्तानबरोबर आशिया खंडाला व पर्यायाने पण दूरान्वयाने जगाला भोगावे लागत आहेत.

**पाकिस्तानची निर्मिती, काश्मिरचा प्रश्न आणि भारत**

भारताची फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिती झाल्याने आता समस्या सुटतील, अशी आशा पुढे फोल ठरली कारण काश्मिरच्या निमित्ताने भारत व पाकिस्तान या दोन राष्ट्रातील संघर्ष आशिया खंडातीलच नव्हे तर राष्ट्रसंघाच्या निमित्ताने आंतरराष्ट्रीय प्रश्न बनला.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने संसदीय लोकशाही व अर्धसंघराज्याचा स्वीकार केला. पारंपरिक भारतामध्ये यावेळी ५६५ संस्थाने काम करीत होती. यात जुनागढ, हैद्राबाद, काश्मिर, कोल्हापूर इत्यादी काही महत्वाची संस्थाने होती. यातील काही संस्थानात मुस्लीम समाज बहुसंख्याक होता तर काही संस्थानात हिंदू समाज बहुसंख्याक होता. राष्ट्रीय सत्तारुढ काँग्रेसने संस्थानांचे विलीनीकरण करताना एकूण दोन पर्याय सांगितले यात–

१) स्थानिक लोकांची कोणत्या देशात विलीनीकरण करावे, ही इच्छा बघावी.

२) भौगोलिक दृष्ट्या त्या संस्थानाला जवळचा देश असेल त्यास संस्थान जोडावे.

साधारणतः लोकांची इच्छा व भौगोलिक समिपतेचा विचार करता मुस्लीम संस्थाने उदा. हैद्राबाद सुद्धा भारतात विलीन झाले पण काश्मिरचा प्रश्न या सर्वापेक्षा वेगळा होता. काश्मिर हे पारंपरिक व ऐतिहासिक दृष्ट्या हिंदू राजांचे संस्थान होते. कश्यप नावाचे हिंदू राजे पूर्वी येथे राज्य

करीत. म्हणूनच कश्यप राज्याची भूमी म्हणजे मीर असे ते कश्यप-मीर म्हणजे काश्मिर. या काश्मिरमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात हरिसिंह नावाचा राजा राज्य करीत होता. मात्र काश्मिरमध्ये बहुसंख्य समाज हा मुस्लीम होता व सध्याही आहे. भौगोलिक समिपतेचे निकष लावले तर काश्मिर हे संस्थान भारतालाही जवळचे आहे व पाकिस्तानलाही जवळचे आहे. त्यामुळे काश्मिरचे विलीनीकरण कसे करावे हा मोठा पेच कॉंग्रेससमोर होता. पं. नेहरूंनी या संदर्भात अनेक पर्याय तपासून पाहिले होते.

या संदर्भात पाकिस्तानचे असे मत होते की, भौगोलिकदृष्ट्या काश्मिर आम्हाला जवळचे आहे तसे ते भारतालाही जवळचे आहे. त्यामुळे या संस्थानाचे विलिनीकरण करताना भौगोलिक जवळीकतेचा मुद्दा काश्मिरबाबत अप्रस्तुत असून काश्मिरच्या जनतेचे लोकमत काय आहे याचा विचार करावा. मात्र भारताने लोकमताचा पाकिस्तानचा मुद्दा फेटाळून लावला कारण या काळात काश्मिरमध्ये प्रचंड अस्थिरता व अशांतता असून सीमाभागात सतत चकमकी घडत होत्या. काश्मिरच्या सुरक्षेसाठी भारताने या भागात सैन्य तैनात केले व थोडीफार स्थिरता तयार झाल्याने लोकमताची तयारी मान्य केली पण यावेळी पाकिस्तानने सैन्य माघारी घ्या व मग लोकमत घ्या असा आग्रह धरला. या साऱ्या वादात काश्मिरचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनला.

५ जून १९४७ रोजी संस्थाने विलीनीकरण विभागाच्या निर्मितीनंतर देखिल काश्मिरने पाकिस्तानसोबत 'जैसे थे करार' (स्टँड स्टिल ॲग्रीमेंट) केलेला होता. कारण काश्मिरचे सारे दळणवळण व व्यापारी व्यवहार हे पाकिस्तानमध्ये गेलेल्या भूभागातील बाजारपेठाशी होते. संस्थानाचे हे सारे विलीनीकरण हे प्रचंड डोकेदुखीचे होते. कारण प्रत्येक संस्थानिक वेगवेगळ्या अटी पुढे करून आपला अधिक फायदा करून घेत होता. अन्यथा आम्ही भारतात राहाणार नाही अशी धमकीही ते देत होते. 'फ्रीडम ॲट मिडनाईट' या लॅरी कॉलिन्स यांच्या पुस्तकात हे सारे चढउतार बघावयास मिळतात आणि हे सर्व विलीनीकरणाचे प्रकरण वल्लभभाई पटेलांनी किती कौशल्याने हाताळले याची प्रचिती येते. भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार संस्थान वगळून असणाऱ्या भारताचे संबंध संस्थानांबरोबर एखाद्या संघराज्यातील घटक राज्यांप्रमाणे असतील, असे मान्य केले होते. त्यामुळे फक्त दळणवळण, परस्पर व्यवहार आणि संरक्षण या विषयापुरते मध्यवर्ती शासनाला अधिकार दिले होते व ही तरतूद भारत सरकारने मान्य केली होती. अर्थातच बाकी सर्व अधिकार संस्थानांना देण्यात आले होते. पण पुढे काश्मिरचा अपवाद वगळता इतर संस्थानांबरोबर नव्याने करार करून भारत सरकारने बाकीचे अधिकार स्वतःकडे घेतले. त्यामुळे काश्मिर सोडून बाकीच्या संस्थानांचे अधिकार पूर्णतः नष्ट झाले.

या काळात राजा हरिसिंग यांनी सतत सरकारकडे मदतीची अपेक्षा केली व नॅशनल कॉन्फरन्सचे शेख अब्दुल्ला यांच्या सहकार्याने लोकमताला फाटा देत सैनिकी मदतीने पाकिस्तानला नियंत्रणरेषेमागे लोटले. काश्मिरचा प्रश्न फार लांबणीवर टाकणे चूकीचे आहे हे लक्षात घेऊन भारताने डिसेंबर १९४७ मध्ये काश्मिरचा प्रश्न युनोमध्ये दाखल केला. मात्र पाकव्याप्त काश्मिरला आपण भारतात सामील करू शकलो नाही. ५ मार्च १९४८ रोजी तशी माहिती पं. नेहरूंनी लोकसभेत दिली. ज्या परिस्थितीत

काश्मिर भारतात आले त्याचा विचार करता काश्मिरच्या विशेष हक्कांना रक्षण देण्यासाठी एखादे कलम असावे असा आग्रह शेर-ए-काश्मिर शेख अब्दुल्ला यांनी धरला. पं. नेहरू व शेख अब्दुल्ला यांचे मैत्रीपूर्ण संबंध व एकंदर परिस्थिती पहाता काँग्रेसने काश्मिर मूळ पदावर येईपर्यंत त्यांना ३७० वे विशेष कलम संविधानात अंतर्भूत केले.

**क) पाकिस्तान राज्यघटना निर्मितीची पार्श्वभूमी :**

११ ऑगस्ट १९४७ रोजी कराची येथे पाकिस्तानी घटना समितीची पहिली बैठक राज्यघटनानिर्मितीच्या संदर्भात झाली. बॅ. जीना हे त्यावेळी १५ ऑगस्ट रोजी पाकिस्तानचे औपचारिक गव्हर्नर जनरल होते तर लियाकत अली खान हे मुस्लीम लीगचे सेक्रेटरी होते. जे पुढे पाकिस्तानचे पंतप्रधान झाले. संपूर्ण आयुष्यभर लियाकत अली खान यांनी लीगच्या माध्यमातून पाकिस्तान निर्मितीसाठी प्रयत्न केले आणि त्यांच्या प्रयत्नामुळे कराचीमध्ये संघराज्यात्मक सरकारची स्थापना झाली. १९४७ च्या भारत स्वतंत्रता कायदा व १९३५ च्या भारत प्रशासन कायद्यान्वये, काही बदल करून पाकिस्तान वर्कींग (तात्पुरत्या) राज्यघटनेची निर्मिती झाली. यात सुरुवातीला संघराज्यासारखी कायदेमंडळाची रचना केली होती. पाकिस्तानी घटना समितीला भारत स्वतंत्रता कायदा १९४७ मध्ये दुरुस्ती करण्याचा अधिकार दिला होता. मात्र कोणत्याही परिस्थितीत ब्रिटिश कायदा न वापरण्याचा निर्णय पाकिस्तान घटना समितीने घेतला होता. बॅ. जिनांना गव्हर्नर जनरल पदी नेमून भारताप्रमाणे पाकिस्तान सार्वभौम राष्ट्र बनले.

भारताप्रमाणे पाकिस्तानमधील कॅबिनेट सामूहिकरित्या घटनात्मक सभेला कायदेमंडळाचा भाग म्हणून जबाबदार राहिल ही संसदीय पद्धती कायम केली. पहिल्या घटनात्मक सभेमध्ये (Constituent Assembly) एकूण ७० सदस्य होते. त्यापैकी काही मंत्री तर काही प्रांतांचे नेते होते. १९३५ च्या भारत प्रशासन कायद्याप्रमाणे पाकिस्तानने संघराज्य पद्धती स्वीकारली होती. यात पश्चिम पाकिस्तान, सिंध, पूर्व बंगाल अशी प्रांतरचना होती व प्रत्येक प्रांतासाठी (घटकराज्य) कायदेशीर विधीसभा निवडणुकीद्वारे निर्माण करण्याचा अधिकार लोकांना होता. या घटक राज्यांमध्ये बहावलपूर, खैरपूर, कलात, माकरण, रबरान व लासबेला ही संस्थानिकांची संस्थाने होती. त्यांना संरक्षण, परराष्ट्र व संसूचन सोडून व्यापक स्वायत्तता होती. बलुचिस्तानचा कारभार गव्हर्नर जनरलच्या प्रतिनिधीद्वारे स्थानिक नियुक्त प्रतिनिधीद्वारे चालत होता. सर्व कारभार सुरळीत चालावा यासाठी कराची ही पाकिस्तानी संघराज्याची राजधानी करण्यात आली.

पाकिस्तानी स्वातंत्र्याच्या व राज्यघटना निर्मितीच्या सुरुवातीच्या काळात बॅ. जीना हे पाकिस्तानचे सर्वेसर्वा होते. ते मुस्लीम लीगचे नेते होते तसेच ते गव्हर्नर जनरल होते. घटनासमितीचे अध्यक्ष होते. १९४८ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. या समकाळात बॅ. जीना म्हणजे पाकिस्तान होते असे त्यांचे वर्णन खलीद बीन सैद करतात. त्यांच्या सूचनेशिवाय कॅबीनेट, केंद्र सरकार व घटक राज्यात कोणताची निर्णय घेतला जात नसे. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा वारसदार कोण यावर भिन्न मते मांडली गेली. पूर्व बंगाल प्रांताचे मुख्यमंत्री ख्वाजा निजामुद्दिन हे पहिले घटनात्मक जनरल म्हणून

पाकिस्तानचे प्रमुख बनले तर लियाकत अली खान हे पाकिस्तानचे पहिले प्रधानमंत्री बनले. या नव्या सरकारसमोर अनेक समस्या होत्या. यात राज्यघटनेची निर्मिती, काश्मिरचा प्रश्न, पाटबंधारे, शेती, पाणी, उद्योगधंदे, औद्योगिकरण व दोन्ही पाकिस्तानमध्ये (पूर्व पाकिस्तान म्हणजे आताचे बांगला व पश्चिम पाकिस्तान म्हणजे सध्याचे पाकिस्तान) समन्वय साधने होय.

**पाकिस्तानच्या पहिल्या राज्यघटनेची निर्मिती :**

पाकिस्तानच्या घटना समितीच्या निर्मितीनंतर पहिल्या दोन वर्षात समितीला फारसे काही काम करता आले नाही. मार्च १९४९ घटना समितीने राज्यघटनेची काही ध्येय्ये व उद्दिष्टे तयार केली. यात पुढील मूलभूत उद्दिष्टांचा समावेश होतो.

१) सार्वभौमत्त्व ही देवाची शक्ती असून ती लोकांद्वारे प्रगट होत असली तरी त्यामागे कुराण व सुन्नाहची प्रेरणा आहे.

२) पाकिस्तान हे संघराज्य असेल.

३) लोकशाही, स्वातंत्र्य, समता, सहनशिलता व सामाजिक न्याय ही राज्यघटनेची तत्त्वे असतील.

४) लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीमार्फत राज्य आपले अधिकार वापरेल.

५) पाकिस्तानमधील सर्व नागरिकांना समान अधिकार असतील.

या घटनासमितीचा एक वस्तुनिष्ठ समिती म्हणून एक ‘मूलतत्त्व समिती’ (Basic Principles Committee) गठीत करण्यात आली. या समितीकडे –

अ) मूलभूत अधिकार

ब) निवडणूका

क) न्यायसंस्था

**ड) संघराज्य व प्रांतिक राज्यघटना :**

यासारखे मूलभूत विषय देण्यात आले होते. या समितीची रचना २१ नोव्हेंबर १९५० रोजी लियाकत अली खान यांनी केली होती. या समितीवर पूर्व पाकिस्तानने कठोर अशी टीका केली. कारण त्यांना कायम स्वरूपी अल्पसंख्य मानले जात होते. या संघर्षाचा एक भाग म्हणून १६ ऑक्टोबर १९५१ रोजी लियाकत अली खान यांची अफगाणी नागरिकाने हत्या केली. लियाकत अली खान व बॅ. जीना यांच्या समकाळात मृत्यू झाल्याने पाकिस्तानमध्ये एक मोठी राजकीय पोकळी तयार झाली. या दोन्ही जागा प्रधानमंत्री व गव्हर्नर जनरल या ख्वाजा निजामुद्दिन यांच्याकडे देण्यात आले. पण लगेचच गुलाम महंमद यांना पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल म्हणून नेमण्यात आले. ख्वाजा निजामुद्दिन यांच्याकडे मूलतत्त्व समितीने आपला अहवाल २२ डिसेंबर १९५२ रोजी दिला. यात राज्यघटनेच्या संदर्भात पुढील तरतूदी करण्यात आल्या होत्या. यामध्ये –

१) पाकिस्तानमध्ये द्विगृही सभागृह असेल यात एक हाऊस ऑफ युनिटस म्हणजे राज्यसभा आणि दोन हाऊस ऑफ पीपल म्हणजे लोकसभा यातील लोकसभेची रचना लोकसंख्येच्या आधारावर करण्यात येईल.

२) ही राज्यघटना बोर्ड ऑफ उलेमाजची रचना मान्य करते. जे बोर्ड कायदेमंडळाने केलेले कायदे इस्लामी तत्त्वानुसार आहेत का? हे तपासून पाहिल.

३) संसदीय पद्धतीप्रमाणे कॅबीनेट मंत्री हे केवळ कनिष्ठ (लोकसभा) सभागृहाला जबाबदार असतील.

४) संघराज्याचा पाकिस्तान स्वीकार करीत असले तरी घटक राज्यांना फार थोडी स्वायत्तता दिलेली असेल.

घटना समितीचे सदस्य ख्वाजा निजामुद्दिन यांना व कॅबिनेट मंत्रीमंडळाला एप्रिल १९५३ मध्ये पदावरून दूर केल्यानंतर मुस्लीम लीग पक्षामध्ये अंतर्गत संघर्ष वाढला. याच काळात पूर्व पाकिस्तानला पश्चिम पाकिस्तानचे सततचे वर्चस्व मान्य नव्हते कारण पश्चिम पाकिस्तानने उर्दू ही राष्ट्रभाषा म्हणून जाहीर केली तर पूर्व पाकिस्तान (सध्याचा बांगला देश) ने बंगाली भाषेचा आग्रह धरला होता. घटक राज्यांना दिले जाणारे मर्यादित स्वातंत्र्य, पश्चिम पाकिस्तानमध्ये नोकऱ्यांची अधिक संधी, उलेमांची कायदा निर्मितीमध्ये ढवळाढवळ आणि प्रशासनात पाश्चात्त्य विचारसरणीच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचा भरणा अशा कोंडीमध्ये पाकिस्तानची वाटचाल सुरू होती. याशिवाय अल्पसंख्य जातीजमातींचे प्रश्न सरकारसमोर होते.

त्यामुळे राज्यघटना निर्मितीचे काम महंमद अली यांच्या काळात पूर्णतः थंडावले. पूर्व पाकिस्तानमध्ये प्रांतिक निवडणूका जवळ आल्याने पूर्व पाकिस्तानला कायदेमंडळात समान स्थान देण्याचा निर्णय महंमद अली यांनी घेतला. यासाठी ३ ऑगस्ट १९५४ रोजी घटनादुरुस्ती कायदा संमत करण्यात आला.

**नियंत्रीत लोकशाही**

गव्हर्नर जनरलचे अधिकार घटना समितीने कमी केले पण गव्हर्नर जनरलनेच २४ ऑक्टोबर १९५४ रोजी घटना समिती हुकूमशाही पद्धतीने वागते म्हणून ती बरखास्त केली. यावेळी कॅबिनेटही बरखास्त करण्यात आली. महंमद अली यांनी एका निपक्ष कॅबिनेटची स्थापना केली. याला 'हुषारांची मंत्री परिषद' असे नाव मिळाले. या सर्व गोंधळात पंतप्रधान, प्रशासकीय अधिकार या सर्वांचे अधिकार नष्ट होऊन लष्कराकडे सत्ता जावू लागली.

यावेळी अंतर्गत कारभार मंत्री इश्कंदर मिर्झा जे पुढे बंगालचे म्हणजे पूर्व पाकिस्तानचे गव्हर्नर बनले. जनरल अयुब खान सैन्यदलाचे प्रमुख, चौधरी महंमद अली सनदी नोकर सेवांचे प्रमुख व वित्त मंत्री या काही ठराविक लोकांच्या हातात सत्ता केंद्रित झाली. यालाच 'नियंत्रीत लोकशाही' (Controlled Democracy) असे म्हणतात. या नियंत्रीत लोकशाहीचे व जाहिर केलेल्या

आणीबाणीचे समर्थन यावेळी इश्कंदर मिर्झा यांनी केले. ते म्हणतात, ''विकसनशील व मागास राष्ट्रांना अजून लोकशाही शिकावयाची आहे. ही प्रक्रिया व लोकशाहीचे सार्वत्रीकरण होईपर्यंत आणीबाणी घोषित करण्यात लोकशाहीविरोधी असे काहीच नाही कारण ९५% लोकांनी आणीबाणीस पाठिंबा दिला आहे.

या सर्व उलट सुलट घटनाक्रमातून पाकिस्तानमध्ये वैधानिकताच अडचणीत आली. म्हणूनच ही अस्थिरता मिटवण्यासाठी २८ मे १९५५ रोजी नव्या घटना समितीसाठी निवडणूका जाहिर झाल्या. यात ८० सदस्य होते. ज्यांची पूर्व व पश्चिम पाकिस्तानात समान वाटणी केली होती. या निवडणूका २१ जूनला झाल्या. यात कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. मुस्लीम लीग २५, युनायटेड फ्रंट १०, अवामी लीग १३, स्वतंत्र ४, पाकिस्तान नॅशनल काँग्रेस ४, शेड्युल कास्ट फेडरेशन ३, नून ग्रुप ३, युनायटेड प्रोग्रेसिव्ह पार्लमेंटरी पार्टी २, आझाद पाकिस्तान पक्ष १ व कम्युनिस्ट १ या निवडणूकीत लीगला मोठा धक्का बसला व महंमद अलींनी आपला राजीनामा सादर केला.

या नव्या घटनासमितीने काही महत्त्वाच्या घोषणा केल्या. यात पाकिस्तान हे इस्लामी प्रजासत्ताक असेल व ते राष्ट्रकुल परिषदेचे घटक राष्ट्र असेल. मेजर जनरल इश्कंदर मिर्झा यांना ५ मार्च १९५६ रोजी हंगामी राष्ट्राध्यक्ष म्हणून संबोधले जाईल. या राज्यघटनेत २३४ कलमे असून ती १३ भागात विभागलेली असतील. यातील पहिला भाग प्रजासत्ताक व घटक प्रांतविषयक असेल, विभाग दुसरा हा मूलभूत हक्कांशी संबंधीत असेल, विभाग तिसऱ्यात राज्याची मार्गदर्शक तत्त्वे असतील, विभाग चौथा हा फेडरेशनचा तपशील देईल. पाचवा विभाग प्रांतांसाठी असेल. सहावा विभाग संघराज्यातील केंद्र व घटक संबंध निर्धारित करील. सातवा विभाग हा मालमत्ता व करारासाठीचा असेल आठव्या विभागात निवडणूक तरतूदी असतील. नववा विभाग न्याय तर दहावा सनदी सेवांचा तर अकराव्यात आणीबाणीच्या तरतूदी समाविष्ठ असतील. बारावा विभाग सर्वसाधारण विषयांचा तर तेराव्यात तात्पुरत्या तरतूदींची रचना असेल.

**१९५६ च्या पाकिस्तानी राज्यघटनेची वैशिष्ट्ये**

या राज्यघटनेने संघराज्याचा स्वीकार केला. यात केंद्र व घटक राज्यात कामाचे विभाजन करून फेडरल, प्रांतिक व समवर्ती या तीन विषय याद्या तयार केल्या. ही राज्यघटना अंशतः कठोर अशी तयार करण्यात आली. कारण १० वे कलम घटक राज्याशिवाय बदलता येत नाही. पाकिस्तानने १९५६ मध्ये संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केला. यात केंद्रात राष्ट्राध्यक्ष प्रमुख असेल व कॅबीनेट मंत्री कायदेमंडळाला जबाबदार असतील. पाकिस्तानने यावेळी एकगृही कायदेमंडळाचा स्वीकार केला. राष्ट्रीय लोकसभेमध्ये ३०० सदस्य असतील. १० जागा १० वर्षासाठी स्त्रियांना राखीव असतील. राष्ट्रीय लोकसभेची मुदत ५ वर्षे असून ती प्रौढ मताधिकाराने तयार होईल. असे निर्णय झाले. त्यांनी भारताप्रमाणे स्वतंत्र न्यायमंडळाची रचना केली. सर्वोच्च न्यायालय व घटक राज्यांची उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश हे राष्ट्राध्यक्षाकडून पाकिस्तानचे सर्वोच्च न्यायाधीशाच्या शिफारसीने करतील. या राज्यघटनेने राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचा स्वीकार केला. पाकिस्तानी

प्रजासत्ताक हे सामाजिक न्याय व इस्लामी तत्त्वांवर कल्याणकारी बनविण्यासाठी ही तत्त्वे होती. त्यांनी राष्ट्रीय आर्थिक समिती स्थापुन नियोजीत अर्थव्यवस्थेला प्राधान्य दिले होते. ही राज्यघटना निःपक्ष व स्वतंत्र निर्वाचन मंडळाचा स्वीकार करीत होती. तसेच भारताप्रमाणे एकूण ९ मूलभूत हक्कांना प्राधान्य दिले होते. आपल्या उद्देशपत्रिकेत पाकिस्तानने सर्वशक्तीमान परमेश्वराला, अल्लाला राज्यघटनेचा आध्यात्मिक आधार मानले होते. म्हणूनच या राज्यघटनेचा तसा वास्तववादी आधार हा कुराण व सुन्नाह होता. या राज्यघटनेने आणीबाणीच्या तरतूदी स्वीकारून पाकिस्तानला कॉमनवेल्थ समूहात सामील राहाण्याचे मान्य केले होते.

**शासन संस्थांची कार्यपद्धती**

**अ) कायदेमंडळ :**

पाकिस्तानमध्ये केंद्रिय कायदेमंडळाला नॅशनल असेंब्ली असे म्हणतात. यात राष्ट्राध्यक्ष व एकाच गृहाचा समावेश होतो. यात १५६ सदस्य होते. यातील निम्मे सदस्य हे पूर्व व पश्चिम पाकिस्तानमधून निवडले जात. तीन जागा स्त्रियांसाठी राखीव होत्या.

हे कायदेमंडळ बरखास्त न झाल्यास ५ वर्षेपर्यंत काम करीत असे. कायदेमंडळाचा एक सभापती असतो व तो सभेचे कामकाज चालवतो जर तो उपस्थित नसेल तर सर्वोच्च न्यायालयाचा सर न्यायाधीश हे काम पहातो. राष्ट्राध्यक्षांना कायदेमंडळ बरखास्त करण्याचा अधिकार आहे. पण कायदेमंडळाची मुदत एकशेवीस दिवसांपेक्षा कमी शिल्लक असेल तर राष्ट्राध्यक्ष कायदेमंडळ बरखास्त करू शकत नाहीत.

पाकिस्तानच्या कायदेमंडळाची कार्यपद्धती ही साधारणतः भारत व इंग्लंडसारखी आहे. तिथेही समिती पद्धती आहे पण त्यांना फारसे महत्त्व नाही. (They are sleeping Committees) सध्या पाकिस्तानात १९ विविध प्रकारच्या समित्या आहेत.

पाकिस्तानात राष्ट्राध्यक्ष हा कायदेमंडळाचा फार महत्त्वाचा भाग आहे. त्याच्या परवानगीशिवाय कायदेमंडळ आपले अधिकार वापरू शकत नाही. नॅशनल ॲसेंब्लीने एखादे विधेयक संमत केल्यानंतर त्यास राष्ट्राध्यक्षाची संमती लागते. त्यास तो परवानगी देतो. राखून ठेवतो वा काही सूचनासह परत पाठवतो. यासाठी राष्ट्राध्यक्षास ३० दिवसांची मुदत दिलेली आहे. ३० दिवसात कोणताच निर्णय घेतला नाही तर ते विधेयक संमत झाले असे समजतात. अमेरिकेप्रमाणे पाकिस्तानात राष्ट्राध्यक्षांना पॉकेट व्हेटोचा अधिकार नाही. मात्र एखाद्या विधेयकावरून राष्ट्राध्यक्ष व कायदेमंडळात मतभेद झाले तर राष्ट्राध्यक्षांच्या निर्वाचन मंडळातील सदस्यांचे लोकमत 'हो किंवा नाही' याप्रकारे तो घेऊ शकतो. राष्ट्राध्यक्ष नॅशनल असेंब्लीला उद्‌बोधीत करू शकतो किंवा संदेश पाठवू शकतो. कौंसिल ऑफ मिनिस्टरचे सदस्य, महाधिवक्ता यांना असेंब्लीचा कामकाजात मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. प्रत्येक विधेयक मांडण्यापूर्वी त्यास राष्ट्राध्यक्षांची पूर्वसंमती घ्यावी लागते.

**वित्तीय कार्यपद्धती/केंद्रिय एकत्रित फंड :**

सर्व प्रकारचा महसूल व मिळणारे उत्पन्न हा केंद्र सरकारचा एकत्रित केंद्रिय निधी आहे. या केंद्रिय एकत्रित निधीमधील पैसा खर्च करण्याचा अधिकार केंद्रिय कायदेमंडळाला आहे मात्र त्यास पाकिस्तानी राज्यघटनेनुसार राष्ट्राध्यक्षांची मान्यता लागते. या खर्चातील काही मान्यताप्राप्त विषय- उदाहरणार्थ राष्ट्रपतींचे मानधन व राष्ट्रपती भवनावरील खर्च, सभापती, उपसभापती व नॅशनल ॲसेंब्लीचे सदस्य, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, राष्ट्राध्यक्षांचे कौंसिल ऑफ मिनिस्टर, प्रमुख निर्वाचन अधिकारी, इस्लामीक सल्लागार सदस्य, संसदेचे सचिव, केंद्रिय लोकसेवा आयोगाचे सदस्य, महालेखापरिक्षक, कायदेमंडळाशी संलग्न केंद्रिय प्रशासकीय अधिकारी, इत्यादीवर होणारा खर्च इत्यादी.

**अंदाजपत्रक प्रक्रिया व कायदेमंडळाची भूमिका :**

पाकिस्तानी राज्यघटनेच्या ४० व्या कलमानुसार राष्ट्राध्यक्षांना प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला नॅशनल ॲसेंब्लीसमोर एकत्रित केंद्रिय निधी व खर्च यांचा लेखा सादर केला जातो. यालाच वार्षिक अंदाजपत्रक म्हणतात. यात जमेच्या बाजूला (१) सध्याचे कर (२) नवे कर, वाढीव कर (३) उसनवार मिळालेला फंड (४) इतर माध्यमातून मिळालेला पैसा यांचा जसे कर्ज इत्यादीचा समावेश होतो. तर

खर्चाच्या बाजुला मागील वर्षी नॅशनल ॲसेंब्लीने जे विकास कार्यक्रम मंजूर केले आहेत व जे अजून पूर्ण झाले नाहीत त्यांना यात प्राधान्य दिले जाते किंवा ज्यांना खर्च मंजूर आहे पण प्रत्यक्षात निधी मिळाला नाही त्यांना अग्रक्रमाने अंदाजपत्रकात खर्च करण्यास मंजूरी दिली जाते. याला नॅशनल ॲसेंब्लीची मान्यता लागते. ही मुदत १४ दिवसांची असते. राष्ट्राध्यक्षाशी चर्चा करून नॅशनल ॲसेंब्ली आर्थिक मागण्या व करावा लागणारा खर्च याबाबतचा निर्णय घेऊ शकते. यातील काही मागण्या नाकारण्याचा अधिकार नॅशनल असेंब्लीला आहे. अधिकृत खर्चाला राष्ट्राध्यक्ष व ॲसेंब्लीची संयुक्त संमती लागते तरच कलम ४१ न्वये असा खर्च करता येतो. मात्र पूरक मागण्यांच्या संदर्भात जर एखाद्या खात्याचा खर्च अचानक वाढला किंवा वाढण्याची शक्यता वाटली तर पुरवणी मागण्या करता येतात. अशा उशिरा पण गरजेच्या मागण्यांना पूरक वा पुरवणी मागण्या म्हणतात. त्यासाठी अंदाजपत्रकात समाविष्ठ नसलेला पण करावा लागणाऱ्या अतिरिक्त खर्चास नॅशनल ॲसेंब्लीची संमती लागते. तसेच राष्ट्राध्यक्ष अशी कारणे तपासून ॲसेंब्लीस सूचना करतो.

**संचित निधी :**

अंदाजपत्रकात वा पुरवणी मागण्यात न केलेल्या पण अचानक उद्‌भवलेल्या आर्थिक पेचप्रसंगाला तोंड देण्यास राष्ट्रीय संचित निधी असतो. पाकिस्तानमध्ये तो राष्ट्राध्यक्षांच्या संमतीने खर्च करण्याचा अधिकार नॅशनल ॲसेंब्लीला आहे.

**कायदेमंडळ व शासन :**

पाकिस्तानमध्ये शासन हे प्रत्येक आर्थिक वर्षात जेवढा खर्च करते किमान तेवढा किंवा आगामी वर्षात संभाव्य खर्च किती अपेक्षीत आहे याचा विचार करून अंदाजपत्रकाची कार्यवाही करण्याचा प्रयत्न करते. संसदीय, अध्यक्षीय अशा सर्वच देशांमध्ये साधारणतः याच पद्धतीने शासनसंस्था काम करते.

**(ब) पाकिस्तानमधील केंद्रिय कार्यकारी मंडळ**

भारतातील संसदीय पद्धतीप्रमाणे पाकिस्तानमध्ये कार्यकारी मंडळ म्हणजे शासन कायदेमंडळ म्हणजे संसद व सर्वोच्च तथा घटक राज्याची न्यायालये यांच्यामध्ये देशाची सर्वोच्च सत्ता विभागलेली आहे. १९४७ ते १९५८ पर्यंत पाकिस्तानमध्ये कॅबिनेट प्रकारची म्हणजे मंत्रीमंडळात्मक प्रकारची शासनपद्धती स्वीकारली होती. १९५६ च्या राज्यघटनेनुसार पाकिस्तानने प्रजासत्ताकाचा स्वीकार करून राष्ट्राध्यक्षांना राज्याचे कार्यकारी प्रमुख म्हणून मान्यता दिली पण १९५८ मध्ये प्रे. मिर्झांनी राजीनामा दिल्यानंतर जनरल अयुबखान यांच्या हातात सत्ता गेली. अयुबखान लष्करप्रमुख असल्याने राष्ट्राध्यक्षाला घटनात्मक व वास्तविक व्यापक अधिकार मिळून राष्ट्राध्यक्ष व लष्करप्रमुख ही दोन्ही पदे एकत्र आल्याने पाकिस्तानमध्ये संसदीय ऐवजी अध्यक्षीय हुकूमशाही सदृश्य परिस्थिती निर्माण झाली.

**राष्ट्राध्यक्षांची निवडणूक : पात्रता**

१) अशी व्यक्ती मुस्लीम असली पाहिजे.

२) अशा व्यक्तीने वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असावीत.

३) नॅशनल ॲसेंब्लीमध्ये निवडून येण्याची त्या व्यक्तीची पात्रता असावी.

४) सत्ता ग्रहण करण्यापूर्वी त्या व्यक्तीस सर्वोच्च न्यायालयाच्या प्रमुख न्यायाधीशासमोर आपल्या पदाची शपथ घ्यावी लागते.

५) राष्ट्राध्यक्षाची मुदत पाच वर्षाची असते.

६) राष्ट्राध्यक्षाला त्याच्या पदाचा राजीनामा हा नॅशनल असेब्लींच्या सभापतीकडे देता येतो.

**राष्ट्राध्यक्षाविरुद्धचा महाभियोग** (Impeachment of President)

नॅशनल ॲसेंब्लीच्या १/३ सदस्यांनी जर लेखी स्वरूपात ॲसेंब्लीच्या सभापतीकडे महाभियोगाचा प्रस्ताव सादर केला तर राष्ट्राध्यक्षाने केलेल्या राष्ट्रविघातक वा घटनाबाह्य कृतींची चौकशी होऊ शकते. यावर मत मांडण्यासाठी सभापती त्या ठरावाची एक प्रत राष्ट्राध्यक्षांना देतो. त्यासाठी चौदा दिवसाचा अवधी दिला जातो. राष्ट्राध्यक्षाला नॅशनल ॲसेंब्लीसमोर आपली बाजू मांडण्याचा अधिकार आहे. पण जर ॲसेंब्लीच्या ३/४ मतांनी महाभियोगाचा ठराव संमत केला तर

राष्ट्राध्यक्षाला तेथून पुढे दहा वर्षे अपात्र मानले जाते. याशिवाय शारीरिक व मानसिक अपात्रतेच्या कारणातूनही त्याला पदमुक्त करता येते. राष्ट्राध्यक्षाच्या गैरहजेरीत नॅशनल अॅसेंब्लीचा सभापती राष्ट्राध्यक्षपदाचा कारभार तात्पुरत्या स्वरूपात पहातो.

**पाकिस्तानच्या राष्ट्राध्यक्षाची कामे :**

पाकिस्तानचा राष्ट्राध्यक्ष हा प्रमुख कार्यकारी सेनापती मानला जातो. त्याला कायद्याने सर्व लष्करी अधिकार मिळाले आहेत. या दृष्टिने सैन्यदलाची रचना, पुनर्बांधणी व लष्करी अधिकाऱ्यांच्या तो नेमणूका करतो. राज्यघटनेच्या १७ व्या कलमानुसार सैन्यदलातील अधिकाऱ्यांच्या अटी व पगार त्याला ठरवता येतात तर कलम १८ नुसार कोणत्याही कोर्टाने दिलेली शिक्षा कमी वा माफ करण्याचा त्यास अधिकार आहे.

**कायदेमंडळाला मार्गदर्शन :**

पाकिस्तानी राष्ट्राध्यक्षाला कायदेविषयक व्यापक अधिकार आहेत. तो नॅशनल अॅसेंब्लीला वेळोवेळी सूचना करतो, तसेच राष्ट्राध्यक्ष अॅसेंब्लीला संबोधीत करून मार्गदर्शन करतो. राज्यघटनेच्या २२ ते २५ कलमात याचा स्पष्ट उल्लेख आहे.

**विधेयकांना मंजुरी :**

कायदेमंडळाने संमत केलेले विधेयक भारताप्रमाणेच नंतर राष्ट्राध्यक्षाकडे पाठवले जाते. एकूण तीस दिवसांच्या आत त्याला असे पारित विधेयक मान्य करावे लागते किंवा तो ते काही दुरुस्त्यांच्या शिफारसीसह परत माघारी कायदेमंडळाकडे पाठवतो मात्र असे काहीही न घडल्यास ते विधेयक रद्द होते व त्यावर नॅशनल अॅसेंब्ली पुन्हा फेरविचार करू शकते पण असे विधेयक दुरुस्तीसह वा दुरुस्तीशिवाय दुसऱ्यांदा कायदेमंडळाने संमत केले तर त्यावर राष्ट्राध्यक्षांना दहा दिवसात निर्णय घ्यावा लागतो किंवा कलम २४ अन्वये त्यावर जनमत घेता येते.

**वटहुकूम :**

याशिवाय भारतीय राष्ट्रपतीप्रमाणे पाकिस्तानी राष्ट्राध्यक्षांना अध्यादेश म्हणजेच वटहुकूम काढण्याचा अधिकार आहे. ज्यावेळी नॅशनल अॅसेंब्ली बरखास्त झाली असेल किंवा तिचे सत्रअधिवेशन चालू नसेल अशा अॅसेंब्लीच्या विश्रांतीच्या काळात जर गरज आहे असे वाटले तर राष्ट्राध्यक्ष स्वतःच्या घटनात्मक अधिकारात वटहुकूम काढू शकतो. मात्र त्यास १८० दिवसांच्या आत नॅशनल अॅसेंब्लीने संमती दिली तर वटहुकूमाचे रुपांतर कायद्यात होऊ शकते.

**आणीबाणीचे अधिकार :**

पाकिस्तानी राष्ट्राध्यक्षाला आणीबाणीविषयक अधिकार आहेत. हे राष्ट्र सतत अस्थिर व संघर्षातून वाटचाल करीत असल्याने पाकिस्तानात राष्ट्राध्यक्षांच्या आणीबाणीच्या अधिकाराला महत्त्व आहे. नॅशनल अॅसेंब्लीच्या बरखास्तीच्या अथवा विश्रांतीच्या काळात राष्ट्राध्यक्ष वटहुकूम काढून

आणीबाणीची घोषणा करू शकतो. खालील असाधारण परिस्थितीमध्ये राष्ट्राध्यक्षाला आणीबाणी घोषित करण्याचा अधिकार आहे.

१) पाकिस्तानमध्ये वा पाकिस्तानच्या एखाद्या प्रांतामध्ये युद्ध वा युद्धजन्य परिस्थितीने अस्थिरता निर्माण झाली आहे अशी राष्ट्राध्यक्षाची खात्री झाल्यास.

२) आर्थिकदृष्ट्या एखादा प्रांत सरकार चालवण्यास असमर्थ असल्यास.

३) या सर्व घोषणांना पुन्हा नॅशनल ॲसेंब्लीची संमती लागते.

**मंत्रीमंडळ आणि संसदीय सचिव** (Ministers and Parliamentary Secretaries)

पाकिस्तानमध्ये राष्ट्राध्यक्ष हा कार्यकारी प्रमुख असून तो त्याला मदत करण्यासाठी मंत्रीमंडळ तयार करू शकतो. तो नॅशनल ॲसेंब्लीमध्ये निवडून आलेल्या सदस्यांमधून ते तयार करू शकतो. नॅशनल ॲसेंब्लीमध्ये निवडून आलेल्या सदस्यांमधून पात्र असणाऱ्या सदस्यांमधून तो स्वतःचे मंत्रीमंडळ तयार करतो. याला 'राष्ट्राध्यक्षांचे मंत्रीमंडळ' असे म्हणतात (President's Council of Ministers) संसदीय पद्धतीपेक्षा ही मंत्रीमंडळात्मक पद्धती ही अध्यक्षीय पद्धतीला जवळची आहे. मंत्रीमंडळात समाविष्ठ मंत्र्याला राष्ट्राध्यक्षासमोर पद व गोपनियतेची शपथ घ्यावी लागते. या सर्वांना मदत करण्यास संसदीय सचिव असतो व तो शासकीय कामकाजाचे व्यवस्थापन करतो.

**महान्यायवादी** (Attorney General)

पाकिस्तानच्या राष्ट्राध्यक्षांना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या पात्रतेच्या सक्षम व्यक्तीला महान्यायवादी म्हणून नेमण्याचा अधिकार आहे. राष्ट्रपतीच्या सूचनेप्रमाणे तो काम करतो. महान्यायवादी हा कार्यकारी मंडळाचा कायदा क्षेत्रातील सल्लागार घटक असतो. याशिवाय संरक्षण मंत्री हा लेफ्टनंट जनरलच्या दर्जाचा निवृत्त अधिकारी असतो. तसे नसेल तर हे खाते राष्ट्राध्यक्ष स्वतःकडे घेतो. १९६४ मध्ये संरक्षण मंत्र्याशिवाय परराष्ट्र, वित्त, कॉमर्स, गृह व काश्मिरसंबंध, औद्योगिक व नैसर्गिक साधनसंपत्ती, संसूचन व संपर्क, शिक्षण व माहिती, कायदा व संसद व्यवहार, शेती व उद्योग, आरोग्य, कामगार व सामाजिक कल्याण ही खाती व त्याचे मंत्री काम करीत होते. साधारणतः पाकिस्तानमध्ये १७ खाती विभाग असून त्यातील ५ विभाग प्रत्यक्ष राष्ट्राध्यक्षांच्या सचिवालयाशी संलग्न असून ती त्यांच्या नियंत्रणात कॅबिनेट मंत्री म्हणून काम करतात. यात व्यवस्थापन, नियोजन, वित्तव्यवहार व घटक राज्य तथा सरहद्दीवरील प्रांत इत्यादी.

थोडक्यात पाकिस्तानमध्ये सर्वोच्च कार्यकारी अधिकार हे राष्ट्राध्यक्षाला असून नॅशनल ॲसेंब्लीस फारसे अधिकार नाहीत. कारण असेंब्लीने पारित केलेल्या विधेयकावर अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांचा आहे. आपले काम करताना त्याने तयार केलेले मंत्रीमंडळ हे राष्ट्राध्यक्षांचा सल्ला देते. हे मंत्री नॅशनल ॲसेंब्लीच्या कामकाजात भाग घेतात. आर्थिक बाबतीतही पाकिस्तानी राष्ट्राध्यक्ष अधिक अधिकार संपन्न आहे. पाकिस्तानमध्ये राष्ट्राध्यक्ष हा अमेरिकन अध्यक्षाप्रमाणे शासनाचा व देशाचा प्रमुख आहे. अर्थातच त्याचे मंत्री त्याचे सहकारी नसून ते खाजगी

सल्लागारासारखी भूमिका पार पाडतात. राष्ट्राध्यक्षाला ते जबाबदार असून त्याची मर्जी असेपर्यंत ते सत्तेवर राहातात. ते ॲसेंब्लीला जबाबदार नाहीत. त्यामुळेच पाकिस्तानात कार्यकारी मंडळ सर्वोच्च म्हणजेच राष्ट्राध्यक्ष सर्वोच्च व संसद मात्र बरीच दुर्बल दिसते. हा शासन प्रकार घटनात्मक अनियंत्रीत शासन प्रकार मानला जात असला तरी तो हुकूमशाहीमध्ये मोडत नाही.

**पाकिस्तानमधील न्यायालय व्यवस्था :**

पाकिस्तानमध्ये कार्यकारी मंडळ, कायदे मंडळ व न्यायमंडळ यात देशाची सर्वोच्च सत्ता विभागलेली आहे. देशाच्या सर्वोच्च ठिकाणी सर्वोच्च न्यायालय असून त्यात एक प्रमुख न्यायाधीश व कायद्याने ठरवलेले किंवा राष्ट्राध्यक्षांनी निश्चित केलेले इतर न्यायाधीश असतात. सर्वोच्च न्यायालयाच्या प्रमुख न्यायाधीशाची नेमणूक राष्ट्राध्यक्ष करतो. यावेळी तो इतर न्यायपंडित व न्यायाधीशांचा सल्ला घेतो. यासाठी -

१) अशी व्यक्ती पाकिस्तानची नागरिक असावी लागते.

२) अशा व्यक्तीकडे उच्च न्यायालयात किमान पाच वर्षे न्यायाधीश म्हणून कामाचा अनुभव असावा किंवा

३) अशा व्यक्तीकडे किमान पंधरा वर्षे वकीलीचा उच्च न्यायालयातला अनुभव असावा लागतो.

सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशाला राष्ट्रपतीसमोर आपल्या पद व जबाबदारीची शपथ घ्यावी लागते. सरन्यायाधीश आपल्या पदावर वयाच्या पासष्ट वर्षापर्यंत राहू शकतात. ते राजीनामा देऊ शकतात किंवा त्यांना घटनेच्या ५१-५२ अन्वये दूर करता येते. ज्यावेळी सरन्यायाधीशाचे पद रिक्त असेल वा ते गैरहजर अथवा काम करण्यास असमर्थ असतील त्यावेळी तात्पुरत्या स्वरूपात सर्वोच्च न्यायालयातील इतर न्यायाधीशांना सरन्यायाधीश पदाची जबाबदारी राष्ट्राध्यक्ष देऊ शकतात. तर इतर न्यायाधीशांची जागा सर्वोच्च न्यायालयात वरीलप्रमाणे तात्पुरती रिक्त असेल तर उच्च न्यायालयातील प्रमुख न्यायाधीशाला तात्पुरत्या स्वरूपात सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून राष्ट्रपती नेमू शकतो. सर्वोच्च न्यायालयातील कामकाज चालण्यास पर्याप्त संख्या अपुरी पडत असेल तर किंवा अतिरिक्त न्यायाधीशांची गरज असेल तर सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश लेखी स्वरूपात राष्ट्राध्यक्षाच्या मान्यतेने तशी मागणी करून उच्च न्यायालयातून काहींना सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून घेऊ शकतात. यावेळी त्यांना सर्वोच्च न्यायालयात असणारे अधिकार मिळतात पण कलम ५५ प्रमाणे या नेमणूका तात्पुरत्या व गरजेपुरत्या केलेल्या असतात.

इस्लामाबाद येथे पाकिस्तानचे सर्वोच्च न्यायालय आहे. पण १९७१ पूर्वी त्याचे वर्षातून किमान दोनदा कामकाज हे ढाक्का येथे होत असे.

**सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र** (Jurisdiction of the Supreme Court)

**(अ) प्रारंभिक अधिकार क्षेत्र :** पाकिस्तानी संघराज्यात केंद्र सरकार विरुद्ध घटक राज्ये अथवा राज्य किंवा राज्य विरुद्ध राज्य या सर्व संघर्षावर न्याय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. हे न्यायालयाचे प्राथमिक कार्यक्षेत्र असून असे संघराज्यीय वाद उच्च न्यायालयात चालवता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाचे हे प्रारंभिक कार्यक्षेत्र व पद्धती भारतीय सर्वोच्च न्यायालयासारखी आहे.

**(ब) पुनर्निर्णयाचे अधिकार क्षेत्र :** घटक राज्यातील उच्च न्यायालयांनी दिलेल्या निर्णयांच्या संदर्भात पुनर्निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. जर

१) उच्च न्यायालयाने एखादा वादविषय राज्यघटनेच्या संदर्भात असल्याचे उपस्थित केला तर

२) उच्च न्यायालयाने एखाद्या गुन्हेगाराला फाशीची शिक्षा दिली असेल वा त्याला जन्मठेप दिली असेल तर

३) कलम १२३ अंतर्गत उच्च न्यायालयाने कायदेशिर कारवाई केली असल्यास सर्वोच्च न्यायालय अशा खटल्यांच्या संदर्भात पुनर्विचार करू शकते.

**इतर न्यायिक अधिकार क्षेत्र :**

पाकिस्तानच्या राष्ट्राध्यक्षांना जर एखाद्या घटनात्मक कायदेशीर संदर्भात माहिती वा स्पष्टीकरण हवे असेल तर राष्ट्राध्यक्ष सर्वोच्च न्यायालयाला विचारून सल्ला घेऊ शकतो. असे वैधानिक विषयावरील मार्गदर्शन राष्ट्राध्यक्षाला करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.

याशिवाय प्रलंबित खटल्यांच्या संदर्भात विशेष लक्ष देण्याचा सर्वोच्च न्यायालयास अधिकार आहे. दुय्यम न्यायालये व उच्च न्यायालयात तयार झालेल्या प्रश्नांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अंतीम असतो.

भारताप्रमाणेच पाकिस्तानमध्येही सर्वोच्च न्यायालयालाही न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार आहे. नॅशनल ॲसेंब्लीने जर घटनाबाह्य कायदे तयार केले असतील तर असे कायदे घटनाबाह्य करण्याचा सर्वोच्च न्यायालयास अधिकार आहे. असे निर्णय इतर सर्व दुय्यम न्यायालयांवर बंधनकारक असतात. घटनेमध्ये दिलेल्या कायदेशीर तरतूदीनुसार व राष्ट्राध्यक्षांच्या मान्यतेने न्यायालयांचे नियम पद्धती व एकंदर प्रक्रिया ठरवण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. थोडक्यात पाकिस्तानच्या न्यायप्रक्रियेत सर्वोच्च न्यायालयाला अंतरीम स्वरूपाचे अधिकार आहेत.

**पाकिस्तानातील उच्च न्यायालये :**

भारताप्रमाणेच पाकिस्तानमध्ये प्रत्येक घटकराज्यासाठी एका उच्च न्यायालयाची व्यवस्था केलेली आहे. उच्च न्यायालयात एक प्रमुख न्यायाधीश व इतर काही दुय्यम न्यायाधीश असतात. ही संख्या कायद्याने निर्धारित केलेली असते किंवा राष्ट्राध्यक्षांनी निश्चित केलेली असते. उच्च

न्यायालयातील मुख्य न्यायाधीशाची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांना आहे. या नेमणूका करताना राष्ट्राध्यक्ष

१) सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशाचा सल्ला घेतो.

२) त्या घटक राज्याच्या राज्यपालाशी चर्चा करून त्यांचे मत जाणून घेतो.

३) अशी व्यक्ती पाकिस्तानी नागरिक आहे का, याची खातरजमा करतो.

४) अशा व्यक्तीला दहा वर्षाचा उच्च न्यायालयातील कामाचा अनुभव असावा.

५) अशा व्यक्तीने किमान दहा वर्षे नागरी कायदा विषयक क्षेत्रात काम केलेले असावे.

६) किंवा अशा व्यक्तीने जिल्हा न्यायालयात किमान तीन वर्षे न्यायाधीश म्हणून काम केलेले असावे.

७) किंवा त्याचे विधीसेवा देणारे कार्यालय दहा वर्षेपर्यंत कार्यरत असावे. असे अपेक्षीत आहे.

अशा न्यायाधीशांना उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशासमोर व मुख्य न्यायाधीशाला राज्यपालासमोर पदाची व कामाची शपथ घ्यावी लागते. वयाच्या पासष्ट वर्षेपर्यंत त्यांना काम करता येते किंवा वैयक्तीक कारणासाठी त्या अगोदर आपल्या पदाचा राजीनामा देता येतो.

**अतिरिक्त व जादा न्यायाधीश :** जर –

१) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश पद रिक्त असेल किंवा

२) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश गैरहजर अथवा काम करण्यास असमर्थ असतील. अशावेळी राष्ट्राध्यक्ष उच्च न्यायालयातील इतर पात्र न्यायाधीशांना तात्पुरत्या स्वरूपात उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नेमू शकतो. तसेच आवश्यकता भासल्यास जादा सक्षम न्यायाधीश राष्ट्राध्यक्ष कायदेशीर तरतूदीनुसार नेमू शकतो.

पूर्वी पूर्व पाकिस्तानसाठी ढाका येथे तर पश्चिम पाकिस्तानसाठी उच्च न्यायालय हे लाहोर येथे होते. आता ही दोन्ही राष्ट्रे वेगवेगळी स्वतंत्र असल्याने पाकिस्तानी उच्च न्यायालये ही लाहोर, कराची, पेशावर याठिकाणी आहेत. उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या बदल्या करण्याचा राष्ट्राध्यक्षांना अधिकार असून साधारणतः पाच वर्षानी त्यांना एका उच्च न्यायालयातून दुसऱ्या उच्च न्यायालयात बदलता येते पण त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची संमती लागते.

**उच्च न्यायालयांचे अधिकार क्षेत्र** (Juridiction of High Courts)

पाकिस्तानच्या राज्यघटनेत नमूद केल्याप्रमाणे उच्च न्यायालयाला आपले काम विशिष्ट मर्यादेत करता येते. यामध्ये –

१) एखाद्या व्यक्तीने तशा प्रकारे न्यायासाठी अर्ज केला असेल तर ज्यात राज्यसरकार जर त्या व्यक्तीला तिच्या मूलभूत अधिकारकृतीवर प्रतिबंध घालत असेल किंवा कोणती कृती वैधानिक आहे वा नाही याबाबत संभ्रम असेल तर उच्च न्यायालय अशा तक्रारीनंतर त्याची दखल घेऊ शकते.

२) जर एखाद्या व्यक्तीला बेकायदेशीररित्या तुरुंगात डांबण्यात आले असेल व अशी कृती चुकीची आहे हे उच्च न्यायालयास पटले तर त्यास न्यायालयासमोर उभे केले जाते. भारतातील बंदीप्रत्यक्षीकरणासारखा हा अधिकार आहे.

३) एखाद्या प्रशासकीय जागेवर तक्रारदाराचा अधिकार दावा असताना दुसऱ्यास ती अधिकार जागा दिली असेल तर. याला अधिकारपृच्छा (Quo-warranto) म्हणता येईल. सैन्यदलातील व्यक्तीसंदर्भात तक्रारींची दखल घेण्याचा उच्च न्यायालयाला अधिकार नाही.

४) उच्च न्यायालय इतर कनिष्ठ व दुय्यम न्यायालयांवर नियंत्रण ठेऊ शकते.

**सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधीशांसाठी सेवाशर्ती :**

अधिक गतिमान व निःपक्ष पद्धतीने लोकांना न्याय मिळावा म्हणून पाकिस्तानी राज्यघटनेने न्यायाधीशांसाठी काही सेवाअटी सांगितल्या आहेत. घटनेच्या दुसऱ्या विभागात त्याची माहिती आहे. या न्यायाधीशांना –

१) आपल्या पदाचा केंव्हाही राजीनामा देता येतो.

२) त्यांना पदावर असताना लाभाचे कोणतेही इतर पद वा नोकरी करता येत नाही.

पाकिस्तानमधील न्यायव्यवस्थेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिथे ''सर्वोच्च न्यायालयीन कौन्सिल'' आहे. त्यात सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश इतर दोन वरिष्ठ सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश, प्रत्येक उच्च न्यायालयाचा प्रमुख न्यायाधीश असतात. न्यायालयात विधीसंकेतांचे पालन होते का? यावर ते लक्ष ठेवतात. जर नॅशनल ॲसेंब्ली वा इतर माध्यमातून न्यायाधीश वैधानिक व घटनात्मक पद्धतीने वागत नाहीत असे राष्ट्राध्यक्षांना समजले तर ते नॅशनल ॲसेंब्लीला याची चौकशी करण्याचे आदेश देतात आणि या चौकशीत जर एखादा न्यायाधीश गैरवर्तन घटनाबाह्य अवैध मार्गांचा वापर वा अकार्यक्षम वाटत असेल तर त्याला काढून टाकण्याचा अधिकार नॅशनल ॲसेंब्लीच्या शिफारशीने राष्ट्राध्यक्षांना आहे. बऱ्याच वेळा राष्ट्राध्यक्षांनी या अधिकाराचा पाकिस्तानमध्ये गैरवापर केला आहे. न्याय प्रक्रियेत अनावश्यक हस्तक्षेपाची अनेक उदाहरणे पाकिस्तानमध्ये सापडतात. त्यामुळे पाकिस्तानमध्ये व्यवहारात लोकसत्ताक सामाजिक न्याय नसून तो सर्वस्वी राष्ट्राध्यक्ष व लष्करशहा असणाऱ्या राष्ट्राध्यक्षांच्या मर्जीवर चालतो. पाकिस्तानमध्ये सातत्याने अराजक असल्याचे हे एक कारण असावे. तेथील न्यायालयांना स्वातंत्र्य, सुरक्षा नसल्याने सामाजिक न्याय पाकिस्तानमध्ये दिसत नाही.

**पाकिस्तानची नवी राज्यघटना :**

पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान तयार झाल्यानंतर तयार झालेल्या पहिल्या १९५६ च्या राज्यघटनेत दोन्ही पाकिस्तानचा विचार झाला होता. १९७१ मध्ये बांगला देशाची (पूर्व पाक) निर्मिती झाल्यानंतर पाकिस्तानने नवी राज्यघटना तयार केली.

२० डिसेंबर १९७१ रोजी प्रे. याह्या खान यांनी राजीनामा दिला. त्यामुळे सर्व सत्ता झुल्फीकार अली भुट्टो यांच्या हातात आली. ते मार्शल लॉचे मुख्य प्रशासक होते. त्यांनी घटक राज्यांचे राज्यपाल २२ डिसेंबर १९७१ रोजी नेमले. त्यावेळी घटक प्रांतांना जादा स्वायत्तता देण्याचे त्यांनी घोषित केले. पुढे भुट्टोंनी मार्शल लॉ माघारी घेऊन नॅशनल असेंब्लीची १४ एप्रिल १९७२ रोजी इस्लामाबादेत रचना केली. त्याचवेळी ते १०४ विरुद्ध ३८ मतांनी राष्ट्राध्यक्ष झाले.

२० ऑक्टोबर १९७२ रोजी घटना परिषदेची रावळपिंडी येथे बैठक होऊन त्यात 'संघराज्यात्मक संसदीय शासनाला' मान्यता देण्यात आली. या करारात–

१) पाकिस्तान या राष्ट्राचा धर्म इस्लाम असेल.

२) राष्ट्राध्यक्ष हा ॲसेंब्ली व सिनेटच्या संयुक्त निर्वाचन मंडळाकडून निवडला जाईल.

३) सिनेटमध्ये सर्व घटकराज्यांना (अमेरिकेप्रमाणे) समान प्रतिनिधी पाठवता येतील. अशा तरतूदी होत्या.

४) मात्र नॅशनल अवामी पक्षाने संघराज्य पद्धती व प्रांतिक स्वायत्ततेला विरोध केला.

२ डिसेंबर १९७२ रोजी घटनेसाठी मसुदा समिती तयार करण्यात आली. यात संसदीय शासनपद्धतीतून घटक राज्यांच्या स्वायत्ततेचा संकोच केला गेला. नॅशनल ॲसेंब्लीमधून बहुमताने प्रधानमंत्री नेमावा. त्याच्या सहीशिवाय राज्यप्रमुखांनी घेतलेले निर्णय अवैध मानावेत असे सूचवले. तसेच इस्लामीक राज्य मान्य करताना मूलभूत व्यक्तीस्वातंत्र्य, श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र्य यांना स्थान देण्यात आले पण बिगर मुस्लीमाला राष्ट्राध्यक्ष होता येणार नाही ही तरतूद तशीच कायम केली. मात्र राज्यघटनेचे स्वरूप नक्की कसे असावे याबाबत कोणताही निर्णय एकमताने व विश्वासाने घेतला जात नव्हता. १ फेब्रुवारी १९७३ रोजी पत्रकार परिषदेत विरोधी पक्षांनी घटनासमितीवर टीका केली. त्यांचे हे प्रयत्न इस्लामविरोधी, लोकशाहीविरोधी, असंसदीय व संघराज्यविघातक आहेत असे विरोधी पक्षाचे मत होते.

१७ फेब्रुवारी १९७३ रोजी घटना विधेयकावर नॅशनल ॲसेंब्लीमध्ये चर्चा झाली. कायदा मंत्री अब्दुल हफिज पिरजादे यांनी विरोधी पक्षाला सहकार्याचे आवाहन केले. पण विरोधी पक्षांनी भुट्टोंच्या अकरा कलमी कार्यक्रमाला विरोध केला. भुट्टोंनी विरोधकांच्या सात मागण्या मान्य केल्यानंतर विरोधी पक्षाने बहिष्कार मागे घेतला व नवी पाकिस्तानची राज्यघटना तयार होण्याचा मार्ग मोकळा झाला.

या नव्या राज्यघटनेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे -

१) या घटनेने केंद्र व घटक राज्यात संसदीय शासन पद्धती स्वीकारली व केंद्रात प्रधानमंत्री तर घटक राज्यात मुख्यमंत्री शासन प्रमुख बनले.

२) १९६२ प्रमाणे ही राज्यघटना संघराज्याचा स्वीकार करणारी बनली. यात एक संघसरकार व चार घटकराज्ये तयार करण्यात आली. तसेच संघराज्याच्या प्रमुख तीन तत्त्वांचा म्हणजे कामाचे विभाजन, लिखित राज्यघटना व सर्वोच्च न्यायालयाची तरतूद राज्यघटनेत करण्यात आली.

३) या नव्या राज्यघटनेत एकूण बारा मूलभूत अधिकार समाविष्ट केले तसेच संघराज्य व घटक राज्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे टाकण्यात आली. हे सर्व भारताप्रमाणेच होते.

४) कलम नं. २२७ ते २३१ अंतर्गत नव्या राज्यघटनेने पाकिस्तान हे इस्लामीक राज्य असेल असे नमूद केले. अर्थातच लोकशाही, धर्मनिरपेक्षता व राज्यघटनावादाच्या विरुद्ध ही तरतूद होती. त्यांच्या मते केवळ मुस्लीमच सर्वोच्च पद चालवू शकतात.

५) या राज्यघटनेने (अ) स्वतंत्र न्यायमंडळ ज्यात सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाची क्रमबद्ध साखळी तयार केली (ब) निर्वाचन मंडळाची स्थापना करण्यात आली (क) राष्ट्रीय आर्थिक परिषद तयार केली जी राष्ट्रीय आर्थिक धोरण, उद्योग, उत्पादन, वाणिज्य, विकासनिधी याचा अभ्यास करेल (ड) ही राष्ट्रीय आर्थिक परिषद राष्ट्राध्यक्षांना आर्थिक धोरणाबाबत सल्ला देईल. (इ) यात केंद्र घटक आर्थिक संबंध, अनुदाने, करप्रणाली याचा विचार ही परिषद करेल. (ई) कौन्सिल ऑफ इस्लामीक आयडीयालॉजी, संसद, घटक राज्ये यांना इस्लामी तत्त्वज्ञानाबाबत मार्गदर्शन करेल. यात कुराण व सुन्नाहला आधार मानले जाईल.

६) ही नवी पाकिस्तानी राज्यघटना (१९७३) लिखित असून त्यात ३०० कलमे, विभाग व काही प्रकरणे यात विभागली आहे. यात चार परिशिष्ट्ये आहेत. यासाठी साधारणतः एकूण शंभर पृष्ठे खर्च पडली आहेत. १९५६ ला पहिली राज्यघटना, १९६२ प्रे. अयुब खान यांची दुसरी राज्यघटना, १९६९ ला प्रे. याह्याखान यांची तिसरी व २ एप्रिल १९७३ रोजी भुट्टो यांची चौथी राज्यघटना पाकिस्तानमध्ये सुरू झाली. ''आता आपली राज्यघटना तयार आहे. खडतर मार्ग संपला आहे व आपले प्रश्न ही राज्यघटना सोडवेल कारण राष्ट्राप्रती ती अर्पण करताना त्यामागे अल्लाचे आशिर्वाद आहेत.'' असे यावेळी झुल्फिकार अली भुट्टो म्हणाले होते.

### ४.२.३ समाज व अर्थव्यवस्था

(अ) सामाजिक संरचना - जाती, जमाती व अल्पसंख्यांक

(ब) सामाजिक चळवळी

(क) अर्थव्यवस्था व विकास

**(अ) सामाजिक संरचना – जाती जमाती व अल्पसंख्यांक**

पाकिस्तानची निर्मितीच मूळात धर्माच्या आधारावर झाल्याने पाकिस्तानला धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार करता आला नाही. मुस्लीम धर्म हा समतेवर आधारीत असला तरी पाकिस्तानमध्ये धार्मिक समता नाही कारण मुस्लीम धर्मातील शिया व सुन्नी पंथ तिथे असून त्यांच्यात प्रचंड संघर्ष आहे. त्यामुळे मुस्लीम धर्मात पाकिस्तानमध्ये धार्मिक ऐक्य व एकजिनसीपणा दिसत नाही. आर्थिकदृष्ट्या पाकिस्तानात प्रचंड विषमता असून फार छोटा वर्ग हा पारंपरिकदृष्ट्या सधन असून या वर्गातील युवकांनी इंग्लंड व मध्ययुरोपात शिक्षण घेतले असल्याने तो प्रशासनातही प्रभावी आहे तर बाकी बहुसंख्य समाज वाळवंटी भागात राहाणारा दरिद्री असून त्याला शिक्षण व इतर सुविधा नाहीत त्यामुळे तो मोठ्या प्रमाणात दिशाहिन बनला असून धार्मिक मूलतत्त्ववादामुळे दहशतवादाकडे व आक्रमक हिंसाचाराकडे वळला आहे.

राज्यघटनेच्या २२७ व्या कलमात असा स्पष्ट उल्लेख आहे की, हे राष्ट्र इस्लामला मानणारे असून पवित्र कुराण व सुन्नाहवर आधारीत आहे. म्हणूनच पाकिस्तानात 'इस्लामीक कौन्सिल' महत्त्वाची असून ती रशियन प्रेसिडियम वा पॉलिटब्युरोप्रमाणे अंतीम कार्यकारी, कायदेविषयक व न्यायविषयक सर्वोच्च परिषद आहे. ही परिषद इस्लामिक प्रथापरंपरा, तत्त्वज्ञान याचा वापर करण्यावर भर देते. इस्लाम धर्म हा असे मानतो की, 'इस्लामचे मुख्य काम हे मनुष्य व त्याचा निर्माता म्हणजे अल्ला यात अत्यंत श्रेष्ठ व पवित्र नाते तयार करणे होय. तसेच दुसऱ्या बाजुला मानसामानसात प्रेमाचे नाते तयार करणे होय.' म्हणूनच धर्म हा सर्वोच्च, शुद्ध, वैयक्तीक, चैतन्यदायी असा परमेश्वराशी जोडलेला अनुबंध आहे. ते असे मानतात की, इस्लामच्या आज्ञा या सामाजिक स्वरूपाच्या आज्ञा असल्याने वेगळ्या कृत्रीम आधुनिक राजकीय धर्मनिरपेक्षतेची गरज नाही. या काळात पाकिस्तान हे 'मुस्लीम राष्ट्र' आहे की 'इस्लामीक राष्ट्र' आहे असा एक वादविवाद रंगला होता. या शब्दांमधील बारकावे तपासताना असे म्हटले की, मुस्लीम राष्ट्र हे मुस्लीम बहुसंख्य जनतेचे प्रतिनिधीत्व करते तर इस्लामीक राष्ट्र हे इस्लामीक तत्त्वांचे पालन करते त्यामुळे तिथे बिगरमुस्लीम जनताही असू शकते. म्हणूनच १९५६ च्या राज्यघटनेत इस्लामीक रिपब्लीक ऑफ पाकिस्तान असा उल्लेख आहे. यातील इस्लामीक शब्द १९६२ ला काढून टाकला पण पुन्हा १९६३ च्या पहिल्या घटनादुरुस्तीने तो राज्यघटनेत टाकण्यात आला. म्हणूनच पाकिस्तानमध्ये हिंदू, ख्रिश्चन व बौद्ध धर्मिय लोक राहाताना दिसतात. पाकिस्तानच्या संदर्भात हे लोक अल्पसंख्यांक असून अलीकडच्या दहशतवादी कारवाया व इसिसच्या मूलतत्त्ववादामुळे या लोकांचे जीवन असुरक्षित बनले आहे. काश्मिरी पंडितांचे स्थलांतर हा आंतरराष्ट्रीय स्तरावर सतत चर्चेत असणारा विषय आहे.

पाकिस्तानचा उत्तरेकडील व वायव्येकडील प्रांत हा वाळवंटी मागास व आदिवासी समाजाने व्याप्त आहे. यात अमाब, चित्राल, दिर, स्वात, मालकंद, झोब, लोराली, दलबंदीन, चगई, मारी, भुगती, सीबी, पेशावरचा काही भाग व वरील जिल्ह्यात अल्पसंख्य भटक्या मुस्लीम टोळ्या राहातात. आफ्रिदी ही त्यातील एक मोठी मागास जमात आहे. याशिवाय सीमाभागात पख्तु, बलुचि व अफगाण

पठाणांचे वास्तव्य असून सध्या बलुचिस्तान हे भारताचे मित्र राष्ट्र बनल्याने पाकिस्तानची कोंडी झाली आहे. या मागास भागाच्या विकासासाठी नॅशनल ॲसेंब्ली व राष्ट्राध्यक्ष विशेष आर्थिक विकास कार्यक्रम राबवत असतात. पाकिस्तानमध्ये उर्दू ही राष्ट्रभाषा असून इंग्रजीचा वापरही प्रशासनात केला जातो. याशिवाय सीमाभागात पंजाबी, सिंधी, हिंदी, उत्तरेकडे पख्तु, बलुचि भाषाही बोलल्या जातात.

**आर्थिक, सामाजिक चळवळी आणि विकास :**

पाश्चात्य व आशिया खंडातील इतर राष्ट्रांच्या तुलनेत पाकिस्तान हे अत्यंत मागास व दरिद्री राष्ट्र आहे. शेती हेच त्यांचे उत्पन्नाचे प्रमुख राष्ट्रीय साधन असून ८०% जनता ही शेतीवर अवलंबून आहे. ७५% नागरीक श्रमिक शेतीवर काम करतात. जे साधारणतः ७१% परकीय चलन मिळवतात जे राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६०% आहे. ११४०००००० एकर एकूण क्षेत्रफळ असणाऱ्या जमिनीपैकी निम्मी जमिन शेतीची आहे व त्यातील निम्मी बागायती व पाण्याची आहे. सिंधू नदीचे हे खोरे असून पाकिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणात कापूस पिकतो. जो आंतरराष्ट्रीय व्यापारास उपयोगाचा आहे. सिंधू नदीवर मंगला धरण असून त्यामुळे शेतीला पाणीपुरवठा होतो. याच नदीवरील सक्कर धरणानेही पाकिस्तानमध्ये शेती विकास झाला आहे. या भागात व पंजाबमध्ये गहू मोठ्या प्रमाणात पिकतो. बार्ली व मका हेही त्यांचे शेती उत्पादन आहे. बाजरी, ज्वारीचे जिरायत पिक ते घेतात. साधारणतः पाकिस्तानमध्ये शेतीची वाटणी विषम असून पूर्वीचे मुस्लीम नवाब व धनिकांची शेती मजूर वर्ग करतो. त्यामुळे मोठी वर्गरचना इथे पहावयास मिळते. दक्षिण आशियात शेतीच्या असणाऱ्या सर्व समस्या पाकिस्तानमध्ये पहावयास मिळतात. यात अपुरे भांडवल, व्यवस्थापनाचा अभाव, मागास पद्धती, पाण्याचे दुर्भिक्ष, तंत्रज्ञानाचा अभाव इत्यादी. बलुचिस्तानच्या सीमावर्ती भागात मोठ्या प्रमाणात मेंढपाळीतून लोकर व्यवसाय चांगले उत्पन्न देणारा आहे. ही लोकर इंग्लंडमध्ये निर्यात होते. सियालकोट येथे म्हणजे पंजाब प्रांतात टेनिस रॅकेट व खेळाचे साहित्य तयार होते. त्याला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध आहे.

दक्षिण पश्चिमेकडील पाकिस्तानमध्ये खनिज संपत्ती सापडते. समुद्रकाठी मीठ तर हिंदूबाग या बलुचिस्तानच्या सीमेवर क्रोमाईट सापडते. ज्याचा स्टिल भांड्यात क्रोमियम म्हणून वापर होतो. सल्फाईट, बॉक्साईट, जिपसमचे मध्यम साठे इथे आहेत शिवाय भारताखालोखाल पाकिस्तानमध्ये पेट्रोलियम व खनिज तेलही सापडते. कराची येथे ऑईल रिफायनरी असून आशिया खंडातील ती मोठी रिफायनरी आहे. याशिवाय नैसर्गिक गॅसही येथे सापडतो. मात्र तो अपुरा असल्याने पाकिस्तान भारताकडून कोळसा आयात करते.

पाकिस्तानातील दळणवळणही मागास असून सायकल रिक्षा, बैलगाड्या या पारंपरिक साधनांचा सर्रास वापर केला जातो. तरी सुद्धा आज आधुनिक गाड्या, रेल्वे व विमान सेवा यांना पाकिस्तानमध्ये प्राधान्य मिळत आहे. अमेरिकेच्या सहकार्याने पाकिस्तानने आता भौतिक विकासाकडे वाटचाल केली असली तरी राष्ट्रीय उत्पन्नाच्या मोठा भाग ते लष्करी व्यवस्थापन, शस्त्रनिर्मिती व

खरेदी यावर खर्च करतात. भारतावर प्रभुत्व गाजवण्यासाठी चीन सातत्याने पाकिस्तानला सहकार्य करून काश्मिर प्रश्नाचे लक्ष्य तेवत ठेवताना दिसतो.

या असमतोल अर्थनीती व विकासामुळे पाकिस्तानमध्ये शिस्तबद्ध सामाजिक चळवळींची वाढ झालेली दिसत नाही. त्यामुळे तात्पुरते अतिचार गट, ॲनॉमिक गट (Anomic Groups) पाकिस्तानात तयार होतात. यात काश्मिरची मागणी करणारा व दहशतवादाला पाठिंबा देणारा गट लष्करे तोयबा, जैस ए महंमद, मुजाहिद्दिन इत्यादींचा समावेश होतो. याशिवाय अमेरिकेला विरोध करणारा गट, मलायाकासारख्या सुधारक मुलीला पाठिंबा व विरोध करणारे गट, हिंदूंच्या मंदिरांना संरक्षण देणारा गट, सीमाभागात बौद्ध मुर्तींचे जतन व दुसरीकडे तोडफोड करणारे गट, सांस्कृतिक गट, इस्लामी कायद्यांना प्राधान्य देणारा मुस्लीम मूलतत्त्ववादी गट, असे काही गट व चळवळी या देशात आहेत पण उदारमतवादी व सुधारणावादी चळवळी फारशा विकसीत नसून बुद्धिजीवी लोक, काही पत्रकार लेखक सातत्याने शांतता, विकास व स्थैर्यासाठी मागणी करताना दिसतात.

### ४.२.४ समकालीन राजकारण

(अ) पक्षीय राजकारण

(ब) एकी व एकात्मतेला आव्हान

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात ज्याप्रमाणे राष्ट्रीय काँग्रेस हा एकच पक्ष होता व त्यातून पुढे अनेक पक्ष तयार झाले तसेच पाकिस्तानमध्ये पाकिस्तानी स्वातंत्र्य व निर्मितीसाठी काम करणारा पाकिस्तान मुस्लीम लीग हा एकमेव मुख्य पक्ष होता. बॅ. जीनासारख्या नेत्याने या पक्षाची मुस्लीम समाजात आदराची भावना तयार केली होती. हा पक्ष मुस्लीम पाकिस्तानी राष्ट्रवादावर उभा होता पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अंतर्गत संघर्षामुळे व बॅ. जीनांच्या मृत्यूनंतर मुस्लीम लीगचे महत्त्व कमी होऊन अनेक पक्ष पाकिस्तानमध्ये तयार झाले यांची माहिती खालीलप्रमाणे–

#### १) पाकिस्तान मुस्लीम लीग :

सुरुवातीच्या काळात सलग सात वर्षे मुस्लीम लीगने केंद्र व प्रांतात प्रभुत्व गाजवले. लीग ही दैवी पार्टी असून ती कायम स्वरूपी पाकिस्तानमध्ये राज्य करणार आणि विरोधी पक्ष हे या दैवी पक्षाचे विरोधक आहेत असे चित्र तेंव्हा रंगवले गेले. जुलै १९५४ मध्ये पुढील वीस वर्षांसाठी विरोधी पक्षांवर बंदी घालण्यात आली. यावेळी लियाकत अली यांनी केलेले भाषण किती संकुचित धर्मवादी व लोकशाही स्वातंत्र्यविरोधी होते याची प्रचिती येते. अशा विचारांमुळे खुले दबावगट व लोकसत्ताक पक्ष पाकिस्तानमध्ये तयार झाले नाहीत. लियाकत अली म्हणाले, ''मुस्लीम लीगला पार्लमेंटपेक्षा जास्त महत्त्व आहे कारण माझा अशा विश्वास आहे की, लीगची शक्ती म्हणजे पाकिस्तानची शक्ती होय. त्यामुळे मी घटना समितीमुळे प्रधानमंत्री झालो नसून लीगमुळे प्रधानमंत्री झालो आहे.'' प्रस्तुत विधानात पक्षीय हुकूमशाहीची मूल्ये आपणास दिसतात. या पक्षाने आपल्या जाहिरनाम्यात पुढील प्रकारचे कार्यक्रम व धोरणे राबवण्याचे जाहीर केले होते. यात–

पाकिस्तानचे स्वतंत्र परराष्ट्र धोरण असेल, हा पक्ष जहागिरदारी व सरंजामशाही बंद करेल. तसेच स्वतंत्र निर्वाचन मंडळ तयार करेल. उद्योगधंद्याचे हा पक्ष राष्ट्रीयकरण करेल. न्यायमंडळाला स्वातंत्र्य, सुरक्षा व स्वायत्तता दिली जाईल. तसेच न्यायमंडळाला कार्यकारी व कायदेमंडळापासून वेगळे केले जाईल. हा पक्ष लोकांच्या राहाणीमानाचा दर्जा उंचावेल. पण रिपब्लीकन पक्ष तयार झाल्यावर या पक्षाची लोकमान्यता खालावली व सप्टेंबर १९५६ मध्ये तो पहिल्यांदा विरोधी पक्ष बनला. कारण या पक्षाने उर्दूचा आग्रह धरल्याने पूर्व पाकिस्तानात त्यास विरोध झाला. या पक्षातील एका व्यक्तीची अधिकारशाही लोकांना आवडली नाही. अयुब खान सत्तेवर आल्यावर १९५८ मध्ये त्यांनी अनेक पक्षांवर बंदी लादली. अवामी लीग व नॅशनल अवामी पक्षांच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले. हा काळ अस्थिरतेचा व मार्शल लॉ म्हणजे आणीबाणीचा असल्याने पाकिस्तानमधील आधीच दुर्बल राजकीय प्रक्रिया आणखीनच मंद झाल्या. पुढे अयुब खान १९६३ मध्ये मुस्लीम लीगमध्ये आले व राष्ट्राध्यक्ष बनले. १९६५ ची राष्ट्राध्यक्षाची निवडणूक ते मुस्लीम लीग पक्षाच्या तिकीटावर लढले. त्यामुळे पाकिस्तान मुस्लीम लीगची नव्याने बांधणी सुरू झाली. एक प्रभावी सरकार असावे. वेगवान आर्थिक प्रगती व मुस्लीम तत्त्वज्ञानाचा प्रसार यावर त्यांनी भर दिला. पण तरीही या काळात झालेले सत्तेचे केंद्रिकरण लोकांना आवडणारे नव्हते. त्यांच्याकडे लोकांना आकर्षित करणारा असा इतर विधायक कोणताही कार्यक्रम नव्हता. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था व विशेषतः पूर्व पाकिस्तान (सध्याचा बांगला) मध्ये मुस्लीम लीगचे महत्त्व कमी होऊ लागले. त्यामुळे पूर्व पाकिस्तानात अवामी लीगचे तर पश्चिम पाकिस्तानात नॉर्थ वेस्ट फ्रंटीयर प्रोव्हिन्स (एनडब्ल्यूएफपी) सारख्या पक्षांनी जोर धरला. त्यांनी संघराज्य, घटक राज्यांचे सार्वभौमत्व व स्वायत्तता, खुल्या निवडणूका, प्रौढ मताधिकार, लोकमताला महत्त्व यावर भर दिला.

**२) अवामी (मुस्लीम) लीग व नॅशनल अवामी पक्ष**

१९४९ मध्ये मुस्लीम प्रखर राष्ट्रवादाला व आक्रमक कडवेपणाला विरोध करणाऱ्या या पक्षाची स्थापना पूर्व पाकिस्तानात (बांगला देश) झाली. भाषिक आधार हा या पक्षाचा मुख्य आधार होता. तिने उर्दूला विरोध करून बंगाली या स्थानिक भाषेचा आग्रह धरला. मौलाना अब्दुल हमीद खान भाषानी हे या पक्षाचे प्रमुख होते. जे पूर्वी आसाम मुस्लीम लीगचे अध्यक्ष होते. या पक्षाचे सेक्रेटरी शामसुल हक हे विद्यार्थी नेते होते व पुढे बांगला देशच्या स्वातंत्र्याचे प्रमुख पुरस्कर्ते शेख मुजबूर रहेमान हे यावेळी पक्षाचे तरुण कार्यकर्ते होते. साधारणतः १९४८-१९४९ मध्ये भाषिक अस्मितेमधून या पक्षाची निर्मिती झाली असल्याने या पक्षाने स्वतंत्र बांगला देशची मागणी याच दरम्यान केली. १९५३ मध्ये या पक्षाने त्यांच्या नावातील मुस्लीम शब्द काढून पक्षाचे नाव अवामी लीग असे केले. राष्ट्रीय संपत्तीचे समान वितरण, ज्यूट व्यवसायाचे राष्ट्रीयकरण व ज्यूट उत्पादकांना योग्य मोबदला, सामूहिक शेती व समाजवादाचे प्रयोग, सूतगिरण्यांमधील मानवी श्रमाऐवजी त्याचे यांत्रिकीकरण, वेगवान औद्योगिकरण, मोफत व सक्तीचे शिक्षण, वृत्तपत्र, भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, न्यायमंडळाला स्वातंत्र्य, बंगालीला राष्ट्रभाषेचा सर्वत्र समान दर्जा व पाकिस्तान मुस्लीम लीगला विरोध ही या पक्षाची प्रमुख तत्त्वे होती. या पक्षाच्या निर्मितीमुळे पाकिस्तानातील पक्षांचे ध्रुवीकरण

वाढू लागले व त्याचे दूरगामी परिणाम पाकिस्तानला भोगावे लागले तर पूर्व पाकिस्तानात स्वतंत्र बांगला देश निर्मितीच्या (सोनार बांगला) प्रक्रियेला वेग आला. ६ जून १९७० रोजी अवामी लीगने आपला जाहिरनामा प्रसिद्ध केला. तो लोकसत्ताक व समाजवादी स्वरूपाचा होता. शिवाय यात पाकिस्तानी सनदी सेवा रद्द करणे. वास्तविक संघराज्य स्वीकारताना स्थानिक स्वराज्य संस्थांना व्यापक अधिकार देणे यावर त्यांनी भर दिला.

**नॅशनल अवामी पक्ष** (NAP)

या पक्षाची स्थापना जुलै १९५७ रोजी झाली. हा पक्ष आठ अल्पसंख्य गटांचा मिळून तयार झाला होता. यात आझाद पाकिस्तान, गणतंत्र दल यासारखे छोटे पक्ष होते. मैयान इफ्तिकारुद्दिन, जी. एम. सैद व खान अब्दुल गफारखान (सरहद्द गांधी) या गांधीवादी बलुचि नेत्यांनी या पक्षाचे नेतृत्व केले. खान अब्दुल गफारखान यांची खुदाई खिदमतगार (रेड शर्ट) ही उदारमतवादी संघटना यामध्ये होती. बलुचिस्तानला पाकिस्तानने खास स्वायत्तता द्यावी अशी मागणी त्यांनी सातत्याने केली.

**३) जमात–इ–इस्लाम आणि जस्टीस पक्ष**

जमात–इ–इस्लाम या पक्षाची निर्मिती राजकीय पक्ष कायदा पारित झाल्यानंतर झाली. आपला पक्ष राष्ट्रीय पक्ष आहे. असा त्यांचा दावा होता. हा पक्ष दोन्हीही पाकिस्तानमध्ये काम करीत होता. पश्चिम पाकिस्तानमध्ये जमातला सनातन कर्मठ धार्मिक लोकांचा पाठिंबा होता. पश्चिम पाकिस्तानमध्ये जमातला विद्यार्थ्यांनी पाठिंबा दिला तर पूर्व मध्ये विद्यार्थी डाव्या व राष्ट्रवादी चळवळीकडे वळले. या पक्षाची तत्त्वे पुढीलप्रकारची होती. यात–

१) धर्मनिरपेक्षतेच्या विरोधात देवाला शरण जाणे.

२) राष्ट्रवादाविरुद्ध मानवतावाद महत्त्वाचा मानणे.

३) देवाचे प्रभुत्व मान्य करणे.

४) भांडवलशाही व साम्यवादी अर्थव्यवस्थेला विरोध करून मुस्लीम अर्थनीती स्वीकारणे.

५) आधुनिक बँकप्रणाली व व्यवस्थापनास विरोध करणे.

६) कुराण व सुन्नाहचा बौद्धिक व तार्किकदृष्ट्या लोकांमध्ये प्रसार करणे त्यासाठी व्याख्यान, परिषदा, मासिके यातून प्रयत्न करणे.

७) राजकीय सत्ता परावर्तीत करून जे लोक देवाला मानतात. अल्ला व रसुलचे कायदे पालन करून मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात इस्लामचा प्रसार करणे इत्यादी तत्त्वप्रणाली व कार्यक्रम त्यांनी सांगितले.

**जस्टिस पार्टी :**

अझहर खान या विमानदलातील प्रमुखाने १९६५ मध्ये या पक्षाची स्थापना केली. धर्मनिरपेक्षता व सामाजिक न्याय हे त्यांचे उद्दिष्ट होते. मानवी कटूता ही आर्थिक कारणापेक्षा आग्रही वृत्तीमुळे येते असा जस्टिस पार्टीचा विश्वास होता. यासाठी त्यांनी मुक्त स्वतंत्र पत्रकारितेवर भर दिला. हा पक्ष लोकशाहीवर विश्वास ठेवणारा होता. मात्र या पक्षाने निश्चित असा शासनप्रकार, घटनात्मक मार्ग सांगितला नाही अथवा समकालीन ज्वलंत प्रश्नावर त्यांनी कोणतेही भाष्य केले नाही.

**४) पाकिस्तान पीपल्स पार्टी :**

१ डिसेंबर १९६७ रोजी झुल्फीकार अली भुट्टो (Z. A. Bhutto) यांनी पाकिस्तान पीपल्स पार्टीची स्थापना केली. ऑगस्ट १९६६ मध्ये परराष्ट्र मंत्री असताना प्रें. अयुब खान आजारपणाच्या रजेवर गेले. त्या काळात भुट्टोनी अयुब खान यांच्या विरोधात बंड पुकारले. इतर कोणत्याही प्रस्थापित पक्षात जाण्याऐवजी भुट्टोनी स्वतःचा पाकिस्तान पीपल्स पक्ष (पीपीपी) स्थापन केला. 'इस्लामी समाजवाद' स्थापन करणे हे त्यांचे प्रधान ध्येय होते. या काळात भुट्टोंनी अयुबखान यांच्या हुकूमशाहीवर टीका केली. भुट्टोंनी आपल्या पक्षाचे तीन प्रमुख आधार सांगितले यात ''इस्लाम, समाजवाद व लोकशाही'' तसेच त्यांनी काश्मिर, चीन व धोरणे निश्चिती यावर भर दिला. 'तुम्ही मला सत्ता द्या, मी तुम्हाला काश्मिर देतो' ही त्यांची घोषणा होती. भारताशी चर्चा करून हा प्रश्न मिटवता येईल असे त्यांना वाटत होते. चीनबद्दल त्यांच्या मनात आदराची भावना होती. शासनव्यवस्थेत पायाभूत पुरोगामी प्रयोग करावे अशी भुट्टोंची इच्छा होती. २५ फेब्रुवारी १९६९ ला दिलेल्या मुलाखतीत इंग्लंडचा पाकिस्तानला विरोध का? याची त्यांनी चिकित्सा केली. काश्मिर प्रश्न व इंग्लंडचे सुवेझ प्रश्नाबाबतचे धोरण यामुळे इंग्लंड पाकिस्तानला विरोध करते. असे ते म्हणत. पुढे ते म्हणतात, आम्ही यापुढेही पेकींग, मास्को व वॉशिंग्टनशी चचा करू, द्विपक्षीय चर्चेवर आमचा विश्वास आहे. भुट्टोंनी 'द मिथ ऑफ इंडिपेंडन्स' (The Myth of Independence) हे पुस्तक एप्रिल १९६९ मध्ये प्रसिद्ध केले. बांगला निर्मितीनंतर भुट्टोंचे महत्त्व कमी झाले व लष्करप्रधान पाकिस्तानमध्ये झिया उल हक यांनी भुट्टोंवर न्यायालयीन कारवाई करून त्यांना फाशी दिले. विमान अपघातात पुढे झियांचाही मृत्यू झाला. पाकिस्तान पीपल्स पार्टीच्या आधारे बेनझीर भुट्टो, बिलावल भुट्टो यांनी सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला पण बेनझीर भुट्टोंची हत्या झाली. तिच्या नवऱ्याला घोड्यांच्या व्यापारातील घोटाळ्यात अटक झाली व पुन्हा नवाब शरिफ, परवेझ मुशर्रफ यांनी सत्ता वापरली मात्र पाकिस्तानातील अंगभूत अस्थिरता, हिंसा, दहशतवाद कोणालाही दूर करता आला नाही.

## ४.३ सारांश :

बॅ. जीनांनी मांडलेल्या द्विराष्ट्रवादातून तथा हिंदू मुस्लीम समांतर धर्म व या दोहोतील दंगली संघर्षामुळे १४ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तानची निर्मिती झाली. दक्षिण आशिया खंडावर प्रभाव

टाकणारे पाकिस्तान हे महत्त्वाचे राष्ट्र आहे. साधारणतः पाकिस्तानचा वासाहतिक इतिहास म्हणजे भारताचा इतिहास असून भारतीय व ब्रिटिश राजवटीतील स्वातंत्र्यासाठीचे संघर्ष, राष्ट्रीय काँग्रेसची राष्ट्रवादी वाटचाल पाकिस्तानलाही लागू होते. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर तिथे सर्व प्रकारचे प्रश्न त्यांच्यासमोर उभे राहिले, यात निर्वासीत, स्थलांतराचा प्रश्न, राज्यघटना निर्मिती, शासनसंस्थेची निवड, निवडणूका, पक्षपद्धती, कायदा, सुव्यवस्था, न्याय, प्रशासन, परराष्ट्र धोरण, काश्मिरचा प्रश्न, अर्थनीती, शेती, शिक्षण इत्यादींचा समावेश होता. स्वातंत्र्यानंतर तिथे राज्यघटना तयार झाली पण त्यावर मुस्लीम मूलतत्त्ववादाचा प्रभाव होता. त्यामुळे ही पहिली घटना पाकिस्तानला स्थिरता, शांतता व विकास देऊ शकली नाही. त्यामुळे १९६० ते १९७० च्या दशकात मार्शल लॉ तयाार झाले. याह्याखान व अयुबखान यांनी एकूण दोनवेळा त्याचा वापर करून लष्करप्रधान अध्यक्षीय पद्धती राबवली. १९७१ ला बांगला देशनिर्मितीनंतर पुन्हा नव्याने राज्यघटना तयार करण्यात आली व त्यात संसदीय संघराज्यीय लोकशाहीचा स्वीकार करण्यात आला तरी मूळ धर्मांधता तशीच टिकून राहिली.

पाकिस्तानने संसदीय व अध्यक्षीय पद्धतीला जोडणारी शासनपद्धती स्वीकारली आहे. केंद्रिय कायदेमंडळाला तिथे नॅशनल ॲसेंब्ली म्हणतात. राष्ट्राध्यक्ष हा शासनाचा व देशाचा प्रमुख असून तो स्वतः मंत्रीपरिषद तयार करतो. राष्ट्राध्यक्षाच्या संमतीशिवाय कायदे तयार करता येत नाहीत. त्यांनी सल्ला देण्यास समिती पद्धती स्वीकारली आहे. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या तीन शाखात पाकिस्तानी शासनव्यवस्था विभागलेली आहे. कायदेमंडळाला सहकार्य करण्यास महान्यायवादी आहे. पाकिस्तानात सर्व सत्ता राष्ट्राध्यक्षाच्या हातात आहे. भारताप्रमाणे पाकिस्तानात एक सर्वोच्च न्यायालय व घटक राज्यांसाठी उच्च न्यायालयाची सोय आहे. सर्वोच्च न्यायालयास प्रारंभिक, पुनर्निर्णयाचा व न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार आहे. या न्यायालयात केंद्र, घटक वा घटक राज्य विरुद्ध घटक राज्य यासारखे खटले चालतात तर उच्च न्यायालयात दुय्यम राज्यांतर्गतचे खटले चालतात. पाकिस्तानमधील कायदा निर्मिती, न्याय व एकंदर प्रशासनावर मुस्लीम कायदे, सुन्नाह इत्यादींचा प्रभाव आहे. त्यामुळे या देशात लोकशाही, स्वातंत्र्य व धर्मनिरपेक्षता ही उदारमतवादी मूल्ये फारशी आलेली दिसत नाही.

पाकिस्तानमधील सामाजिक रचना विषम स्वरूपाची आहे. या देशात एकच मुस्लीम धर्म बहुसंख्यांकाचा असला तरी या धर्मात शिया व सुन्नी हे दोन परस्परविरोधी पंथ असून अल्पसंख्यांक हिंदू, जैन, बौद्ध व पश्चिम उत्तर भागात बलुचि, पख्तु आणि आदिवासी आफ्रिदी सारख्या जमाती आहेत. मोठ्या प्रमाणात दारिद्र्य, मागासलेपण हे पाकिस्तानचे वैशिष्ट्य असून मूठभर जमिनदार नवाब वर्ग इथे आहे. त्यातील काहीजण मध्य युरोपात शिकून प्रशासनात काम करताना दिसतात. शेती हे आर्थिक उत्पन्नाचे साधन असून ८०% जनता शेती करते. कापूस, गहू, बाजरी, बार्ली, मका हे येथील मुख्य उत्पादन असून पाण्याचा मोठा प्रश्न तिथे आहे. पश्चिम उत्तरेकडे खनिज संपत्ती थोडीफार सापडते पण ती अपुरी आहे. पाकिस्तान मोठ्या प्रमाणात लष्करावर खर्च करते त्यामुळे महागाई प्रचंड आहे. शेती, शिक्षण, आरोग्य, रस्ते, तंत्रज्ञान मागास आहे. मोठ्या प्रमाणात हिंसक अतिचार गट, दहशतवादी गट तिथे सतत अस्थिरता करताना दिसतात कारण मुस्लीम मूलतत्त्ववाद हे

पाकचे प्रमुख लक्षण आहे. त्याला चीन व अमेरिकेचा पाठिंबा आहे. तरी काही पुरोगामी, शांततावादी, उदारमतवादी चळवळी इथे काम करताना दिसतात.

पाकिस्तानमध्ये बहुपक्षपद्धती असून इस्लामी तत्त्वज्ञान हा बहुतेक पक्षांचा कमीजास्त आधार आहे. यात पाकिस्तान मुस्लीम लीग, अवामी लीग, नॅशनल अवामी लीग, जमात-इ-इस्लाम, जस्टिस पार्टी, पाकिस्तान पीपल्स पार्टी याशिवाय काही अपक्ष पक्ष पाकिस्तानमध्ये आहेत. पाकिस्तानमध्ये लोकसत्ताक राज्यघटना आहे. एकूण बारा मूलभूत अधिकार लोकांना आहेत. राज्याची मार्गदर्शक तत्त्वे आहेत. कार्यकारी, कायदे व न्यायमंडळ स्वतंत्र आहे. न्यायालयीन पुनर्विलोकन आहे. राष्ट्राध्यक्ष सार्वभौम आहे. असे सर्व असताना निवडणूका पार पडत असतानाही समाजात लोकशाही विचारांचे, उदारमतवाद, समाजवाद, कल्याणकारी राज्य व एकंदर विकासाचे अभिसरण व समाजीकरण झालेले नाही. अमेरिका व चीनच्या प्रभुत्वाखाली पाकिस्तानचा एक बाहुले म्हणून बडी राष्ट्रे वापर करताना दिसतात. त्यामुळे त्यांचे परावलंबन वाढले असून सर्व मानवी हक्कांची पायमल्ली करणारे, दहशतवादाला पाठिंबा देणारे, बलुचिस्तानला त्रास देणारे, काश्मिरच्या निमित्ताने भारतात अस्थिरता पसरवणारे, हुकूमशाही, मागास व बदनाम राष्ट्र म्हणून पाकिस्तान ओळखले जाते. म्हणूनच सध्या अमेरिकन अध्यक्ष ट्रम्प यांनी पाकिस्तानला दिली जाणारी आर्थिक मदत बंद केली आहे.

## ४.४ महत्त्वाच्या पारिभाषिक संकल्पना

- **धार्मिक मूलतत्त्ववाद :** कर्मठ, सनातनी, संकुचित धर्म विचार व त्यावर आधारीत चळवळी, उदा. मुस्लीम वा हिंदू मूलतत्त्ववाद
- **समकालीन :** त्या काळातील
- **प्रेसिडियम :** रशियातील सर्वोच्च मार्क्सवादी गटाची कार्यकारिणी व मुख्य धोरण निश्चिती करणारी सार्वभौम संघटना
- **सार्क :** दक्षिण आशियाई परस्पर सहकार्य करणारी संघटना.
- **नाम :** NAM - अलिप्ततावादी संघटना
- **अतिचार गट :** अचानक तयार होणारे गट उदा. हिंसक गट, आक्रमक दंगली इ.

## ४.५ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे / वस्तुनिष्ठ प्रश्न

१. पाकिस्तान निर्मितीचा शिल्पकार कोणास म्हणतात?

२. पूर्व पाकिस्तान म्हणजे सध्याचे कोणते राष्ट्र?

३. बेनझीर भुट्टोंचा पक्ष कोणता?

४. कोणत्या नेत्याच्या काळात झेड. ए. भुट्टोना फाशी झाली?

५. मार्शल लॉ म्हणजे काय?

६. बांगला देशाला कोणाच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य मिळाले?

७. पाकिस्तानी राजकारण कोणत्या प्रमुख दोन तत्त्वावर चालते?

८. क्वेट्टा शहर कशासाठी प्रसिद्ध आहे?

९. पाकिस्तानी शासन व्यवस्थेतील ठळक वैशिष्ट्ये कोणती?

**उत्तरे :** १. बॅ. जीना यांना पकिस्तान निर्मितीचे शिल्पकार म्हणतात.

२. पूर्व पाकिस्तान म्हणजे सध्याचे बांगला राष्ट्र होय.

३. बेनझीर भुट्टोंचा पक्ष पाकिस्तान पीपल्स पार्टी होता.

४. झेड. ए. भुट्टोंना झिया उल हक च्या काळात फाशी झाली.

५. मार्शल लॉ म्हणजे आणीबाणी, पाकिस्तानमध्ये त्यावेळी राष्ट्राध्यक्ष हे लष्कराचे प्रमुख बनतात.

६. बांगला देशाला १९७१ मध्ये शेख मुजबूर रहेमान यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य मिळाले.

७. पाकिस्तानी राजकारण कुराण, सुन्नाह या मुस्लीम अभिजात तत्त्वज्ञानावर चालते.

८. क्वेट्टा शहर सक्कर धरणाजवळ असून तिथे युद्धसाहित्याचे कारखाने आहेत.

९. पाकिस्तानच्या पश्चिम उत्तर तथा वायव्येकडे, पख्तुनिस्तान, बलुचिस्तान व अफगणिस्तान ही राष्ट्रे आहेत.

१०. पाकिस्तानी शासन संसदीय, अध्यक्षीय पद्धतीचे मिश्रण असले तरी लष्करशाही व मुस्लीम मूलतत्त्ववादावर उभे आहे. त्यांनी संघराज्य लोकशाहीचा स्वीकार केला आहे.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. पाकिस्तानच्या राजकारणाचा ऐतिहासिक विकास कसा झाला? ते स्पष्ट करा.

२. पाकिस्तानच्या राष्ट्राध्यक्षाची निवड व त्यांचे अधिकार विशद करा.

३. पाकिस्तानच्या नॅशनल अॅसेंब्लीची रचना व कामे सांगा.

४. पाकिस्तानातील न्यायालयावर निबंध लिहा.

५. पाकिस्तानातील सामाजिक चळवळीवर भाष्य करा.

६. पाकिस्तानातील पक्षपद्धतींची वैशिष्ट्ये सांगा.

**ब) थोडक्यात टीपा लिहा.**

१. द्विराष्ट्रवाद व पाकिस्तानचे स्वातंत्र्य

२. राज्यघटना निर्मिती व पाकिस्तान

३. पाकिस्तान पीपल्स पार्टी

४. दहशतवाद व पाकिस्तान

५. पाकिस्तान व अल्पसंख्य जातीजमातींचा प्रश्न

६. अस्थिरता व पाकिस्तान

७. अमेरिका, पाकिस्तान व चीन मैत्रीची मीमांसा

## ४.७ ससंदर्भ ग्रंथ


1. Sharan Parmatma – Government of Pakistan, Development and Working of the Political System – Meenakshi Prakashan, Meerut, 1975.
2. Jahan R. – Pakistan Failure in National Integration.
3. Choudhury G. W. – Constitutional Development in Pakistan.

४. जोशी प. ल. : भारतीय राज्यघटना व शासनव्यवस्था, मंगेश प्रकाशन, नागपूर.


❑❑❑